16-04-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
SGJ/ ST/ D/ 10:00

**( सभापतीस्थानी मा. तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कोरम नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात यावे.

**तालिका सभापती** ( श्री. रामनाथ मोते ) : ठीक आहे. सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक १०.०१ ते १०.१५ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी मा.तालिका सभापती श्री. विनायक मेटे )**

**तालिका सभापती ( श्री. विनायक मेटे )** : नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेला सुरुवात करण्यात येत आहे.

पृ.शी. मराठी माध्यमातून हिंदी आणि अन्य माध्यमातून मराठी हद्दपार करण्याचे होत असलेले कारस्थान

मु.शी. :मराठी माध्यमातून हिंदी आणि अन्य माध्यमातून मराठी हद्दपार करण्याचे होत असलेले कारस्थान या विषयावर श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती ( विनायक मेटे )** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"राज्य शिक्षण मंडळाने 5 वीच्या नव्या अभ्यासक्रमात हिंदी विषय बंद केला आहे. तसेच इंग्रजी आणि अन्य माध्यमातील मराठी (दुसरी भाषा) या विषयाची पुस्तके अत्यंत दुर्बोध करुन ठेवली आहेत. राज्याच्या त्रिभाषा सूत्राच्या धोरणात अचानक बदल करुन मराठी माध्यमांच्या लक्षावधी विद्यार्थ्यांचे नुकसान करण्यात आले आहे. देशाची संपर्क भाषा, चित्रपट, उद्योग आणि इलेक्ट्रानिक माध्यमे यातील व्यावसायिक संधीपासून मराठी विद्यार्थी वंचित होणार आहेत. हिंदी विषय माध्यमिक स्तरावर कायम ठेवण्याची आवश्यकता आहे. मराठी सुलभ व आनंददायी करण्याची आवश्यकता आहे. हिंदी-संस्कृत याप्रमाणे हिंदी-ऊर्दू, हिंदी-पाली या पध्दतीने द्वितीय भाषेमध्ये अनेक जोड पर्याय देण्याची आवश्यकता आहे. मराठी माध्यमातून हिंदी आणि अन्य माध्यमातून मराठी हद्दपार करण्याचे कारस्थान होत आहे. याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच माननीय शिक्षणमंत्र्यांचे आभार मानतो आणि अभिनंदनही करतो. हिंदी विषय बंद करण्यासंबंधीचा मुद्दा मागच्या आठवड्यामध्ये सभागृहामध्ये नियम 93 अन्वये उपस्थित करण्यात आला होता. त्या विषयावर माननीय शिक्षण मंत्र्यांनी अतिशय सकारात्मक भूमिका घेतली आहे, त्यामुळे पहिल्यांदा त्यांचे आभार मानल पाहिजे.

हिंदी ही या देशाची संपर्क भाषा आहे. जास्तीत जास्त लोक ही भाषा बोलतात. त्याही पेक्षा हिंदीमध्ये व्यावसायिक संधी देखील खूप उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मुलांना हिंदी भाषेपासून तोडणे याचा अर्थ महाराष्ट्रातील मुलांचे नुकसान करण्यासारखे आहे. हा प्रश्न हिंदी माध्यमांच्या शाळातील नाही. मराठी माध्यमातील हिंदी भाषा विषयाचा आहे. देशाला जोडणारी ही भाषा आहे. ही एकतेची भाषा आहे. अखंडतेची भाषा आहे. त्या भाषेपासून दूर नेणे चुकीचे होते. कोणी निर्णय घेतला, कसा घेतला, याची चर्चा करण्याचे कारण नाही. शेवट गोड होत असेल तर ती स्वीकारला पाहिजे म्हणून मी माननीय शिक्षण मंत्री यांचे यासाठी अभिनंदन करतो की,त्यांचे शिक्षण देखील मराठीत झालेले आहे. तरीही हिंदीवर त्यांचे प्रेम आहे. ते देशभक्त घरातील आहेत. घरात आईशी आपण ज्या भाषेत बोलतो आणि स्वप्न ज्या भाषेत बघतो ती भाषा ही मातृभाषा मानली पाहिजे. माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा हे जैन मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. जैन मराठी साहित्याला महाराष्ट्रातील जवळपास 2000 वर्षाची परंपरा आहे. महाराष्ट्रातील जैन धर्माची धर्म भाषा मराठी आहे. त्यामुळे त्यांचा मराठीशी असलेला संबंध मान्य केला पाहिजे.

**तालिका सभापती** : माननीय मंत्र्यांचा मराठी भाषेशी संबंध पूर्वापार असल्यामुळे त्यांनी आज नियम 97 अन्वये आपण जी चर्चा उपस्थित केली आहे त्यासंबंधी आधीच निर्णय घेतलेला आहे. त्यांनी या प्रश्नाची सोडवणूक केलेली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, त्यासाठीच मी आभार मानण्यासाठी उभा आहे. पण यातील जो दुसरा मुद्दा आहे त्यासंबंधी थोडी गांभीर्याने चर्चा व्हायला पाहिजे. मराठी सोडून अन्य माध्यमे आहेत त्या माध्यमांमध्ये मराठी ही दुसरी भाषा आहे. ही दुसरी भाषा अन्य शाळांमध्ये पाचवी ते आठवी पर्यंत आहे. खरे तर ती पहिली ते दहावी पर्यंत असायला हवी. आज मराठी माध्यमाच्या

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

शाळेतील मराठी भाषा देखील दुर्बोध करून ठेवली आहे. प्राथमिक शाळांमधील मुलांना कशा पद्धतीने मराठी भाषा शिकवली पाहिजे ? त्यांना भाषा शिकायची असते. ती भाषा सहज, सुलभ आणि आनंददायी वाटली पाहिजे. तेथे बालकवी चालतील. ग्रेस यांची कविता कॉलेज पातळीवर शिकवली पाहिजे. ती शाळेच्या पातळीवर शिकवता कामा नये. सहज सोप्या वाङ्मयाची मुलांना गोडी वाटेल आणि मुले मराठी भाषेकडे आकर्षित होतील असा प्रयत्न केला पाहिजे. परंतु, अभ्यासक्रम ठरविणाऱ्या मंडळींना शाळेतील मुलांवर साहित्य कोंबले पाहिजे असे वाटते.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

आणि मग साहित्यिक मंडळी आपले साहित्य कोंबण्याच्या इर्षेमध्ये आणि स्पर्धेमध्ये मराठी भाषा शिकविण्याचा आनंद हरवून बसतात. त्यामुळे त्या भाषेपासून मुले प्रचंड दूर जातात.

अन्य माध्यमातील कोणतीही मुले दहावीला मराठी विषय घेत नाहीत त्याऐवजी फ्रेंच किंवा जगातील अन्य कोणतीही भाषा निवडतात. शेवटी हा स्कोअरींचा मुद्दा असल्यामुळे मराठीमधून स्कोअरींग झाले पाहिजे यासाठी आपला आग्रह आहे. मराठीमधून स्कोअरींग झाले तरच ही भाषा वाढणार आहे. भाषा म्हणून नाही तर व्यवहारामध्ये कोणत्याही क्षेत्रात केवळ मराठीचा वापर वाढवावयाचा असेल तर एका बाजूने आपण अशाप्रकारचा प्रयत्न करणे गरजेचे आहे आणि दुसऱ्या बाजूने विविध प्रकारच्या व्यवहारात मराठी भाषा कशी वापरता येईल त्या पध्दतीचे शिक्षण शालेय स्तरावर दिले गेले पाहिजे. या करिता माझी दुसरी सूचना आहे की, उपयोजित मराठी हा त्यातील एक महत्वाचा भाग आहे. तिसरा मुद्दा असा की, अनेक भाषिक मुले आपल्या महाराष्ट्रामध्ये शिक्षण घेत असतात त्यांना आपण दोन पर्याय उपलब्ध करुन दिले तर ती मुले मराठी भाषा शिकतील त्याचबरोबर त्यांची असलेली अन्य मातृभाषा स्वीकारतील. त्यांना आपण हिंदी-संस्कृत अशा प्रकारचा जोड पर्याय दिला आहे. या ठिकाणी हिंदी-संस्कृत प्रमाणे हिंदी-गुजराती द्या, हिंदी-तमिळ द्या, हिंदी-पारशी द्या, हिंदी-अरबी द्या, हिंदी-उर्दू द्या असे जोड पर्याय आपण दिले तर मराठी शाळेतील इतर भाषिक मुले आनंदाने मराठी भाषा शिकतील. तसेच, आपली मातृभाषा सुध्दा त्यांना शिकण्याची संधी मिळेल.

माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब व अन्य माननीय सदस्यांचा आग्रह आहे की, मराठी भाषा टिकली पाहिजे. मराठी भाषा इतरांनी स्वीकारली पाहिजे, ती स्वीकारता येण्याजोगी सहज सोपी व्यवस्था आपण करुन ठेवली पाहिजे एका बाजूला सोपी मराठी, दुसऱ्या बाजूला उपयोजित मराठी आणि तिसऱ्या बाजूला हिंदी-संस्कृतप्रमाणे अन्य विषयांचे जोड पर्याय आपण विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिले पाहिजेत. तसे झाले तर मराठी मुलांना सुध्दा बाहेर पर्यायी जोड भाषा शिकण्याची संधी उपलब्ध होऊ शकेल. अशा तीन गोष्टी या ठरावाच्या निमित्ताने मी मांडलेल्या आहेत. या बाबत मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, हा विषय असा आहे की, मंत्री महोदयांना चांगले मराठी येते याबद्दल वाद नाही परंतु आपल्याला तो शिक्षण मंत्री म्हणून समजला पाहिजे. आपल्या घरामध्ये मराठीच बोलतात, क्वचित प्रसंगी हिंदी बोलतात हे मलाही माहीत आहे. बाबूजी कधीही मला भेटले तर त्यांनी हिंदीमधून कधीच सुरुवात केलेली नाही, ते करुच शकत नाहीत. सर्वाधिक खपाचे एकमेव पाक्षिक आपण महाराष्ट्रामध्ये प्रसिध्द करीत आहात. आपल्यावर लक्ष्मी प्रसन्न आहे ती केवळ मराठीमुळेच आहे. म्हणून जैन साहित्यिक मंडळींचे मराठीतले जैन व्यक्ती म्हणून तुम्ही अध्यक्ष होऊ शकता. एखाद्या माणसाला आमची मराठी भाषा किती करोडपती बनवू शकते याचे उत्तुंग उदाहरण म्हणजे आपण स्वत: आहात. त्यामुळे मराठीचा होत असलेला अवमान आपणाकडून थांबण्याची अपेक्षा व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी फक्त हिंदीचा विषय नाही. परंतु विषय असा आहे की, हिंदी हा विषय संपूर्णपणे बंद करावयाचे ठरविले तर हिंदी शिकविणाऱ्या पाच-दहा हजार शिक्षकांच्या नोकरीवर कुऱ्हाड येईल अशी परिस्थिती आहे. माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे हिंदीबहुल दुसरी कोणतीही जोड भाषा न शिकल्यामुळे जोड भाषेतील दुसरे कोणतेही शिक्षण घेण्याची त्यांची परिस्थिती नाही. तर मग ही होत असलेली निरर्थक भरती आपण थांबवावयाची काय, असाही विषय त्यावेळी चर्चेला होता. चुकून कां होईना राजभाषेबरोबर संपर्क भाषा म्हणून घटनेने हिंदीला मान्यता दिली आहे. हिंदी भाषेचे दुर्देव असे की, पंडित जवाहरलाल नेहरु यांना वाटत होते की, हिंदी ही राष्ट्रभाषा व्हावी. हिंदी राष्ट्रभाषा करण्याचा प्रस्ताव आला त्यावेळी दक्षिणेच्या सर्व राज्यांनी हिंदीला नकार दिला. प्रत्येक देशाची स्वत:ची भाषा असते अशाप्रकारचा राष्ट्रभाषेचा दर्जा हिंदी भाषेला आजपर्यन्त मिळू शकला नाही. तेव्हा आपण आता विमानतळापासून सर्वत्र गेलात तरी हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याबाबतचे फलक लावलेले असतात. देशामध्ये सर्वसाधारण व्यवहाराची भाषा हिंदी आहे. ही भाषा मुलांना माहीत असली पाहिजे, अवगत असली पाहिजे इथपर्यन्त पूर्वी हिंदी भाषेचे शिक्षण दिले जात होते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 10:25

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, पूर्वीच्या काळामध्ये मी मराठी शाळेमध्ये जात असताना मुद्दाम शनिवारी व रविवारी हिंदीच्या क्लासला जात असे आणि त्या संदर्भातील वेगवेगळ्या डिग्री घेऊन मोठ्या अभिमानाने फिरत होतो की, मी अमुक भाषेच्या संदर्भात डिग्री घेतलेली आहे वगैरे. त्यावेळी आम्ही चाणाक्षपणाने एक गोष्ट हेरली होती की, तेव्हा शनिवार व रविवार या दोन दिवशी विविध भाषा शिकविण्यासाठी जे क्लासेस होते त्यामध्ये बंगाली भाषा शिकविण्याचे देखील क्लासेस होते आणि मी एक उत्सुकता म्हणून बंगाली भाषेच्या क्लासला देखील जात होतो. मला देखील इतरांपेक्षा जास्त भाषा बोलता याव्यात याकरता या भाषा अवगत असाव्यात अशा प्रकारची लहान मुलांमध्ये जी उत्सुकता असते आणि त्यामुळे मुले विविध भाषा शिकत असतात. परंतु असे असले तरी प्रथम भाषा ही मराठीच होती अगदी दहावीपर्यंत मराठीच भाषा होती. त्यामुळे महाराष्ट्रामधील प्रत्येक वर्गामध्ये प्रमुख भाषा ही मराठीच असावयास पाहिजे हा एक भाग आहे. परंतु आपण दुर्दैवाने तो भाग काढल्यामुळे मराठीला दुय्यम स्थान देण्यात आले आणि मराठी भाषा ही ऑप्शनल म्हणजे "इच्छित" केली. आपल्या महाराष्ट्राचे हे दुर्भाग्य आहे की, महाराष्ट्राची राज्यभाषा ही मराठी असताना या राज्यामध्ये ती इच्छित केली.

सभापती महोदय, या भाषेच्या बाबतीत कै.कुसुमाग्रज म्हणजे तात्यासाहेब यांचा केवळ मंत्रालयापुरताच आक्रोश नव्हता. परंतु येथील राज्यकर्त्यांनी त्यांचा आक्रोश ऐकला असता तर मंत्रालयाबरोबर प्रत्येक क्षेत्रातील व्यवहाराच्या भाषेमध्ये मराठीचा वापर झाला असता. आपल्या शेजारी असलेल्या आंध्र प्रदेशमध्ये त्याच्या भाषेच्या विकासासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येते, कर्नाटक राज्यामध्ये देखील त्यांच्या राज्यभाषेच्या विकासासाठी, उन्नतीसाठी 100 कोटी रुपये ठेवण्यात आलेले आहेत. मात्र आम्ही गेल्या वर्षी मराठी भाषेच्या विकासासाठी 10 कोटी रुपये ठेवले होते, पण त्याचाही वापर केलेला नाही. आदरणीय श्री.पृथ्वीराज चव्हाणसाहेब जेव्हा माननीय मुख्यमंत्री झाले, तेव्हा त्यांनी पहिल्यांदा काय केले असेल तर त्यांना शुध्द मराठी बोलता येत नव्हते कारण त्यांचे संपूर्ण आयुष्य दिल्लीमध्ये गेले आहे.मी त्यांना दोष देणार नाही. ते दिल्लीमध्ये राहिल्यामुळे त्यांचे बोलण्याचे वळणच बदलले होते. त्यांना मराठी येत नव्हते काय ? तर असे नाही. त्यांना मराठी येत होते पण इतकी वर्षे दिल्लीमध्ये राहिल्याने रोजच्या व्यवहारामध्ये क्वचित कधीतरी एखादा शब्द मराठी मध्ये बोलावयाचे असे दिल्लीतील त्यांचे आयुष्य गेल्यामुळे त्यांना या राज्याचे माननीय मुख्यमंत्री झाल्यानंतर सुरुवातीला ते कठीण जात असणार. मग त्यांना

16-04-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

मी मराठी राज्यकर्ता आहे हे सांगण्यासाठी त्यांची वर्तमानपत्रामध्ये जी प्रतिक्रिया आली होती, ती मला वाचावयास मिळाली. त्यामध्ये त्यांनी म्हटले होते की, "मी याठिकाणी मराठी भाषेचा आग्रह धरणार वगैरे".तसेच त्यांनी सभागृहामध्ये अभिमानाने घोषणा केली की,मी मराठी भाषेच्या विकासासाठी 10 कोटी रुपये ठेवलेले आहेत. अशा प्रकारे याबाबतीत आग्रह धरीत असताना यावर्षी 15 कोटी रुपयांची मागणी करण्यात आल्यावर सर्वांनी बाके बडविली. 10 कोटी ऐवजी 15 कोटीची मागणी केली. ठीक आहे, या घोषणेचे स्वागत करणे तुमचे काम आहे, मी त्याबाबत बोलत नाही.

सभापती महोदय, कै.कुसुमाग्रज यांचे स्मारक करण्यासाठी सरकारने 10 कोटी जाहीर केल्यानंतर त्यांचे स्मारक उभे रहावे यासाठी सहा ते सात अधिवेशने खर्ची पडली. नाशिकमध्ये आमच्या कै.कुसुमाग्रज यांचे स्मारक कधी होणार आहे हा प्रश्न आहे. मग मी एका ठिकाणी खवळून असे म्हणालो, त्यावेळी आपण उपस्थित नव्हता. कै.कुसुमाग्रज यांचे कशासाठी स्मारक करीत आहात, त्यांचा तारा कधीच विराजमान झालेला आहे, ते ध्रुव ताऱ्यासारखे विराजमान झालेले आहेत, अजरामर. त्यामुळे तुमच्या या स्मारकाला कोण विचारतो ? असे त्यावेळी मी चिडून बोललो होतो.

सभापती महोदय, या राज्यामध्ये मराठी ही प्रथम भाषा असावी आणि याठिकाणी इतर भाषिक म्हणजे मातृभाषेच्या ज्या शाळा आहेत, तेथे अनिवार्य दुय्यम भाषा ही मराठी असावी म्हणजे कम्पलसरी भाषा असावी, ऑप्शनल नसावी. ती दहावी पर्यंत अनिवार्यच असावयास पाहिजे आणि एखादा मुलगा त्या विषयामध्ये नापास झाला तर तो नापासच असेल. या राज्यामध्ये मराठी विषय घेऊन जर पास होता आले नाही तर मला या विषयामध्ये पास होता येत नाही अशा प्रकारचा संकेत मराठी भाषेच्या बाबतीत देणार आहात काय हा महत्वाचा विषय आहे. म्हणून मराठी ही दुसरी भाषा म्हणून अनिवार्य असली पाहिजे पण तसे करीत असताना ती सोपी असावयास पाहिजे. कॉन्व्हेन्टमध्ये जाणारी जी मुले आहेत, ती रामा, लक्ष्मणा अशा प्रकारचे जे उच्चार करतात. आपले मराठीतील राम,लक्ष्मण इ.शब्द हे हिंदीतून असे काही उच्चारतात की मग आपल्या घरामध्ये रामा, लक्ष्मणा असेच चालते आणि ते कौतुकाने चालते आणि त्यांच्या आई-वडिलांना असा प्रश्न पडत नाही की, आपल्या मुलाला राम, लक्ष्मण, हनुमान असे बोलता का येत नाही ?

यानंतर श्री.अ.शिगम .....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

तो आपल्या प्रत्येक दैवताला काना का मारत असतो ? अशा प्रकारे भाषेचा अपभ्रंश होतो. याबाबत माझ्या पेक्षा सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेब आणखी चांगले सांगू शकतील. मुळात आपण संस्कार करायला चुकतो.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय संसदीय कार्य मंत्री उपस्थित आहेत. या महाराष्ट्र राज्यामध्ये आपल्या संस्थासहीत सर्वांनी सरकारने दिलेले भूखंड लाटले. त्या भूखंडावर संस्था उभ्या केल्या. भूखंड लाटले असे मी कॅगच्या अहवालानुसार बोलत आहे. सरकारने दिलेले भूखंड गैर आहेत किंवा कसे हा वेगळा विषय आहे. सरकारच्या भूखंडावर आपल्या संस्था उभ्या करायच्या आणि त्या संस्थांचे नाव मात्र ढळढळीतपणे इंग्रजीमध्ये द्यायचे. सरकारच्या अनुदानावर ज्या संस्था चालतात किंवा सरकारच्या भूखंडावर ज्या संस्था उभ्या आहेत त्या संस्थांच्या नावाची पाटी ही मराठीतच असली पाहिजे. संस्थाचे नाव मराठी भाषेत नाही म्हणून आम्ही तोडफोड आंदोलन केले तर त्यासाठी आपण आम्हाला तुरुंगामध्ये टाकाल. पण आम्ही त्या अटकेला भीत नाही. परंतु शिक्षण संस्थाच्या नावाचे बोर्ड तोडणे हे आंदोलन होऊ शकते काय ? अशा आंदोलनाचे दूरगामी परिणामी विद्यार्थ्यांवर होतात. प्रसिध्दीकरिता असे आंदोलन करणे सोपे आहे. माझ्या सारख्याच्या डोक्यात सतत येत असते की, इंग्रजीतील नावांचा बोर्ड फोडून टाकावा. डी.वाय.पाटील युनिर्व्हसिटी, डॉ.पंतगराव कदम यांची भारती विद्यापीठ ही सरकारी भूखंडावरील ही तेजस्वी नावे रात्रीची चमकताना दिसतात. मी चुकीचे काही बोलत नाही. आपण इंग्रजीत निऑन साईन म्हणतो. या संस्थांची नावे इंग्रजीत लिहिलेली दिसतात. मला त्याबद्दलही काही म्हणायचे नाही.

सभापती महोदय, कुसुमाग्रज हे जगातील एकमेव साहित्यिक ताऱ्याच्या रुपाने विराजमान झालेले आहेत. दुसरे आहेत की नाही मला माहीत नाही असल्यास माझ्या ज्ञानात भर पडेल. लोकांना ध्रुव तारा माहीत होता. परंतु ताऱ्याच्या रुपाने विराजमान झालेल्या कुसुमाग्रजाबद्दलची माहिती शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना देत नाहीत. शिक्षक अजूनही विद्यार्थ्यांना ध्रुवतारा म्हणून सांगतात. परंतु आधुनिक ध्रुव तारा, अटळ ध्रुव तारा म्हणून कुसुमाग्रजांचे नाव सांगत नाही. काही शिक्षक विद्यार्थ्यांना असे सांगत असतील तर मी त्यांचा सत्कार करायला तयार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, मराठीच्या पुस्तकात फक्त पाच धडे आणि पाच कवितांचा समावेश करावा. परंतु धड्यातील शब्द आणि त्या शब्दावरुन निर्माण झालेल्या साहित्यिकांच्या साहित्याची माहिती शिक्षकांच्या मुखोद्‌गत असली पाहिजे आणि त्यांनी ती विद्यार्थ्यांना सांगितली पाहिजे. या माध्यमातून साहित्यिकांचे विश्‍व विद्यार्थ्यांपुढे उघड केले पाहिजे आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अमुक शब्दाप्रमाणे तुम्हाला माहीत असलेले साहित्यिक सांगा असे प्रश्‍न विचारले पाहिजेत. मराठीची जाण अशी निर्माण होईल. मुले टी.व्ही.पुढे न बसता वाचनालयामध्ये जातील. आपल्याला अभ्यास केला पाहिजे, वेगवेगळ्या साहित्यिकांची पुस्तके वाचली पाहिजेत असे विद्यार्थ्यांना वाटू लागेल. मला आठवते आम्ही शाळेत असताना हिंदी उपन्यास वाचायचो. आपल्या काळात आपण कांदबऱ्या वाचायचो. मी किती कादंबऱ्या वाचल्या याचा आपणास अभिमान वाटायचा.... हा मराठी भाषेचा विषय आहे. आपणास कल्पना नाही इतका मराठी भाषेचा सत्यानाश झालेला आहे. आज आपल्या मुलीला मराठीतून "आई"वर निबंध लिहायला सांगा. मी आपणास आव्हान देतो. आपल्या मुलीने मराठीत दहा ओळी "आई" वर निबंध लिहिल्यास मी वाटेल ते हरायला तयार आहे, ही परिस्थिती आहे.

**तालिका सभापती (विनायक मेटे)** : हे व्यक्तीगत नाही. ..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शैक्षणिक परिस्थिती अशी आहे. मराठी विषय दहावीपर्यंत अनिवार्य करुन इयत्ता 12 वीला मराठी भाषेतून विज्ञान विषय घेता येतो असे आपण सांगितल्यास ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी विज्ञान शाखेत प्रवेश घेऊ शकतील अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, पाचवीच्या नव्या अभ्यासक्रमात हिंदी विषय बंद केला आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी तो विषय शैक्षणिकदृष्टया दुय्यम आहे असे सांगितले.

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

शैक्षणिकदृष्ट्या शिक्षणातील तज्ज्ञांच्या मताप्रमाणे ते योग्य असेलही परंतु सन्माननीय सदस्यांचा उद्देश तो नाही. आपला उद्देश शिक्षक वाढविण्याचा आहे.

श्री. कपिल पाटील : तसा उद्देश नाही.

श्री. दिवाकर रावते : पाली भाषा म्हटल्यानंतर दुसरा शिक्षक लागणार की नाही ?. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांच्या मूळ प्रस्तावामध्ये मराठी सुलभ व आनंददायी करण्याची आवश्यकता असे म्हटले आहे आणि ते करणे फार महत्वाचे आहे. मराठी भाषा आनंददायी म्हणजे ती दुय्यम स्थानाची नाही तर पहिल्या स्थानामध्ये दुसरी भाषा या महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा अनिवार्य असली पाहिजे. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो. काल मी कोल्हापूरवरुन येताना आपल्या नेत्यांच्या प्रचंड संस्थांचे इंग्रजीमध्ये बोर्ड लावलेले पाहिले. एकाच इंजिनिअरींग कॉलेजचा बोर्ड मराठीमध्ये दिसला. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये असलेल्या ज्या संस्था आहेत त्या बाबतीत हे तातडीने व्हावयास पाहिजे. अन्यथा कोणत्या तरी विद्यार्थी संघटनेला वेगळे आंदोलन निर्माण करावे लागेल आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ते चांगले नाही. तोडफोड करणे सोपे असते पंरतु आपण कोणते संस्कार निर्माण करतो याला महत्व असते. हिंदीच्या संदर्भात आम्हाला उत्तर मिळाले आहे त्याबद्दल माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो परंतु मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या संदर्भात आम्हाला आपल्याकडून अपेक्षा आहेत. आम्ही आपल्याकडूनच अपेक्षा करु शकतो. पूर्वी श्री. रामकृष्ण मोरे शिक्षण मंत्री असताना त्यांनी फार चांगले निर्णय घेतले होते. त्यावेळी त्यांनी वेगळ्या पध्दतीने काम केले होते. आपल्याकडून सुध्दा आमच्या अपेक्षा आहेत. आपण आपल्या उत्तरामध्ये या संदर्भात उत्तर दिले तर बरे होईल, आम्हाला आनंद वाटेल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या अल्पकालीन चर्चेची सुरुवात करतानाच अगोदर ही चर्चा लवकर आटोपावयाची, थोडक्यात संपवावयाची, पाच मिनिटांत संपवावयाची, दहा मिनिटात उत्तर घ्यावयाचे, असे बोलले गेले. मला असे वाटते की, या सभागृहामध्ये काही विषय असे असतात की, त्या विषयावर चर्चा झाली पाहिजे. त्यावर विचारमंथन घडवावयास हवे. हेच जर होणार नसेल तर जसे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आपले अभिनंदन केले तसे अभिनंदन करुन मी सुध्दा एक मिनिटामध्ये आसनस्थ होऊ शकतो. परंतु मला असे वाटते की, थोड्या अधिक गांभीर्याने या प्रश्नाचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी कवी कुसुमाग्रजांचा उल्लेख केला. जवळजवळ 60 वर्षे साहित्य निर्मिती करणारे ते साहित्यिक होते. त्यांचा अखेरच्या दशकातील जो कवितासंग्रह आला तो लहान मुलांसाठी होता आणि त्या कवितासंग्रहाचे वैशिष्ट्य असे होते की, अक्षरांची ओळख एवढाच त्याचा विषय होता. त्याचे शीर्षक 'अक्षरबाग' असे होते. मराठी भाषा शिकणाऱ्या लहान मुलांसाठी 'अक्षरबाग' हा कवितासंग्रह कुसुमाग्रजांना नव्वदीनंतर लिहावासा वाटला. कुसुमाग्रजांशी आमचे फार जवळचे संबंध होते. त्यावेळी या साहित्य निर्मिती प्रक्रियेमध्ये आम्ही त्यांना खूप जवळून अनुभवले आहे. त्यांना सहज म्हणून विचारले की, तात्या, 'अक्षरबाग' कवितासंग्रह इतक्या उशिरा का आणला ? तात्यांनी 1953 ची त्यांची नोट लिहिण्याची डायरी काढून दाखवली. अक्षरबागचे पहिले पान 1953 साली त्यांनी लिहिले होते. भाषा संस्कारक्षम वयामध्ये मुलांमध्ये रुजविली पाहिजे हाच खरा या मराठी भाषेसाठी आवश्यक असणारा भाग आहे.

मला आठवते की, मी स्वत: व्दिपदवीधर झालो, व्यवस्थापनाचा पोस्ट ग्रॅज्युएट झालो आणि त्यानंतर दिल्लीला उच्च शिक्षणासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन ट्रेड मध्ये गेलो. त्यावेळी माझे वय तेवीस-चोवीस वर्षे असेल. त्यावेळी त्या कोर्समध्ये अनिवार्यतेचा एक भाग म्हणून एक तरी विदेशी भाषा शिकावी लागत होती. त्यावेळी त्या वर्गामध्ये मला स्पॅनिश भाषा शिकणे अपरिहार्य झाले होते.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

मी वर्षभर खूप प्रयत्न केले. जर मला लहान वयात भाषा शिकायची असेल तर जी भाषा पटकन माझ्या हृदयामध्ये जाऊन तिचा मी वापर करु शकेन हे स्पॅनिश बाबतीत वयाच्या 23-24 वर्षानंतर होणे शक्य नव्हते. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी दुर्बोध मराठी असा उल्लेख केला. माझा त्यांच्या बोलण्याविषयी आक्षेप आहे. ते असे म्हणाले की, अनेक साहित्यिक आपले साहित्य अभ्यासक्रमामध्ये कोंबण्याचा प्रयत्न करतात. हा प्रकार तितकासा बरोबर नाही. पण आपल्याला कोणती मराठी पाहिजे याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय मंत्री महोदय हे शिक्षण खात्याचा कारभार अतिशय कार्यक्षमरीतीने सांभाळत आहेत. मी पुन्हा इंग्रजी शब्दांचा आसरा घेऊन सांगेन की, माननीय मंत्री महोदय हे जितके या खात्याच्या हार्डवेअरकडे लक्ष देत आहेत तितके लक्ष त्यांनी सॉफ्टवेअरकडे देण्याची आज आवश्यकता निर्माण झालेली आहे. हे कशासाठी तर या मराठी भाषेबद्दल गोडी निर्माण व्हायची असेल तर ती अतिशय सुलभ पध्दतीने, सोप्या पध्दतीने, गोष्टीच्या रुपाने, कवितेच्या रुपाने शिकविली गेली पाहिजे. "रमण नमन कर" असे माझ्या पहिलीच्या पुस्तकातील पहिल्या धडयामध्ये पहिले वाक्य होते. कुठे वेलांटी नाही, उकार नाही, जोडाक्षर नाही. पटकन ती भाषा मी आत्मसात करु शकतो. मला वाटते मंत्री महोदय हे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याकरिता प्रयत्नशील आहेत ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

मी या विषयाच्या संदर्भात विशेष उल्लेख देणारच आहे. मराठी असणे म्हणजे मराठीची संस्कृती जपणे, हा भाषेच्या परिघाच्या खूप पलीकडचा आणि सगळयांना व्यापणारा असा विषय आहे. पुन्हा एकदा कुसुमाग्रजांकडे जाऊन मी म्हणेन की, मराठी भाषा समृद्ध, व्यापाराची भाषा, व्यवहाराची भाषा, परस्पर संबंधांची भाषा झालीच पाहिजे. पण मराठीने कधीही दुस-या भाषेचा द्वेष केलेला नाही किवा द्वेष करायला शिकविले नाही. कविवर्य कुसुमाग्रज असे म्हणतात की, इतर भाषा या आमच्या घराच्या खिडक्या आहेत. या खिडक्यातून आम्हाला त्या भाषांचे दर्शन आणि आकाश जरुर मिळावे.त्याची आवश्यकता आहेच. पण आमच्या घरातील जी मूळ ज्योत पेटलेली आहे, जो दिवा लावलेला आहे तो या मराठी भाषेचा आहे आणि तो दिवा सदैव कसा तेवत राहील यादृष्टीने आपले शिक्षणाचे धोरण असले पाहिजे. आपण अभिजात भाषेसाठी प्रयत्न करीत आहात.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ 10:40

श्री. हेमंत टकले.....

आपण आता कायद्याप्रमाणे शिक्षणाचा हक्क मान्य केलेला आहे. हा शिक्षणाचा हक्क मिळाल्यामुळे सर्वांना अनिवार्यपणे शिक्षणाकडे वळावे लागेल. मुलांना शिकावावे लागेल. जेव्हा हे शिक्षण अनिवार्य करतो तेव्हा आपण काय शिकविणार आहोत हा प्रश्न निर्माण होतो. त्यासाठी मराठी भाषा असेल, हिंदी भाषा असेल या सर्व भाषांची आपल्याला एक परिपूर्ण नागरिक घडविण्यासाठी नितांत आवश्यकता आहे. त्यामध्ये मराठीचे महत्व आहे, मग ती पर्यायी भाषा म्हणून असेल किंवा मुख्य भाषा म्हणून असेल. संस्कारक्षम वयामध्ये आपल्याला संस्कार द्यायचे असतील तर हा सर्वव्यापक असा विचार आहे.

आज आपण धोरण म्हणून मांडू ते धोरण निदान पुढच्या 5-10 वर्षामध्ये कायम राहील, त्यामध्ये बदल होणार नाही अशा प्रकारची खात्री आम्हाला या निमित्ताने दिली पाहिजे. हा अतिशय महत्वाचा विषय आहे. आम्हा सर्वांना आपणाबद्दल एक विश्वास आहे की आपण अत्यंत मायेने, ममतेने व या भाषेचे संस्कार आपल्यावरही असल्याने आपण या विषयाला न्याय द्याला अशी अपेक्षा करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, हिंदी विषय बंद केला आणि मराठी कठीण केली अशा प्रकारच्या दोन बाबींचा उल्लेख करुन सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी प्रस्ताव सभागृहात चर्चेसाठी उपस्थित केलेला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने मराठीच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते यांनी आपले विचार मांडले आहेत. तसेच या प्रस्तावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी देखील आपले विचार मांडले आहेत. एका भाषेत माणूस इतका तज्ज्ञ झाला पाहिजे की, त्या भाषेचा लाभ इतर भाषा बोलत असताना झाला पाहिजे. आपण मोकॅबरली हा शब्द वापरतो. मराठीचा अतिशय चांगल्या पध्दतीने अभ्यास झाला तर तुम्ही दुसऱ्या भाषेत शिकताना मग ती हिंदी भाषा असेल, इंग्रजी भाषा असेल, इतर परदेशी भाषा असेल, त्याचा निश्चितपणे परिणाम होतो. भाषा हे अभ्यासाचे, व्यापाराचे, माहिती व तंत्रज्ञानाचे रक्त आहे. भाषेच्या संदर्भातील विचार हा अत्यंत महत्वाचा आहे. पूर्वी एक काळ असा होता की, ज्यांना भाषेचा अभ्यास करावयाचा आहे, ते कला महाविद्यालयात प्रवेश घेत होते. परंतु आता ते मर्यादित राहिलेले नाही, आपण डॉक्टर असाल, आपण वकील असाल, सी.ए.असाल, सी.ए.ला देखील रिपोर्ट तयार करावा लागतो. भाषेवरील प्रभुत्व हे अत्यंत महत्वाचे आहे. म्हणून भाषेचे प्रभुत्व टीकविण्याच्या दृष्टीकोनातून अभ्यासक्रमामध्ये त्याचा योग्य तो समावेश होणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

सभापती महोदय, हिंदी भाषा शासनाकडून बंद करण्यात आली, त्याबाबतीत आपले मत काय आहे यासंबंधी पाच-सहा दिवसापूर्वी मला काही लोक विचारणा करीत होते. पहिले मत मराठीच्या संदर्भातील आहे. कॉमर्स, सायन्स, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विषयांची महाविद्यालये आहेत, त्या महाविद्यालयांमध्ये भाषा हा विषय सक्तीचा केला पाहिजे. इयत्ता 10 वी संपली की, आपल्याला मराठीचे ज्ञान आले अशातला भाग नाही.

सभापती महोदय, मला अमेरिकेमध्ये काही विद्यापीठांमध्ये जाण्याची संधी मिळाली. त्या ठिकाणी पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणामध्ये देखील भाषा विषयाच्या संदर्भात विचार केला होता. या सभागृहात सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या शब्दात मत मांडले की, मराठी भाषा दार असेल, तर इतर भाषा खिडक्या आहेत. आपण त्या खिडक्यांचा देखील वापर केला पाहिजे. रवींद्रनाथ टागोर यांचे संपूर्ण साहित्य बंगाली भाषेत निर्माण झाले. आपण त्या साहित्यांचे भाषांतर

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

केले. भाषांतर करण्यामागचे कारण असे होते की, ते साहित्य अतिशय उच्च दर्जाचे होते. मराठी नाटकांचे हिंदी, गुजराथी भाषेमध्ये रुपांतर होत आहे व त्याच पध्दतीची नाटके त्या ठिकाणी दाखविली जात आहेत. देशाची संपर्क भाषा, चित्रपट, उद्योग आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे यातील व्यावसायिक संधीपासून मराठी विद्यार्थी वंचित होणार आहेत असा या प्रस्तावात उल्लेख करण्यात आला आहे.

महोदय, मी संगणकाच्या बाबतीत मागे विनंती केली होती की, संगणकाची भाषा मराठीत व्हावयास पाहिजे. मोबाईलव्दारे मोठया प्रमाणात एस्.एम.एस्.येत आहेत, त्या एस्.एम्.एस.ची भाषा कोणती आहे हे कोणालाही समजून येत नाही. त्यात अर्धी मराठी भाषा, अर्धी इंग्रजी भाषा असते. मोबाईल मॅसेजची एक वेगळीच भाषा निर्माण झालेली आहे. इंग्रजी, हिंदी या ऐवजी हिंग्लिश ही भाषा निर्माण झालेली आहे. या इंग्लिश भाषेत काही शब्द इंग्रजी असतात व काही शब्द हिंदीत असतात. म्हणून भाषेचे व्याकरण हे अतिशय महत्वाचे आहे.

सभापती महोदय, मी अधिक बोलून सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. आमच्या वेळी 11 वी चा पॅटर्न होता. इयत्ता 11 वी उत्त्तीर्ण झाल्यानंतर महाविद्यालयांमध्ये पी.डीग्रीसाठी प्रवेश मिळत असे. मराठी विषयात "पुष्पांच्या सहवासात"असा निबंध होता. त्या निबंधातील नायकाची पुष्पा नावाची मैत्रीण होती, तिच्या समवेत सकाळी काय केले, दुपारी काय केले, कोणत्या हॉटेलमध्ये जेवण घेतले, सांयकाळी कोठे हिंडायला गेलो या सर्व गोष्टी लिहिल्या, परंतु त्याने रात्रीची माहिती मात्र लिहिली नाही. त्या प्राध्यापक पतीने आपल्या पत्नीस सांगितले की, बघ, याला अनुस्वराचा अर्थ समजत नाही. वाचून घेण्यास सांगितले. पत्नीने वाचून सांगितले की, त्याला अनुस्वराचा अर्थ समजला नाही पण तुम्हाला तर जीवनाचाच अर्थ समजला नाही. त्याने एका दिवसात जे केले, ते तुम्ही आयुष्यभरात केले नाही. म्हणून व्याकरणाला खूप महत्व आहे. परंतु सध्या व्याकरणाचे महत्व फारच कमी झालेले आहे. पूर्वी व्याकरणाला खूपच महत्व दिले जात असे. एखाद्या शब्दात वेलांटी पहिली की दुसरी याचा खूपच विचार करुन वेलांटी दिली जावयाची. परंतु आता शब्द लिहिताना व्याकरणाचा गंभीरतेने विचार केला जात नाही. व्याकरणाला आत्यंतिक महत्व आहे, मराठी भाषा सोपी करीत व्याकरणाचा प्राथम्याने विचार केला पाहिजे.मराठीत देखील अतिशय सोपे शब्द आहेत.

3...



ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 10:45

श्री.अरुण गुजराथी....

भगवद् गीता ही ज्ञानेश्वरांनी अतिशय सोप्या शब्दात लिहिली. गीताई देखील अतिशय सोप्या शब्दात लिहिली गेली आहे.

गीताई माझी माऊली

तिचा मी बाळ

पडता पडता उचलून घेई कडेवरी.

महोदय, मराठी भाषा सोपी कशी करता येईल याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी जास्तीत जास्त प्रयत्न करावेत.

यानंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ पूर्वी श्री.गिते.. 10:50

श्री.अरुण गुजराथी.........

हिंदी-संस्कृत, हिंदी-उर्दू, हिंदी-पाली या पध्दतीने द्वितीय भाषांमध्ये अनेक जोड पर्याय देण्याची आवश्यकता आहे असे प्रस्तावात म्हटले आहे. पाली भाषेचा या ठिकाणी उल्लेख झालेला आहे. किती लोक ही भाषा जाणतात? मोडी भाषेमध्ये देखील प्रचंड साहित्य उपलब्ध आहे. परंतु मोडी भाषा वाचणारी माणसे उपलब्ध नाहीत. शासनाने त्या भाषेचे कोर्स सुरु करावेत आणि त्या दृष्टीने आर्थिक मदत करावी. ही भाषा अशी आहे की, एकदा टाक आणि बोरु लिहिण्यासाठी हाती घेतला की तो उचलायची गरज नाही. ही इतकी सोपी लिपी आहे. एकदा बोरु टेकला की मोडी भाषा कंटिन्यू लिहिता येत होती. म्हणून मोडी भाषेच्या संदर्भात मंत्री महोदयांनी लक्ष घालावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, हिंदी विषय बंद करु नये अशी माझी शासनाला विनंती आहे. काही लोक असे आहेत की, ते हिंदी ही राष्ट्रभाषा असल्याचे मानत नाहीत. हिंदी ही लिंक भाषा आहे असे ते समजतात. त्यांना जे काही समजायचे असेल ते समजू दे. परंतु मराठी भाषेतून चांगल्या पध्दतीने शिक्षण देता येईल, मराठी भाषेतून चांगले ज्ञान कसे वाढविता येईल, मराठी ही ज्ञानाची, व्यवहाराची, व्यापाराची, माहिती व तंत्रज्ञानाची भाषा, संगणकाची भाषा कशी बनविता येईल या दृष्टीने शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, आज चायनीज भाषा शिकण्याला खूप महत्व आले आहे. चायनीज भाषा जो कोणी शिकवितो त्याला 5000 रुपये एका तासाला फी मिळते. भाषा शिकविताना चायनीज इन टू मराठी त्याचे स्वरुप राहील. शिकविणाऱ्याला 5 हजार रुपये दर तासाला मिळतात. कोणतीही भाषा वाईट आहे असा भाग नाही. परंतु सर्वात उत्तम मातृभाषा आहे. त्यानंतर इतर भाषा आहेत. ती मराठी भाषा जतन करण्याचा प्रयत्न करुया एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-04-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) I.1

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले हे दरवर्षी त्यांच्या मतदारसंघात दहा दिवसाच्या काळात "आई महोत्सव" आयोजित करीत असत. त्या महोत्सवात प्रा.शिवाजीराव भोसले यांची वेगवेगळ्या विषयावर व्याख्याने होत असत. दहा दिवसाच्या काळात हिंदुस्थानातील सर्वोच्च व्यक्तिमत्वाबद्दल या महोत्सवात उत्कृष्ट भाषणे ऐकायला मिळायची.

सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी केवळ महोत्सव भरविण्याचे काम केले नाही, तर त्यांनी या माध्यमातून महाराष्ट्राच्या जडणघडणीला महत्व दिले. त्यांनी भरविलेल्या महोत्सवातील प्रत्येक व्याख्यानांचे सी.डी.च्या माध्यमातून जतन करण्यात आले आहे. दर शनिवारी ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेतील मुलांना एक तासाच्या वेळेत त्या सी.डी.तील व्याख्याने ऐकविण्याचा कार्यक्रम आयोजित केला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज, रविंद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद यांचे चरित्र या मुलांना ऐकू द्या. माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांच्याकडे हा अमोल ठेवा उपलब्ध आहे. प्रा.शिवाजीराव भोसले यांच्या प्रतिभेतून व्यक्त झालेले विचार या लहान मुलांना समजतील. आज व्याख्यानांच्या जवळजवळ 50 ते 52 सी.डी.उपलब्ध आहेत. दर शनिवारी शाळेतील मुलांना या सी.डी.ऐकविल्या तर त्यांच्यावर चांगले संस्कार होतील. माननीय सदस्यांनी निर्माण केलेला हा अमूल्य ठेवा राज्य सरकारने ताब्यात घेऊन मुलांसाठी उपयोगात आणला तर त्यांच्या जीवनामध्ये आमुलाग्र बदल होऊ शकतो. असे केले तर माननीय सदस्यांनी ज्या ध्येयाने हा अमूल्य ठेवा निर्माण केला आहे त्याला महत्व येईल.

**तालिका सभापती** (श्री.विनायक मेटे) : या सभागृहात या प्रस्तावाच्या निमित्ताने माननीय सदस्यांची एकच भावना आहे ती म्हणजे मराठी भाषेचे जतन झाले पाहिजे. मराठी भाषा चांगली व सोपी झाली पाहिजे. दोन्ही सभागृहातील माननीय सदस्य आणि सभागृहातील बाहेरच्या मंडळींनी देखील अशा स्वरुपाचे विचार व्यक्त केल्यानंतर शासनाने मराठी भाषा विभाग स्थापन केला. तो विभाग माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत:कडे ठेवला आहे. त्यामुळे मराठी भाषेबाबत अधिक चांगल्या पध्दतीने काम होईल अशी अपेक्षा आहे. कुसुमाग्रजांनी मराठी भाषेबद्दलची शासनाची अनास्था लक्षात घेऊन जो उल्लेख केला होता तो मला आठवतो. त्यांनी जागतिक मराठी साहित्य संमेलनामध्ये बोलताना असे म्हटले होते की, "मराठी भाषा ही मंत्रालयाच्या दारात लक्तरे लेवून उभी आहे." त्या परिस्थितीत आजच्या घडीला काही फरक पडला आहे असे वाटत नाही. आज महाराष्ट्रात जे शालेय अभ्यासक्रम आहेत, त्या बाबतीत मराठी भाषा अनिवार्य करावी असा आग्रह होता.

नंतर श्री.खर्चे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. विनायक मेटे)** .......

या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करावा इतकेच या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेची सूचना दिली आहे. सुरुवातीला या चर्चेच्या अनुषंगाने मला असे वाटत होते की, यातील हिंदी भाषेबद्दल अगोदरच आपण सभागृहात घोषणा केलेली असल्यामुळे या प्रस्तावावर फार वेळ चर्चा चालणार नाही परंतु यावर विस्तृत अशी चर्चा झाली त्याबद्दल मी या सभागृहाचे मनापासून आभार व्यक्त करतो. तसेच या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, दिवाकर रावते, हेमंत टकले, अरुण गुजराथी आणि आपण स्वतः भाग घेतला. विशेषत: मराठी भाषेबद्दल चर्चा घडवून आणली आणि मला शासनाच्या वतीने निवेदन करण्याची संधी दिल्याबद्दल आपला अत्यंत आभारी आहे.

महोदय, सुरुवातीलाच सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, प्रत्यक्ष व्यवहारात आपण इंग्रजीचा वापर करतो, तसेच ते पुढे फारच सुंदर बोलले की "आपण हार्डवेअरकडे खूपच लक्ष देतो, सॉफ्टवेअरकडे लक्ष कधी देणार ?" मला या निमित्ताने सांगावेसे वाअते की, गेले वर्षभर या विभागाचा कार्यभार सांभाळत असताना मला सुध्दा असे वाटते की, शालेय शिक्षण विभागाकडे 2 कोटीपेक्षा जास्त विद्यार्थी शिकतात, 7 लाखापेक्षा जास्त शिक्षक आहेत, 1.75 लाखपेक्षा जास्त इतर कर्मचारी काम करीत आहेत आणि 28 हजार कोटीच्या पलिकडे शिक्षणावर खर्च होतो. पण हे सर्व करण्यात आपण गुंतलेलो असताना शिक्षणाच्या माध्यमातून जे फलित मिळायला हवे ते मिळते काय या संदर्भात मी गेले काही दिवस सातत्याने विचार करतो आणि ज्यावेळी अभ्यासक्रम बदलण्याच्या गोष्टी असतात त्याकडे खूप लक्ष दिले. आज या चर्चेतून ज्या ज्या गोष्टी निघाल्या, मराठी भाषा ही जशी ज्ञानाची भाषा आहे तशी ती संपर्काची भाषाही असली पाहिजे. खरे म्हणजे मराठी भाषा ही गोड भाषा आहे. मराठी भाषेने कधीही इतर भाषांचा द्वेष करायला शिकविले नाही. मी सुरुवातीलाच शासनाच्या वतीने सभागृहाला सांगू इच्छितो की, मराठी भाषा जी आमची मायबोली आहे, मायभाषा आहे त्या भाषेचा जास्तीत जास्त वापर शालेय शिक्षण घेत असताना विद्यार्थी आपल्या आयुष्यात पुढील काळात करतील या दृष्टीने पूर्णपणे प्रयत्न केला जाईल.

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा ........

महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी असेही सांगितले की, लहान वयात कोणतीही भाषा चांगल्या प्रकारे शिकता येते. ते वयाच्या 23 व्या वर्षी जेव्हा दिल्लीला गेले त्यावेळी त्यांना स्पॅनिश भाषा शिकण्यासाठी कठीण गेले. ही गोष्ट खरी आहे की, कोणत्याही माध्यमातून मुलगा शिकत असेल, काही मुले मराठी भाषेतून शिक्षण घेत नाहीत, जी मुले हिंदी किंवा इंग्रजी तसेच उर्दू भाषेतून शिकत असतील त्यांना मराठी भाषा अनिवार्यच असली पाहिजे. कारण ज्यावेळेस तो महाराष्ट्रात राहतो, महाराष्ट्रात येणाऱ्या काळात उपजिविकेचे साधन निर्माण होणार असेल, उपजिविकेचे साधन निर्माण होण्यासाठी त्याला काम करावयाचे असेल तर त्या भागातील माणसांची भाषा ही चांगल्या प्रकारे त्याला कळलीच पाहिजे, तरच तो निश्चितपणे काम करु शकेल. सन्माननीय सदस्य बोलल्यानुसार लहान वयात कोणतीही भाषा शिकता येते हे मी देखील स्वत: अनुभवलेले आहे. मी जे.जे. स्कूल मध्ये शिकत असताना मला जर्मनीत जाण्याची संधी प्राप्त झाली होती. सुदैवाने मला मार्क्स सुध्दा त्या काळात चांगलेच मिळत होते.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा...

सभापती महोदय, दादर येथे श्री. कुलकर्णी जर्मन भाषा शिकविण्याचे काम करीत असत. मी 6.00 वाजता त्यांच्याकडे जर्मन भाषा शिकण्यासाठी जात असे व नंतर पुन्हा 10.00 वाजता कॉलेजमध्ये येत असे. भाषा चांगल्या प्रकारे कशी शिकविता येते ते मला श्री. कुलकर्णी सरांकाडून समजले आहे. मराठी भाषा गोड आहे. जर्मन भाषा ही कठीण भाषा आहे. परंतु मी जर्मन भाषेच्या संदर्भात आपल्याला सांगू इच्छितो की, श्री. कुलकर्णी आम्हाला जर्मन भाषा शिकवित असतांना "मायनर किंडल, डायनल किंडल, स्लांगर उंजर किंडल" असे शिकवित असत. मी त्यांना विचारले की, याचा अर्थ काय होतो तेव्हा त्यांनी मला सांगितले की, "माझी मुलं आणि तुझी मुलं दोघेही मिळून आपल्या मुलांना मारतात". जर्मनीमध्ये याचाही घटस्फोट झालेला आहे, त्याचाही घटस्फोट झ ालेला आहे खरे म्हणजे ही जर्मनीची संस्कृती आहे. श्री. कुलकर्णी हे शिकवतांना सुध्दा फार आनंदाने शिकवत असत.

इंग्रजी भाषेतून शिक्षण घेत असतांना मुलांनी मराठी भाषा शिकलीच पाहिजे. मराठी भाषा शिकवित असतांना मराठी भाषा अत्यंत सोप्या भाषेत शिकवली पाहिजे. या चर्चेच्या अनुषंगाने या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी फार चांगले विचार व्यक्त केलेले आहेत. ज्यावेळेस या विषयाच्या कामास सुरुवात करु त्यावेळेस या ठिकाणी विचार व्यक्त केलेल्या सन्माननीय सदस्यांची निश्चित मदत घेतली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. आज सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार उपस्थित नाहीत परंतु त्यांनी सुध्दा या विषयाच्या संदर्भात पूर्वी विचार व्यक्त केलेले आहेत. बाल भारतीच्या माध्यमातून निर्माण होणारी जी पुस्तके आहेत ती सोपी, सुटसुटीत करुन विद्यार्थ्यांना मराठी भाषा सहज शिकता येईल यासाठी निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील. साहित्य क्षेत्रात प्रचंड साहित्य निर्मिती करणाऱ्या कवी कुसुमाग्रजांनी आपल्या शेवटच्या काळात लहान मुलांसाठी साहित्य लिहिलेले आहे.

सभापती महोदय, लहानपणी थिएटर कसे लिहायचे याबद्दल माझे शिक्षक मला सांगत होते की, "THE ATRE" लिहिले म्हणजे थिएटर होते. खरे म्हणजे शिक्षकाने विद्यार्थ्यांना सोप्या पध्दतीमध्ये शिकविले पाहिजे. श्री. ना.सी.फडके, श्री.वि.स.खांडेकर किंवा श्री. व्यंकटेश माडगुळकर यांनी फार चांगले साहित्य निर्माण केले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : कोणी जर वि.स.खांडेकरांचे पुस्तक वाचत असेल तर त्याच्याकडे आदराने बघितले जात असे परंतु श्री. ना.सी.फडके यांचे पुस्तक वाचत असले तर लोक रोमँटिक पध्दतीने बघत असत.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माझे "झुंबर" नावाचे पुस्तक प्रकाशित झाले होते त्यामध्ये मी "दोन ओंडक्यांची होते सागरात भेट, एक लाट येई पुन्हा नाही भेट" अशी कविता लिहिली होती.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी माझा हिंदीशी संबंध आहे असा उल्लेख केला होता, त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, 200 वर्षापूर्वी माझा हिंदीचा संबंध असेलही. परंतु या ठिकाणी मला जी प्रतिष्ठा, पैसा मिळालेला आहे ते सर्व काही मला मराठी भाषेने दिलेले आहे. मराठी भाषेतील "लोकमत" वृत्तपत्राचा संपादक होण्याची संधी मिळालेली आहे.

सभापती महोदय, मी या सभागृहाला खात्री देऊ इच्छितो की, मराठी भाषेतून शिक्षण घेतांना ते आनंददायी व्हावे यासाठी पाठ्यपुस्तके सुलभ करण्यात येतील. अध्यापन हे रुचीपूर्ण व्हावे यासाठी पावले उचलण्यात येतील. त्याच बरोबर राज्यातील मराठी माध्यम वगळता इतर माध्यमांच्या शाळामध्ये सद्या आठवीपर्यंत मराठी अनिवार्य आहे परंतु दुर्दैवाने हे धोरण केवळ कागदावरच आहे. या पुढील काळात आवश्यकता असेल त्या शाळांना भेटी मी देईन. मराठी भाषा सीबीएसई, आयसीएसई अशा कोणत्याही शाळांमध्ये शिकवली जाईल याची काळजी घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या मुद्याला मी मागच्या वेळेसच उत्तर दिले होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा...
महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा 2010 मध्ये विषय योजनेत प्रस्तावित केल्याप्रमाणे ज्या शिफारशी आल्या होत्या त्यामध्ये हिंदीवर अन्याय होणार होता हे मला मान्य आहे. याबाबत दोन्ही सभागृहामध्ये चर्चा झाली आहे. ज्यावेळी आपण प्रस्ताव दिला होता, त्यावेळी माननीय सभापतींनी निदेश दिले होते. हिंदी ही संपर्क भाषा आहे.नोकरीमध्ये संधी देणारी भाषा आहे, याचा विचार करून यापूर्वी प्रमाणेच इयत्ता पाचवी पासूनच हिंदी भाषा विषय सुरू राहील असे मी घोषित करू इच्छितो.

प्रा.शिवाजीराव भोसले यांच्या बद्दल मी कालच सन्मानननीय सदस्य प्रा.नवले यांच्याशी चर्चा केली. मी असे म्हणालो की, 20 वर्षापूर्वी मी लायन्स क्लबचा अध्यक्ष असताना माननीय प्रा.श्री.शिवाजीराव भोसले यांची सातत्याने तीन वर्षे तीन दिवसांची व्याख्यानमाला आयोजित केली होती. त्यांची भाषा अत्यंत सोपी असायची. मला त्यांचे एक वाक्य आजही आठवते. जेव्हा तुम्ही एखाद्या मुलाला शिकवता तेव्हा एक व्यक्ती शिकते. जेव्हा तुम्ही एखाद्या मुलीला शिकवता तेव्हा संपूर्ण परिवार शिकत असतो. कुटुंब शिकत असते. हे प्रा.शिवाजीराव भोसले यांचे वाक्य मला आजही आठवते. मी कालच अण्णांशी बोलत होतो. सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रा.सुरेश नवले, हेमंत टकले, आमचे भाई हे इतके चांगले बोलतात की, त्यांचे भाषण ऐकत रहावे असेच वाटते. त्यामुळे त्यांनी जो प्रश्न विचारलेला असतो तो मी विसरतो. आपले या भाषेवर प्रभुत्व आहे. मराठी भाषा सोपी करण्यासाठी मी निश्चितपणे आपणा सर्वांचा उपयोग करून घेईन. आज या सभागृहामध्ये अनेक दिवसांनी चांगली चर्चा झाली आहे. त्याचा मला आनंद होत आहे. धन्यवाद.

**तालिका सभापती** : अल्पकालीन आता चर्चा संपलेली आहे. आता पुढील अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल.

........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील शिक्षकांच्या विविध मागण्या.

**मु.शी.** : राज्यातील शिक्षकांच्या विविध मागण्या या विषयावर सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार, भगवान साळुंखे, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती** : या अल्पकालीन चर्चेसबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग-शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"राज्यातील शासकिय कर्मचाऱ्यांप्रमाणे अनुदानित संस्थामधील शिक्षक शिक्षकेत्तरांना ६ वा वेतन आयोग केंद्राच्या धर्तीवर लागू करणे, तसेच माध्यामिक शाळांच्या मुख्याध्यापकांना १५६००-३९१०० ऐवजी ९३००-३४८०० ची निम्न वेतनश्रेणी देणे, मुंबई मा. उच्च न्यायालयाने ६ महिन्यांपूर्वी निर्णय देऊन शासनाने दखल न घेणे व कायम विना अनुदानित शाळांची अद्यापही मूल्यांकनास सुरुवात न होणे व मूल्यांकनासाठी निश्चित केलेले निकष जाचक असून त्यात बदल करण्याची ग्वाही मा.मुख्यमंत्री महोदयांनी देऊनही कार्यवाही न होणे, विना अनुदानित शाळांमधील शिक्षकांनी शालांत परीक्षेच्या कामावर बहिष्कार टाकणे, तसेच विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनाबाबत अडचण निर्माण होणे, वेतनेत्तर अनुदान देण्याचे मान्य करुनही अनुदानित संस्थांचे गेल्या ८ वर्षापासूनचे अनुदान न मिळणे, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत व मागासवर्गीयांच्या फी माफीबाबत शासनाने योग्य निर्णय न घेतल्याने घोळ निर्माण होऊन विद्यार्थी लाभापासून वंचित राहणे, शिक्षकेत्तरांचा आकृती बंध ५ वर्षापूर्वी निश्चित करुनही कार्यवाही न होणे, अनुदानित शाळांमधील कायम विनाअनुदानित तुकड्यांचा कायम शब्द न काढणे व माध्यमिक विभागाच्या धर्तीवर प्राथमिक विभागातील खाजगी प्राथमिक शाळांमधील तुकड्या टिकविण्यासाठी विद्यार्थी संख्येचे निकष न बदलणे, मराठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

माध्यमाच्या शाळांना मान्यता न देणे, ८ वर्षापासून प्रलंबित वाढीव तुकड्यांन मान्यता न देणे तसेच पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांना मान्यता देणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, नियम 289 अन्वये हा प्रस्ताव सभागृहापुढे आला होता. सन्माननीय सभापती महोदयांनी त्यावर चर्चा घेण्याचे मान्य केले होते. या सभागृहाचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांच्यासह अन्य सन्माननीय सदस्यांनी सभागृहात नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव याच विषयावर आणला होता.

यानंतर श्री.सरफरे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

या सभागृहामध्ये मांडण्यात आलेल्या नियम 260 च्या प्रस्तावातील बहुतेक विषय त्या प्रस्तावामध्ये होते त्यावेळी या सभागृहाच्या दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांनी त्या चर्चेमध्ये भाग घेतला होता आणि अत्यंत चांगल्या प्रकारची चर्चा या सभागृहामध्ये झाली होती. शिक्षण क्षेत्राबद्दल, शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या समस्यांबद्दल आणि एकूणच शैक्षणिक धोरणाबाबत अत्यंत चांगली चर्चा झाली होती. या राज्याचे सन्माननीय शिक्षण मंत्री श्री. राजेंद्र दर्डा साहेबांची अत्यंत तळमळीने आणि मनापासून काम करण्याची इच्छा असल्यामुळे त्यांनी त्या चर्चेला खूप चांगले उत्तर दिले होते.

सभापती महोदय, या निमित्ताने मला फक्त दोन-तीन मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत. त्या चर्चेमध्ये या प्रस्तावाच्या अनुषंगाने ज्या समस्या मांडण्यात आल्या होत्या त्यावेळी चर्चेला उत्तर देतांना सन्माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला आश्वासन देतांना त्यावेळी दिलेला शब्द पाळावा. त्यांच्याकडून दिलेल्या अश्वासनांची पूर्ती होईल यासाठी मला त्यांना विनंती करावयाची आहे. ज्या प्रश्नासाठी आम्ही आता भांडत आहोत ते प्रश्न सन्माननीय मंत्री महोदय विधानसभेमध्ये सभासद असतांना मांडीत होते. म्हणून खऱ्या अर्थाने शिक्षण क्षेत्रातील समस्या, शिक्षकांच्या समस्यांची जाण मंत्री महोदयांना आहे. म्हणून मी त्यांना फक्त एकच विनंती करुन त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करणार आहे की, आपण सभागृहामध्ये दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होणे आवश्यक आहे.

नवीन शाळांच्या मूल्यांकनाच्या संदर्भात आदेश जारी केले आहेत, त्यातील मूल्यांकनाचे निकष जाचक आहेत. त्या निकषामध्ये बदल करण्यासंदर्भात मंत्री महोदयांची आणि शासनाची भूमिका पहाता त्यामध्ये सद्या तरी ते बदल करु इच्छित नाही. गुणवत्तेच्या बाबतीत, सुविधांच्या बाबतीत हे शासन तडजोड करणार नाही अशाप्रकारची शासनाची भूमिका आहे आणि आमची देखील तीच भूमिका आहे. गुणवत्तेच्या बाबतीत आमच्यापैकी कुणीही तडजोड करु इच्छित नाही किंवा तडजोड करण्याची आमची भूमिका नाही. परंतु ज्या शाळा नव्याने अनुदानावर येणार आहेत त्या शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी काही मुद्दे, विषय दिले आहेत. त्या मुद्यांच्या आधारावर या शाळा अनुदानास पात्र किंवा अपात्र ठरणार आहेत त्या मुद्यांबाबत थोडासा गांभीर्याने विचार केला पाहिजे. या निकषांमुळे आज अनेक शाळा अनुदानापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

सन्माननीय मंत्री महोदयांनी शाळांचे एकदा निकषानुसार मूल्यांकन होऊ द्या अशी अपेक्षा व्यक्त केली. शासनाच्या जाचक अटींमुळे काही शाळा अनुदानापासून वंचित राहणार असतील तर त्या बाबत फेरविचार करता येईल अशाप्रकारचा शब्द मंत्री महोदयांनी आम्हाला दिला. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा झाली होती व त्यांनी मान्य केले होते की, हा विषय थोडासा अडचणीचा वाटत असल्यामुळे त्या बाबत फेरविचार करतो असे त्यांनी सांगितले होते. परंतु तो फेरविचार अजूनपर्यन्त झालेला नाही. उदा. ज्या अनुदानित शाळा आहेत त्या ठिकाणी प्रयोगशाळांच्या संदर्भात जे निकष ठरविले आहेत ते आपण मूल्यांकनामध्ये तंतोतंत टाकले आहेत. त्यामध्ये विज्ञानाच्या प्रयोगशाळेसाठी, फिजिक्ससाठी, भौतिक शास्त्रासाठी वेगवेगळया प्रयोगशाळा, रसायन शास्त्रासाठी वेगळी प्रयोगशाळा, जीवशास्त्रासाठी वेगळी प्रयोगशाळा पाहिजे. आज ज्या अनुदानित शाळा आहेत त्यांच्याकडे तीन वेगवेगळया प्रयोगशाळा नाहीत, ज्या शाळांना अनुदान मिळत नाही त्यांच्याकडे आज विद्यार्थ्यांसाठी वर्गखोल्यांची अडचण आहे. या बाबतीत शहरी भागामध्ये फार मोठी अडचण आहे, माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे शहरी भागातील झ ोपडपट्टयांमधील शाळा व वर्गखोल्यांचा विषय सारखे मांडीत असल्यामुळे त्यांना याची माहिती आहे. अशाप्रकारे प्रत्येक विषयासाठी वेगवेगळया प्रयोगशाळा असणे थोडेसे अडचणीचे ठरणार आहे. परंतु आपण हे निकषामध्ये समाविष्ट केल्यामुळे त्यामधून गंभीर प्रश्न निर्माण होणार आहेत. त्यासाठी देखील आपण गुण ठेवले आहेत. वेगवेगळया शाखेसाठी शाळेच्या तीन वर्गखोल्या प्रयोगशाळा म्हणून वापरल्या जातील. ग्रामीण भागामध्ये, शहरी भागामध्ये सुध्दा हे निकष खूप अडचणीचे ठरणार आहेत.

शाळेमध्ये मुलींचे प्रमाण खूप कमी असल्यामुळे आपण जर मूल्यांकन करणार असाल तर त्या भागातील, परिसरातील शाळेमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुध्दा विचारात घेतली पाहिजे. एकूणच राज्यातील मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण दिवसें दिवस कमी होत चालले आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . . .

त्या शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येबाबत सांगावयाचे तर जर मुलींची संख्या ही मुलांच्या संख्येपेक्षा कमी असेल आणि मुलांची संख्या जास्त असेल तर तो त्या शाळेचा, शिक्षकांचा दोष नाही आणि शासनाचाही दोष नाही. मात्र सध्या एकूण जी सामाजिक परिस्थिती आहे, त्यानुसार जे विद्यार्थी उपलब्ध आहेत ते त्या शाळेमध्ये येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थीनींच्या संख्येच्या प्रमाणावर जर तुम्ही शाळांचे मूल्यांकन करणार असाल आणि त्यानुसार अनुदानास पात्र किंवा अपात्र असे ठरविणार असाल तर ते योग्य होणार नाही. त्यामुळे याचाही फेर विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गुणवत्ता वाढली पाहिजे याबद्दल मी पुन्हा पुनरावृत्ती करतो की, याबाबत आमचे दुमत नाही. पण केवळ गुणवत्ता ही आपण केवळ पर्सेंटेजच्या आधारावर ठरवू नये म्हणजे प्रथम श्रेणीमध्ये किती विद्यार्थी पास झाले, दुसऱ्या श्रेणीमध्ये किती पास झाले आणि तृतीय श्रेणीमध्ये किती पास झाले याची संख्या किती आहे ते पाहून त्याच्या आधारे जर तुम्ही शाळेची गुणवत्ता ठरविणार असाल, त्याच्या आधारावर शाळेचे मूल्यांकन करुन मग त्याला शाळेला अनुदानास पात्र ठरविणार असाल तर कुठेतरी याचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे.पण खरोखरच माननीय मंत्री महोदयांना मनापासून या शाळांना अनुदान देण्याच्या बाबतीत तळमळ आहे. म्हणून या निकषाचा अनुषंगाने आपल्याला या मूल्यांकनातून जो काही अनुभव येईल त्याबाबतीत केव्हातरी एकत्र बसून आपण याचा फेरविचार करण्याची गरज आहे.समजा या मुल्यांकनातून कमीतकमी शाळा अनुदानास पात्र ठरल्यानंतरही जर जास्तीतजास्त शाळा अनुदानापासून वंचित रहात असतील तर या संबंधातील निकष शिथिल करुन शेवटी ग्रामीण भागातील वर्षानुवर्षे म्हणजे 10-10, 12-12 वर्षे सुरु असलेल्या शाळांना अनुदान देण्याच्या संदर्भात मूल्यांकनाचा आणि एकूणच निकषाचा फेरविचार करुन जास्तीतजास्त शाळांना कसे अनुदान मिळू शकेल, कसा दिलासा मिळू शकेल या दृष्टीकोनातून विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपण वेतनेतर अनुदानाचा विषय मान्य केलेला आहे. तसेच विधानसभेमध्ये देखील हे मान्य केलेले आहे. याबाबतीत जे आश्वासन दिलेले आहे ते रेकॉर्डवर आहे. पण हा विषय अत्यंत महत्वाचा व गंभीर स्वरुपाचा आहे. ग्रामीण भागातील शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यातून अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. काही शाळांना त्यांच्या इमारतीची डागडुजी करता येत नाही. तसेच प्रिटींगचा खर्च आहे, विजेचे तसेच पाण्याचे बिल द्यावयाचे आहे,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . . .

असे अनेक विषय आहेत. त्यामुळे वेतनेतर अनुदान किती द्यावयाचे, काय द्यावयाचे त्याची आपण टक्केवारी ठरवावी. पण त्याचाही विचार करण्यात यावा. मी दोन मुद्दे मांडून माझे बोलणे संपविणार आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे लवकर संपवावे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, दोनच मुद्दे आहेत. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क घेऊ नये असे आदेश आहेत. पण ज्या शाळांना अनुदान मिळत नाही, ज्या विना अनुदानित शाळा आहेत किंवा इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत तेथे मागासवर्गीयांकडून शिक्षण शुल्क घेतले जात नाही. पण त्याची प्रतिपूर्ती शासनाकडून होत नाही या विषयाच्या बाबतीत न्यायालयापर्यंत प्रकरणे गेलेली आहेत. पण एका बाजूला मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी त्यांच्या पालकांकडून घेत नाही आणि दुसऱ्या बाजूला शासन देखील त्याची प्रतिपूर्ती करीत नाही या दोन्ही मुद्यांमुळे आमचे संस्था चालक, शाळा अडचणीमध्ये आलेल्या आहेत. म्हणून याबाबतीत सुध्दा काही मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. आपण याबाबतीत अनेक विषय चर्चेसाठी आणले असून त्यावर चर्चा सुध्दा झाली आहे. पण मी एक शेवटचा मुद्दा मांडून यासंदर्भातील माझा निवेदन संपविणार आहे.

सभापती महोदय, आपण या राज्यामध्ये शिक्षण हक्क विधेयक लागू केलेले आहे आणि ते विधयेक येऊनही आज जवळजवळ 3 वर्षे पूर्ण होतील. आता नवीन प्रक्रिया सुरु झालेली आहे. काही बाबींच्या संबंधातील नियमावली तयार करण्याच्या बाबतीत किंवा एकूणच या राज्यामध्ये सदरहू विधेयकाची अंमलबजावणी कशा प्रकारे व्हावी याविषयीचे धोरण शासन अद्याप निश्चित केलेले नाही, काही बाबतीत अद्यापही निर्णय घेणे अपेक्षित असून त्याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयामध्ये 25 टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या संदर्भात एक प्रकरण होते.परंतु आता तोही मुद्दा क्लिअर झालेला आहे.25 टक्के विद्यार्थ्यांना म्हणजे दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना आपल्या मर्जीनुसार जवळच्या आणि चांगल्या खाजगी शाळेमध्ये शिक्षण घेण्याची जी संधी विधेयकाच्या अनुषंगाने होती. त्याला काही संस्था चालकांनी कोर्टामध्ये आव्हान दिले होते पण सर्वोच्च न्यायालयाने यावर शिक्कामोर्तब केलेले आहे की,सदरहू विधेयकानुसार आता 25 टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश दिला पाहिजे. मात्र आता याबाबतीत निर्णय दिला

. . . .एन-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . . .

म्हणजे हे प्रकरण मिटले आहे असे अजिबात नाही. उलट आता त्यातून अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. आता 2012-2013 ची प्रक्रिया सुरु होईल.

यानंतर श्री.बरवड . . ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

2012-2013 च्या प्रक्रियेच्या संदर्भात जर आता आदेश दिले गेले नाहीत, त्या संदर्भातील जर सूचना दिल्या नाहीत तर 90 हजार विद्यार्थ्यांना, एक लाखापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळून जाईल आणि नंतर आपला आदेश जाईल. नंतर ते सांगतील की आता आमची प्रक्रिया संपलेली आहे त्यामुळे आता आम्ही प्रवेश देऊ शकत नाही. 2012-2013 मध्ये या 25 टक्के विद्यार्थ्यांना, दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना त्यांच्या मर्जीनुसार त्यांच्या आवडीच्या शाळेमध्ये प्रवेश मिळणार नाही. या 25 टक्के विद्यार्थ्यांच्या संदर्भामध्ये, त्यांच्या प्रवेशाच्या संदर्भामध्ये, त्यांच्या फीच्या संदर्भामध्ये त्या शाळांना प्रतिपूर्ती मिळेल की नाही या संदर्भामध्ये निर्णय होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपण 25 टक्के प्रवेश कोणत्या वर्गात देणार आहात ? ज्या ठिकाणी बालवाडीचे वर्ग सुरु होतात तेव्हापासून देणार की पहिलीपासून देणार ? आता विधेयक लागू झ ाले, आता आम्हाला हक्क मिळाला, माझा मुलगा आता चौथीमध्ये शिकतो, आम्हाला समजले आहे की, माझ्या आवडीच्या शाळेमध्ये प्रवेश मिळणार आहे म्हणून मला चौथीच्या वर्गात प्रवेश पाहिजे असेल तो मिळेल का ? अशा अनेक अडचणी त्यातून निर्माण होणार आहेत. शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने आपण आठवी पर्यंत मोफत शिक्षण देणार आहात. आपला आठवीचा वर्ग माध्यमिकला जोडलेला आहे. मग नववी आणि दहावीच्या शिक्षणाचे काय असा गंभीर प्रश्न आहे. भविष्यामध्ये नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क भरावे लागेल का, फी भरावी लागेल का, सगळ्या सुविधा मिळतील की नाही, असे अनेक प्रश्न या निमित्ताने निर्माण होणार आहेत. त्याचा उल्लेख या चर्चेच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी करावा, अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. मी या निमित्ताने फक्त दोनच प्रश्न मांडणार आहे. पहिल्या परिच्छेदामध्ये मुख्याध्यापकांच्या वेतनश्रेणीच्या संदर्भात जो मुद्दा होता त्या संदर्भात उच्च न्यायालयाने विचार करण्याचे आदेश दिलेले आहेत. ज्यावेळी आम्ही बक्षी कमिटीपुढे साक्ष देण्यासाठी गेलो त्या बैठकीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते तसेच इतर शिक्षक आमदार उपस्थित होते. बक्षी समितीने एक बाब आमच्या निदर्शनास आणून दिली की, वेतनश्रेणीच्या संदर्भामध्ये राज्य सरकारी कर्मचारी संघटना, शिक्षक-शिक्षकेतर संघटना यांची जी एकत्र समन्वय समिती होती त्या समितीने हा करार मान्य केलेला आहे. त्यामुळे तो करार तुम्हाला स्वीकारावा लागत आहे. त्यामध्ये शिक्षक माध्यमिक संघ आणि टीडीएफ म्हणजे शिक्षक लोकशाही आघाडी होती. शिक्षक लोकशाही आघाडी ही मुख्याध्यापकांचे प्रतिनिधित्व करीत नाही. त्यामुळे त्यांनी मान्य केले आहे म्हणून आपण ती वेतनश्रेणी लादत आहात, हे बरोबर नाही. आम्ही दोन्ही सन्माननीय सदस्य त्यावेळी उपस्थित होतो. आम्ही दोघांनी ते मान्य केलेले नाही. परंतु बक्षी समितीने आमच्या निदर्शनास आणून दिले की, राज्य सरकारी कर्मचारी संघटनेने त्यांचे पदरात पाडून घेतले. त्यांना सहावा वेतन आयोग मिळाला. शिक्षकांना मात्र हकीम कमिटी लावली.

हकीम कमिटी शिक्षक लोकशाही आघाडी मान्य करीत असेल तर तो मुख्याध्यापकांवर अन्याय आहे. मुख्याध्यापकांची संघटना स्वतंत्र आहे. आपले जर काही स्वतंत्र मत असेल तर आपण भूमिका घेण्यास स्वतंत्र आहात पण मुख्याध्यापक संघटनेशी चर्चा झाली पाहिजे. यामध्ये फक्त वेतनश्रेणीचाच प्रश्न नाही तर मुख्याध्यापकांचा कार्यभार, व्यवस्थापन, नवे बदललेले अभ्यासक्रम, त्यामुळे वाढलेले ओझे असे अनेक प्रश्न शालेय प्रशासनाशी निगडित आहेत. मुख्याध्यापक संघटना सातत्याने हे मांडत आली आहे. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या सगळ्या प्रश्नांबाबत मुख्याध्यापक संघटनेशी स्वतंत्र चर्चा झाली पाहिजे. केवळ शिक्षक लोकशाही आघाडीने त्या करारावर सही केली म्हणून तुम्ही लादले ते स्वीकारले पाहिजे अशी भूमिका असता कामा नये, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा की, आकृतिबंधाच्या संदर्भात शाळा चालविणे कठीण झालेले आहे. किमान ज्या ठिकाणी एकाकी पद आहे ते सुध्दा भरता येत नाही. म्हणजे शिपायाची

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. कपिल पाटील .....

जागा रिक्त झाल्यानंतर नवीन शिपाई नाही, क्लार्कची जागा रिक्त झाल्यानंतर एकही क्लार्क नाही अशा अनेक शाळा आहेत. किमान जे एकाकी पद आहे ते भरण्यास परवानगी द्यावी. ज्या ठिकाणी अनुकंपाची प्रकरणे आहेत त्या ठिकाणी पद रिक्त असेल तर प्राधान्याने अनुकंपाचा विचार झाला पाहिजे अशा दोन सूचना करुन मी माझे भाषण संपवितो.

---

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. विक्रम काळे ( औरंबाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी जास्त वेळ घेणार नाही. कारण अनेक प्रस्तावांच्या माध्यमातून या अधिवेशनात चर्चा झालेली आहे. मी मूळ मुद्यांच्या बाबतीत आणि जे होऊ शकते त्या संदर्भात बोलणार आहे आकृतिबंधाची मागणी ही बिनपैशाची मागणी आहे. ही मागणी अनेक वर्षापासून आहे हे माननीय मंत्री महोदयांना माहीत आहे. बिनपैशाची मागणी अशा अर्थाने आहे की, यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद आधीच झालेली आहे. त्यामुळे नवीन आर्थिक भार पडणार नाही. त्यामुळे आपण पुढच्या अधिवेशनात हा विषय येणार नाही याची काळजी घ्याल अशी अपेक्षा व्यक्त करतो. आपण तातडीने जूनपूर्वी हा आकृतिबंधाचा प्रश्न मार्गी लावावा अशी विनंती मी या चर्चेच्या माध्यमाधून करीत आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

सभापती महोदय, ज्युनियर कॉलेजसंबंधी माझी आपल्याबरोबर चर्चा झालेली आहे. ज्युनियर कॉलेजमधील तुकड्यांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे ज्या पध्दतीने माध्यमिक शाळांच्या तुकड्यांचे निकष बदलले आहेत त्याच पध्दतीने ज्युनियर कॉलेजसाठी तुकड्यांचे निकष तातडीने बदलणे आवश्यक आहेत. जेणे करुन येणाऱ्या शैक्षणिक वर्षामध्ये तुकड्यांची अडचण येणार नाही. मंत्री महोदय, मराठवाड्यातील ज्या तालुक्याचे प्रतिनिधीत्व करतात तेथेच 105 शिक्षक अतिरिक्त झालेले आहेत. त्यामुळे हा प्रश्नही गंभीर आहे. त्यामुळे शासनाने ज्युनिअर कॉलेजच्या तुकड्यांसंबंधी तातडीने निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, मुख्याध्यापक संघ ही राज्यातील मोठी संघटना आहे. त्यांच्या प्रतिनिधींना व शिक्षक प्रतिनिधींची एक बैठक आयोजित करुन वेतनश्रेणी व वर्क लोड या प्रश्नांची सोडवणूक करावी. कारण मुख्याध्यापक हे शाळेचे कमांडर असतात, शाळेचा आत्मा असतो. त्यामुळे ही बैठक लवकरात लवकर आयोजित करावी. वेतनेतर अनुदान देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन असल्याचे शासनाने यापूर्वी सांगितलेले आहे. परंतु किती अधिवेशनामध्ये वेतनेतर अनुदानाचा प्रश्न विचाराधीन असल्याचे मंत्री महोदय सांगणार आहेत ? याबाबतचा विचार कधी तरी पूर्ण झाला पाहिजे असे आम्हाला वाटते. मागील काळातील वेतनेतर अनुदान देण्याबाबत नंतर विचार करावा, पण पुढील काळातील वेतनेतर अनुदान देण्याबाबत तरी तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून या ठिकाणी थांबतो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.नागो पुंडलिक गाणार ( नागपूर विभाग शिक्षक ) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी केवळ 2-3 मुद्देच मांडणार आहे. सहा खात्यामध्ये शिक्षण चा विषय विभागला गेला आहे. त्यामुळे शिक्षणामध्ये सुसंगती आणावयाची असेल तर शिक्षण विभाग एकाच विभागाच्या अंतर्गत असावयास पाहिजे. या संदर्भात वेगवेगळे कायदे अस्तित्वात आहेत. एमइसीआयटी ॲक्ट आहे, रुल्स आहे, सेकंडरी स्कूल कोड, प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट, प्रायमरी एज्युकेशन रुल्स, शिक्षणाचा अधिकार हा कायदा आहे. हे सर्व कायदे एकत्र करुन शिक्षणासंबंधी विचार करण्याची आज गरज आहे. यापूर्वी नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देत असताना माननीय शिक्षण मंत्र्यांनी काही घोषणा सभागृहात केलेल्या आहेत. त्या घोषणांची तत्काळ अंमलबजावणी करण्याची गरज आहे. अंमलबजावणी करावयाची असेल, संस्था चालकांचे नियुक्तीचे अधिकार काढून घ्यावयाचे असतील तर कायद्यात तरतुदी करण्याची आवश्यकता आहे. ही प्रक्रिया तत्काळ सुरु करण्यात यावी. वेतनेतर अनुदान देण्याची घोषणा तत्काळ करण्यात यावी व मुख्याध्यापकांच्या वेतनश्रेणीबाबत शिक्षण संचालकांनी शासनाला सादर केलेला रिपोर्ट वस्तुस्थितीला सोडून आहे. त्या रिपोर्टचीही चौकशी करण्यात यावी अशी मागणी मी करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-------

3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बृहत् आराखड्यासंबंधी सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. हा बृहत् आराखडा केवळ मराठी माध्यमांच्या शाळांना लागू न करता सीबीएसईच्या शाळांना, इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी बृहत् आराखडा तयार करुन तो लवकरात लवकर प्रसिध्द करण्यात यावा. तोपर्यंत कोणत्याही माध्यमांच्या शाळांना मान्यता देऊन शिक्षण क्षेत्रामध्ये असमतोल निर्माण केला जाऊ नये अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळांचा कायम हा शब्द काढण्याबाबत मंत्री महोदयांनी अनुकूल भूमिका घेतलेली आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळांमधील कायम हा शब्द काढण्याची घोषणा केली जावी. वेतनेतर अनुदान देण्याविषयी शासनाने अनुकूल भूमिका घेतलेली आहे. त्यामुळे मंत्री महोदयांची त्याचीही घोषणा उत्तराच्या भाषणात करावी अशी मागणी करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद.

-----

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, नागो गाणार, भगवान साळुंखे, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विक्रम काळे, नागो गाणार, भंगवान साळुंखे यांनी विविध मुद्दे मांडलेले आहेत. या मुद्यांसंबंधी मी अत्यंत थोडक्यात उत्तर देणार आहे. याचे कारण असे की, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावाच्या चर्चेला मी विस्ताराने उत्तर दिलेले आहे. त्यावेळी मी बहुतांश मुद्यांबाबत शासनाची भूमिका विशद केलेली आहे. आजच्या चर्चेच्या वेळी एक चांगली गोष्ट झाली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण संपेपर्यन्त वाढविण्यात येत आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : आज शिक्षणाच्या प्रश्नासंबंधी दोन अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आलेल्या आहेत. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी हॉर्डवेअर आणि सॉफ्टवेअर असा शब्दप्रयोग केला. आधीच्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देत असताना मी अत्यंत मोकळेपणाने आणि मनापासून बोलत होतो. कारण माझ्या मनातील त्या भावना होत्या. या अल्पकालीन चर्चेचा जो विषय आहे, जो हार्डवेअरचा विषय आहे, त्याबद्दल मनापासून बोलता येणार नाही. प्रत्येक शब्द तोलून मापून बोलावा लागतो. एखादा शब्द इकडचा तिकडे झाला की मग हक्कभंगाचा विषय होतो किंवा आश्वासनाचा विषय होतो. म्हणून बोलताना देखील काय बोलले पाहिजे किती बोलले पाहिजे याचे भान ठेवावे लागते. दुस-या बाजूला अनेकदा मी सन्माननीय सदस्यांच्या विचारांशी सहमत असतो. पण सहमत असलो तरी शेवटी त्यामध्ये आर्थिक गणित असते आणि त्या सर्व गोष्टींचा विचार करणे आवश्यक असते.

राज्याचा विकास घडवित असताना भाषेची गरज असते. त्याच वेळेला मी सांगू इच्छितो की जर आपल्याला सॉफ्टवेअर चांगले करावयाचे असेल, उत्तम शिक्षण द्यावयाचे असेल तर ते देणारे जे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांच्याकडेही त्याच भावनेतून पाहिले पाहिजे असे माझे मत आहे. जेव्हा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव या सभागृहामध्ये चर्चिला गेला त्यावेळी मी सविस्तर उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे आणि सन्माननीय सदस्य श्री. नागो गाणार यांनी एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगितली ती म्हणजे नियम 260 अन्वेच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना जे आश्वासन दिलेले आहे त्याची पूर्तता व्हायला पाहिजे. मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, या सभागृहामध्ये मी जे बोललो आहे त्या सर्व गोष्टींची पूर्तता केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. नागो गाणार हे प्रत्येक गोष्ट तात्काळ झाली पाहिजे असे म्हणतात. प्रत्येक गोष्ट तात्काळ करायला गेलो तर ते मला फार अडचणीचे ठरते. तरीही मी त्याबाबतीत निश्चितपणे काळजी घेईन.

..2..

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:30

श्री. राजेंद्र दर्डा...

सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी मूल्यांकनाचा विषय उपस्थित केला. शासनाने या शाळांना 2012-13 पासून अनुदानावर आणण्याचा निर्णय घेतल्यानंतर या शाळांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. हे मूल्यांकन करीत असताना पुढच्या काळामध्ये अहित होणार नाही, त्यांचे हितच पाहणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी मला वेळोवेळी भेटून सांगितलेले आहे की, हे मूल्यांकन करीत असताना अनेक अडचणी येऊ शकतात. शाळेची काय चूक असू शकते, असे त्यांनी सांगितले. मी त्यांना सांगितले की, आता आपण मूल्यांकनाला सुरुवात केलेली असल्यामुळे या मूल्यांकानाचा निकाल काय लागतो, कोणकोणत्या अडचणी निर्माण होतात हे समजतील. परंतु आपण जी मूल्यांकनाची पध्दत आता सुरु केलेली आहे त्यानुसार आपण काम करु या.

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी वेतनेतर अनुदानाचा प्रश्न उपस्थित केला. शाळांना वेतनेतर अनुदान देणे आवश्यक आहे असे गेल्या अनेक वर्षापासूनचे माझे आणि माझ्या विभागाचेही मत आहे. याच भूमिकेतून शासनाची प्रक्रिया सुरु असली पाहिजे आणि त्यामध्ये आम्ही पुष्कळ पुढे गेलो आहोत. या बाबतीत आपण चांगला निर्णय अपेक्षित करु या.

माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. केन्द्र शासनाने 6व्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना दिलेली आहे. या बदलत्या काळामध्ये त्यांचे असलेले अधिकार, त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा अशा अनेक बाबीवर चर्चा करणे आवश्ययक आहे. त्यासाठी मुख्याध्यापक संघटनेचे अधिकृत प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी यांची एक बैठक घेण्याची माझी तयारी आहे.

आकृतिबंधाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उच्चस्तरीय समितीकडून त्याबद्दलचा निर्णय लवकरच अपेक्षित आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे म्हणाले की हे बिनपैशाचे काम आहे. बिनपैशाने हे काम होऊ शकते हे मला कळले नाही ते सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना कळलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा.....

मुख्य सचिवांसमोर सर्व लोकप्रतिनिधींनी देखील बाजू मांडणे आवश्यक आहे. आमच्या विभागाचे सचिव हे मुख्य सचिवांसमोर जाऊन बाजू मांडतात. आपण सर्व लोकप्रतिनिधी अनुभवी आहात. आपली बाजू मुख्य सचिवांसमोर मांडता यावी म्हणून मुख्य सचिवांबरोबर तातडीने बैठक आयोजित करण्यात येईल.

महोदय, कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील तुकडया आणि वर्गांचा कायम शब्द वगळण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे बृहत आराखडयाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला गेला आहे. यासंदर्भात सांगू इच्छितो की, आमच्या विभागाकडून ग्रामीण भागाचा बृहत आराखडा तयार झालेला आहे. इंग्रजी वगळता सर्व माध्यमांसाठी तो लागू होणार आहे. इंग्रजीचा प्रश्न नाही, सी.बी.एस.ई.चा प्रश्न नाही. आमच्या विभागाने यासंबंधी निर्णय घेतलेला आहे. त्यास शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर इतर बाबतीतील देखील निर्णय घेता येतील.

सन्माननीय सदस्य श्री. साळुंखे यांनी ज्युनिअर कॉलेजचा कायम शब्द काढण्याबाबतची सूचना केली. वेळ कमी असल्यामुळे मी अतिशय घाईने बोलत आहे. मी जे काही बोलतो आहे ते त्यांना कळते आहे आणि मला देखील कळते आहे. तेव्हा कायम शब्द काढण्याबाबतचा जो मुद्दा आहे, त्याबाबतीत शासनाने पाऊल उचलले आहे, याबद्दल सन्माननीय सदस्यांना कल्पना आहे. मला असे वाटते की, मी बहुतेक प्रश्नांना उत्तरे दिलेली आहेत.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणाच्या हक्काप्रमाणे विकर सेक्शन आणि डिस ॲडव्हांटेज ग्रुप मधील विद्यार्थ्यांना 25 टक्के प्रवेश देण्यासंदर्भातील निर्णय दिलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने यासंबंधी जो निकाल दिलेला आहे त्या पध्दतीने शासन भूमिका वठविणार आहे. या घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. याबाबतीत अनेक प्रश्न उपस्थित होणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेब, आपणाला कल्पना आहे की, विकर सेक्शन आणि डिस ॲडव्हांटेज ग्रुप यासंबंधी व्याख्या तयार करावी लागेल. त्या घटकातील विद्यार्थ्यांना कशा प्रकारे प्रवेश दिला जाणार आहे, त्यासंबंधी आम्हाला मेकॅनिझम घ्यावे लागणार आहे. यासाठी पैशांची प्रतिपूर्ती कशा पध्दतीने होणार आहे याचाही शासनाला विचार करावा लागणार आहे. भविष्यात त्रास होऊ नये या अनुषंगाने शासनास विचार करावा लागणार आहे. हा विषय शासनाने

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा....
अतिशय गांभीर्याने घेतलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्याप्रमाणे त्याबाबतची योग्य पध्दतीने अंमलबजावणी होईल. सन्माननीय सदस्यांनी नियम 97 अन्वये सभागृहात अल्पकालीन चर्चा घडवून आणली व त्या चर्चेस मला उत्तर देण्याची संधी प्राप्त करुन दिली, त्याबाबतीत मी आपले आभार मानतो.

**तालिका सभापती** (श्री.विनायक मेटे ) : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 11.45 वाजता सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 11.38 ते 11.45 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/पूर्वी श्री.गिते 11:45

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मराठवाडा विभागातील वरिष्ठ महाविद्यालयात सामाजिक शास्त्राचे पद पूर्णवेळ करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(१) * २५६८३ श्री.सतीश चव्हाण , श्री.एम.एम.शेख , श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे : तारांकित प्रश्न क्रमांक २१९२३ ला दिनांक १६ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर विभागाप्रमाणे मराठवाडा विभागातील वरिष्ठ महाविद्यालयात सामाजिक शास्त्राचे दुसरे अर्धवेळ पद पूर्णवेळ करण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, त्या बाबतच्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राजेश टोपे** : (१) होय.

(२) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ८(१) मधील तरतुदीनुसार शासनाची पूर्व परवानगी न घेताच डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठाने सामाजिक शास्त्र विषयाच्या ऐच्छिक विषयाच्या तिसऱ्या वर्षास चौथा पेपर २००४ पासून सुरु केला आहे. या चौथ्या पेपरचा ४ तासिकेचा कार्यभार वाढविलेला आहे. सदर प्रकरणी शासनाची पूर्वपरवानगी घेतलेली नसल्याने तो कार्यभार अनुदानित पदावरील कार्यभारासाठी गणना करताना विचारात घेता येणार नाही. म्हणजेच मराठवाडा विभागातील वरिष्ठ महाविद्यालयात सामाजिक शास्त्राचे दुसरे अर्धवेळ पद पूर्णवेळ करण्यास मंजूरी देता येणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मराठवाड्यातील औरंगाबाद आणि नांदेड येथील विद्यापीठांमध्ये सामाजिक शास्त्र विषय शिकविण्यासाठी प्राध्यापकांचे पद अर्धवेळ ऐवजी पूर्णवेळ करण्याचा प्रस्ताव २००५-०६ पासून प्रलंबित आहे हे खरे आहे काय? या संदर्भातील निर्णय केव्हा घेण्यात येईल?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय सामाजिक शास्त्र विषयाचे दुसरे पद मान्य करावे किंवा अर्धवेळ ऐवजी पूर्णवेळ करावे अशी मागणी करण्यात येत होती. माननीय सदस्यांची आजही ती मागणी आहे. वेगेवगळ्या विद्यापीठांचे वेगवेगळे म्हणणे आहे. अभ्यासक्रम वेगवेगळे आहेत. त्यामुळे यामध्ये समानता असावी या दृष्टीकोनातून संचालक, उच्च शिक्षण यांच्या स्तरावर पाच

..२..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

जणांची एक समिती गठीत करण्यात येईल. त्यामध्ये वेगवेगळ्या विद्यापीठाचे पीएसईडीचे डायरेक्टर असतील आणि त्या समितीच्या माध्यमातून एका महिन्याच्या आत या संदर्भातील अहवाल मागविण्यात येईल, त्या अहवालाच्या अनुषंगाने योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मागील अधिवेशनात मी याच विषयावरील प्रश्न उपस्थित केला होता. त्या प्रश्नाला याच मंत्री महोदयांनी हेच उत्तर दिले होते की, प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. आता उत्तर दिले आहे की, अर्धवेळ पद पूर्णवेळ करण्यास मंजुरी देता येणार नाही. सहा महिन्यात हा बदल कसा झाला? हा विषय पद मंजूर करण्यापुरता मर्यादित नाही. मराठवाड्यामध्ये नांदेड आणि औरंगाबाद येथे वरिष्ठ महाविद्यालये आहेत. या दोन्ही विद्यापीठांमध्ये जे प्राध्यापक अर्धवेळ काम करीत आहेत त्यांना तासिका तत्वावर मानधन दिले जाते. हे मानधन दोन-दोन वर्षे मिळत नाही. त्यांचे पद पूर्णवेळ केल्यास त्यांना वेळेवर पूर्ण पगार मिळू शकेल. मंत्री महोदयांनी समिती गठीत केली जाईल असे उत्तर दिले आहे. मंत्री महोदय हे अभ्यासू असून त्यांच्या निर्णयाकडे उभ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहे. पुढील अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करण्याची पाळी आमच्यावर येऊ नये या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये समान कार्यभार, समान गुण पॅटर्न लागू करुन मराठवाडा विद्यापीठामध्ये सामाजिक शास्त्र विषयाचे पद पूर्णवेळ करण्याचा निर्णय घेण्यात येईल काय?

श्री.राजेश टोपे : होय.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये म्हटले आहे की, कायद्यातील तरतुदीनुसार शासनाची पूर्वपरवानगी न घेताच तिसऱ्या वर्षास चौथा पेपर सुरु केलेला आहे. विद्यापीठामध्ये काहीतरी विचारविनिमय होऊन व या विषयाचे महत्व लक्षात घेऊन या विषयाच्या अभ्यासाकडे विद्यार्थी वळावेत म्हणून हा ऐच्छिक विषय त्यांनी सुरु केला असावा. हा विषय कायद्यात बसत नसला तरी त्यांच्याकडून याचे स्पष्टीकरण मागवून हा विषय आवश्यक आहे की नाही याबद्दल कारवाई केली जाईल काय?

नंतर श्री.खर्चे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26683.....

श्री. राजेश टोपे : महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाने सन 2004 पासून त्यांचा चौथा पेपर वाढविला, तत्पूर्वी त्यांचे तीन पेपर्स असायचे. हा चौथा पेपर वाढविल्याने त्यांच्या 32 तासिका होऊ शकल्या व यू.जी.सी. च्या नियमाप्रमाणे 20 ला एक पूर्णवेळ शिक्षक आणि त्यानंतर उर्वरित तासिकांसाठी दुसरा असे दुसरे पद बसू शकत होते. या अनुषंगाने चौथा पेपर वाढविलेला आहे. आता प्रश्न फक्त इतकाच आहे की, मी उत्तरात सांगितल्याप्रमाणे कायद्यातील कलम 8 (1) नुसार एका विद्यापीठाला नंबर्स ऑफ पेपर्स वाढविता येतात, अभ्यासक्रम त्यांच्या त्यांच्या पध्दतीने करता येऊ शकतो पण शासनाकडून अनुदानाची अपेक्षा असेल तर त्यासाठी मात्र शासनाची पूर्व परवानगी आवश्यक असते. अशी पूर्व परवानगी न घेता हे सर्व पेपर्स वाढविलेले आहेत. त्या पध्दतीने तासिका वाढविण्यात आल्या त्यांच्यासाठी परवानगी न घेतल्याने असे उत्तर दिलेले आहे. विद्यापीठाला ॲकॅडमिक हद्दीपर्यंत संपूर्ण ॲटॉनॉमी आहे, त्यांच्या मनाप्रमाणे ते अभ्यासक्रम करु शकतात पण ग्रँटची अपेक्षा करीत असतील तर त्यासाठी परवानगी घ्यावी लागते.

श्री एस. क्यू. जमा: सभापति महोदय, महाराष्ट्र यूनिवर्सिटी एक्ट 1994 एक्ट एक ऐसा एक्ट है जिसके अंतर्गत सारी यूनिवर्सिटी चलती हैं. माननीय मंत्री जी ने यहां पर कहा कि ॲकेडमिक पर्पज के लिए नये कोर्स शुरु किए जा सकते हैं और यदि उनको ग्रांट चाहिए तो ही उनको सरकार की पमीशन लेने की जरुरत है.

सभापति महोदय, मैं यहां पर बताना चाहूंगा कि व्यवहारिक तौर पर देखा जाये तो सरकार की अनुमति के बिना कुछ काम होता ही नहीं है. क्योंकि संत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय में उर्दू पोस्ट ग्रेज्युएशन कोर्स शुरु करने की मांग पिछले दस साल से चल रही है. यह प्रस्ताव शासन के पास दस साल पहले आने के बाद भी सरकार उसको अभी तक अनुमति नहीं दे रही है. जबकि नागपुर यूनिवर्सिटी की इस कोर्स को शुरु करने की ॲकेडमिक तैयारी पूरी तरह से है.

इसलिए मेरा प्रश्न यह है कि इस एक्ट के अनुसार नागपुर यूनिवर्सिटी में उर्दू पोस्ट ग्रेज्युएशन कोर्स शुरु करने की अनुमति मांगने संबंधी जो प्रस्ताव सरकार के पास आया है, क्या सरकार यह कोर्स शुरु करने की परमीशन उस यूनिवर्सिटी को देगी या नहीं देगी ?

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26683.....

श्री. राजेश टोपे : महोदय, हा प्रश्न पूर्णत: वेगळाच आहे. तरी देखील सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा यांनी जर तसा प्रस्ताव पाठविलेला असेल तर त्याबाबत निश्चित विचार केला जाईल.

-----------------

....3

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**खाजगी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी संख्येअभावी बंद पडणा-या तुकड्या टिकविण्यासाठी विद्यार्थी संख्येच्या निकषात माध्यमिक शाळांप्रमाणे बदल होण्याबाबत**

**(2) *26403 श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे, श्री.संजय केळकर, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो पुंडलिक गाणार** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात विद्यार्थी संख्येअभावी बंद पडणाऱ्या माध्यमिक शाळांमधील तुकड्या टिकविण्यासाठी दिनांक 2 फेब्रुवारी,2009 च्या शासन निर्णयानुसार विद्यार्थी संख्येच्या निकषात बदल केला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, माध्यमिक शाळांप्रमाणे प्राथमिक शाळांमधील तुकड्याही दिवसेंदिवस कमी होत आहेत, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, गेल्या तीन वर्षात प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी संख्येअभावी बंद पडलेल्या तुकड्यांची संख्या किती आहे,

(4) माध्यमिक विभागाप्रमाणेच प्राथमिक शाळांमधील बंद पडणाऱ्या तुकड्या टिकविण्यासाठी शासनाने विद्यार्थी संख्येच्या निकषात बदल करण्याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनाबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (1), (2), (3) व (4) माध्यमिक शाळांमध्ये विषयानुसार शिक्षक पदे मंजूर करण्यात येतात. प्राथमिक शाळेतील शिक्षकांची पदे विषयानुसार मंजूर केली जात नाहीत. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 अंतर्गत 6 ते 14 वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी राज्य शासनाने स्वीकारली आहे. अनुषंगाने सर्व प्राथमिक शाळांतील इयत्ता व तुकडीनिहाय पटसंख्या व त्यावर आधारित शिक्षकांची पदे निश्चित करण्यासंदर्भातील शासन निर्णय दिनांक 18 जून, 2010 रोजी निर्गमित केलेला आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. रामनाथ मोते : महोदय, प्राथमिक शाळांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या दिवसेदिवस कमी होत आहे व तुकड्या बंद पडत आहेत. माध्यमिक आणि प्राथमिकच्या तुकड्या बंद पडत आहेत. शासनाने मागील काळात म्हणजे सन 2008 मध्ये माध्यमिक शाळांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्यानुसार ग्रामीण भागात एका तुकडीत किमान 20 विद्यार्थी, शहरी भागासाठी ही संख्या 25 ची असून आदिवासी भागात 15 मुले आवश्यक आहेत. याच धर्तीवर प्राथमिक शाळांबाबत निर्णय घेणार काय किंवा हेच निकष प्राथमिक शाळांनाही लागू करणार काय ? तसेच मंत्री महोदयांनी उत्तरात म्हटले आहे की, शिक्षण हक्क कायद्याच्या अनुषंगाने प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थी संख्येच्या आधारावर शिक्षक देण्यात येतील

....4

ता. प्र. क्र. 26403........ श्री. रामनाथ मोते .....

येतील. तसेच शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी 35 हजार अतिरिक्त पदेही मंजूर केली पण खाजगी संस्थांच्या शाळांच्या संदर्भात मात्र कोणताही निर्णय शासनाने घेतलेला नाही, म्हणून हा निर्णय खाजगी संस्थांच्या शाळांसाठी देखील लागू करणार काय, त्याचबरोबर सन 2010 मध्ये शासनाने जी.आर. काढून विद्यार्थ्यांच्या संख्येचे निकष शाळांना कळविले. माझ्याकडे याच संदर्भात मी दिलेल्या पत्राला शासनाने दि. 17.10.2011 रोजी दिलेले उत्तर आहे. त्यात असे म्हटले आहे की, पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गांच्या तुकड्यांबाबत अद्याप निर्णय निर्गमित झालेला नाही, माझा प्रश्न असा आहे की, जर विद्यार्थी संख्या टिकविण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असेल तर तो कोणता आणि त्यातील विषय काय आहेत ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 26403 ......**

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माध्यमिक शाळेच्या तुकडया टिकविण्याच्या निकषाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. तुकडयांच्या संदर्भातील निकष मागे घेण्यात आला होता. यामध्ये शहरी भागासाठी 25 तसेच ग्रामीण भागासाठी 20 तसेच आदिवासी भागासाठी 15 असा निर्णय घेण्यात आला होता. माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांची विषयानुसार पदे मंजूर होत असतात. परंतु प्राथमिक शाळेतील शिक्षकांची पदे विषयानुसार मंजूर होत नसतात. माध्यमिक शाळेच्या धर्तीवर प्राथमिक शाळेच्या तुकडया टिकविण्याचे निकष बदलविण्याचे आता तरी प्रस्तावित नाही. आपल्याकडे शिक्षणाचा अधिनियम अधिकार आलेला आहे त्यामुळे प्राथमिक तुकडया टिकविण्यासाठी वेगळे निकष करण्याची आवश्यकता नाही. मात्र प्राथमिक शिक्षणासाठी पहिली ते पाचवी-आठवी मध्ये 30 किंवा सहावी ते आठवी 35 अशा पध्दतीचा निकष आरटीई मध्ये आलेला आहे तो मात्र निश्चितपणे वेळेच्या आत पाळण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी असा प्रश्न विचारला होता की, खाजगी अनुदानित शाळेच्या....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांना नंतर प्रश्न विचारण्याची संधी दिली जाईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 100 टक्के कुटुंब नियोजनाची मोहीम राबविण्यात आलेली असल्यामुळे त्या ठिकाणी विधानसभेचे एक क्षेत्र कमी झाले असून शाळेच्या संदर्भातील पटपडताळणीची संख्या अडचणीची झालेली आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळा बऱ्याच ठिकाणी बंद करण्याची वेळ जिल्हा परिषदेवर आलेली आहे. या ठिकाणी जसा प्राथमिक शाळेचा प्रश्न आहे तसाच माध्यमिक शाळेच्या संदर्भातही प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यामुळे तुकडया टिकविण्यासाठी विशेष असा निकष कोकणासाठी लावण्यात येणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 26403** ......

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, शिक्षण हे विद्यार्थ्यांसाठी आहे असे आपण नेहमी म्हणत असतो. विद्यार्थी कमी होत असल्यामुळे तुकडी टिकत नसल्यामुळे निकष बदविण्यात यावे असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. विद्यार्थी विशिष्ट शाळेत गेले नाही तर त्या शाळेचे विद्यार्थी कमी होत असतात ही वस्तुस्थिती आहे. परंतु हे विद्यार्थी दुसऱ्या शाळेत जातात व त्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढते. केवळ शिक्षक टिकविण्यासाठी प्राथमिक शाळेचे निकष बदलविणे शासनाला शक्य नाही परंतु एकही शिक्षक, कोणत्याही परिस्थितीत नोकरीवरुन कमी होणार नाही, त्यांना इतरत्र समायोजित करण्यात येईल एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी कोकणाची परिस्थिती वेगळी आहे त्यामुळे कोकणासाठी वेगळे निकष लावण्यात येतील काय असा प्रश्न विचारला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, कोकणामध्ये विद्यार्थी कमी आहेत ही वस्तुस्थिती आहे. या ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांची संख्या कमी जरी झाली तरी त्या ठिकाणच्या शाळा बंद केल्या जाणार नाहीत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शिक्षण हा सर्व मुलांचा अधिकार आहे व ते सरकारने मान्य केलेले आहे. प्रश्न क्रमांक 3 मध्ये विचारण्यात आले आहे की, गेल्या तीन वर्षात प्राथमिक शाळेमधील विद्यार्थी संख्येअभावी बंद पडलेल्या तुकडयांची संख्या किती आहे ? परंतु या प्रश्नाला उत्तरच देण्यात आलेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांअभावी किती तुकडया बंद पडलेल्या आहेत ? शिक्षणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून मान्य झालेला आहे. त्यामुळे प्राथमिक शाळेच्या ज्या तुकडया बंद पडल्या असतील त्या तुकडया पुन्हा सुरु करण्यासाठी शासन कोणती पाऊले उचलणार आहे ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, विद्यार्थी संख्येअभावी किती तुकडया बंद पडलेल्या आहेत त्याची माहिती आता माझ्याकडे नाही परंतु ही माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. प्राथमिक शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. प्राथमिक शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी न होता त्यामध्ये वाढच होत आहे. यासंदर्भात मी आपल्याला

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 26403** ......

श्री. राजेंद्र दर्डा....

उदाहरण देतो की, मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मराठी किंवा उर्दू माध्यमाच्या ज्या शाळा सुरु होत्या त्यातील काही शाळा बंद पडलेल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्याच बरोबर या शाळेमधील विद्यार्थी खाजगी शाळेमध्ये गेलेले आहेत हे सत्य आहे. एका ठिकाणी तुकडी कमी होत आहे परंतु दुसऱ्या ठिकाणी तुकडी वाढते आहे हे सत्य आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26403...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी कोकणातील एक मुद्दा मांडला आहे. कोकणात वेंगुर्ला आणि मालवण हे दोन तालुके आहेत. या दोन तालुक्यांना समुद्र किनारा आणि डोंगराळ भाग देखील लाभला आहे. यातील 17 गावे सोडली तर बाकीची गावे नॉन डोंगरीमधून काढून टाकली आहेत. कोकणात परिस्थिती वेगळी आहे. हे दोन तालुके आपण डोंगरी भागातून वगळले आहेत. ते पुन्हा डोंगरी भागात समाविष्ट करण्याच्या सूचना आपण द्याल काय ? शाळा बंद होणार नाही ही परिस्थिती खरी आहे. डोंगरी भागातील शाळांचे निकष वेगळे असल्यामुळे त्यांना वेगळा लाभ मिळतो. केवळ समुद्र आहे म्हणून तो तालुका वगळला आहे. पण याचे वैशिष्ट्य असे आहे की, या तालुक्यांमध्ये डोंगराळ भाग आणि समुद्र देखील आहे. तेव्हा या तालुक्यांना डोंगराळ भागाच्या निकषातच समाविष्ट करण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांनी दोन तालुक्यांचा उल्लेख केला आहे. यासंबंधी मी त्यांच्याकडून अधिकची माहिती घेईन. ती तपासून कोणताही अन्याय झाल असेल तर निश्चितपणे न्याय देण्याची भूमिका घेण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा सांगितला त्याबाबत निकषामध्ये आणखी एक वाढ करावी लागेल. येथे डोंगराळ भाग आहे. त्यामुळे समुद्र किनाऱ्यावरील गावे व दुर्गम भागातील गावे हे दोन शब्द समाविष्ट केले तर त्या शाळा वाचू शकतील. कारण मुले कमी आहेत. शाळा बंद होत आहेत. त्यामुळे मुलांना 10-10 कि.मी.पायपीट करावी लागते. यासाठी फक्त निकष बदलावा लागेल. दुर्गम आणि समुद्र किनाऱ्यावरील भागातील शाळांना तुकड्यांचा निकष हा राहील. RTE नुसार पटसंख्या निश्चित केली आहे. तो पर्यंत शिक्षकांना सरप्लस करू नये. सरप्लस शिक्षक वाचवत आहात त्या बद्दल वाद नाही. शाळेमध्ये शिक्षक उपलब्ध राहिला पाहिजे हा मुद्दा आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : माननीय महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना एक गोष्ट सांगितली की, त्या दोन्ही तालुक्यांची पूर्ण माहिती घेऊन न्याय देण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सूचना केली आहे, त्या जी.आर.मधील दोन शब्द बदलावे लागतील. या संबंधी माहिती घेऊन कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना न्याय मिळेल, त्यांना पायपीट करावी लागणार नाही, या दृष्टीनेच शासनाची भूमिका राहणार आहे. RTE

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26403...

श्री.राजेंद्र दर्डा...

प्रमाणे पटसंख्या निश्चित करण्यात येणार आहे. त्यानुसार कोणताही शिक्षक नोकरीतून कमी केला जाणार नाही याबद्दल देखील निश्चितपणाने काळजी घेतली जाईल. वेळ आली तर समायोजन करण्यात येईल. कोणत्याही शाळेत शिक्षक उपलब्ध राहील इतकी व्यवस्था करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी जाणीवपूर्वक प्रश्न विचारला होता. तुकड्या बंद पडलेल्या आहेत, शिक्षक अतिरिक्त झाले आहेत, त्यांचे समायोजन होत नाही, नवीन तुकड्या शासन देत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्याचे उत्तर आले नाही. तसेच सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जे निदर्शनास आणले त्याचे देखील उत्तर आले नाही. शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या आधारावर शिक्षक मान्य करणार आहात, असे उत्तर दिले आहे. आपण स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी 35 हजार पदे मंजूर केली आहेत. ज्या खाजगी प्राथमिक अनुदानित शाळा आहेत, त्यांना निकष लावून शिक्षकांना अतिरिक्त ठरवले आहे. त्यांच्या तुकड्या बंद पाडल्या आहेत, आज शिक्षक रिकामे आहेत. घरी बसून पगार घेत आहेत. शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने असे होत असेल तर आपण त्यांना तातडीने कळवून जुन्या निकषाच्या आधारे ज्या तुकड्या बंद केलेल्या आहेत, आणि शिक्षकांना अतिरिक्त ठरवले आहे, ते रद्द करून शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने त्या पट संख्ये नुसार त्या प्रमाणात शिक्षक परत देणार आहात काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, वाटतो तेवढा प्रश्न सोपा नाही याची मला देखील कल्पना आहे. हा प्रश्न महत्त्वाचा आहे, याची मला कल्पना आहे. त्यामुळे मी पहिली गोष्ट सांगितली की, RTE प्रमाणे शिक्षक नियुक्ती केली जाईल. आपण सांगितल्याप्रमाणे मी चर्चा करायला तयार आहे. माहिती घ्यायला तयार आहे. त्यात न्याय मिळेल ही शासनाची भावना आहे.

......

...3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**एकुर्ली (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील वसंत माध्यमिक विद्यालयातील, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस वैयक्तिक मान्यता मिळण्याबाबत**

**(3) * 25015 श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) एकुर्ली (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील वसंत माध्यमिक विद्यालयातील, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस वैयक्तिक मान्यता मिळण्यासाठी मा.शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हापरिषद यवतमाळ यांचेकडे रितसर प्रस्ताव पाठवून अद्यापपर्यंत मान्यता दिल्या नाहीत अशा प्रकारचे एक निवेदन शाळेतील शिक्षक / कर्मचाऱ्यांनी मा.शिक्षण संचालक, (माध्य) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांना दिनांक 19 ऑक्टोबर, 2011 रोजी वा त्यासुमारास पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (1) होय, हे खरे आहे.

(2) शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या स्तरावर वसंत माध्यमिक विद्यालय, एकुर्ली, ता.राळेगांव, जि.यवतमाळ या शाळेतील अधिकृत शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव सद्य:स्थितीत प्रलंबित नाहीत.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सदर प्रश्न हा प्रत्येक अधिवेशनामध्ये येत असतो. शाळेच्या दृष्टिकोनातून दरवर्षी दोन कामे महत्त्वाची असतात. एक म्हणजे संच मान्यता करणे आणि दुसरे म्हणजे नवीन शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देणे. शाळेच्या दृष्टीने ही कामे अतिशय महत्त्वाची आहेत.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25015...

श्री. विक्रम काळे...
मंत्री महोदयांनी संच मान्यतेमध्ये ज्या पध्दतीची पारदर्शकता आणली आहे त्यामध्ये संगणक प्रणालीव्दारे दरवर्षी संच मान्यता करण्यात येते. ही पध्दत अत्यंत चांगल्याप्रकारे अंमलात आलेली आहे. म्हणून माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, दर वर्षी ज्यापध्दतीने संच मान्यता संगणक प्रणालीनुसार दिली आहे त्याप्रमाणे वैयक्तिक मान्यता सुध्दा संगणक प्रणालीव्दारे देणार काय? या बाबत मंत्री महोदय आपणास माहित आहे की, या यंत्रणेमध्ये दिवसें दिवस मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु आहे. या शाळांना मान्यता देत असतांना प्रत्येक जिल्ह्यामध्ये लाखो रुपये घेतले जातात ही वस्तुस्थिती आहे. त्या बाबतच्या अनेक तक्रारी आपल्याकडे आल्या आहेत. त्या माध्यमातून वैयक्तिक शाळांच्या बाबतीत सुध्दा आपल्याकडे तक्रारी आल्या आहेत. म्हणून संच मान्यतेप्रमाणे वैयक्तिक मान्यता निश्चित कालावधीमध्ये आपण देणार काय, त्या बाबत आपण टाईम टेबल ठरविले आहे काय? शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी एकाच कालावधीमध्ये त्यांना वैयक्तिक मान्यता देण्यासंबंधीचे आदेश निर्गमित करणार काय?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा प्रश्न वेगळा आहे. या प्रश्नांसबंधी आपण काही विचारले तरी त्याचे उत्तर मी देण्यास तयार आहे. माननीय सदस्य श्री. विक्रम काळे साहेबांच्या प्रश्नाला मी उत्तर देतो. ते उत्तर देत असतांना इतर ठिकाणाहून देखील माझ्याकडे प्रश्न येतील. माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला असल्यामुळे मी त्याला उत्तर देतो, इतकेच नव्हेतर अशाप्रकारच्या कोणत्याही प्रश्नाला उत्तर देण्यास मी समर्थ आहे परंतु त्या बाबतीत मी अडचणीमध्ये येऊ इच्छित नाही. मी फक्त त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, पितृछाया बहुद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, आटमोडी, ही यवतमाळ जिल्ह्यातील, राळेगाव तालुक्यामधील संस्था असून या संस्थेची वसंत माध्यमिक विद्यालय, एकुर्ली ही शाळा 2001 पासून विना अनुदान तत्वावर सुरु होती. या संस्थेने एकाच नावाच्या दोन शाळा अशाप्रकारे दोन समांतर शाळा सुरु केल्या. त्यामध्ये एक शाळा अनधिकृत होती हे जेव्हा शासनाच्या लक्षात आले त्यावेळी संस्थेने अनधिकृत शाळा स्थलांतरीत केली. स्थलांतरीत केलेल्या शाळेचे संस्था चालक श्री. आशिक माणिकराव सावरकर हे आम्हाला वैयक्तिक मान्यता मिळावी या मागणीसाठी उच्च न्यायालयात गेले त्यावेळी उच्च

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

ता.प्र.क्र. 25015...
श्री. राजेंद्र दर्डा...

न्यायलायाने ऑगस्ट 2011 मध्ये असा निर्णय दिला की, शिक्षणाधिकारी, यवतमाळ यांनी शाळेच्या कर्मचाऱ्यांचा वैयक्तिक मान्यतेबाबतचा निर्णय पुढील आठ दिवसात घ्यावा. त्या दृष्टीकोनातून शासनाच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी सदरची शाळा अनधिकृत व स्थलांतरीत झालेली असल्यामुळे वैयक्तिक मान्यता देता येणार नाही असा निर्णय घेतला, अशाप्रकारे या प्रश्नाचे उत्तर आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दोन शाळांपैकी एक शाळा अधिकृत आहे तर दुसरी अनधिकृत आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. तसे असेल तर या ठिकाणी दुस-या क्रमांकाला उत्तर देतांना म्हटले आहे की, "शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या स्तरावर वसंत माध्यमिक विद्यालय,एकुर्ली, ता. राळेगांव, जि. यवतमाळ या शाळेतील अधिकृत शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव सद्यस्थितीत प्रलंबित नाहीत" त्याऐवजी "प्रस्ताव मान्य करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तर देणे आवश्यक होते. प्रश्नाला उत्तर देतांना "हो किंवा नाही" असे उत्तर दिल्यानंतर त्यावर उप प्रश्न विचारले जातात. आकाशाचा रंग निळा आहे की तांबडा आहे या प्रश्नाला गुलमोहराच्या झाडाचा रंग लाल दिसतो अशाप्रकारचे उत्तर देण्यापेक्षा शाळेचा प्रस्ताव अमूक कारणामुळे फेटाळला आहे असे सांगणे आवश्यक होते, तसे कां सांगत नाही?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय यामध्ये गंमत अशी आहे की, मी अनेक वर्षापासून सभागृहामध्ये पहात आहे की, सभागृहात असे प्रश्न विचारले जातात त्यामध्ये पहिल्या प्रश्नाला "होय" उत्तर दिल्यानंतर दुसऱ्या प्रश्नाला "होय" असे उत्तर देता येत नाही. त्यामुळे यामध्ये क्लॅरिटी आहे. आकाशाचा रंग कसा आहे हे सांगणे सोपे आहे. मी याठिकाणी ठासून उत्तर दिले आहे की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी सांगितल्याप्रमाण् त्या संस्थेचा कोणताही प्रस्ताव आमच्याकडे प्रलंबित नाही.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळणेबाबत**

**(४) * २५६६०  श्री.कपिल पाटील , श्री.जयंत प्र. पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळणेबाबत व संप काळातील रजा सर्व्हिस बुकमध्ये जमा करण्याबाबत उच्च माध्यमिक शिक्षकांनी सातत्याने मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाचव्या वेतन आयोगात उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना १९९७ पूर्वीची थकबाकी दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे ?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (१) होय.

(२) सुधारित वेतनश्रेणी ही दि.१ मार्च, २००० पासून लागू करण्यात आली असल्यामुळे थकबाकी देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सुधारित वेतनश्रेणी दि.१ जानेवारी, १९९६ पासून लागू करणे व संपकाळातील रजा त्यांच्या खाती जमा करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मला या ठिकाणी दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. एक म्हणजे १ जानेवारी १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत, दुसरा प्रश्न संप काळातील रजा खाती जमा करण्याबाबत आहे. ज्या शिक्षकांनी संप काळातील रजेची कसर भरुन काढून काम केले आहे, त्यामुळे त्या वर्षीचे शाळांचे निकाल चांगले लागले आहेत. त्या करिता पैशाची गरज लागणार नाही. फक्त तीन हजार रुपये त्यांच्या खाती जमा करण्यासंबंधीचा प्रस्ताव आपण मंजूर करणार काय, किंवा तो प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविणार काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25660 . . . .

श्री.कपिल पाटील . . . .

दुसरे म्हणजे 1996 पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या बाबतीतील प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविणार आहात काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी त्रि-स्तरीय सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीबाबत 1998-99 या कालावधीमध्ये 42 दिवसांचा संप केला होता. त्यानंतर संप संपल्यावर वाटाघाटीच्या माध्यमातून मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय असा आहे की, संपकाळातील गैरहजेरी रजा म्हणून मंजूर करावी आणि या काळातील पगार द्यावा असे दोन मुद्दे आहेत. त्यातील पहिली गोष्ट म्हणजे संपकाळातील जो पगार दिलेला आहे त्याबद्दल त्यांनी धन्यवाद मानले आहेत. परंतु त्यांनी असे सांगितले आहे की, खर्ची पडलेली जी रजा आहे, ती खात्यावर जमा करावी. आपला मुद्दा एवढाच आहे की, जी खर्ची पडलेली रजा आहे, ती खात्यावर जमा करावी आणि त्याला शासन म्हणून माझे उत्तर एवढेच आहे की, वित्त आणि सामान्य प्रशासन विभागाच्या सल्ल्याने याबद्दल निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल.

श्री.भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी छापील उत्तरातील क्रमांक 3 मध्ये असे म्हटलेले आहे की, "सुधारित वेतनश्रेणी दि.1 जानेवारी 1996 पासून लागू करणे व संपकाळातील रजा त्यांच्या खाती जमा करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे." पण आम्ही गेल्या दहा वर्षापासून हेच उत्तर वारंवार ऐकत आहोत. त्यामुळे याबाबतचा निर्णय सध्या सुरु असलेले अधिवेशन संपण्यापूर्वी होईल काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, उच्च माध्यमिक शाळेतील आणि कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगानुसार 1 जानेवारी 1996 पासून प्रथम श्रेणी रुपये 6500-10,500 आणि वरिष्ठ वेतनश्रेणी 7500-12,000 अशी वेतनश्रेणी मंजूर केलेली आहे.केंद्र शासना प्रमाणे आपण पदव्युत्तर आणि पदवी शिक्षकांसाठी 1 जानेवारी 1996 पासून पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे.केंद्र शासनाने पाचवा वेतन आयोग लागू करताना त्रि-स्तरीय वेतनश्रेणी लागू केली होती आणि राज्य शासनाने व्दि-स्तरीय वेतनश्रेणी लागू केली. त्यानंतर 42 दिवसांचा संप झ ाला. मग याबाबत समझोता झाला आणि दिनांक 1 मार्च 2000 पासून आपण सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे आणि खरे म्हणजे ती केंद्र शासनापेक्षा जास्त आहे. प्रश्न एवढाच आहे की,आपली जी मागणी आहे ती 1 जानेवारी 1996 पासून केवळ मानीव वेतनवाढ देऊन आणि 2006 ते 2009

या काळातील रक्कम द्यावी असा संघटनेचा प्रस्ताव आहे आणि यासाठी 24 कोटी 9 लक्ष 36 हजार रुपयांची तरतूद करावी लागते आणि 10 कोटी रुपयांचा प्रतिवर्षी खर्च करावा लागतो. त्यासाठी आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. त्यामुळे माझ्या विभागातर्फे हा प्रस्ताव शासनाच्या विविध स्तरावर पाठविण्यात येत असून याबाबतचा निर्णय पुढच्या अधिवेशनाच्या अगोदर निश्चितपणे घेण्यात येईल.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. कारण त्यांनी ही बाब मान्य केली आणि विभागाने सुध्दा ही रक्कम देंण्याचे मान्य केले असून तसा प्रस्ताव केला आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी असे सांगितले आहे की, मी हा प्रस्ताव पाठविलेला आहे. जोपर्यंत सर्वजण मान्य करीत नाहीत तोपर्यंत तो मान्य होत नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मुद्दा असा आहे की, जवळजवळ दहा वर्षानंतर ही रक्कम देण्यात येणार आहे. माझा असा प्रश्न आहे की, सदरहू रक्कम व्याजासहित देण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चाणाक्षपणे प्रश्न विचारलेला आहे की, तुम्ही सदरहू रक्कम व्याजासहित देणार काय ? म्हणजे व्याज देणार याचा अर्थ मुद्दलही देणारच आहे आणि ही गोष्ट माझ्या लक्षात आलेली आहे. त्यामुळे मी याबाबतीत कोणतीही कमिटमेंट करीत नाही.

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**आटपाडी (जि.सांगली) तालुक्यात विधंन विहीरी कार्यक्रमांतर्गत १२ ठिकाणी विंधण विहिरी देण्याबाबत करावयाची कार्यवाही**

**(५) * २५०४९ श्री.भगवान साळुंखे , डॉ.रणजित पाटील , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.रामनाथ मोते , श्री.चंद्रकांत पाटील** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील पाणी टंचाई असणाऱ्या वाडी-वस्तीवर व गावात विंधण विहिरीचा कार्यक्रम राबविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत १२ ठिकाणी झालेल्या सर्वेक्षणात एकाच ठिकाणी विंधण विहिरीला मान्यता देऊन शासनाने दुष्काळग्रस्तांवर अन्याय केल्याचे माहे जानेवारी, २०१२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित दुष्काळग्रस्तांना विंधण विहीर देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणेत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांच्याकरिता** : (१) होय.

(२) नाही.

(३) सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यात ऑक्टोबर ते डिसेंबर, २०११ या कालावधीच्या कृती आराखड्यामध्ये एकूण ९० विंधण विहिरी प्रस्तावित करुन सदर विंधण विहीरींचे सर्वेक्षण वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सांगली यांचेमार्फत करण्यात आले आहे. सर्वेक्षणामध्ये पाणी लागण्यायोग्य ठरलेल्या ३७ नवीन विंधण विहिरींना मान्यता दिली असून त्यापैकी ३५ विंधण विहीरींची खोदाई पूर्ण करुन सदर विंधण विहिरींवर हातपंप बसवून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तसेच जानेवारी ते मार्च, २०१२ च्या कृती आराखड्यामध्ये १७ गावातील १ गावठाण व १६ वाड्यांमध्ये एकूण ३४ विंधण विहिरी प्रस्तावित असून त्यापैकी २३ विंधण विहिरींचे सर्वेक्षण पूर्ण झाले. पाणी लागण्यायोग्य विंधण विहिरींची पुढील कार्यवाही करण्यात येईल. सांगली जिल्ह्यात मार्च, २०१२ अखेर एकूण २५२ विंधण विहिरींना मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे पाणी टंचाई निवारणार्थ अन्य उपाययोजना घेण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले आहे त्यानुसार ऑक्टोबर ते डिसेंबर, 2011 या दरम्यान 90 विंधण विहिरी आटपाडी तालुक्यामध्ये प्रस्तावित केल्या. भूजल सर्वेक्षण यंत्रणेकडून फक्त 37 ठिकाणी पाणी लागण्याची शक्यता असल्याचे लक्षात घेऊन 35 विहिरी काढण्यात आल्या तसेच हातपंप बसविले वगैरे माहिती दिलेली आहे. 90 विंधण विहिरी प्रस्तावित केल्या त्याचे कारण असे की, त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची आवश्यकता आहे, तुटवडा आहे म्हणून त्या प्रस्तावित केल्या. 35 ठिकाणी विंधण विहिरी काढल्या हे बरोबर आहे पण भूजल सर्वेक्षण यंत्रणेने तेथे विहिरींना पाणी लागत नाही असे जर मत दिले असेल तर



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

त्या ठिकाणी कोणती पर्यायी यंत्रणा उभी केली आहे ? मार्च, 2012 च्या दरम्यान 17 गावांमध्ये 34 विहिरी प्रस्तावित केल्या त्यांची कार्यवाही एक महिन्यात पूर्ण होणार का ? सांगली जिल्ह्यामध्ये 252 विंधण विहिरी प्रस्तावित असल्याचे म्हटले आहे. त्याचीही कार्यवाही एक महिन्यात पूर्ण केली जाणार आहे का ? पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेऊन कार्यवाही केली जाणार आहे का ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, टंचाईच्या आराखड्यामध्ये 90 गावे प्रस्तावित होती. सर्व्हे झाल्यानंतर जवळपास 37 गावांमध्ये जीएसडीएने मान्यता दिल्यानंतर काम केले. याचे मूळ कारण हेच आहे की, त्या जागेमध्ये पाणी लागणार नाही असे जीएसडीएने सांगितले. उर्वरित गावांमध्ये टँकरच्या माध्यमातून पाणी देत आहोत. आटपाडी तालुक्यामध्ये 17 विहिरी आणि एक तात्पुरती पाणी पुरवठा योजना....

श्री. दिवाकर रावते : आपण खरे सांगावे.

श्री. रणजित कांबळे : मी खरेच सांगत आहे. मी कधीही असत्य सांगत नाही. दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यामध्ये सांगली जिल्ह्यामध्ये सगळ्या विंधण विहिरी टंचाईमध्ये घेतलेल्या आहेत त्या पूर्ण करणार की नाही असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. आपण जे सांगत आहात तो डिसेंबरचा आराखडा आहे. शेवटच्या आराखड्यापर्यंत जे मंजूर आहे ते पूर्ण करणार आहोत.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, टंचाई, पाणी पुरवठा तसेच चाऱ्याच्या बाबतीत या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. अर्थसंकल्प मांडल्यानंतर या सभागृहात प्रमुख मुद्दा टंचाईचा आलेला आहे. ज्यावेळी पाणी पुरवठ्याच्या बाबतीत, टंचाईच्या बाबतीत चर्चा झाली त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, विंधण विहिरींचा 200 फुटाचा जो निकष आहे तो 200 फुटांऐवजी 300 फूट केला जाईल. परंतु अजूनपर्यंत खाली तसे आदेश गेलेले नाहीत. भरपूर विंधण विहिरी प्रस्तावित करण्यात येतात पण 200 फुटापर्यंत विहीर खणावयाची असा जीएसडीएचा निकष आहे. बाजूला जर एखाद्या शेतकऱ्यांची विहीर असेल आणि त्याने जर 200-300 फूट बोअर घेतली असेल तर त्या ठिकाणी मंजुरी देत नाही. वाड्या-वस्त्यांना पाणी तर दिलेच पाहिजे. 200 फुटांऐवजी 300 फुटांचा जो निकष मान्य केलेला आहे त्याचे आदेश त्वरित देणार का ? ज्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

ता. प्र. क्र. 25049 ...... श्री. रमेश शेंडगे ...

प्रस्तावित केलेल्या विंधण विहिरी आहेत त्या विहिरींचे निकष स्थानिक पातळीनुसार बदलून विंधण विहिरी मंजूर करणार का ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी मागेच सभागृहात उत्तर दिले होते की, ज्या ठिकाणी 50 टक्के पेक्षा कमी आणेवारी आहे...

श्री. दिवाकर रावते : मागे म्हणजे कोणत्या तारखेला उत्तर दिले ते सांगितले पाहिजे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मागे मी या सभागृहात उत्तर दिले होते की, ज्या गावामध्ये 50 टक्केपेक्षा कमी आणेवारी आहे आणि पाणी उपलब्ध करण्याचा दुसरा कोणताही स्त्रोत नाही त्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी जीएसडीएकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर आणि जीएसडीएच्या मान्यतेनंतर काम करण्याची निश्चितपणे परवानगी आहे. आज जे आदेश आहेत ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत गेलेले आहेत.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, कोणत्याही प्रकारचे आदेश खाली गेलेले नाहीत.

**सभापती** : जर आदेश गेले नसतील तर ते तातडीने पाठवावेत.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, होय.

श्री. जयंत प्र. पाटील : ज्या 252 विंधण विहिरींना मान्यता देण्यात आली त्याचे स्टेटस काय आहे ? किती विहिरी सुरु झाल्या, किती विहिरींचे टेंडर काढले, ते कोणाला दिले ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, पाणी टंचाई निवारणार्थ अन्य उपाययोजना केलेली आहे. मघाशी सांगण्यात आले की, टँकरची व्यवस्था केलेली आहे. 2012 मध्ये किती टँकर चालू आहेत, त्यावर किती रुपये खर्ची पडले, आज किती गावात टँकर चालू आहेत ? 2011 मध्ये या गावांमध्ये टंचाई होती का, त्या ठिकाणी किती टँकरने पाणी पुरवठा झाला व त्यावर किती रुपये खर्ची पडले ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला त्याची माहिती आता माझ्याकडे नाही. मागच्या वर्षीची माहिती पटलावर ठेवण्यात येईल. या वर्षी सांगली जिल्ह्यामध्ये 121 गावांमध्ये आणि 1025 वाड्यांमध्ये टंचाई आहे. त्या गावात आम्ही 167 टँकर्सच्या माध्यमातून पाणी देत आहोत. खर्चाची माहिती आता माझ्याकडे नाही. ती माहिती निश्चितपणे पटलावर ठेवण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25049....

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, काल मी आटपाडी तालुक्यातील शेटफळ, करदाणा गावात जाऊन आले आहे. मंत्री महोदयांनी टँकरने पाणी पुरवठा करण्याबाबत खालच्या स्तरावर आदेश दिलेले आहेत असे आताच सांगितले आहे. या तालुक्यातील उर्वरित गावातील लोकांनी टँकरची मागणी केल्यानंतर त्यांना किती दिवसात टँकरने पाणी पुरवठा केला जाईल, यासाठी कालमर्यादा घालून दिलेली नाही. त्या गावातील सरपंचांनी 2-2 महिन्यांपूर्वी टँकर्सची मागणी करुनही टँकरने पाणी दिले जात नाही. या गावांसाठी अन्य उपाययोजनाच्या माध्यमातून कोणती व्यवस्था केलेली आहे ? काल मी जिल्हाधिकाऱ्यांना सुध्दा भेटले होते. दुष्काळाच्या संदर्भातील शासनाने योग्य ते जी.आर.इश्यू केलेले आहेत. परंतु त्या जी.आर.ची योग्य पध्दतीने अंमलबजावणी होताना दिसत नाही. मागणीनंतर किती दिवसात टँकरने पाणी पुरवठा होईल याबाबतची माहिती लोकांना मिळत नाही. याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ज्यावेळी कोणत्याही गावात टंचाईची परिस्थिती निर्माण होते त्यावेळी एक आराखडा तयार करुन वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जातात. त्यामध्ये एकूण 7 प्रकारच्या उपाययोजना नमूद केलेल्या आहेत. त्यामध्ये टँकरने पाणी पुरवठा हा शेवटचा ऑप्शन नमूद केलेला आहे. मार्च महिन्यामध्ये टंचाई भासणार आहे हे गृहित धरुन त्यापूर्वीच लोकांकडून टँकरची मागणी केली जाते.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शासनाने आटपाडी व जत तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर केलेला आहे.

श्री.रणजित कांबळे : मी जनरल स्टेटमेंट करीत आहे. मी ठराविक गावासंबंधी बोलत नाही.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ठराविक गावांसंबंधी प्रश्न विचारलेला आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर या महिन्यात बृहत् आराखडा तयार केला जातो. त्यावेळी दुष्काळासाठी उपाययोजना निश्चित केली जाते. परंतु सध्या जी परिस्थिती असेल त्याप्रमाणे तातडीने उपाययोजना कराव्या लागतात. त्यामध्येही टँकर हा शेवटचा ऑप्शन आहे. सन्माननीय सदस्यांनी ठराविक गावांबाबतची माहिती दिली तर त्याबाबत चौकशी करुन तातडीने आदेश निर्गमित केले जातील.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25049.....

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आटपाडी तालुक्यात जाऊन आलेल्या आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांना आणखी कशाची चौकशी करावयाची आहे, मंत्री महोदयांनी ब्रिफ्रिंगच्या वेळी अधिकाऱ्यांकडून नीट माहिती घेतली नाही काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, शासनाच्या माहितीप्रमाणे त्या तालुक्यातील सर्व गावांमध्ये रितसर पाणी पुरवठा चालू आहे. काही गावांबाबत सन्माननीय सदस्यांकडे तक्रार आली असेल तर त्याबाबत शासनाकडून निश्चित कार्यवाही केली जाईल.

**सभापती** : मी राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सांगली जिल्ह्यातील आटपाडी हा कायम दुष्काळी तालुका आहे. त्या तालुक्यामध्ये 167 टँकर्सद्वारा पाणी पुरवठा सुरु असल्याचे आपण यापूर्वी सांगितलेले आहे. त्या ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा चालू आहे. अन्य ठिकाणी विंधन विहिरीच्या, नळ पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून पाणी पुरवठा केला जातो. लोकांकडून टँकरची मागणी आल्यानंतर बी.डी.ओ.किंवा तहसीलदार यांनी त्या गावांची पाहणी करुन जिल्हाधिकाऱ्यांना रिपोर्ट दिल्यावर टँकरने पाणी पुरवठा करण्याला मंजुरी दिली जाते. त्याप्रमाणे अन्य गावातील लोकांनी टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी केलेली आहे काय असे सन्माननीय सदस्यांनी विचारलेले आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, शासनाने यापूर्वीच विभागीय आयुक्तांना, बी.डी.ओ., तहसीलदारांना आदेश दिलेले आहेत. कोणत्याही ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी किंवा ग्रामसेवकांनी टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी केली असेल, त्याबाबत बी.डी.ओं.नी तपासणी केल्यानंतर त्या गावात गरज असेल तर त्या गावात टँकरने ताबडतोब पाणी पुरवठा सुरु करण्याबाबत तहसीलदारांना अधिकार आहे. मी यापूर्वीच सांगितले आहे की, आटपाडी तालुक्यातील 21 गावांमध्ये व 303 वाड्यांमध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी आलेली आहे. तेथे 39 टँकर्सने पाणी पुरवठा चालू आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सांगली हा आपला जिल्हा आहे. पश्चिम महाराष्ट्रात 35-36 तालुके कायम दुष्काळी आहेत. त्यामध्ये आटपाडी हा तालुका आहे. मंत्री महोदयांनी या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून उत्तर दिले पाहिजे. माननीय सभापतींनी आपल्या निदर्शनास ही बाब आणलेली आहे, त्याचे उत्तर आपल्याकडून मिळत नाही.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25049....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदय माहिती बघून देतो, नंतर देतो अशाप्रकारची उत्तरे सभागृहात देत आहेत. काही वेळा आम्ही मूळ प्रश्नाशी संबंधित नसलेल्या गावांबाबत प्रश्न विचारला तर मंत्री महोदय यासाठी वेगळा प्रश्न विचारावा लागेल असे सांगत असतात. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी ठराविक दोन गावांची नावे घेऊन प्रश्न विचारला होता. ही गावे टंचाईग्रस्त आहेत. माननीय सभापती महोदय, त्या भागातील असल्यामुळे मंत्री महोदयांनी जबाबदारीने उत्तरे दिली पाहिजेत. मंत्री महोदय केवळ वाड्यांची व गावांची आकडेवारी देऊन उत्तरे देत आहेत ही दुर्दैवी बाब आहे. मंत्री महोदयांच्या उत्तराने आमचे समाधान झाले नसल्यामुळे आम्ही त्याचा निषेध करुन सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात. )

------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांना ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबत**

**(६) * २५५८४ श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.सतीश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांना ६ व्या वेतन आयोगाची राज्य शासनाने देय असलेली दहा महिन्याची थकबाकी अद्यापही देण्यात आलेली नाही तसेच ६ टक्के व ७ टक्के महागाई भत्याचीही रक्कम देखील देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राजेश टोपे** : (१) अंशत: खरे आहे.

(२) i) माहे ऑक्टोबर, २०११ पासून ६ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात आला आहे.

ii) सहाव्या वेतन आयोगानुसार देय असलेली दहा महिन्यांची थकबाकी आणि ७% महागाई भत्ता अदा करण्यासाठी निधी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विक्रम काळे : राज्यातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना 6वा वेतन आयोग लागू केला आहे. इतर राज्यातील सर्व शिक्षक आणि कर्मचा-यांना 6वा वेतन आयोग लागू झालेला आहे. सर्वांना 6व्या वेतन आयोगाची थकबाकी मिळालेली आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना अजून 6व्या वेतन आयोगाची थकबाकी मिळालेली नाही. आता राज्य शासनाने नुकताच 7 टक्के महागाई भत्ता जाहीर केलेला आहे. तो महागाई भत्ता वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना सुध्दा लागू झालेला आहे काय ? युजीसीकडून 6व्या वेतन आयोगाच्या थकबाकीपोटी 80 टक्के रक्कम येणे आहे. ही रक्कम प्राप्त झालेली आहे काय ? नसल्यास, ती किती दिवसात प्राप्त होईल ? वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना 10 हप्त्याची थकबाकी रोखीने द्यावयाची आहे, ती कधी देण्यात येणार आहे ?

श्री. राजेश टोपे : वरिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांना 7 टक्के डी.अे. लागू आहे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. होय. तो त्यांना लागू झालेला आहे. 6व्या वेतन आयोगाच्या 1.1.2006 ते 1.3.2010 पर्यन्तची फरकाची रक्कम मिळालेली आहे काय असा सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न आहे. ती रक्कम अद्याप मिळालेली नाही. ती लवकरात लवकर मिळविण्यासाठी राज्य शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. सन्माननीय सदस्यांचा तिसरा प्रश्न हा

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

10 महिन्याच्या कॅश कॉम्पोनण्ट संबंधीचा आहे. तो देणे बाकी आहे, तो देय्य आहेच, तो दिला पाहिजे, तो त्यांचा हक्क आहे आणि तो मान्य केलेला आहे. आता 2012-13चे बजेट मान्य झालेले आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये मे महिन्यापर्यन्त ॲरिअर्स देण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न केले जातील.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा प्रश्न हा वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वेतनाशी संबंधित नसला तरी आज राज्यभरातील सर्व प्राध्यापकांनी जेलभरो आंदोलन सुरु केलेले आहे. त्यांनी परीक्षेवर बहिष्कार टाकलेला आहे. त्या प्राध्यापकांच्या मागण्यांच्या संदर्भात शासनाने काय चर्चा केली, काय तडजोड केली ? हा प्रश्न मिटविण्याच्या दृष्टीने, परीक्षांचे निकाल वेळेवर लागण्याच्या दृष्टीने शासनाने काय धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे ?

श्री. राजेश टोपे : या प्रश्नाच्या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, त्यांचा जो संप चालू आहे त्याबाबतीत त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांची मागणी पूर्ण करा तरच ते विद्यार्थ्यांचे परीक्षेचे पेपर तपासतील. आमची त्यांच्याशी दोन वेळा बोलणी झाली. त्यांचे तीन मुद्दे आहेत. पहिला मुद्दा म्हणजे 10 महिन्यांचे ॲरिअर्स ताबडतोबीने द्यावेत. याबाबतीत मी आताच सभागृहामध्ये माहिती दिली. हे ॲरिअर्स कोणत्याही परिस्थितीत मे महिन्यापर्यन्त देण्यात येतील. त्यांना 7 टक्के डी.ए.लागू आहे तो देखील मे महिन्यापर्यन्त देण्यात येईल. 1991 ते 1999 या कालावधीमध्ये रेग्युलर पिरिअड डेट ऑफ अपॉइण्टमेण्टपासून ग्राह्य धरावा असे त्यांचे म्हणणे आहे. याबाबतीत मी सभागृहामध्ये उत्तर दिलेले आहे. ..

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ 12:30

श्री. राजेश टोपे... ता.प्र.क्र.25584...

तो आम्ही ग्राहय धरणार आहोत आणि त्या अनुषंगाने वित्त विभागाकडे फाईल पाठविण्यात आलेली आहे. ती फाईल लवकर मंजूर व्हावी म्हणून आम्ही पाठपुरावा करणार आहोत, तसेच त्याबाबतचे प्लेसमेंटचे काम आणि 1991 ते 1999 या कालावधीतील प्राध्यापकांचा जो विषय आहे, तो विषय सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. या तीनच मुद्यांवर प्राध्यापकांचे आंदोलन चालू आहे. मे महिन्यापर्यंत थकबाकी देऊन प्रश्न सोडविला जाणार असल्याने त्यांनी त्यांचे आंदोलन मागे घेण्यास अडचण नाही असे मला वाटते.

-----------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अकोला जिल्ह्यातील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत १९ अशासकीय अनुदानित संस्थांच्या अहवालाबाबत**

**(७) *२५२४१ डॉ.रणजित पाटील , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.भगवान साळुंखे :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील गीतादेवी खंडेलवाल इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, गोडबोले प्लॉट्स ही अशासकीय अनुदानित संस्था माहे ऑगस्ट, १९८० पासून महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असून अशा एकूण १९ अशासकीय अनुदानित संस्था राज्यात कार्यरत आहेत त्याबाबतचा अहवाल संचालक, तंत्र शिक्षण यांच्याकडून मागितला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) अद्याप अहवालावर निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे** : (१) होय.

(२) संचालक, तंत्र शिक्षण यांच्याकडून दि.३० मार्च, २०१२ रोजीच्या पत्रान्वये नुकताच शासनास अहवाल प्राप्त झाला असून त्याची तपासणी सुरु आहे.

(३) दि.४.९.१९९९ रोजीच्या शासन निर्णयातील अनुदान सूत्रात बदल करण्याचा प्रस्ताव आहे.

(४) सदर बाब अनुदानाशी संबंधित असल्याने शासन मान्यतेने निर्णय घ्यावा लागणार असल्यामुळेत्यास काही कालावधी लागणे अपेक्षित आहे.

श्री. नागो पुंडलिक गाणार : या प्रश्नाच्या उप प्रश्न 3 ला दिलेल्या उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, दिनांक 4.9.1999 च्या शासन निर्णयातील अनुदान सूत्रात बदल करण्याचा प्रस्ताव आहे. हा बदल करण्याचा प्रस्ताव किती कालावधीत निकाली काढण्यात

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येईल? उप प्रश्न 4 ला दिलेल्या उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, सदर बाब अनुदानाशी सबंधित असल्याने शासन मान्यतेने निर्णय घ्यावा लागणार असल्यामुळे त्यास काही कालावधी लागणे अपेक्षित आहे. काही कालावधी म्हणजे किती ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री. नागो गाणार दोन प्रश्न उपस्थित केले. उत्तर क्रमांक 3 च्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, शासनाने जानेवारी महिन्यात एक समिती गठीत केली आहे. याबाबीतीत संचालकांकडून अहवाल मागवावा अशा सूचना देण्यात आल्या होत्या. त्या सूचनेप्रमाणे संचालकांचा अहवाल मार्च महिन्यामध्ये शासनाकडे प्राप्त झालेला आहे. त्या अहवालावर शासन लवकरात लवकर निर्णय घेत आहे.

---------------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यात १० वी मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्या घरी शौचालय नसेल त्यांना प्रवेश न देण्याचा केलेला नियम

**(८) * २५७२६ श्री.विनायकराव मेटे , ॲड. उषा दराडे , श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्री.सतीश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांस इयत्ता १० वी मध्ये प्रवेश देताना विद्यार्थ्यांच्या घरी शौचालय नसेल त्यांना प्रवेश न देण्याचा नवा नियम केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे अनेक पात्र व हुशार विद्यार्थी अकारावीतील शिक्षणापासून वंचित रहाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून शासनाने सदर नियम रद्द करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र दर्डा** : (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. विनायकराव मेटे : उपरोक्त तारांकित प्रश्नाच्या उप प्रश्न 1 ला नाही असे उत्तर देण्यात आले आहे. माझे असे म्हणणे आहे की, पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या घरी शौचालये असल्याशिवाय प्रवेश देऊ नये असा काही निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे काय ? या संदर्भात काही जाचक अटी टाकण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : इयत्ता दहावीमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या घरी शौचालय नाही. अशा एकही विद्यार्थ्यांस इयत्ता दहावीत प्रवेश देण्याचे नाकारलेले नाही. याबद्दल शालेय शिक्षण विभागाकडून कोणत्याही प्रकारचे परिपत्रक काढण्यात आलेले नाही. त्यामुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री. विनायकराव मेटे यांनी भविष्यामध्ये अशा प्रकारचा निर्णय घेण्याच्या शासनाचा विचार आहे काय असा प्रश्न विचारला.

5...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

त्याबाबतीत सांगू इच्छितो की, मागच्या वर्षी तंत्र व शिक्षण विभागाने एक चांगली कल्पना मांडली होती. मागील वर्षी महाविद्यालयात 11 वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी येत होते, त्या विद्यार्थ्यांच्या घरी शौचालय आहे किंवा नाही एवढाच फॉर्म भरुन द्यावयाचा होता. त्या विभागास एकूण माहिती गोळा करावयाची होती. ज्या विद्यार्थ्यांच्या घरी शौचालय नाही, त्यास प्रवेश मिळणार नाही अशी प्रसिध्दी प्रसार माध्यमांनी दिली. परंतु तशी वस्तुस्थिती नव्हती. प्रत्येकाच्या घरी शौचालय असले पाहिजे अशी आजही शासनाची इच्छा आहे. प्रत्येक कुटुंबास स्वच्छतेचे महत्व लक्षात यावयास पाहिजे. परंतु कायदा करुन विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवावे अशी कोणतीही भावना शासनाची नाही.

श्री.कपिल पाटील : माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराने आज समाधान होत असले तरी भविष्यात यासंबंधी कोणत्याही प्रकारची अट घातली जाऊ नये. कारण शिक्षण आणि शौचालयाचा काहीही संबंध नाही. ज्या कुटुंबीयांकडे शौचालये नाहीत, आपण त्यांना जरुर शौचालये बांधून द्यावीत. परंतु तुम्ही शौचालये बांधत नाही आणि विद्यार्थ्यांना सांगता की, शिक्षणासाठी येऊ नका. असे शासनातर्फे म्हटले जात असेल तर ती गोष्ट अतिशय चुकीची आहे. माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचा यासंबंधी जो उल्लेख केला आहे, त्या बाबतीत त्यांनी खुलासा केला पाहिजे.

श्री. राजेंद्र दर्डा : मी संपूर्ण प्रश्नाचे उत्तर देण्यास तयार आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या घरी शौचालय नसेल तर त्यास इयत्ता 11 वीत प्रवेश दिला जाणार नाही असे तंत्र शिक्षण विभागाने कधीही म्हटलेले नाही. शिक्षण विभागाने एक परिपत्रक काढले होते. त्यामागचा उद्देश एकच होता की, महाविद्यालयांना निर्मल असे स्टेटस द्यावयाचे होते.

श्री.कपिल पाटील : आपण ते परिपत्रक विथ्ड्रॉ करणार काय ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25726..........

श्री.राजेंद्र दर्डा : परिपत्रक विथ्ड्रॉ करण्याची गरज नाही. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थ्यांच्या घरी शौचालयाची व्यवस्था आहे याची माहिती गोळा करण्यासाठी हे परिपत्रक काढले होते. एका चांगल्या भावनेने हा प्रयत्न केला होता. जर एखाद्या महाविद्यालयातील 100 टक्के विद्यार्थ्यांच्या घरी शौचालयाची व्यवस्था असेल तर त्या महाविद्यालयाची निर्मल महाविद्यालय म्हणून नोंद करण्याची त्यांची संकल्पना होती. परंतु कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित व्हावा ही त्या परिपत्रकामागील भावना नव्हती.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, विचारलेला प्रश्न आणि मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर याचा अभ्यास केल्यानंतर जे परिपत्रक शासनाकडून काढले जाते किंवा प्रसिध्दी खात्याकडे देण्याचे जे काम आहे त्याचा विचार केला तर आम्हाला वृत्तपत्रातून "घरी शौचालय नाही तर महाविद्यालयात प्रवेश नाही, विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित" अशा आशयाची बातमी वाचावयास मिळाली. असे प्रकार थांबविण्यासाठी विभागामार्फत कोणत्या प्रकारची दक्षता घेण्यात येईल?

श्री.राजेंद्र दर्डा : अत्यंत महत्वाचा मुद्दा आपण उपस्थित केलेला आहे. अनेकदा प्रसिध्दी माध्यमामधून बातम्या आल्यानंतर त्या बातम्या व्यवस्थित नसतील आणि त्यामुळे जनतेला त्रास होणार असेल तर शासनाने वेळोवेळी त्या बातम्यांचे खंडन करणे आवश्यक आहे. माननीय सदस्यांच्या मुद्याशी मी सहमत आहे. भविष्यात तसे केले जाईल.

डॉ.दीपक सावंत : उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरी शौचालय आहे की नाही ही माहिती विचारण्यामागे राज्य शासनाची किंवा त्या विभागाची नेमकी भूमिका काय आहे?

श्री.राजेंद्र दर्डा : विद्यार्थ्यांवर लहानपणीच चांगल्या गोष्टींचे संस्कार व्हावेत, स्वच्छतेचे संस्कार व्हावेत या अत्यंत चांगल्या भूमिकेतून उच्च व तंत्र शिक्षण विभागाने परिपत्रकाच्या माध्यमातून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. परिपत्रक काढल्यानंतर ज्याच्या घरी शौचालय नाही अशा विद्यार्थ्याला ही बाब चांगली नाही हे सागण्यात येते. त्या विद्यार्थ्याच्या पालकांना घरी शौचालय बांधण्यासाठी विनंती करण्याच्या भूमिकेतून त्या विभागाने परिपत्रक काढले होते.

---



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पनवेल (जि.रायगड) येथील व्यावसायिकांकडून कार्यालय व दुकान नोंदणी करिता कार्यालयातील कर्मचारी लाच घेत असल्याबाबत**

**(९) * २५८७५ श्री.अरुण गुजराथी , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , ॲड.उषाताई दराडे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुक्यात (जि.रायगड) व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना कार्यालय किंवा दुकानाच्या नोंदणीसाठी कागदपत्रे अपुरी असल्याचे कारण देत व्यावसायिकांकडून कार्यालयातील कर्मचारी अडीच ते तीन हजार रुपयांची लाच घेत असल्याचे माहे जानेवारी, २०१२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र गावीत, श्री.हसन मुश्रीफ यांच्याकरिता** : (१) दिनांक ७.१.२०१२ रोजीच्या दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२) सहाय्यक कामगार आयुक्त, रायगड यांनी चौकशी करुन अहवाल अप्पर कामगार आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांना सादर केला आहे.

(३) या चौकशीत वृत्तपत्रातील बातमी मध्ये विशिष्ट कर्मचाऱ्याविरुध्द किंवा घटनेबाबत तक्रार नसल्याचे आढळून आले. त्यामुळे कोणत्याही कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, माझी उत्तराला हरकत आहे. हे उत्तर योग्य नाही. दिनांक ७ जानेवारी, २०१२ च्या दै.सकाळ वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली हे खरे आहे की नाही? या प्रश्नाला हे खरे आहे किंवा खरे नाही किंवा अंशत: खरे आहे असे शासनाकडून उत्तर अपेक्षित होते. सहाय्यक कामगार आयुक्त, रायगड यांनी चौकशी अहवाल कोणत्या तारखेला सादर केला, त्या अहवालामध्ये कोणत्या बाबी नमूद केल्या आहेत?

श्री.राजेंद्र गावीत : सभापती महोदय, दै.सकाळ या वृत्तपत्राचे वार्ताहर यांनी दिनांक ६ जानेवारी, २०१२ रोजी सहाय्यक कामगार आयुक्त, रायगड यांच्या कार्यालयात जाऊन संबंधित निरीक्षकांनी लाच मागितली अशी तक्रार केली.

नंतर श्री.खर्चे...

ता. प्र. क्र. 25875.......... श्री. राजेंद्र गावित .......

संबंधित पत्रकाराने विशिष्ट कर्मचाऱ्याविरुध्द अथवा घटनेच्या संदर्भात तक्रार केलेली नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नसला तरी या बातमीच्या अनुषंगाने सहाय्यक कामगार आयुक्तांनी 7 मार्च, 2012 रोजी अप्पर कामगार आयुक्त, कोकण भवन यांच्याकडे तसा अहवाल सादर केला आहे. तसेच याप्रकरणी लाचेची मागणी केल्याची तक्रार प्राप्त झालेली नसली तरी संबंधित कामगार आयुक्तांनी कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन तशा सूचना दिलेल्या आहेत आणि 4 एप्रिल, 2012 रोजी पुन्हा या प्रकरणाची सखोल चौकशी करावी असे आदेश दिलेले आहेत. प्रचलित बदलीच्या नियमाप्रमाणे 3 वर्षापेक्षा जास्त काळ एकाच ठिकाणी काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची बदली करण्याबाबतचा प्रस्ताव देखील सादर करण्यात आला आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, मंत्री महोदयांनी प्रश्नाला दिलेले उत्तर संयुक्तिक वाटत नाही. पनवेल तालुक्यात व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना कार्यालय किंवा दुकानाच्या नोंदणीची कागदपत्रे अपुरी असण्याची कारणे देऊन हे कर्मचारी सर्रास अडीच ते तीन हजाराची लाच मागतात. त्याप्रमाणे जानेवारी, 2012 मध्ये लाच घेतल्याचे निदर्शनास आले आहे. या चौकशीत वृत्तपत्रातील बातमीमुळे विशिष्ट कर्मचाऱ्याविरुध्द तक्रार नसल्याचे आढळून आले असे म्हटले आहे. मग यासंबंधीची नावासहित चौकशी सुध्दा पत्रकारांनीच करावयाची काय, जर एखादा कर्मचारी लाच घेत असताना पकडला तर त्याची नोंद अधिकाऱ्यांनीच घेतली पाहिजे, पण येथे मात्र सरकारी अधिकाऱ्यांची कामे सुध्दा पत्रकारांनीच करावयाची काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणून या संपूर्ण प्रकरणाची फेर चौकशी करुन जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई होणार काय ?

श्री. राजेंद्र गावित : महोदय, यासंदर्भात तथ्य आढळून आल्यानंतर निश्चितच कारवाई करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, मंत्री महोदयांच्या उत्तरालाच मुळात आक्षेप आहे. सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी विचारलेला प्रश्न वर्तमान पत्रातील बातमीच्या आधारे विचारलेला आहे असे समजून शासनाने उत्तर दिलेले आहे, म्हणून हा आक्षेप आहे. ज्या सहाय्यक कामगार आयुक्तांनी या प्रकरणाची चौकशी केली त्यांनी चौकशी करताना किती कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदवून घेतले व त्यात काय आढळून आले, त्याचबरोबर या कामगार

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25875.......... श्री. जयंत प्र. पाटील .......

आयुक्त कार्यालयात मी स्वत: अनेक वेळा गेलो असल्याने मलाही माहीत आहे की, कोणतेही काम पैसे दिल्याशिवाय होत नाही, म्हणून सन्माननीय सदस्या श्रीमती फडणवीस यांनी विचारल्यानुसार शासन या प्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्यामार्फत फेर चौकशी करणार काय ?

श्री. राजेंद्र गावित : महोदय, दुकाने निरीक्षकाच्या संदर्भात बऱ्याच ठिकाण अनियमितता आढळून आल्या असून आपण "महाश्रम" या संगणक सॉफ्टवेअरच्या माध्यमातून यातील त्रुटी कायमस्वरुपी कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न जानेवारी 2012 पासून सुरु केले आहेत. तसेच अप्पर आयुक्त, कामगार यांनी सर्व संबंधितांबरोबर बैठक घेऊन योग्य त्या सूचनाही दिल्या आहेत. तसेच या प्रकरणात जे जे दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : महोदय, मंत्री महोदयांनी प्रथम उत्तर दुरुस्त केले पाहिजे किंवा ते मागे तरी घेतले पाहिजे. याचे कारण म्हणजे सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नात तथ्य आहे की नाही यासंबंधीचे उत्तर प्रथम येणे अपेक्षित असते. मला मान्य आहे की, वर्तमान पत्राच्या बातमीच्या आधारे प्रश्न विचारता येत नाही अथवा त्यावर चर्चाही करता येत नाही कारण तो आधार होऊ शकत नाही, म्हणून हे उत्तर मागे घेणे आवश्यक आहे किंवा दुरुस्त केले पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी प्रश्न विचारताना कोणत्याही वर्तमान पत्रातील बातमीचा उल्लेख केलेला नाही, त्यामुळे मंत्री महोदयांनी अशा प्रकारे उत्तर देणे योग्य आहे असे मला वाटत नाही, म्हणून आपण हे उत्तर दुरुस्त केले तर बरे होईल.

श्री. राजेंद्र गावित : महोदय, या उत्तरात दुरुस्ती करण्यात येईल.

----------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यात कृषि विभागातर्फे बांधण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्याच्या बांधकामात झालेला भ्रष्टाचाराबाबत**

**(१०) * २६७०६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , प्रा.सुरेश नवले :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यात कृषि विभागातर्फे बांधण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्याच्या बांधकामात भ्रष्टाचार झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.नितीन राऊत** : (१) व (२) हे खरे नाही.
यासंबंधात प्रत्यक्षात ग्रामस्थांनी कृषी विभागाकडे तक्रार नोंदविलेली नाही. तथापि, वर्तमानपत्रात याविषयी बातमी प्रसिद्ध झाली होती. त्याअनुषंगाने जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, नागपूर याचे अध्यक्षतेखालील चमुमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(३) सन २०००-२०१० या कालावधीत भिवापूर तालुक्यात एकूण ७९ सिंमेट नाला बांधाचे कामे झाली आहेत त्यापैकी ५५ कामे सुस्थितीत आहेत. उर्वरित २४ पैकी १५ कामांची झालेली फुटतुट ही दुरूस्ती करण्यालायक असून ७ कामे ही दुरूस्त होण्यालायक नसल्याचे व २ कामे अपूर्ण अवस्थेत असल्याचे आढळून आले आहे. अपूर्ण अवस्थेतील कामाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून खर्च झालेल्या रक्मेच्या वसूलीची कार्यवाही करण्यात येत आहे.(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, यह प्रश्न नागपुर जिले के भिवापुर तालुका में सिमेंट कॅनाल में हुए भ्रष्टाचार के बारे में है. इस प्रश्न के उत्तर में माननीय मंत्री महोदय ने माना है कि 79 कॅनाल में से 55 कॅनाल ठीक पाये गए. बाकी 24 में से 15 कॅनाल दुरुस्त करने लायक हैं और 7 कॅनाल दुरुस्त करने के लायक नहीं हैं तथा दो कॅनाल तो अपूर्ण अवस्था में ही हैं. उन्होंने कहा कि दोषी कर्मचारियों से पैसे वसूले जा रहे हैं.

हमारा प्रश्न यह है कि जो काम घटिया किस्म के किए गए हैं उस बारे में जिला अधीक्षक कृषि अधिकारी द्वारा जांच के बाद जो रिपोर्ट आयी है उस रिपोर्ट के मुताबिक वहां पर भ्रष्टाचार हुआ है या नहीं हुआ है ? यदि भ्रष्टाचार हुआ है तो उन दोषी अधिकारियों पर कार्रवाई होगी या नहीं ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : २६७०६** ......

डॉ. नितीन राऊत :सभापती महोदय, या ठिकाणी जी तक्रार आलेली आहे त्यानुसार दि 24.11.2011 रोजी, दि. 3.12.2011 रोजी चौकशी करण्यात आली असून अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी सुध्दा या संदर्भात चौकशी केली असून त्याचा रिपोर्ट दिनांक 4 एप्रिल रोजी सादर झालेला आहे. यामध्ये एकंदरीत 27 कामे बघितली असून त्यातील 5 कामे दोनदा बघितलेली आहेत. 27 कामांपैकी 11 कामे सुस्थितीत आढळली असून 2 कामे अपूर्ण आढळून आलेली आहेत. बोटेजरी गावामधील शेतकऱ्यांना पाणी मिळावे यासाठी बांध बांधण्यात आले होते परंतु या बांधाला शेतकऱ्यांनी छिद्र पाडलेले आहे. या बांधकामाला शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात भगदाड पाडलले असून ही दोन्ही कामे दुरुस्त करण्यात येतील. जी कामे अपूर्ण आहेत ती कामे महात्मा फुले जल व भूमी अभियानातून पूर्ण केली जातील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी**

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, श्री. दिवाकर रावते, श्री. रामदास कदम डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. परशुराम उपरकर यांनी नियम 289 अन्वये एक प्रस्तावाची सूचना दिली असून ती पुढील प्रमाणे आहे :-

"राज्यातील शासकीय व निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांना व्यवसायरोध भत्ता (नॉन प्रॅक्टीसींग अलाऊन्स) हा सुरुवातीस मूळ वेतनाच्या 35 टक्के देण्यात येत होता तो 25 टक्के एवढा कमी करणे, त्यामुळे वैद्यकीय प्राध्यापकांच्या संघटनेतर्फे व्यवसायरोध भत्ता पूर्ववत देण्याच्या मागणीसाठीचे आंदोलन सुरु करणे, तसेच मुंबई विद्यापीठाच्या प्राध्यापकांच्याही वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याच्या मागणीसाठी संप चालू असणे, प्राध्यापकांच्या मुक्टू या संघटनेमार्फत यावर्षीच्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे पेपर तपासण्यास नकार देणे, प्राध्यापकांच्या वेतनश्रेणीबाबतचा निर्णय वित्त विभागाकडे प्रलंबित असणे, त्यामुळे निकालावर तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर परिणाम होणे, वरील दोन्ही संप प्रकरणी शासनाने गंभीरतेने लक्ष घालून प्राध्यापकांच्या मागण्या मंजूर करण्याची आवश्यकता". सदर प्रस्तावाची सूचना नियम 289 च्या निकषात कशी बसते यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटात आपले म्हणणे मांडावे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रस्तावाच्या सूचनेचे दोन भाग आहेत. राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्राध्यापकांनी संप सुरु केलेला आहे. खाजगी वैद्यकीय व्यवसाय न केल्यास त्यांना नॉन प्रॅक्टीसींग अलाऊन्स दिला जातो. दिनांक 22.4.2007 पासून नॉन प्रक्टीसींग अलाऊन्स द्यावयास पाहिजे होता. परंतु आज पर्यंत 35 टक्के नॉन प्रॅक्टीसींग अलाऊन्स न देता तो 25 टक्के दिलेला आहे. महाविद्यालयात शिकविणारी वैद्यकीय खात्यातील जी अनेक प्राध्यापक मंडळी आहेत ती संपावर गेलेली आहेत. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांनी प्रश्न उपस्थित केला होता त्याप्रमाणे कॉलेजच्या प्राध्यापकांनी मुक्टूच्या मार्फत संप सुरु केला आहे. आम्ही येणाऱ्या परीक्षांवर बहिष्कार टाकू असे दोन्ही संघटनेच्या प्राध्यापकांनी सांगितलेले आहे. बहिष्कारामुळे विद्यार्थ्यांचे पेपर तपासले जाणार नाहीत. वैद्यकीय शिक्षण खात्यामधील प्राध्यापक हे पेंशट सुध्दा तपासत असतात परंतु हे प्राध्यापक आता पेशंटसुध्दा तपासणार नाहीत.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

गेल्या अधिवेशनात या प्रश्नाच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता व त्या औचित्याच्या मुद्याचे उत्तर मला प्राप्त झालेले असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, "माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री तसेच माननीय अर्थमंत्र्यांनी यावर चर्चा करुन याबाबत निर्णय घेतलेला आहे". परंतु दुर्दैवाने या प्राध्यापकांना नॉन प्रॅक्टीसींग अलाऊन्स मिळालेला नाही. सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला करुन नियम 289 च्या प्रस्तावावर चर्चा करा असे आम्ही म्हणणार नाही परंतु हा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात राज्य शासनाकडून निवेदन होणे आवश्यक आहे. मुबई विद्यापीठाच्या कॉलेजेसचे प्राध्यापक तसेच वैद्यकीय शिक्षण खात्याच्या प्राध्यापकांच्या नॉन प्रॅक्टीसींग अलाऊन्सच्या संदर्भात शासनाकडून निवेदन होण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी नियम 289 ची सूचना दिलेली आहे. तिला अनुमोदन देण्यासाठी, पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. शिक्षण क्षेत्राशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा असा हा विषय आहे. हे आंदोलन मुंबईत आणि मुंबई विद्यापीठाशी संबंधित नसून राज्यातील सर्व विद्यापीठांशी संबंधित आहे. हे आंदोलन राज्यातील सर्व विद्यापीठांमधील प्राध्यापकांशी संबंधित आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या परीक्षा, त्यांचे मूल्यांकन, 45 दिवसाच्या आत निकाल लागणे यावर परिणाम होणार आहे. या संपामध्ये वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक मंडळी सहभागी झाल्यामुळे,डॉक्टर्स सहभागी झाल्याामुळे वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या स्पर्धा परीक्षासंबंधी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा अत्यंत गंभीर आणि महत्वाचा विषय आहे. त्यामुळे यासंबंधातील शासनाची भूमिका, धोरण विशद करणे आवश्यक आहे. हा प्रश्न मिटण्यासाठी शासनाने निवदेन करावे अशा प्रकारची विनंती मी करीत आहे.

श्री.राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, शासन माहिति घेऊन निवेदन करेल.

......

## वाढदिवसा निमित्त अभिष्टचिंतन

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, काल व परवा आपले सभागृहाचे कामकाज नव्हते. आपल्या सभागृहाचे सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी वयाची 50 वर्षे पूर्ण केली आहेत. त्यांनी आंब्याची पेटी दिल्याशिवाय पन्नास वर्षे पूर्ण झाली हे आम्हाला कळणार नाही, असे अनेकांनी मला सांगितले आहे. तेव्हा त्यांना आपण सर्वांनी मनापासून शुभेच्छा देऊ या.

**सभापती** : जरूर. मी सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांना सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देतो.

....

==2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन 2009-2010 चे वार्षिक लेखा आणि लेखा विवरणपत्र सभागृहा समोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा आणि लेखा विवरणपत्र सभागृहा समोर ठेवण्यात आले आहे.

श्री.राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2009-2010 या कालावधीच्या लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल सभागृहा समोर ठेवतो.

**सभापती** : लेखा परीक्षण अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

श्री.राजेंद्र मुळक (संसदी कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2010-2011 चा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहा समोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

......

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी गडचिरोली येथे नक्षलवाद्यांनी दिनांक 13.4.2012 रोजी एटापल्ली येथे राजकीय कार्यकर्ते म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केवल सावकार यांची केलेली निघृण हत्या तसेच जानेवारी 2012 रोजी भामरागड, पं.स.सभापती आलाम यांची गोळ्या घालून केलेली निघृण हत्या यामुळे जिल्ह्यात घडत असलेल्या घटनांमुळे आदिवासी व सामान्य जनतेच्या जीवनाला होत असलेला धोका या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्मानननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी मुंबईतील 27 शाळांमधील 44 शिक्षक आझाद मैदान येथे प्राणांतिक उपोषणाला बसणे या विषयावर नियम 93 ची सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी "धुळे जिल्ह्यातील आदिवासी टोकरे कोळी, महादेव कोळी बांधवांवरील दिनांक 10/8/2010 रोजी झालेल्या गोळीबार प्रकरणी दंडाधिकाऱ्यांमार्फत सहा महिन्यापूर्वी झालेल्या चौकशीत पोलीस उपअधीक्षक श्री. यु.एम.धोबी तसेच पोलीस अधीक्षक दोषी आढळूनही अद्याप दोषी व्यक्तींवर कारवाई करण्यात होत असलेली टाळाटाळ" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "उपनिबंधक,सहकारी गृहनिर्माण संस्था, यांनी एमआयजी सहकारी गृहनिर्माण संस्था, क्र.5, बांद्रा (पूर्व), मुंबई या संस्थेच्या ए.बी. व डी या प्रकारच्या एकूण 11 इमारतींच्या पुनर्विकास करण्याकरिता विकासक मे. कल्पतरु प्रायव्हेट लिमिटेड यांना वर्तमानपत्रात जाहिरातीव्दारो निविदा न मागविता व सर्व नियम धाब्यावर बसवून विकास म्हणून मंजुरी दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील, सर्वश्री नागो गाणार, रामनाथ मोते, भगवान साळुंखे यांनी "महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठातील शिक्षकांना शासनाने सहावा वेतन लागू न करणे, तसेच सन 1991 ते 2000 पर्यंतच्या काळातील बिगर सेट-नेट धारक शिक्षकांची सेवा नियुक्ती ग्राह्य न धरण्यात येणे, सदर शिक्षकांच्या मागणीकडे होत असलेल्या दुर्लक्ष व दिरंगाईमुळे दि. 16.4.2012 पासून शिक्षक संघटनांनी राज्यभर जेलभरो आंदोलन करण्याचा सरकारला दिलेला इशारा " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे,चंद्रकांत पाटील,संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "सत्कर्म बालगृह, केवडास, ठाणे, पनवेल बालगृहात मानसिक विकलांग मुलांचे कुपोषण व त्यांच्यावर होणारे लैंगिक अत्याचार याची दखल घेण्यासाठी प्राध्यापिका श्रीमती आशा बाजपेयी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणे, उपरोक्त समितीस आपले गुरुवींत कार्य कार्यक्षम

DGS/ D/ D/ KTG/ ST/

**सभापती** ...

करण्यासाठी दोन वर्षाची मुदत वाढ देण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : एम.सी.व्ही.सी. शिक्षक आणि कर्मचारी यांचे अनियमित होणारे वेतन याबाबत श्री कपिल पाटील, वि. प. स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.राजेश टोपे ( उच्च व तंत्र शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक एक सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिले असले तरी ही बाब अतिशय गंभीर आहे. 15 जिल्ह्यातील शिक्षकांना गेले चार महिने पगार मिळालेला नाही आणि 20 जिल्ह्यातील शिक्षकांना तीन महिने पगार मिळालेला नाही. वेतन हा बांधील खर्च असून तो वेळेवर दिला गेला पाहिजे तो देयकातून देणे आवश्यक असतांना कां दिला गेला नाही? सदरचा थकलेला पगार केव्हापर्यन्त देण्यात येईल, विकास निधीच्या नावाखाली पैसा घेतला जातो.एमसीव्हीसीला प्रवेश घेणारी मुले अत्यंत गरीब स्थितीतील असतात, त्यांना हे पैसे देणे महाग पडते. आता 50 रुपये निधी करण्यात येईल असे उत्तर मंत्री महोदयांनी दिले. परंतु माझे तर असे म्हणणे आहे की, शासनाने त्यांच्याकडून 50 रुपये सुध्दा घेता कामा नये. यंत्रसामग्री किंवा आधुनिकीकरणासाठी शासन एकदाच अनुदान देते त्यानंतर शासनाने दर पाच वर्षानी नवीन सामुग्री घेण्यासाठी अनुदान दिले पाहिजे. तो खर्च मुलांकडून वसूल करण्यास सांगणे म्हणजे त्यांच्याकडून फी घेण्यास परवानगी दिल्यासारखे आहे. या मुलांकडून कोणत्याही परिस्थितीत विकास निधी घेतला जाणार नाही. तुम्हाला 100 रुपयांची गरज असेल तर तेवढा विकास निधी शासनाने उपलब्ध करुन दिला पाहिजे तो देणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी उणे खाते असले तरी त्यामधून पगार देण्यात यावा अशी मागणी केली. हा नियम शासकीय महाविद्यालयीन कर्मचारी आणि शासकीय कर्मचाऱ्यांसाठी लागू आहे. परंतु ज्या ठिकाणी अशासकीय अनुदानित संस्था आहेत...

श्री. कपिल पाटील : माध्यमिक शाळांना हा निर्णय लागू आहे....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ही गोष्ट मान्य केली पाहिजे की, कर्मचाऱ्यांचा पगार अजिबात थांबता कामा नये. परंतु शेवटच्या तीन महिन्यांच्या कालावधीकरिता वित्त विभागाकडून 50 कोटींच्या रकमेचे बजेटींग झाले नव्हते यामुळे विलंब झालेला आहे. त्यानंतर सन 2012-13 मध्ये 403 कोटी रुपयांचे वेतनाकरिता बजेटींग करण्यात आले आहे. त्यामधून ही संपूर्ण रक्कम भागविली जाईल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . . .

त्यासाठी मे महिन्यापर्यंत ही सर्व रक्कम देण्यात येईल. तसेच मागील पूर्ण रक्कम सुध्दा मे महिन्या पर्यंत देण्यात येईल.

सभापती महोदय, तसेच सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा मांडला की, इमारत विकास निधीच्या नावाने पैसे घेऊ नयेत. पूर्वी 100 रुपये घेतले जात होते. परंतु मी मागच्या वर्षी बैठक घेऊन त्या 100 रुपयाऐवजी 50 रुपये घेण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला होता. एम.सी.व्ही.सी.चे कोर्सेस किंवा किमान कौशल्यावर आधारित जे कोर्सेस आहेत, त्यासाठी शासनाने वन-टाईम ग्रँटस् मंजूर केली होती तेव्हा तो निधी इक्वीपमेंटसाठी मंजूर करण्यात आला होता. परंतु त्या इक्वीपमेंटच्या दररोजच्या मेन्टेनन्स्साठी किंवा ज्याप्रमाणे लॅब मेन्टेनन्स् असतो त्यापध्दतीने इक्वीपमेंट मेन्टेनन्स आणि इक्वीपमेंटचा खर्च वगैरे साठी संस्थेकडे निधी उपलब्ध होत नाही. त्याकरता नाममात्र 50 रुपये घेण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत त्याबाबतीत निश्चितपणे सकारात्मक विचार करु. मघाशी सांगितल्याप्रमाणे ज्याप्रमाणे इमारत विकास निधीसाठी पूर्वी 100 रुपये घेतले जात होते, ते नंतर 50 रुपये करण्यात आले आणि 50 रुपयाऐवजी शून्य करण्यात यावे असे त्यांचे जे म्हणणे आहे त्याबाबतीत सुध्दा निश्चितपणे संस्था चालक, विद्यार्थी प्रतिनिधी आणि शिक्षक प्रतिनिधी यांची बैठक आयोजित करुन सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना देखील बोलविण्यात येईल व एक महिन्यामध्ये हा विषय आपण नक्की सोडवू.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सरकार चार महिन्याचा पगार देऊ शकलेले नाही ही गोष्ट माननीय मंत्री महोदयांनी मान्य केलेली आहे. जर पगार वेळेवर झाला नाही तर कर्जाचा हप्ता चुकतो आणि बँकेकडून किमान 500 रुपयांची पेनल्टी लावली जाते म्हणजे या शिक्षकांचे 2500 हजार रुपयांचे नुकसान झालेले आहे. माझा असा प्रश्न आहे की, शिक्षकांचा थकलेला पगार व्याजासहित देण्यात येणार आहे काय आणि जे नुकसान झालेले आहे ते भरुन देणार काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, असे नाही. मात्र मे महिन्यापर्यंत निश्चितपणे पगार देण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,सन्माननीय मंत्री महोदयांनी पगार देण्याचे आश्वासन दिलेले आहे.माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की,अशा प्रकारे तंत्रशिक्षण विभागातील किंवा एम.सी.व्ही.सी.च्या शिक्षकांच्या बाबतीत सांगावयाचे तर किमान जे कायम आहेत, ज्यांना नियमित



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . . .

मान्यता आहे आणि काम केल्यानंतर त्यांना पगार मिळणे हा त्यांचा हक्क आहे. त्यामुळे यापुढे अशा प्रकारे शिक्षकांचे पगार थकणार नाहीत, त्यांना नियमितपणे वेळेवर पगार मिळतील अशा प्रकारची हमी सन्माननीय मंत्री महोदय देणार आहेत काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, 100 टक्के होय. येथून पुढे असे होणार नाही अशी मी खात्री देतो. तसेच मी स्वत:त्यामध्ये लक्ष घालेन आणि ज्या काही उणीवा असतील तर त्या दुरुस्त केल्या जातील.

----

. . . .2 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील गांगेश्वर मंदिरापासून 60 मीटर अंतरावर असलेल्या कोकणप्राईड बिअरबार व परमिटरुमच्या नुतनीकरणासाठी परवाना देणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गणेश नाईक (राज्य उत्पादन शुल्क मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 एच-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशराम उपरकर : सभापती महोदय, 2005 साली देण्यात आलेला बिनशेती आदेश रद्द करण्यात आला. मुंबई-गोवा महामार्गाच्या मध्यापासून 18 मीटर अंतरावर ही इमारत असल्याने याठिकाणी वाणिज्य परवाना देता येत नाही म्हणून रद्द केला. त्यानंतर अपिल करन 2009 मध्ये ॲडिशनल कलेक्टर यांनी परत बिनशेती आदेश रद्द करण्याचे आदेश दिले. त्यानंतर ते आदेश परत 2010 रोजी अप्पर आयुक्तांनी मंजूर केले म्हणजे स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांनी चौकशी करुन रद्द केलेले आदेश आयुक्तांनी मान्य केले. त्याबाबत चौकशी करणार आहात काय? जर अशा पध्दतीने नगरपालिका हद्दीमध्ये 18 मीटरवर जर वाणिज्य वापरासाठी, इमारतीसाठी परवानगी देणार असाल तर अन्य इमारतींना देखील अशा प्रकारची परवानगी देण्याच्या बाबतीत शासन तरतूद करणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, श्री.भूषण मधुकर परुळेकर यांचे कोकण प्राईड हॉटेल कणकवली येथे आहे.उत्पादन शुल्क खात्याच्या माध्यमातून देण्यात आलेला परवाना हा सर्व नियमांच्या अधीन राहून देण्यात आलेला आहे.यानंतर बिनशेतीच्या बाबतीत प्रश्न राहिलेला आहे. दिनांक 26-05-2006 च्या आदेशान्वये देण्यात आलेली परवानगी उप विभागीय अधिकारी, कणकवली यांचे आदेश दिनांक 15-10-2007 अन्वये रद्द करण्यात आली.परंतु लायसन्स् होल्डरने या आदेशाविरुध्द अप्पर जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे अपिल दाखल केले असता अप्पर जिल्हाधिकारी,सिंधुदुर्ग यांनी दिनांक 30-6-2008 अन्वये उप विभागीय अधिकारी कणकवली यांची फेर चौकशी करुन आदेश आदेश देण्यात यावेत असे आदेशित केले.

**सभापतीस्थानी - माननीय उप सभापती**

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. गणेश नाईक .....

उपविभागीय अधिकारी यांच्या दि. 11.12.2009 च्या आदेशान्वये बिनशेती बाबतचा 26.5.2006 चा आदेश रद्द करण्यात आला. या आदेश रद्द करण्याच्या निर्णयाविरुध्द अनुज्ञप्तीधारकाने अपर आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांच्या न्यायालयात अपील दखल केले असता अपर आयुक्त कोकण विभाग, मुंबई यांनी त्यांच्या 18.3.2010 च्या आदेशान्वये श्री. परुळेकर यांचा अपील अर्ज मान्य करुन सदर जागा बिनशेती करुन देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी या ठिकाणी सांगितले की, अशा प्रकारची बिनशेती करुन वाणिज्य वापराकरिता किंवा अन्य बाबीसाठी परवानगी देणार आहात का ? जे परवाने शासनमान्य आहेत अशा वाणिज्य परवान्यासाठी निश्चितपणे परवानगी दिली जाईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी या ठिकाणी 23.4.2010 रोजी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय गृह मंत्र्यांनी सदर मंदिर परवानगी देण्यापूर्वीचे आहे की नंतरचे आहे हे तपासून बघितले जाईल असे उत्तर दिले होते. सदर मंदिराची नोंद जरी नसली तरी ते मंदिर फार जुने आहे आणि त्या मंदिरापासून 68 मीटर अंतरावर तो बिअर बार आहे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मुंबई विदेशी मद्य नियम, 1953 च्या नियमातील तरतुदी व शासनाच्या 1 फेब्रुवारी, 2005 च्या परिपत्रकानुसार राष्ट्रीय आणि राज्य महामार्ग महानगरपालिका, नगरपालिका गावठाण क्षेत्रातून जात असल्यास अंतर निर्बंध नियम लागू होत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी देण्यात आलेली परवानगी योग्य आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मागच्या वेळी हा प्रश्न उपस्थित केला तेव्हा माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी उत्तर दिले होते. त्या ठिकाणी मंदिरापासून 68 मीटर अंतरावर परवानगी दिलेली आहे. मंदिरापासून 100 मीटरच्या आत कोणताही बिअर बारचा किंवा परमीट रुमचा परवाना देता येत नाही. तरी सुध्दा त्या ठिकाणी परवाना दिलेला आहे. उत्तरामध्ये त्याचे कारण हे मंदिर रजिस्टर्ड नाही असे दिलेले आहे. कोकणामध्ये हजारो मंदिरे अशी आहेत की जी रजिस्टर्ड नाहीत. शासनाच्या या उत्तराचा अर्थ असा होतो की, ज्या मंदिराचे रजिस्ट्रेशन नाही अशी मंदिरे बांधण्यात येऊ नये. उद्या जर एखाद्याने रजिस्टर्ड नसलेल्या मंदिरामध्ये बिअर बार काढतो म्हटले तर त्याला शासन परवानगी देणार का ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, ज्या मंदिराचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी केलेला आहे ते गांगेश्वर मंदिर सदर अनुज्ञप्तीच्या जागेपासून 68 मीटर अंतरावर असले तरी सुध्दा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये सहायक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग विभाग यांच्याकडे हे मंदिर नोंदीत नाही. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सांगितल्याप्रमाणे कोकणामध्ये निश्चितपणे अशी हजारो मंदिरे आहेत. परंतु ज्यावेळी या ठिकाणी आस्थापना सुरु झाली त्यावेळी जर त्याला कोणी हरकत घेतली असती, ते मंदिर पुरातन काळापासून आहे अशी हरकत नोंद केली असती तर त्या ठिकाणी परवाना देण्याचा प्रश्नच उपस्थित झाला नसता. त्या ठिकाणी ते मंदिर आहे पण नोंदीत नाही. त्या ठिकाणी ही आस्थापना किंवा हा व्यवसाय आजच सुरु झालेला नाही. फार पूर्वीपासून तो सुरु आहे. ही आस्थापना पूर्वीपासून असताना तेथील मंदिराच्या विश्वस्तांची जर हरकत असती तर त्यांनी या पूर्वीच हरकत घेतली असती.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या राज्यामध्ये शासनाने निर्णय घेऊन कायदा केलेला आहे. कोणत्याही परिस्थितीत मंदिरापासून 100 मीटरच्या आत अशा प्रकारचे परवाने द्यावयाचे नाहीत असा कायदा अस्तित्वात आणलेला आहे. हरकत घेतली की घेतली नाही यापेक्षा आपल्या अधिकाऱ्यांनी ते पाहिले पाहिजे. सर्व निकषात बसत असेल तरच परवानगी द्यावी हे पाहण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांची आहे. आम्ही हरकत घेणार आणि त्यानंतर आपण त्याची तपासणी करणार मग कायदा कशासाठी केलेला आहे ? एरवी कायद्याचा बडगा दाखविता.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, विश्वस्त अधिनियम, 1950 अन्वये कोणत्याही विभागाच्या सहायक धर्मादाय आयुक्तांकडून विश्वस्तांच्या माध्यमातून नोंदीत मंदिर असेल तरच त्याची दखल घेतली जाते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक...

ज्या अर्थी हे मंदिर नोंदीमध्ये नाही, याचा अर्थ शासनाच्या नियमावलीप्रमाणे त्या ठिकाणी अशा प्रकारचे लायसन्स देण्यासाठी कोणतीही हरकत नाही. एवढेच मी आपल्यामार्फत सभागृहाला सांगू इच्छितो.

**उप सभापती** : नियम 93 अन्वये सूचनेच्या निवेदनावर एक किंवा दोन उपप्रश्न विचारण्यासाठी संधी दिली जाते. परंतु मी या निवेदनावर बऱ्याच सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिलेली आहे. आता मी पुढील कामकाज पुकारत आहे. लक्षवेधी सूचना क्रमांक 1.

श्री.दिवाकर रावते : महाराष्ट्रामध्ये जर एखादे मंदिर नोंदणीकृत नसेल तर त्या ठिकाणी दारु व बियरचा अड्डा सुरु करण्याला शासन परवाना देणार आहे काय ? हा धार्मिक विषय आहे. सर्वच मंदिरांची नोंदणी केलेली नसते. महाराष्ट्रामध्ये नोंदणीकृत मंदिरे नसतील तर त्याच्या बाजूला बिअर बार सुरु करण्याला हरकत नाही असा अर्थ मंत्री महोदयांच्या उत्तरातून निघतो. त्यामुळे मंत्री महोदय उत्तरात सुधारणा करणार आहेत काय असे मी विचारले होते.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न बरोबर आहे आणि मंत्री महोदयांनी दिलेले उत्तरही बरोबर आहे. प्रोहिबिशन ॲक्टमध्ये जी प्रोव्हिजन केलेली आहे त्यानुसार आतापर्यंतचे परवाने दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ग्राह्य धरावयाचे झाल्यास संपूर्ण कायदाच बदलावा लागेल.

श्री.दिवाकर रावते : म्हणजे मंदिराच्या गाभाऱ्याच्या मागे दारुचा धंदा चालू करण्यास हरकत नाही असा याचा अर्थ होत आहे. एखादे मंदिर सार्वजनिक विश्वस्तांकडे दिलेले नसेल तर त्या मंदिराच्या गाभाऱ्यामध्ये दारुचा अड्डा चालू करता येईल काय, असा त्याचा अर्थ निघत असल्यामुळे मी प्रश्न विचारला होता त्याला मंत्री महोदयांनी होय असे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे मंत्री महोदयांचे आभार मानावयाचे की नाही ते मला माहीत नाही. परंतु आम्हाला गणेश मंदिर मात्र बांधावे लागेल.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माझे नाव घेतले आहे. मंदिरांमध्ये दारुचे धंदे सुरु करावेत असे मी म्हटलेलेच नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : मंत्री महोदयांच्या उत्तराचा अर्थ असाच होतो.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझ्या उत्तराचा तसा अर्थ काढलेला आहे. मी उत्तर देताना असे स्पष्टपणे सांगितले आहे की, याकरिता आपल्याला कायद्यात बदल करावा लागेल. हा कायदा बदलण्यासाठी दोन्ही सभागृहासमोर यावे लागेल. सन्माननीय सदस्यांनी कायदा बदलून घ्यावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदय, जे उत्तर देत आहेत ते सरकारचे उत्तर आहे काय ? सन्माननीय सदस्यांच्या मतांची नोंद करुन शासन कायद्यामध्ये योग्य तो बदल करील असे मंत्री महोदयांनी उत्तर द्यावयास पाहिजे होते. कायदा बदलण्याचे अधिकार विरोधी पक्षातील सदस्यांना असतात काय, शासनाने कायद्यामध्ये दुरुस्ती सुचविणारे विधेयक आणावयाचे असते.

श्री.गणेश नाईक : सभागृहाने कायदा बदलला पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : सरकारने सभागृहात कायद्यात दुरुस्ती सुचविणारे विधेयक मांडल्याशिवाय प्रचलित कायदा बदलता येतो काय ? मंत्री महोदयांकडून अशा प्रकारचे उत्तर आम्हाला अपेक्षित नाही.

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

**उप सभापती** : दोन्ही बाजूच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सभागृहाचे कामकाज अशा प्रकारे चालत नाही.

श्री.किरण पावसकर : वडाच्या झाडाखाली मंदिर स्थापन केले जाते.... या संदर्भात मी सभागृहात विषय उपस्थित केला होता.

श्री.दिवाकर रावते : महाराष्ट्राच्या दृष्टीने सार्वजनिक स्वरुपाचा विषय मांडलेला आहे. वडाच्या झाडाखाली बसून जर कोणी दारु पित असेल तर तो माझा विषय नाही.

श्री.राजन तेली : अशा प्रकारच्या काही बारमध्ये जाऊन काही लोकांनी पैसे आणलेले आहेत त्याची शासन चौकशी करणार आहे काय ?

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ 13:15

श्री. पांडुरंग फुंडकर : महाराष्ट्रातील हजारो गावामध्ये हनुमानाची मंदिरे आहेत. अनेक मंदिरे पुरातन आहेत. ही पुरातन मंदिरे रजिस्टर झालेली नाहीत. असे असताना मंदिराच्या शेजारी बिअर बार काढण्याचा परवाना देऊन आपण जनतेला कोणता संदेश देणार आहात ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा एका मंदिराचा विषय नाही. यातून निर्माण होणा-या परिस्थितीचा विषय आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मी सुस्पष्ट कल्पना दिली होती की, प्रोहिबिशन ॲक्टच्या संदर्भातील हा विषय आहे. त्या ॲक्ट मधील तरतुदीच्या पलीकडे माननीय मंत्री महोदय काही करु शकणार नाहीत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे अनेक मंदिरे रजिस्टर झालेली नाहीत. केवळ मंदिरेच नाही तर शाळांच्या 100 मीटरच्या परिसरामध्ये बिअरबारच नव्हे तर वाईन शॉपही असू नये अशी तरतूद आहे. ह्या सर्व गोष्टी तपासून परवानगी दिली जाते. सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना या ठिकाणी व्यक्त केल्या त्या संदर्भात कायद्यामध्ये तरतूद करावी लागेल. आता सभागृहामध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदय पावले उचलू शकतील.

श्री. गणेश नाईक : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी व्यक्त केलेल्या भावनेशी मी पूर्णपणे सहमत आहे. महाराष्ट्रामध्ये अजून पुरातन अशी अनोंदित मंदिरे आहेत. स्टेट एक्साईज खात्याच्या अनुषंगाने जी नियमावली तयार केलेली आहे त्यानुषंगाने मी उत्तर दिलेले आहे. एकूणच सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता मी ही बाब मंत्रिमंडळासमोर ठेवीन. गरज पडल्यास सभागृहामध्ये चर्चा घडवून निर्णय घेऊ.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1 संबंधी**

**उप सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेमधील लक्षवेधी क्रमांक 1 नंतर घेण्यात यावी असे पत्र मला सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी दिलेले आहे. तेव्हा ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) कशेळी-राजापूर-सावरेवाडी धरणाच्या कालव्याची कामे पूर्ण करण्याबाबत

**मु. शी.** : राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) कशेळी-राजापूर-सावरेवाडी धरणाच्या कालव्याची कामे पूर्ण करण्याबाबत सर्वश्री. दिवाकर रावते, रामदास कदम व डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राजापूर तालुक्यातील (जिल्हा रत्नागिरी) कशेळी-राजापूर-सावरेवाडी धरण बांधून पूर्ण होऊन अनेक वर्षे झालेली असणे, या धरणात पूर्णपणे पाणी साठून अतिरिक्त पाणी समुद्रात सोडले जाणे, या धरणाच्या खालच्या बाजूला कालव्याची कामे अपूर्ण असल्यामुळे धरणात पाणी साठूनही त्याचा सिंचनासाठी उपयोग होत नसणे, अवघ्या दोन किलोमीटरचा कालवा खोदून पुढील काम तीन वर्षापासून अपूर्ण असणे, त्यामुळे परिसरातील शेतकरी सिंचनाच्या सुविधापासून वंचित होणे, धरणाच्या मुख्य पाणी साठ्याच्या एका बाजूला असलेले काही शेतकरी थेट धरणाच्या मुख्य पाण्यातून डिझेल पंपाच्या माध्यमातून पाणी उचलून हापूस आंब्याची बागायत करीत असणे, धरणाचे संबंधित अधिकारी धरणाचे पाणी सिंचनासाठी देत असल्याची खोटी नोंद करीत असणे, सिंचनासाठी पाणी देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी केली असताना उडवाउडवीची उत्तरे देण्यात येणे, परिणामी शेतकऱ्यात पसरलेला तीव्र असंतोष, त्यामुळे कालव्याची कामे तातडीने पूर्ण करुन परिसरातील शेतकऱ्यांना सदरहू धरणातून सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

डॉ. नितीन राऊत ( जलसंधारण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कशेळी-राजापूर-सावरेवाडी धरणाचा संकल्पित पाणीसाठा 2233 स.घ.मी. असून सिंचनक्षमता 157 हेक्टर इतकी आहे. हे धरण 2001साली बांधून पूर्ण झाले.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

प्रश्न असा आहे की, हा प्रकल्प 2001 साली पूर्ण झाला आहे. आतापर्यंत या प्रकल्पाच्या कालव्यांची कामे पूर्ण व्हावयास पाहिजे होती. ते कालवे काही मराठवाडा आणि विदर्भातील कालव्यासारखे पंधरा-पंधरा, वीस-वीस मीटरचे नव्हते. एक कालवा 6.50 कि.मी.एवढा आहे आणि दुसरा कालवा 1.75 कि.मी. चा आहे. 2001 ते 2012 या 11 वर्षाच्या कालावधीत सदरहू कालव्यांची कामे पूर्ण न झाल्यामुळे सिंचन क्षमता 175 हेक्टर एवढी होण्याऐवजी फक्त 30 हेक्टर एवढीच झाली आहे. या प्रकल्पाचे बॅक वॉटर उचलतात म्हणून तेवढी सिंचन क्षमता झालेली आहे. 11 वर्षाच्या कालावधीत सदरहू कालव्यांची कामे पूर्ण का होऊ शकली नाहीत, ही कामे कधीपर्यंत पूर्ण होणार आहेत ? या कालव्यामुळे कोकणातील सिंचन क्षमता 175 हेक्टर एवढी झाली असती. परंतु प्रत्यक्षात 30 हेक्टर एवढीच सिंचन क्षमता वाढली. 145 हेक्टर सिंचन क्षमता वाढू शकली नाही त्यामुळे कोणाला जबाबदार धरणार आहात ?

डॉ. नितीन राऊत : या ठिकाणी दोन कालवे आहेत. एक डावा कालवा आहे, त्याची लांबी 6.30 कि.मी.आहे. दुसरा उजवा कालवा आहे, त्याची लांबी 1.75 कि.मी.एवढी आहे. 0 ते 2 कि.मी.पर्यंतच्या कालव्याची 13.55 लक्ष रुपयांची निविदा सन 1999-2000 मध्ये निश्चित करण्यात आली होती. तथापि ठेकेदारानेच थोडेच काम केल्याने सदरची निविदा 2002 मध्ये रद्द करण्यात आली व या कामाची पुन्हा सन 2004-05 या वर्षी 23.03 लक्ष रुपये किंमतीची नवीन निविदा निश्चित करण्यात आली व सदर काम मार्च, 2008 मध्ये पूर्ण झाले. या कामावर 22.94 लक्ष रुपये एवढा खर्च झालेला आहे. नंतर 2 ते 4 कि.मी. लांबीच्या कालव्याच्या कामासाठी 18.05 लक्ष रुपये किंमतीची निविदा सन 2002-03 मध्ये निश्चित करण्यात आली. त्या कालव्याचे 75 टक्के काम पूर्ण झाले असून त्यावर 15.26 लक्ष रुपये खर्च झाला आहे. मोऱ्यांची बांधकामे वगळता कालव्यांचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित किरकोळ कामे ठेकेदाराने पूर्ण न केल्याने त्या कामासंबंधी निविदा अंतिम करण्यात आल्या असून त्यासबंधी पुढील कार्यवाही सुरु आहे. सदर उर्वरित कामे जून महिन्याच्या पहिल्या आठवडयातच म्हणजे रब्बी हंगाम सुरु होण्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत...

महोदय, 4 ते 6.50 कि.मी.लांबीच्या कालव्याच्या कामासाठी 12.90 लक्ष रुपये किंमतीची निविदा सन 2002-03 मध्ये निश्चित करण्यात आली व या भागातील 90 टक्के काम पूर्ण झाले असून त्या कामावर 13.20 लक्ष रुपये खर्च झाला आहे. 1.75 कि.मी लांबीच्या उजव्या कालव्याचे कामासाठी 14.09 लक्ष रुपये किंमतीची निविदा सन 2002-03 मध्ये निश्चित करण्यात आली होती. या कालव्याचे देखील 90 टक्के काम पूर्ण झाले आहे. 0 ते 100 मीटर मधील पाईप लाईन व जलसेतू वरील भरावाचे काम ठेकेदाराने पूर्ण न केल्याने ती कामे अपूर्ण आहेत. डाव्या व उजव्या कालव्याची कामे अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठी निविदा कार्यवाही प्रगतीत आहे. सदर कामे जून महिन्याच्या पहिल्या आठवडयातच म्हणजे रब्बी हंगाम सुरु होण्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

श्री. दिवाकर रावते : या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटले आहे की, उर्वरित कामे संबंधित कंत्राटदार करीत नसल्यामुळे ती अपूर्ण राहिली. ज्या कंत्राटदाराने कामे पूर्ण केली नाही, त्याचे नाव काय आहे, त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली ?

डॉ.नितीन राऊत : पहिले कंत्राट श्री.संजय कुऱ्हाडे यांना देण्यात आले होते. त्या कंत्राटदाराने मी सदरील कामे करु शकत नाही असे सांगितल्यामुळे त्याचे विरुध्द कारवाई करण्यात आली. त्यानंतर ते कंत्राट साईराज कन्स्ट्रक्शन कंपनीला दिले होते.

श्री. दिवाकर रावते : प्रथम कंत्राटदारावर काय कारवाई केली ?

डॉ.नितीन राऊत : त्याची अनामत रक्कम जप्त करण्याची कारवाई संबंधित कंत्राटदाराविरुध्द करण्यात आली आहे. अनामत रक्कम जप्त करण्यात आल्यानंतर त्या कामाची फ्रेश निविदा काढण्यात आली. 15 लक्ष रुपये किंमतीची जी निविदा आहे, ती लेबर सोसायटीला देणार आहोत. खास करुन मोऱ्या आणि विमोचकाचे ही कामे आहेत. ही कामे पूर्वीच्या निविदामध्ये नव्हती. ती कामे आता हाती घेतलेली आहेत. ती कामे निश्चितपणे पूर्ण करण्यात येतील.

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : त्या कंत्राटदाराची फक्त अनामत रक्कम जप्त केलेली आहे. सदर कामे पूर्ण न झाल्यामुळे 140 हेक्टरचे सिंचन झाले नाही. पहिल्या कंत्राटदाराने कामे पूर्ण केली नाहीत म्हणून त्यास काळया यादीत टाकले जाईल काय ? ही कामे वेळेत पूर्ण केली नाहीत म्हणून संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करणार आहात ? रत्नागिरी जिल्हयातील तीन तालुके सध्या टंचाईग्रस्त आहेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक.2....

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, जे काम पूर्ण झाले नाही त्याला अनेक कारणे आहेत. निविदेमध्ये भूमिगत पाईपलाईन व मोऱ्यांच्या कामाचा समावेश नव्हता. त्यांनी मागणी करण्याला अनेक कारणे आहेत. ज्या ठिकाणी कॅनॉल तयार करायचे आहे त्या साईटच्या बाजूला ग्रामदैवताचे स्थान आहे. तेथे पालखी ठेवलेली आहे. त्या ठिकाणी चौथरा बांधलेला आहे. ते धरण पूर्ण झाल्यानंतर सुध्दा हे काम पूर्ण होऊ शकले नाही. जून अखेरपर्यंत काम पूर्ण करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये एका पाठोपाठ मंदिरांचे विषय समोर येत आहेत. इतर मंदिरे रजिस्टर्ड नाहीत म्हणून निष्कासित करण्याची कारवाई केली जाते. परंतु हे मंदिर रजिस्टर्ड नसले तरी पाणी देण्याकरिता काम अडवित होते. हे दोन्ही विषय सभागृहापुढे आलेले आहेत.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, राजापूर तालुक्यातील एक उदाहरण माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सभागृहासमोर मांडले आहे. 1998 पासून आम्रड, पांग्रड, शिरवळ, फोंडा येथे जलसंधारणाची कामे सुरु आहेत. कॉन्ट्रॅक्टर हे ठराविक भागातील आहेत. ते कॉन्ट्रॅक्ट घेतात व सब कॉन्ट्रॅक्टर नेमतात आणि अर्धवट काम सोडून निघून जातात. कणकवली तालुक्यात जानवली येथे 1998 मध्ये प्रकल्प पूर्ण झाला. अद्याप शेतकऱ्यांना पैसे दिलेले नाहीत. 11 वर्षापूर्वीच्या शीघ्र गणकाप्रमाणे पैसे घेण्यास शेतकरी तयार नाहीत. कारण त्यामुळे त्यांचे नुकसान होणार आहे. जे कॉन्ट्रॅक्टर अर्धवट कामे सोडून जातात त्यांना काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय आणि अर्धवट कामांचा आढावा घेण्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येईल काय?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी अत्यंत चांगला प्रश्न उपस्थित केला आहे. अशा ज्या अनियमितता आहेत त्याची तपासणी करण्याचे काम विभागाने सुरु केलेले आहे. त्याचे सॉर्ट ॲनालिसीस करुन त्यांचा अहवाल मागविण्यासंबंधी अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. तशा प्रकारचे काम होईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, अनामत रक्कम जप्त केल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. जर कामाची रक्कम वाढणार असेल तर ती वाढीव रक्कम वसूल करण्याची नियमात तरतूद आहे, त्यानुसार कॉन्ट्रॅक्टरकडून वाढीव रक्कम वसूल केली जाईल काय?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत : नियमांतर्गत जे असेल ते तपासून केले जाईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, कॉन्ट्रॅक्टर काम घेतात आणि सब कॉन्ट्रॅक्ट करण्यासाठी तीन-चार कॉन्ट्रॅक्टरना काम वाटून देतात. अशा प्रकारचा धंदा सर्रासपणे राज्यात सुरु झालेला आहे. शासनाच्या पैशातून कॉन्ट्रॅक्टर स्वत:चा मलिदा काढून घेतो आणि तीन-चार सब कॉन्ट्रॅक्टर नेमतो. अशा लोकांना काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर कारवाई करणार काय? त्यांच्याकडून मागील कामाचे पैसे वसूल करणार आहात काय?

डॉ.नितीन राऊत : जलसंधारण खात्यामध्ये स्पेसिफिक असा कॉन्ट्रॅक्टर नोंदणीचा कार्यक्रम पूर्वी अंमलात आलेला नव्हता. मी या विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर आता जलसंधारण विभागाचे स्वत:चे कॉन्ट्रॅक्टर नोंदणीचे काम केलेले आहे. जलसंधारण विभागांतर्गत जे कॉन्ट्रॅक्टर काम करतात त्यांनाच काम दिले जाणार असल्याने सभागृहापुढे ज्या गोष्टी मांडण्यात आलेल्या आहेत ते प्रकार होणार नाहीत याची काळजी घेण्यात येईल.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : करवीर पीठाच्या संपादित केलेल्या जमिनीचे भाडे आजच्या मूल्यांकनाप्रमाणे मिळणे

**मु. शी.** : करवीर पीठाच्या संपादित केलेल्या जमिनीचे भाडे आजच्या मूल्यांकनाप्रमाणे मिळणे यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूलमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील केसापूर पेठ येथील जगद्‌गुरु शंकराचार्य करवीर पीठाच्या संपादित केलेल्या जागेचे भाडे आजच्या मूल्यांकनाप्रमाणे मिळणेबाबत दिनांक ११.१.२०१० रोजी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना श्री स्वामी जगद्‌गुरु शंकराचार्य पीठ करवीर यांनी अर्ज करणे, जिल्हाधिकारी यांनी दिनांक १०.३.२०१० रोजी देवस्थान कॅश अलाऊन्सची रक्कम सन २००१ पासून प्रतिवर्षी रु.२० लाख प्रमाणे मिळण्याबाबत शासनास पत्राव्दारे कळविणे, परंतु आजअखेर याबाबत शासन स्तरावर निर्णय न होणे तसेच केसापूर पेठ व लगतच्या करवीर पीठाच्या मालकी व वहिवाटीच्या जमीनी बाबत कॅश अलाऊन्सच्या रकमेत गेली १३५ वर्षे कोणतीही वाढ झालेली नसणे, ही बाब लक्षात घेता सदर कॅश अलाऊन्स रक्कम वाढवून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/ 13:25

लक्षवेधी सूचना क्र.3.........

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, 350 वर्षापूर्वी शंकराचार्य पीठाची स्थापना झालेली आहे आणि हे पीठ रजिस्टर्ड आहे. हिंदू धर्म आणि संस्कृतीचा प्रसार करण्याचे महत्वाचे काम या पीठामार्फत चाललेले आहे, ते लक्षात घेऊन शाहू महाराजांनी या पीठाचा खर्च चालावा म्हणून या पीठाला जमीन दिली.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 3........... श्री. चंद्रकांत पाटील.......

ही कोल्हापूरला लागून असलेली अतिशय महत्वाची जागा सन 1873 साली कोल्हापूर नगर पालिका स्थापन झाल्यानंतर घेतली आणि 138 वर्षापूर्वी या जागेचे भाडे रु. 186.70 एवढे ठरले होते. या 138 वर्षात या भाड्यात कोणतीही वाढ झालेली नाही. काळाच्या ओघात पीठाचे खर्च वाढत गेले त्यामुळे पीठाकडून अशी मागणी झाली की, वर्षाकाठी आम्हाला 20 लाख रुपये इतके भाडे देण्यात यावे. यासंदर्भात विधि व न्याय विभागाकडून असे अभिप्राय दिले की या भाड्यात वाढ करता येणार नाही. पण जे अभिप्राय दिलेले आहेत त्याची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, ही रक्कम वाढवून मिळावी अशी विनंती पीठाने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे केली. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी तशा प्रकारचा प्रस्ताव शासनाला सादर केला. यासंबंधी कायदेशीर तरतुदी काय आहेत असा तो प्रस्ताव असून याबाबत विधि व न्याय विभागाचे मत मागविले असता अशा प्रकारे भाड्यात वाढ देणे हे कायदेशीर दृष्ट्या योग्य ठरणार नाही असे अभिप्राय दिले आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, 138 वर्षापूर्वी या जमिनीची नुकसान भरपाई म्हणून त्या काळात रु. 186.70 एवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणून ठरविण्यात आली होती, ही रक्कम कॅश अलाऊन्स म्हणून करवीर तालुका ट्रेझरीमधून कायमस्वरुपी देण्यात यावी असेही ठरले होते. जेव्हा मुंबई सरकारने ही जमीन संपादित केली होती त्या संपादनाबाबत जो करार झालेला आहे तो करार कशा प्रकारे झाला आणि करारानुसार या जमिनीचे क्षेत्रफळ किती आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, सन 1873 मध्ये कोल्हापूर नगरपालिकेची स्थापना झाली तेव्हा मुंबई सरकारने दि. 12.18.1873 मध्ये ही जमीन संपदित केली होती. कोल्हापूर नगरपालिकेचे उत्पन्न वाढावे हा त्यामागचा उद्देश होता. प्रामुख्याने जमीन संपादनात एक रकमी नुकसान भरपाई दिली जाते पण तसे न करता या करवीर पीठाला दरवर्षी रु. 186.70 एवढी रक्कम कॅश अलाऊन्स म्हणून द्यावी असे ठरविण्यात आले होते.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, हा करार मुंबई सरकारने करवीर पीठाची जमीन संपादन करीत असताना केला होता , तेव्हा त्याचे भाडे काय ठरले होते, दरवर्षी एकूण किती रक्कम देण्याचे निश्चित केले होते, या कराराचे स्वरुप काय आहे आणि ही जमीन एकूण किती आहे,

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 3........... श्री. पांडुरंग फुंडकर......

तसेच नगरपालिकेचे उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीने हा करार केल्याचे म्हटले पण ज्या ज्या प्रमाणात इतर खर्चात वाढ झाली त्या प्रमाणात या भाड्यात वाढ न करण्याची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, ज्यावेळेस जमीन संपादित केली जाते तेव्हा एकरकमी नुकसान भरपाई देण्याची तरतूद असते. पण त्या काळात तसे न करता दरवर्षी ठराविक रक्कम देण्याचे निश्चित केले होते........

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, त्या काळात जो करार करण्यात आला तो कोणत्या प्रकारचा करार आहे तसेच करारात नमूद केलेली जमीन किती आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, कराराची प्रत आणि जमिनीचे क्षेत्रफळ यासंबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, त्या काळात जो करार करण्यात आला तो कोणत्या प्रकारचा करार आहे तसेच करारात नमूद केलेली जमीन किती आहे ? याबाबतची माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे, अन्यथा ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी माननीय फुंडकर साहेबांच्या सूचनेला अनुमोदन आणख्ी एका कारणासाठी देऊ इच्छिते की, मंदिरे आणि देवस्थांनसाठी ब्रिटिश काळामध्ये 20-25 रुपये अशा पध्दतीच्या रक्कमा दिल्या जात होत्या. परंतु काही मंदिरांच्या बाबतीतील रकमा शासनाने वाढवून दिलेल्या आहेत. जमिनीचे बाजार भाव वाढल्यामुळे या जमिनींच्या किमती सुध्दा त्या पटीने वाढावयास पाहिजे होत्या. त्यामुळे या प्रकरणात कोल्हापूर क्षेत्रातील केसापूर पेठ येथील जगद्‌गुरु शंकराचार्य करवीर पीठाच्या संपादित केलेल्या जागेचे 186 भाडे आहे ते वाढलेल्या किमतीनुसार वाढवून देणे गरजेचे आहे. त्यावेळचे ट्रस्टी जीवंत नाहीत म्हणून सरकारने एखाद्या धार्मिक पीठावर अन्याय करणे योग्य नाही. सरकारच्या मार्फत ज्या ज्या मंदिर वतनाला पैसे दिले जातात त्यामध्ये सद्य:स्थितीनुसार वाढ करण्याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय, 186 रुपयांची रक्कम वाढवून देण्यासाठी सकारात्मक निर्णय घेतला जाईल काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या विषयाचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे आम्ही पाठविला होता. रक्कमेमध्ये वाढ करुन देण्यात यावी असा आमचा देखील विचार होता परंतु तशामध्ये कायदेशीर तरतुदी नसल्यामुळे हा प्रस्ताव नाकारला गेला व त्याबाबत करवीर पीठाला कळविण्यात आलेले आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. भाऊसाहेब फुंडकर, डॉ.नीलम गोऱ्हे तसेच सन्माननीय सदस्य चंद्रकांत पाटील साहेबांनी सदर लक्षवेधी सूचना उपस्थित केली असून त्यांनी शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, बाकीच्या मंदिरांना भरपाईची रक्कम वाढवून देण्यात आलेली आहे. यासंदर्भात या आसनावरुन मी असे निर्देश देत आहे की, या प्रकरणात त्वरित लक्ष घालून स्वामी जगद्‌गुरु शंकराचार्य करवीर पीठ, कोल्हापूर यांना आपण प्रती वर्षी जी नुकसान भरपाई देता त्यामध्ये त्वरित वाढ करावी व ही वाढ आताच्या कालानुरुप योग्य अशी असावी.

श्री. प्रकाश सोळंके : ठीक आहे.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत**

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत मला माननीय मंत्रीमहोदयांनी विनंती केल्यानुसार ही लक्षेवधी सूचना गुरुवार दिनांक 19 एप्रिल, 2012 रोजी घेण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 4 आपण नक्की घ्याल अशी मला आशा आहे. परंतु ही लक्षवेधी सूचना कशासाठी उपस्थित केलेली आहे याबाबत खूप मोठ मोठे अधिकारी फोन करीत आहेत. सदर लक्षवेधी सूचना ही अपघाताच्या संदर्भातील आहे. आपल्याला कल्पना आहे की, खासदार भारतकुमार राऊत तसेच अन्य सामान्य नागरिकांचे मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवर अतिशय गंभीर अपघात झालेले असून यामध्ये अपघातांची आणि मृत्युमुखी पडणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेवर उत्तर अपेक्षित आहे.

**उप सभापती** : सदर लक्षवेधी सूचना गुरुवार दिनांक 19 एप्रिल, 2012 रोजी घेण्यात येईल. माननीय मंत्री महोदय श्री. जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे हा विभाग येतो परंतु त्यांच्या मुलाचे लग्न असल्यामुळे ते दोन तीन दिवस सभागृहात उपस्थित राहू शकणार नाहीत म्हणून मी हा उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय राज्यमंत्र्यांकडून उत्तर अपेक्षित नाही. आता मी लक्षवेधी सूचना क्रमांक पाच पुकारत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही ज्यावेळेला सभागृहात विचार मांडत असतो त्यावेळी मंत्री महोदय सभागृहात नसतात केवळ राज्य मंत्री तसेच एखादे कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित असतात. सभागृहात माननीय उद्योग मंत्री उपस्थित असले तर ते सांगतात की, सर्व जबाबदारी माझी आहे, तुम्ही चिंता करु नका. कोणी उत्तर दिले नाही तर मी उत्तर देईन असे ते सांगत असतात. या सदनात लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यासाठी संबंधित राज्यमंत्री उपस्थित आहेत. गेल्या 10 वर्षापासून या सभागृहात सक्षमतेने जे राज्यमंत्री उत्तर देतात त्यामध्ये या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात उत्तर देणारे मा.राज्यमंत्री अव्वल आहेत. आपल्या राज्य मंत्र्यांवर अविश्वास व्यक्त करणे हे बरोबर आहे का असा मला प्रश्न पडलेला आहे.

**उप सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांवर कोणीही अविश्वास दाखविलेला नाही. आपली जर हरकत नसेल तर ही लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : माननीय राज्यमंत्री उत्तर देण्यास समर्थ आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : येथे कोणावरही अविश्वास दाखविलेला नाही. मी ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अशाने अधिकाऱ्यांचे फोन बंद होतील.

**उप सभापती** : पण आता सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांना त्या अधिकाऱ्यांची नावे सांगावी लागतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : आम्हाला जगामध्ये रहायचे आहे.

श्री.जयंत प्र.पाटील (बसून) : म्हणजे काय ?

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राजस्थानच्या धर्तीवर मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे आणि राज्यातल्या महामार्गांवर प्रवाशांसाठी दहा कि.मी. अंतरावर विविध सुविधा उपलब्ध करून देणे

**मु. शी.** : राजस्थानच्या धर्तीवर मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे आणि राज्यातल्या महामार्गांवर प्रवाशांसाठी दहा कि.मी. अंतरावर विविध सुविधा उपलब्ध करून देणे या संबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे-मुंबई एक्सप्रेस वे, नगर, नाशिक, सोलापूर आणि बेंगळूर महामार्गाची रुंदी वाढल्यामुळे प्रवास जलदगतीने होत असला तरी या रस्त्यावर पायाभूत सुविधांचा अभाव असणे, रस्त्याच्या देखभालीचा प्रश्न, तुटलेले कॅश बॅरिअर, दुभाजक तोडून वाहन वळवण्यासाठी केलेली व्यवस्था अशा एक ना अनेक कारणांमुळे महामार्गावरुन प्रवास करणे धोकादायक बनत जाणे, त्याचबरोबर बऱ्याचदा महामार्गावर नियम तोडून उलट दिशेने वाहनांची ये-जा सुरु असणे, परिणामी या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढणे, याकरिता शासनाने गुजरात, राजस्थान च्या धर्तीवर राज्यातल्या महामार्गावर प्रवाशांसाठी दहा किलो मीटरच्या अंतरावर रेस्टरुम, महामार्गावरील वाहतुकीवर नजर ठेवण्यासाठी पेट्रोलिंग, रस्त्यावर बंद पडलेल्या गाड्या हलविण्यासाठी यंत्रणा, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी ॲम्ब्युलन्सची सेवा, ट्रॉमा केअर सेंटर, सर्व्हिस रोड या सुविधा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

...3

श्री.रणजीत कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा जसा अपघाता संबंधातील प्रश्न आहे तसा तो पायाभूत सोयीसुविधा संबंधातील देखील प्रश्न आहे. मराठा चेंबर्स ऑफ महाराष्ट्राचे कार्यकारी संचालक श्री.अनंत सरदेशमुख यांनी असे मत व्यक्त केले आहे की, महाराष्ट्रामध्ये उद्योग यायचे असतील तर अपघातांची संख्या कमी झाली पाहिजे. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे, नगर, नशिक, सोलापूर आणि बंगळूरू व गुजरातकडे जाणारे महामार्ग येथे सातत्याने अपघात होत असल्याने उद्योगांवर विपरित परिणाम होत आहे. नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियाचे सदस्य श्री.परमार यांची सुकन्या रस्त्यावरील अपघातात मृत पावली. त्यानंतर त्यांनी या कार्याला वाहून घेतले. अशा अनेक लोकांचा कन्सर्न आहे.

आपण लेखी उत्तराच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये नमूद केले आहे की, "खाजगीकरणांतर्गतच्या अन्य प्रकल्पावरील पथकर स्थानकांच्या अडचणी सोडविण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद-संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे." सदर समिती कधी नेमण्यात आली आहे व या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्यात कोणत्या सूचना देण्यात आल्या आहेत, व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ? या सूचनांमध्ये ट्रॉमा सेंटर, फोनची सुविधा उपलब्ध करून देणे याचा समावेश आहे काय ? कारण अपघात झाल्यानंतर फोनच लागत नसतो. रस्त्यात झाड पडलेले असते. फोन केला तर पोलीस स्टेशन हद्दीचे कारण सांगते. तेव्हा समितीने केलेल्या सूचनांची अंमलबजावणी झाली नसेल तर ठेकेदारांचे ठेके रद्द करण्यासंबंधी पुनर्विचार करणार आहात काय ? कोणत्या पद्धतीची पावले उचलून शासन लोकांना संरक्षण देणार आहे, यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट भूमिका मांडावी.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, दिनांक 23.12.2011 रोजी समिती गठित करण्यात आली होती. यामध्ये कार्यकारी अभियंता, यांच्यासह अनेक अधिकारी होते. सर्व टोल बुथ संबंधात 16 मुद्यांवर सविस्तर माहिती जमा करावी अशी सूचना कार्यकारी अभियंत्यांना दिली. पहिला प्रश्न असा होता की, प्रत्येक प्रकल्पामध्ये किती टोल बुथ आहेत. विहित कालावधीमध्ये रस्त्याचे नूतनीकरण केले आहे किंवा नाही. टोल बुथवर स्त्री-पुरूषांसाठी प्रसाधनगृह आहे किंवा नाही, प्रथमोपचाराची सुविधा आहे किंवा नाही, ट्रॉमा केअर युनिट आहे किंवा नाही, टोल बुथवर दिवसा

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजीत कांबळे.....

व रात्री लाईटची सुविधा आहे किंवा नाही, पाण्याची सोय आहे किंवा नाही, काम करणारे अधिकारी व कर्मचारी गणवेषामध्ये असतात किंवा नाही, त्यांच्याकडे ओळखपत्र असते किंवा नाही, त्यांचे कॅरेक्टर सर्टीफिकेट पोलिसांकडून तपासून घेतले आहे किंवा नाही, प्रत्येक टोल बुथवर केव्हा पासून तक्रार पुस्तिका आहे, प्रत्येक टोल बुथवर प्रकल्पाची किंमत, टोल बुथ चालविणाऱ्या ठेकेदाराचे नाव, वेगवेगळ्या नोटिफिकेशनचा उल्लेख, ठेकेदाराचा पत्ता, दूरध्वनी नंबर, संपर्क साधण्यासाठी नेमलेल्या व्यक्तिचे नाव आणि त्याचा दूरध्वनी नंबर डोर्डिंग बोर्डवर आहे किंवा नाही, तसेच, शासकीय रूग्णालयांचे नंबर, पोलीस ठाण्याचे नंबर ते किती अंतरावर आहे, इत्यादी सविस्तर माहिती असावयास पाहिजे अशा प्रकारचा मुद्दा होता. तसेच शासकीय अधिकाऱ्याचे नाव व नंबर असणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे साईन बोर्ड इन्स्टॉल आहेत किंवा नाही, टेंडर प्रमाणे किती झाडे लावण्यात आली आहेत त्या पैकी किती जीवंत आहेत यांची देखील माहिती तपासून घेणे, अशा प्रकारचे मुद्दे आहेत.

तसेच टोल बुथवर संगणकीकृत पावती देण्यात येते किंवा नाही, हा देखील एक मुद्दा होता. किती सब-वे केले आहेत. ते चालू आहेत किंवा नाही, तेथे किती कर्मचारी काम करीत आहेत.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे....

रात्रीच्या वेळी सब वे सुरु असतात की नाहीत या बाबतीत महत्वाचा मुद्दा मांडण्यात आला. त्या ठिकाणी दिवसा सब वे सुरु रहातात परंतु रात्रीच्या वेळी सब वे बंद करुन टोलची संख्या कमी केली जाते. तसेच, शासनाच्या नियमानुसार टोलचे दर जाहीर करण्यात आले आहेत की नाहीत हे पाहिले पाहिजे. त्यानुसार ते टोल वसुली करतात की नाहीत हे पाहिले पाहिजे. जर तशाप्रकारे टोल वसुली होत नसेल तर संबंधित पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल करण्यात आले आहेत काय, त्याचप्रमाणे माननीय सदस्यांनी रस्त्यावर बेकायदेशीररित्या टोल वसुली केली जाते असे सांगितले. अशाप्रकारे रस्त्यावर टोल वसुली केली जाते की नाही या बाबत माहिती गोळा करण्यास सांगितले आहे. या ठिकाणी सांगण्यात आलेल्या सर्व मुद्यांबाबत दोन-तीन महिन्यानंतर माहिती प्राप्त झाल्यानंतर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मला दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. शासना बरोबर करण्यात आलेल्या करारानुसार टोल वसुली करणाऱ्या यंत्रणेने रस्त्यावर कोणत्या प्रकारच्या सुविधा दिल्या पाहिजेत, रस्ता कशाप्रकारे दुरुस्त केला पाहिजे या बाबतच्या अटी आपण ओपनली डिस्प्ले करणार काय? त्यामध्ये सदर कंत्राटदार किती वर्षे टोल वसुली करणार आहे याचा उल्लेख असला पाहिजे. टॉयलेटमध्ये पाण्याची सुविधा दिली पाहिजे, ॲम्बुलन्स दिली पाहिजे अशाप्रकारच्या इतर अटींचे पालन केले पाहिजे. त्याचप्रमाणे टोल बूथजवळ लावण्यात आलेले स्पीड ब्रेकर हे पी.डब्लू.डी.च्या निकषाप्रमाणे किंवा आंतरराष्ट्रीय निकषानुसार असले पाहिजेत. त्या स्पीड ब्रेकरची उंची आणि रुंदी किती असली पाहिजे, ते निकषात बसत नसतील तर ते आठ दिवसात काढण्याचे आदेश देणार काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, अगोदर सांगितल्याप्रमाणे टोलचा मालक कोण आहे, त्याने स्वत:चा टेलिफोन नंबर, स्वत:चा पत्ता आणि कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत, आणि तो टोल वसुली कोणत्या कालावधीपर्यन्त करणार आहे....

श्री. प्रकाश बिनसाळे : त्याने या सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.

श्री. रणजित कांबळे : या सर्व सुविधा दिल्या जातात की नाहीत याची पाहणी करण्यासाठी समिती गठीत केली आहे. अशाप्रकारे ज्यांना कंत्राट देण्यात आले आहे त्यांच्याकडून अटींचे पालन होते की नाही याची तपासणी ही समिती करणार आहे. टोल वसूल करणाऱ्या कंत्राटदाराचा कंत्राट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे....

किती रकमेचा आहे आणि तो किती कालावधी पर्यन्त टोल वसुली करणार आहे यासंबंधीचे एक साईन बोर्ड त्याने लावला पाहिजे अशाप्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पी.डब्लू.डी.च्या निकषाप्रमाणे ते स्पीड ब्रेकर रंम्बलिंग राहिले पाहिजेत की नाहीत, शासनाच्या निकषाप्रमाणे ते स्पीड ब्रेकर असले पाहिजेत तसे नसतील तर आठ दिवसात ते बदलण्याबाबत त्यांना सूचना देण्यात येतील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे 16 मुद्यांबाबत ही समिती पाहणी करणार आहे. निवेदनातील शेवटच्या वाक्यातील "फूड प्लाझा" सोडले तर बाकीची कोणतीही सुविधा मुंबई-नाशिक हायवेवर नाही, मुंबई-पुणे हायवेवर अभावाने आढळते हे खरे आहे काय? दुसरा प्रश्न असा की, खाजगीरित्या टोल नाक्यावर वसुली करण्यासाठी काही गुंड ठेवण्यात आले आहेत. एखादी गाडी पुढे गेली तर त्या गाडीच्या मालकांना मारहाण केली जाते. अशाप्रकारच्या घटना मुंबई-नाशिक व मुंबई-पुणे रोडवर घडत असतात. टोल वसूल करण्यासाठी ठेवण्यात आलेल्या गँगस्टरना आपण कसा आळा घालणार आहात? त्याचप्रमाणे प्रथमोपचार आणि ट्रॉमा केअर युनिट मधून आपल्याला नेमके काय अपेक्षित आहे आणि ही व्यवस्था केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे?

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी आता सांगितले की, टोल वसुली करण्यासाठी टोल नाक्यावर गँगस्टर माणसे ठेवली जातात. मुळामध्ये त्या ठिकाणी सबवे वर गेट बसविण्यात आले आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे . . . .

टोल दिल्याशिवाय तेथील कर्मचारी गेट उघडतच नाहीत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबई-नाशिक रोडवर असे नाही. मुंबई-पुणे रोडवर बरोबर आहे. बाकी काहीच नाही.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, तेथे दंडा टाकून गेट लावतात, बॅरिअर टाकतात.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, समजा जर एखाद्या वेळेस बाचाबाची झाली तर तेथील लोक अंगावर येतात. गाड्या अडवतात, गाड्या फोडतात, सर्वकाही करतात.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, याबाबत दोन बाजू आहेत. आपल्या राज्यामध्ये नाही परंतु इतर राज्यांमध्ये अनेक उदाहरणे झालेली आहेत की, टोल भरण्यास सांगितल्यानंतर तेथे गोळीबार झालेला आहे आणि ते सिध्द देखील झालेले आहे. त्यामुळे एक मुद्दा हा देखील आहे की, तेथील कर्मचाऱ्यांचे पोलीस स्टेशनमध्ये कॅरेक्टर व्हेरिफीकेशन करणे हे बंधनकारक रहाणार आहे.जेणेकरुन टोल असलेल्या ठिकाणी कशा प्रकारची व्यक्ती काम करीत आहे. हा फार महत्वाचा मुद्दा आहे आणि मी याबाबतीत अगोदर देखील सांगितले होते की, आम्ही ही अट ठेवलेली आहे. कारण नेहमीच दोन्ही प्रकारच्या तक्रारी येत असतात.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, तेथे ट्रॉमा केअर सेंटर असणे आवश्यक आहे आणि ते कशा प्रकारचे असावयास पाहिजे. बेसिकली या बाबतीत सांगावयाचे तर त्याठिकाणी ॲम्ब्युलन्स् असावयास पाहिजे असे अपेक्षित आहे आणि तेथील टोल ऑपरेटरने आयडेंटिफाय केले पाहिजे की, गर्व्हमेंट व्हेईकल आहे की प्रायव्हेट आहे. त्यांच्या बरोबर कुठे ना कुठे लिंकेज व्हावयास पाहिजे की,जर ॲक्सीडन्ट झाले तर आम्ही ताबडतोब लोकांना इमर्जन्सी सर्व्हीस देऊ शकतो. गर्व्हमेंट हॉस्पिटल कुठे आहे ते त्या टोल बूथपासून किती अंतरावर आहे याची देखील नोंद करण्यात आली पाहिजे. जेणेकरुन सदरहू हॉस्पिटल किती अंतरावर आहे याचा लोकांना अंदाज येईल. मात्र प्रत्येक टोल नाक्यावर एक किंवा दोन ॲम्ब्युलन्स असणे अपेक्षित आहे आणि बहुतांशी जे-जे हायवे आहेत तेथे ॲम्ब्युलन्सेस आहेत.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना एक प्रश्न विचारावयाचा आहे की, येथे मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेबद्दल चर्चा होत आहे. आपण स्वत: देखील मुंबईवरुन पुण्याला दर आठवड्याला जात असाल. तेथील टोल नाक्याला आठ गेटस् आहेत आणि त्यातील एक गेट व्ही.आय.पी.साठी आहे. तीन गेटस् बहुतेक वेळा नेहमीच बंद असतात. आणि उर्वरित



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन . . . .

बाकीची कलेक्शन सेंटर्स् आहेत. परंतु ती सुध्दा अनेक वेळा बंदच असतात. याबाबतीत आपण काही नियम करणार आहात काय? जेव्हा ट्रॅफीक असेल त्यानुसार आपण सर्वच्या सर्व गेटस् सुरु ठेवली पाहिजेत. जर कोणी व्ही.आय.पी.आले असतील तर त्यासंबंधातील मॅनेजमेंट हे तेथे जे कर्मचारी असतील ते करतील की नाही? असा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, मुंबई-पुणे एक्सप्रेसबाबत सांगावयाचे आहे की, तेथून जाताना पहिला जो टोल नाका आहे तेथे टॉयलेटची सोय अजिबात नाही. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, याबाबतीत व्यवस्था करण्यात येणार आहे. परंतु ही जुनीच अडचण असून अजूनही तेथे अशा प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली नाही. ही व्यवस्था कधी करण्यात येणार आहे असे माझे दोन प्रश्न आहेत आणि त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी स्पेसिफीक उत्तर द्यावे अशी विनंती आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबत सांगावयाचे तर ती बाब यासाठी बंधनकारक आहे की, ज्यावेळी आपण टोल ऑपरेटरला मंजुरी देतो, तेव्हा तेथे किती गेटस् असावयास पाहिजे हे ठरलेले आहे. मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काही गेटस् बंद असतात. याबाबत सांगावयाचे तर आम्ही त्यांना तातडीने नोटीस देणार आहोत. तसेच कोणत्याही टोलच्या ठिकाणी जेवढे सब-वे आहेत, ते सर्व जर सुरु नसतील तर आम्ही त्यांच्या बाबतीत कारवाई करणार आहोत.सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न टॉयलेटच्या बाबतीत विचारला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे च्या ठिकाणी टॉयलेटची सोय नाही. आम्ही ही बाब तपासून घेऊ. मात्र पुण्याला जाताना अनेक ठिकाणी फूड-मॉल असून तेथे टॉयलेटची सोय करण्यात आलेली आहे. तसेच प्रत्येक पेट्रोल पंपाच्या ठिकाणी देखील टॉयलेट आहे. समजा जर टोलच्या ठिकाणी नसेल तर याबाबतीत निश्चितपणे सूचना दिल्या जातील.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सदरहू लक्षवेधी सूचना फार महत्वाची असून या बाबत चर्चा करण्यासाठी आम्ही आपल्याला विनंती करीत होतो. आता माननीय मंत्री महोदयांनी जे सांगितले आहे, ते सर्व उत्तरामध्ये दिलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे नेहमीच महत्वाच्या विषयाच्या संबंधातील लक्षवेधी सूचना मांडत असतात.

श्री.किरण पावसकर : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना माझ्या तोंडून हे वदवून



APR/KT 1.50

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

घ्यावयाचे आहे काय ? सभापती महोदय, हा प्रश्न महत्वाचा आहे याबद्दल वाद नाही. माननीय मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये सर्वच माहिती दिलेली आहे. यामध्ये असे म्हटलेले आहे की,"यामध्ये प्रामुख्याने पेट्रोलिंग युनिट, क्रेन, रुग्णवाहिका, प्राथमिक वैद्यकीय मदत व इतर आवश्यक सोयीसुविधांचा समावेश आहे."परंतु हे सर्व कागदावर झाले. त्याठिकाणी या सगळया गोष्टी असावयास पाहिजे असे आपण म्हणत आहात. मात्र अशा प्रकारे सरकारी उत्तर देण्यापेक्षा या महामार्गावरुन जास्तीतजास्त प्रवास हे आमदार, खासदार आणि माननीय मंत्री महोदयांचे होत असतात. याठिकाणी मुंबई-पुणे महामार्गाच्या बाबतीत जे सांगितले आहे त्याप्रमाणे टोल नाक्यावरील तीन-तीन केंद्रे बंद असल्याचे दिसून येतील. व्ही.आय.पी.चे केंद्र तर बंदच असल्याचे दिसून येईल. तसेच त्याठिकाणी कोणाची बाचाबाची झाल्यानंतर संबंधितांना मारावयास अचानक 20-25 माणसे कुठून येतात हे देखील कळत नाही. तसेच आम्ही तेथून जात असताना आमदार म्हणून आमचे कार्ड दाखवयाचे. पण मी ज्या व्यक्तीला कार्ड दाखवत आहे, तो युनिफॉर्म मध्ये आहे काय ? त्याच्या युनिफॉर्मबाबत काय करण्यात येणार आहे ? माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, त्या मार्गावर टॉयलेटस् आहेत. त्याठिकाणी टॉयलेटस् आहेत पण तेथे खरोखरच स्वच्छता आहे काय ? यासाठी आपण समिती नेमलेली आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : यासाठी आपण सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाची जी समिती नेमलेली आहे त्या समितीकडे वारंवार तक्रारी केल्यानंतरही काही होत नाही. जर खाजगीकरणातून आणखी चांगल्या सुखसोयी मिळणार असतील तर या समितीवर आपण पहिल्यांदा कारवाई करणार का ? आपल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात का ? खाजगीकरण झाल्यानंतर एखादा महामार्ग चांगल्या पध्दतीने कसा मेन्टेन केला जात आहे हे पाहण्यासाठी या समितीला पहिल्यांदा बेळगाव ते कोल्हापूर या महामार्गाचे केलेले सौंदर्यीकरण एकदा बघावयास सांगावे. जर बेळगाव-कोल्हापूर रस्ता कॉन्ट्रक्टरकडून एवढ्या चांगल्या पध्दतीने मेन्टेन केला जाऊ शकतो तर आपल्या मुंबई-पुणे महामार्गावर कॉन्ट्रक्टरकडून तसे का होत नाही ? या ठिकाणी फक्त आम्ही कॉन्ट्रॅक्टरवर ताशेरे ओढण्यापेक्षा आपण जी समिती नेमलेली आहे त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, प्रत्येक हायवेवर ज्या त्रुटी आहेत त्या तपासण्यासाठी शासनाने ही नेमलेली आहे. ती समिती त्याबाबत चौकशी करीत आहे आणि त्या समितीवरच कारवाई करण्याचा प्रश्न मला समजत नाही.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, ज्यांनी असंख्य प्रश्न उभे केले त्या समितीवर कारवाई करणार की नाही ? त्यांना माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार देणार आहात का ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मला उत्तर पूर्ण करु द्यावे. आताच समिती गठीत केलेली आहे. ज्या त्रुटी आहेत, कॉन्ट्रॅक्टमध्ये ज्या अटी व शर्ती आहेत त्या पूर्ण होत आहेत की नाही हे तपासण्यासाठी ही समिती गठीत केलेली आहे. या अहवालामध्ये जर काही त्रुट्या आढळून आल्या तर त्या रस्त्यावर जे अधिकारी इन्चार्ज आहेत, त्या ठिकाणी जे संबंधित अधिकारी आहेत त्यांच्यावर कारवाई करणे योग्य होईल आणि ती कारवाई निश्चितपणे करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य तसेच विधानसेचे सन्माननीय सदस्य, आम्ही जेव्हा एखाद्या टोल नाक्यावर जातो आणि आमचे कार्ड दाखवतो त्यावेळी आम्हाला एवढी वाईट वागणूक मिळते की, आम्हाला ही सवलतच नको असे वाटावयास लागते. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लयलूट करतात. माननीय मंत्री महोदयांना सांगू

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ...

इच्छितो की, आता आपल्याकडे दिवा आहे. तो दिवा गेल्यानंतर आपल्याला याचा अनुभव येईल. त्यावेळी आपल्याला किती वाईट वागणूक देतात ते कळेल. आम्ही कोणी चोर किंवा दरोडेखोर आहोत की काय अशा पध्दतीचा चेहरा ते करतात. या संदर्भात सूचना देणार का ? मी जर विमानतळावर येणार असेन आणि मला घेण्यासाठी माझी गाडी येत असेल तर माझा ड्रायव्हर माझे कार्ड दाखवतो तेव्हा आमदार कोठे आहेत असे विचारतात. पुणे-कोल्हापूर रस्त्यावर अनेक टोल नाके आहेत. ते माझे कार्ड बघतात, चेहरा बघतात. हे थांबविणार की नाही ? अधिकारी काय करतात ? अनेक वेळा या सभागृहामध्ये शासनाने आम्हाला आश्वासन दिले. आम्हाला ही सवलत नको. सभापती महोदय, आपल्याला सुध्दा असा अनुभव येत असेल. त्या ठिकाणी त्यांच्यावर ताबडतोब कारवाई झाली पाहिजे. 10-20 लोक इकडेतिकडे गेले तर काय फरक पडतो ? एक तर टोल नाक्याच्या निमित्ताने महाराष्ट्राला लुटण्यात येत आहे. या ठिकाणी शासनाकडून ठोस उत्तर पाहिजे.

माननीय मंत्री महोदयांनी ही बाब सहज घेऊ नये. त्या ठिकाणी 25 रुपये, 50 रुपये घेतात. आम्ही माननीय सभापतींना सांगितले होते आणि शासनाकडून उत्तर देण्यात आले होते की, माजी आमदारांना सुध्दा ही सवलत देण्यात येईल. आजींची ही परिस्थिती असेल तर माजींना कोण विचारणार ? शासनाने या ठिकाणी आश्वासन दिले होते. आजी आमदारांना आणि माजी आमदारांना त्या ठिकाणी सन्मानाची वागणूक देणार का, नाही तर ही सवलत रद्द करणार का ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते खरे आहे. त्या ठिकाणी तसे होते. अनेक वेळा टोल नाक्यावर गेल्यानंतर आपण आपले आय-कार्ड दिल्यानंतर ते मॅनेजरला दाखववावे लागते अशी अडचण आहे. एकदा लोकप्रतिनिधी, आमदार यांनी आपले कार्ड दिल्यानंतर खरे तर मॅनेजरने त्या ठिकाणी उभे राहिले पाहिजे. ही बाब अनेक वेळा निदर्शनास येते. या संदर्भात आजच्या आज सूचना दिल्या जातील की, यापुढे कार्ड दाखविल्यानंतर ताबडतोब त्यांना सोडले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, इंधनामध्ये व वेळेची बचत व्हावी म्हणून टोल नाक्यावर चार्जेस दिले जातात. अनेक टोल नाक्यांवर अर्धा-अर्धा तास उभे रहावे लागते. त्यामुळे किती तरी इंधन वाया जाते. पुणे-मुंबई या रस्त्यावर शनिवार व रविवार या दोन दिवशी सुध्दा खूप वेळ वाया जातो. त्यामुळे टोल नाक्यावर वाहन आल्यानंतर जास्तीत जास्त 2 ते 3 मिनिटात वाहन पास झाले पाहिजे. त्यापेक्षा अधिक वेळ लागत असेल तर रांगेत जी वाहने उभी असतील त्यांना तसेच पुढे सोडले पाहिजे. पुणे-सातारा या रस्त्यावरील वाहतुकीमध्ये राज्याचे माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील हे अडकले होते. त्यावेळी टोल नाक्यावरील वाहने टोल न घेताच सोडून दिली होती. टोल नाक्यावर वाहन किती वेळ थांबले पाहिजे यासाठी काही नियम आहेत काय, 5 मिनिटापेक्षा अधिक वेळ लागणार असेल तर वाहनांकडून टोल न घेता ती सोडण्याचा निर्णय घेतला जाईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांनी पुणे-सातारा-सांगली येथील रस्त्याचा उल्लेख केला आहे. त्या ठिकाणी रिलायन्स कंपनीचा टोल आहे. या कंपनीला टोल नाक्यांची संख्या वाढवावयाची आहे, परंतु तेथे जागा उपलब्ध नाही. यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांकडे एक बैठक झालेली आहे. या कंपनीचे असे म्हणणे आहे की, आम्हाला त्या रस्त्याच्या पुढे टोल नाका बांधण्याची परवानगी द्यावी. पण त्या ठिकाणीही स्थानिक लोकांनी विरोध केला आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी स्टॅगनिंग टोल सुरु करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. अशा प्रकारे टोल सुरु केल्यावर गाड्यांचा खोळंबा होणार नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, ओळखपत्र दाखविल्याशिवाय टोल नाक्यावरुन गाडी पुढे नेता येत नाही. आमदारांचे ओळखपत्र टोल नाक्यावर दाखविण्याऐवजी आमदारांची गाडी ओळखण्यासाठी पास देण्याची व्यवस्था केली जाणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : प्रत्येक आमदारांकडे व माजी आमदारांकडे स्वत:चे ओळखपत्र असते. त्याच्या आधारावरच टोल नाक्यावरुन गाडी सोडण्यात येईल.

-------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सोलापूर जिल्ह्यात खताची टंचाई निर्माण होणे

**मु. शी.** : सोलापूर जिल्ह्यात खताची टंचाई निर्माण होणे यासंबंधी सर्वश्री दीपकराव साळुंखे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दीपकराव साळुंखे ( सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूर जिल्ह्यातील कृषि विभागाच्या धोरणामुळे जिल्ह्यात पुन्हा खताची टंचाई निर्माण होणे, रब्बी हंगामासाठी जिल्ह्यातील आठ लाख 15 हजार हेक्टर क्षेत्र निश्चित करण्यात येणे, त्यासाठी कृषि विभागाकडे चार लाख 78 हजार टन खताची मागणी करणे त्यानुसार माहे ऑक्टोबर, 2011 या महिन्यासाठी 78 हजार 360 एवढ्या खतांची आवश्यकता असताना त्यापैकी फक्त 41 हजार 429 टन खतांचा पुरवठा माहे ऑक्टोबर, 2011 मध्ये होणे, मागणीच्या 50 टक्के देखील खताचा पुरवठा न होणे खतांचे असमान वाटप करुन त्यांची माहिती दडविणाऱ्या खत कंपन्यांवर फौजदारी करवाई करण्यास अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ होत असल्याचा आरोप कृषी सभापती यांनी जाहीर करणे, अशा प्रकरणावर शासनाने तातडीने कारवाई करण्याची जिल्ह्यातील नागरिकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (कृषी मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, सोलापूर हा जिल्हा दुष्काळी आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे या जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. आता खतांच्या एजन्सींनी जिल्ह्यात धुमाकूळ घातला आहे. या जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी विविध खते येतात. परंतु त्यांच्या वाटपामध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती दिसून येते. ही खते रेल्वेच्या माध्यमातून जिल्ह्यात येतात. त्याची सूचना शेतकऱ्यांना 3-4 दिवस आगाऊ दिली पाहिजे. पण तशी आगाऊ सूचना न दिल्यामुळे जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये खत वाटपामध्ये विसंगती निर्माण होते. त्याचा गैरफायदा दुकानदार घेत असून 400 रुपयांच्या खताचे पोते 600 रुपयांना विकले जाते. त्याशिवाय स्थानिक खत घेणे बंधनकारक करुन ते खत अक्षरश: शेतकऱ्यांच्या गळ्यात मारले जाते. या संदर्भात शासन काही उपाययोजना करणार आहे काय ?

त्याचप्रमाणे 50 कि.मी.अंतर शासनाने ठरवून दिलेले आहे. परंतु कुर्डुवाडी जंक्शन पासून अनेक तालुके 80 ते 100 कि.मी.अंतरावर आहेत. त्या अंतराचा खताच्या किंमतीमध्ये समावेश करुन खताच्या पोत्यांची किंमत वाढविली जाते. दुसरा एक महत्वाचा प्रश्न असा आहे की, सोलापूर हा दुष्काळी जिल्हा असल्यामुळे शेतकऱ्यांना निरनिराळया प्रकारची जळीत अनुदाने मिळतात. त्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला जातो. त्यामुळे दोषी अधिकाऱ्यांवर शासन किती दिवसात कारवाई करणार आहे ? जळीत अनुदानामध्ये प्रचंड भ्रष्टाचार सुरु आहे. काही अधिकारी 20-20 वर्षांपासून एकाच ठिकाणी काम करीत आहेत. या अधिकाऱ्यांमार्फत भ्रष्टाचार केला जातो. त्यामुळे त्या अधिकाऱ्यांवर किती दिवसात कारवाई करणार आहे ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडून खतांची मागणी नोंदविली जाते. मागणी व प्रत्यक्षात खताचा वापर यामध्ये मोठी तफावत आहे. ही तफावत दूर करण्यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती स्थापन केली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील...

त्यामध्ये विविध कंपन्याचे अधिकारी, एमअेआयडीसीचे अधिकारी होते. त्या समितीच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे समन्वय होत होता. सोलापूर जिल्हा परिषदेने खताची गरजेपेक्षा जास्त मागणी नोंदविली. मागच्या 4-5 वर्षातील आकडेवारी पाहिली तर असे दिसून येईल की, जेवढा खताचा पुरवठा करणे आवश्यक होते तेवढा तो झालेला आहे. जे स्थानिक खतनिर्माते आहेत त्यांचे खत देण्याचा खताच्या डिलरचा आग्रह असतो. त्या संदर्भात एक मोठे रॅकेट तयार झाल्याचे चित्र दिसत आहे. जेथे बियाणे, खते यांचा काळाबाजार होऊन शेतक-यांची लूट आणि फसवणूक होते असे 6-7 जिल्हे आयडेण्टिफाय केलेले आहेत. या गोष्टींवर नियंत्रण रहावे म्हणून विशेष सेल केलेला आहे. खत वितरण करणा-या डिलर्ससंबंधी सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती तपासून पाहून ते दोषी असतील तर त्यांचे परवाने शंभर टक्के रद्द केले जातील. एमआरपी पेक्षा जास्त किंमत आकारल्याच्या तक्रारी वाढत होत्या.

या वर्षी खतांच्या किंमती ठरविण्याबाबत केन्द्र सरकारने नवीन धोरण अवलंबिलेले आहे. 50 कि.मी.पेक्षा जादा वाहतुकीचा खर्च वसूल करण्याची मुभा कंपन्यांना दिलेली आहे. खताची किंमत गोणीवरच छापली जाणार आहे. त्यामध्ये वाहतुकीचा खर्चही अंतर्भूत रहाणार आहे. या वर्षापासून हा बदल करण्यात आलेला आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये भ्रष्टाचाराची प्रकरणे दिवसेंदिवस वाढत आहेत. मध्यंतरी भ्रष्टाचाराची जी प्रकरणे समोर आली त्याबाबतीत कारवाई केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी अनेक वर्षे कृषी अधिकारी एकाच ठिकाणी असतात असे सांगितले. जर कृषी सहाय्यक एकाच ठिकाणी अनेक वर्षे काम करीत असतील तर त्यांच्या बदल्या करण्याच्या संदर्भात आयुक्तांना सूचना देण्यात येतील.

श्री. जयंत प्र. पाटील :आता दोन महिन्यानंतर पाऊस सुरु होणार आहे. गेल्या वर्षी खताचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा निर्माण झाला होता. मागच्या वेळी खताचा वेळेवर आणि व्यवस्थित पुरवठा होईल अशा प्रकारचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले होते. लागणा-या खतापैकी किती खत राज्यामध्ये उपलब्ध आहे ? विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र या भागामध्ये खताची किती मागणी आहे आणि किती खत उपलब्ध आहे ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न व्यापक स्वरुपाचा आहे. खरीप हंगामाची सुरुवात करताना आपल्याकडे साडेपाच लाख मे.टनाचा बफर स्टॉक आहे. त्यामुळे

..2..

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील...

खरिपाचा हंगाम सुरु होईल तेव्हा खताच्या बाबतीत काही अडचण येणार नाही एवढा खताचा स्टॉक आहे. मिनिस्ट्री ऑफ फर्टिलायझरकडून राज्याला खताचे ॲलोकेशन होत असते. आपल्याकडे खताचा बफर स्टॉक मोठया प्रमाणात आहे. मार्केटिंग फेडरेशन आहे, विदर्भ मार्केटिंग फेडरेशन आहे एमएआयडीसी आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 14:10

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

गरजेप्रमाणे सुरुवातीला जेवढा खताचा पुरवठा करणे आवश्यक आहे, तेवढा खताचा पुरवठा करण्याची तयारी सरकारने केलेली आहे.

श्री.दीपकराव साळुंखे : संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले, त्याबद्दल त्यांचे मी स्वागत करतो. परंतु जिल्हा व तालुका पातळीवरील अधिकारी यांनी जोडया केलेल्या आहेत. एका अधिकाऱ्यास पाच वर्षे झाली की, त्यांच्या जागेवर त्यांचा जोडीदार अधिकारी आणतात व जोडीदाराच्या जागेवर ते स्वत: जातात. अशा प्रकारची पध्दत सध्या खालच्या पातळीवर सुरु झाली आहे. कृषी विभागाचा कारभार अधिक पारदर्शक व्हावा यादृष्टीने कृषी मंत्री कार्यवाही करतील काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली आहे. त्यादृष्टीकोनातून आम्ही गेल्या सहा महिन्यापासून प्रक्रिया सुरु केलेली आहे. या महिन्यामध्ये त्या अनुषंगाने कार्यवाही करणार आहोत. ज्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना एकाच पदावर दहा ते पंधरा वर्षे झाली आहेत, त्यांना पूर्वीच्या ठिकाणी म्हणजे जेथे त्यांनी काम केले असेल तेथे त्यांच्या बदल्या केल्या जाणार नाहीत. त्यांना स्वत:चा तालुका दिला जाणार नाही. वर्ग-1 आणि वर्ग-2 च्या अधिकाऱ्यांना स्वत:चे जिल्हे देण्यात येणार नाहीत, अशा पध्दतीचे काही निकष तयार करण्यात येत आहेत. येत्या आठ-दहा दिवसात यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : या खरीप हंगामासाठी राज्याला लागणारे खत आहे, त्या खताचे बुकींग महाराष्ट्र सरकारने केले आहे काय ,असल्यास, किती केले व हंगाम सुरु होण्यापूर्वी किती दिवस अगोदर विभागवार हे खत पोहोचविले जाणार आहे ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : राज्य सरकारकडे 2012 च्या हंगामाकरिता 44 लाख मेट्रीक टन खत उपलब्ध करुन घेण्यासंदर्भात आपल्याला केंद्र सरकारने मान्यता दिलेली आहे. खताच्या बाबतीत गतवर्षी बऱ्यापैकी नियंत्रण केले होते. आपण खताच्या मुव्हमेंट मॉनेटर करीत असतो. प्रत्येक विभागाला गरजेप्रमाणे खताचा पुरवठा केला जाणार आहे. विभागवार माहिती माझ्याकडे नाही, ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. या वर्षी खताच्या बाबतीत काहीही अडचण येणार नाही. गतवर्षी खताच्या बाबतीत बऱ्यापैकी सुधारणा केलेली आहे. यावर्षी खत पुरवठा करण्याच्या बाबतीत अधिक पारदर्शकता आणली जाईल. शेतकऱ्यांना त्यांच्या शेताच्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

बांधावर खत देण्याची योजना तयार केलेली आहे. गावामध्ये शेतकऱ्यांचा समुह तयार करुन, त्या त्या ठिकाणचा खरेदी-विक्री संघ असेल, डिलर असेल यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर खत पोहोचविले जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना एम.आर.पी.किंमत द्यावी लागणार नाही. लिकेजच्या तक्रारी वाढतात, त्या तक्रारी होणार नाहीत. या हंगामात कोठल्याही परिस्थितीत खताचा तुटवडा भासणार नाही असे मी आपल्या माध्यमातून या सभागृहाला आश्वासित करु इच्छितो.

श्रीमती शोभा फडणवीस : सर्वसाधारणपणे शेतकऱ्याच्या धानासाठी खताचा पहिला डोस जुलै महिन्यात दिला जातो आणि दुसरा खताचा डोस सप्टेंबर-ऑक्टोबर या महिन्यात दिला जातो. सप्टेंबर-ऑक्टोबर या कालावधीत नेहमी खताचा तुटवडा असतो. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी खताचा पुरवठा होतो. त्यावेळी आमच्या धान उत्पादक शेतकऱ्याला खताची गरज नसते. रब्बी पिकासाठी मार्चमध्ये खत उपलब्ध होते. आमच्या जिल्हयात ऑक्टोबर महिन्यात खत उपलब्ध होते, त्यावेळी धान उत्पादक शेतकऱ्याला खताची गरज नसते. आमच्या जिल्हयातील शेतकऱ्यांना जुलै आणि सप्टेंबर या दोन महिन्यात खत उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यात येईल काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. चंद्रपूर जिल्हयाची एक विशिष्ट परिस्थिती आहे. तेथे खत वाहतुकीची अडचण आहे, रॉक पॉईंटचे मुद्दे आहेत, अशा दुसऱ्याही काही अडचणी आहेत. मी स्वत: चंद्रपूर जिल्हयाला भेट दिली आहे. या वर्षी शासन विशेष कायदे करीत आहे. गत हंगामामध्ये शेतकऱ्यांना जशी अडचण आली होती, तशी या वर्षाच्या हंगामामध्ये अडचण येणार नाही. शेतकऱ्यांच्या मागणी प्रमाणेच वेळेच्या आत खत पुरवठा केला जाईल.

------------

3...



ABG/ प्रथम श्री.शिगम 14:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बुलढाणा जिल्हयातील आलेवाडी बृहत लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम शासनाची दिशाभूल करुन सुरु करणे.

**मु.शी.**: बुलढाणा जिल्हयातील आलेवाडी बृहत लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम शासनाची दिशाभूल करुन सुरु करणे यासंबंधी सर्वश्री.एस.क्यू.जमा, भाई जगताप, मोहन जोशी, जैनुद्दीन जव्हेरी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.एस.क्यू.जमा (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बुलढाणा जिल्ह्यातील आलेवाडी बृहत लघुपाटबंधारे या प्रकल्पाकरिता शासनाकडून कोणतेही सर्वेक्षण झाले नसताना काही अधिकाऱ्यांनी स्वत:च्या स्वार्थासाठी या प्रकल्पातील लाभार्थी आदिवासी शेतकऱ्यांच्या मूळ जमिनी सोडून दोन किलोमीटर खाली नवीन जागेचे कागदोपत्री सर्वेक्षण करुन दिनांक २७ फेब्रुवारी, २०१२ ला शासनाची दिशाभूल करुन मान्यता घेण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे. चिचारी, सायखेडा, वसाली व आलेवाडी बृहत या चारही प्रकल्पग्रस्त गावांचे लोक आदिवासी तडवि भिल असून त्यांच्या उपजात शेतीला गैर आदिवासी जमीन दाखवून अधिकाऱ्यांतर्फे शासनाची दिशाभूल करण्यात येणे, या प्रकल्पाची भिंतीची लांबी ३९६० मीटर लांब असल्याने या चारही गावांचे आपसातील संपर्क रस्ते बंद होणे, आरोग्य सुविधा तसेच मुलांना शाळेत जाणे बंद होणे या व इतर अनेक समस्यांकरिता प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून शासनास वेळोवेळी निवेदने देऊनही शासनामार्फत कोणताही प्रतिसाद न मिळणे परिणामी आदिवासी शेतकऱ्यांमध्ये शासनाबाबत निर्माण झालेला तीव्र असंतोष, सदर प्रकरणी शासनाची दिशाभूल करुन सुरु करण्यात आलेल्या प्रकल्पाचे काम ताबडतोब बंद करुन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसोबत चर्चा करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री एस. क्यू. ज़मा : सभापति महोदय, बुलढाणा जिले में आलेवाडी लघु पाटबंधारे विभाग की ओर से यह योजना चालू की जा रही है. मैं बताना चाहूंगा कि इस विभाग में 60-70प्रतिशत

लोग आदिवासी हैं और उन आदिवासी लोगों में से आधे से ज्यादा आबादी मुस्लिम समाज के तडवी भिल समाज के आदिवासियों की है. यहां पर माननीय मंत्री ने उत्तर दिया है कि यह प्रोजेक्ट टेक्नीकली और इकॉनामिकली फिजिबल है. इसलिए दिनांक 27.2.09 को इस प्रोजेक्ट को मान्यता दी गयी और वर्तमाान वर्ष 2011-12 में ट्राइबल सब प्लान से पैसा देकर यह काम शुरु करने की बात कही गयी है.

सभापति महोदय, मंत्री महोदय से मैं दो प्रश्न पूछना चाहूंगा कि इस प्रोजेक्ट को टेक्नीकली पास जरुर किया गया है. लेकिन यह प्रोजेक्ट फिजिबल नहीं है.क्योंकि कुल आदिवासी लोगों में से 80 प्रतिशत लोगों की जमीन नॉन आदिवासियों की बतायी गयी है. इसलिए मेरा कहना है कि इन आदिवासियों के साथ जो धोखा हुआ है, उस संबंध में क्या एक बार फिर से जांच की जाएगी ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि वहां पर स्थानीय स्तर पर चाहे लघु पाटबंधारे विभाग हो या अमरावती का विभागीय अधिकारी हो या प्रशासन के जिला स्तर के अधिकारी हों, किसानों का कहना है कि वहां पर तीन-चार-पांच गांवों के जो चुने हुए सरपंच या उप सरपंच हैं, उनके साथ ये अधिकारी चर्चा नहीं करते, बल्कि दूसरे लोगों के साथ चर्चा करके वहां के लोगों के भाग्य का फैसला किया जाता है. इसलिए मैं पूछना चाहता हूं कि वहां के जो चुने हुए पदाधिकारी हैं, क्या उनके साथ माननीय मुख्यमंत्री महोदय के स्तर पर मीटिंग की जाएगी ?

यानंतर श्री. भोगले....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.6...

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या प्रकल्पाच्या संदर्भात महत्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. या प्रकल्पाच्या कामाला 27.2.2009 रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. प्रकल्पाच्या ज्या जमिनी आहेत त्या जमिनीमध्ये आदिवासी आणि बिगर आदिवासी अशा पाच-सहा गावांचे प्राबल्य आहे. शासनाच्या सिंचन विभागाने प्रचलित पध्दतीप्रमाणे सर्व जमिनीचे अधिग्रहण केल्यानंतर आवश्यक 273 हेक्टर क्षेत्र होते. संपादित क्षेत्र 53.35 हेक्टर हे सरळ खरेदीने संपादित करण्यात आले. या क्षेत्रामध्ये कामाला देखील सुरुवात केलेली आहे. घळभरणीचे काम सुरु झालेले आहे. एकूण प्रकल्पाचे 20 टक्के काम पूर्ण झालेले आहे. मार्च, 2012 पर्यंत 15.35 कोटी रुपये या प्रकल्पावर खर्च झालेले आहेत.

सभापती महोदय, या भागातील काही आदिवासी लोकांच्या जमिनी संपादित केल्या जात असल्या तरी शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे त्यांचे अधिग्रहण केले आहे. लाभक्षेत्रामध्ये आदिवासी समाजाची कुटुंबे मोठया प्रमाणात राहतात. लाभक्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांना या प्रकल्पाच्या माध्यमातून सिंचनाचा लाभ होणार आहे. जे काही मुद्दे माननीय सदस्यांनी मांडले त्याबाबत त्यांना आणखी काही माहिती हवी असेल तर मी माझ्या स्तरावर एक बैठक आयोजित करतो आणि त्या बैठकीला माननीय सदस्यांना बोलावतो. जर त्या जमीन अधिग्रहणाच्या कामामध्ये काही अनियमितता झाली असेल तर त्या संदर्भात उचित कारवाई केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रकल्प माझ्या जिल्हयातील आहे. या प्रकल्पाचे सर्वेक्षण होत असताना प्रस्तावित प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील अंबाबारवा अभयारण्यातील वन जमीन बाधित होत असल्याने व अभयारण्यातील वन जमिनी वापरण्याकरिता सर्वोच्च न्यायालयाची पूर्वपरवानगी आवश्यक होती. लक्षवेधी सूचना मांडल्यानंतर अधिकाऱ्यांनी पाटबंधारे विभागाची दिशाभूल केली आहे आणि चुकीचे सर्वेक्षण करुन चुकीच्या जागेवर हा प्रकल्प सुरु केलेला आहे. हा विषय अत्यंत गंभीर आहे. तेथील 5 गावातील आदिवासी लोकांनी या प्रकल्पाच्या कामाला हरकत घेतली आहे. मी स्वत: ही साईट बघून आलो आहे. तेथील काही आदिवासी लोकांची भेट घेतली आहे. आदिवासी समाजाच्या जमिनी संपादित करताना त्यांना विश्वासात घेतले गेले नाही. मंत्री महोदयांनी बैठक आयोजित करतो व त्या बैठकीला माननीय

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/पूर्वी श्री.गिते 14:15

श्री.पांडुरंग फुंडकर.........

सदस्यांना बोलावले जाईल असे सांगितले आहे. अशी बैठक आयोजित केल्यास त्या पाचही गावाच्या सरपंचांना देखील त्या बैठकीला बोलावले पाहिजे. सरपंच आणि ग्रामस्थ यांच्याकडून जे सत्य बाहेर येईल त्यानुसार चौकशी करुन प्रकल्पाच्या कामाबाबत निर्णय घेतला पाहिजे. चुकीच्या मार्गाने सर्वेक्षण करुन चुकीच्या जागेवर प्रकल्प सुरु होणार असेल, दादागिरी करुन कॉन्ट्रॅक्टर कामाला सुरुवात करणार असेल तर या गंभीर बाबी आहेत. मंत्री महोदयांकडे आयोजित करण्यात येणाऱ्या बैठकीला त्या पाचही गावातील सरपंचांना बोलावले पाहिजे. नंतरच प्रकल्पाचे काम सुरु केले पाहिजे. या प्रकल्पाच्या कामाची मूळ किंमत आणि किती जमीन सिंचनाखाली येणार आहे हे सभागृहाला सांगितले पाहिजे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, मी आताच सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा आणि सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विनंती केली त्यानुसार संबंधित अधिकारी यांची बैठक घेत असताना या सन्माननीय सदस्यांनाही बोलाविले जाईल. त्याचबरोबर बाधित गावातील सरपंच आणि आदिवासी कृती समितीच्या सदस्यांना बोलावून त्यांनाही विश्वासात घेतले जाईल. तसेच या प्रकल्पाच्या बाबतीत सुरुवातीच्या काळात अन्य नेमक्या कोणत्या अनियमितता झाल्या असतील तर त्यांची चौकशी केली जाईल. या प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता 38.32 कोटी रुपयांची मान्य केली असून निविदा 28.72 कोटीच्या काढल्या आहेत व मार्च, 2012 अखेरपर्यंत 15.34 कोटी इतका खर्च झालेला आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, या प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात बऱ्याच आदिवासींचे क्षेत्र येत असून त्यांनाही सिंचनाचा फायदा होणार आहे. आदिवासींच्या जमिनी घेतांना मात्र कायद्याचे उल्लंघन झाले व खऱ्या आदिवासींना बिगर आदिवासी दाखवून जमिनी संपादित केल्या ही आणखी गंभीर बाब आहे, याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले नाही. मी या प्रकल्पाला भेट दिली होती तेव्हा मला असे समजले की, या प्रकल्पाचे कंत्राट ज्यांनी घेतले ते दादागिरी करुन किंवा पैसे देऊन लोकांना फितविण्याचे काम करतात, ही गोष्ट खरी आहे काय, तसेच हे कंत्राट कोणत्या कंपनीला दिलेले आहे, त्यांची नावे काय ? तसेच अर्थ संकल्पावरील भाषणात मी सांगितले होते की, राज्यात प्रकल्पांच्या किंमती वाढविण्याच्या रॅकेटची मालिकाच सुरु आहे. याचा परिणाम म्हणून बाणगंगा धरणाची किंमत 400 कोटीवरुन 1200 कोटीवर गेली, असे प्रकार या राज्यात सुरु आहेत., हे प्रकार शासन बंद करणार काय ?

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, या प्रकल्पाचे काम मे. कृष्णा डेव्हलपर्स आणि होनाई कन्स्ट्रक्शन्स, पुणे यांच्याकडे दिलेले असून यात जर आदिवासींना विश्वासात न घेता किंवा त्यांना बिगर आदिवासी दाखवून त्यांच्या जमिनी संपादित केल्या असतील अशा काही अनियमितता असतील तर त्यांची निश्चितपणे चौकशी केली जाईल. तसेच हे करण्यापूर्वी बाधित गावातील सरपंच, आदिवासी कृती समितीच्या लोकांना बोलावून अधिकची माहिती घेण्यात येईल व त्यात तथ्य आढळून आले तर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 2.24 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत मध्यंतर )

**-------** ( नंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी मा. उप सभापती )**

**उप सभापती** : सभागृहात कॅबिनेट मिनिस्टर उपस्थित नाहीत याची मला कल्पना आहे. त्यामुळे सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक 3.00 ते 3.10 पर्यंत स्थगित झाली.)

-----

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**विशेष उल्लेख**

**पृ.शी./मु.शी.**: ग्रामपंचायत अडूळसे (ता.सुधागड,जि.रायगड) येथील गौळमाळ धनगरवाडा या गावासाठी मंजूर करण्यात आलेल्या सौर ऊर्जा पथदीप योजने बाबत श्री.जयंत प्र.पाटील,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

समाज कल्याण विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबागकडून ग्रामपंचायत अडूळसे (ता.सुधागड,जि.रायगड) येथील गौळमाळ धनगरवाडा येथे सौर ऊर्जा पथदीप योजना मंजूर करण्यात आलेली आहे. यामध्ये 3 सौर ऊर्जा पथदीप असून हे पथदीप प्रत्यक्ष गौळमाळ धनगरवाडा येथे बसविण्यात आलेले नाहीत.

सदर सौर ऊर्जा पथदीप अडूळसे येथील श्री.भाऊ मालू कोकरे व श्री.मालू काळू कोकरे यांच्या शेतघरावर बसविण्यात आले आहेत व तेथील लोकसंख्या 6 इतकीच असल्याने सदर पथदीप लोकसंख्येनुसार अयोग्य आहेत.

तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सुधागड यांनी दिनांक 18.10.2011 रोजी सदरचे सौर ऊर्जा पथदीप अयोग्य ठिकाणी बसविल्याबाबत समाज कल्याण विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना लेखी कळविले. तथापि, यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न झाल्यामुळे श्री.सावळाराम देवजी कोकरे व श्री.संतोष हेमा बावधाने यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे दिनांक 23.3.2012 रोजी तक्रार केली आहे. तसेच, दिनांक 9.4.2012 पासून रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्या कार्यालया समोर गौळमाळ धनगरवाडा येथील ग्रामस्थ बेमुदत उपोषणास बसले होते. त्यामुळे

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

संबंधित विभागाने याबाबत कोणतीही दखल घेतल्यामुळे श्री.मालू काळू कोकरे यांच्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे तेथील ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व त्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व केलेली कार्यवाही यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मानसेवी जिल्हा समादेशक होमगार्ड यांचा दर्जा
जिल्हा पोलीस अधीक्षक पदा प्रमाणे नसणे
या बाबत श्री.चंद्रकांत पाटील,वि.प.स.यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्य शासनाचे होमगार्ड दल हे संपूर्ण राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामी सन 1947 साला पासून कार्यरत असणे, या दलाचे जिल्हा स्तरावरील होमगार्डचे प्रमुख जिल्हा समादेशक पदाचे मानसेवी वरिष्ठ अधिकारी असतात. ते कार्यालयीन वेतनीय कर्मचारी, मानसेवी अधिकारी पुरूष महिला होमगार्ड सदस्य यांची भरती, प्रशिक्षण, कवायती, कर्तव्य, सुरक्षा सेवा, अपघात, पूर, भूकंप आणि शासकीय विकास कामे त्याच बरोबर धोरणात्मक व्यापक प्रक्रिया जिल्ह्यात पार पाडत असतात. तरीही मानसेवी जिल्हा समादेशक होमगार्ड दर्जा राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये पोलीस अधीक्षक पदाप्रमाणे सर्व हक्क, कर्तव्य, जबाबदाऱ्या व शासकीय सोयी सुविधायुक्त नसणे, यावर शासनाने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना यासाठी हा विशेष उल्लेख उपस्थित केला आहे.

....

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत तालुका, जिल्हा पातळीवर प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सुरु करणे याबाबत श्री.विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत युपीएसी व एमपीएससी स्पर्धा परीक्षेसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यासाठी विविध शासकीय संस्थांना मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने निधीही देण्यात येत आहे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. परतु ही मार्गदर्शन केंद्र फक्त विभागीय पातळीवर आहेत त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी यापासून वंचित रहात आहेत.त्यामुळे युपीएससी व एमपीएससी स्पर्धा परीक्षेसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र तालुका, जिल्हा पातळीवर सामाजिक न्याय विभागाने सुरु करावीत किंवा दर्जेदार अशा शैक्षणिक संस्थांना ती सुरु करण्यासाठी परवानगी द्यावी जेणेकरुन महाराष्ट्रातील विद्यार्थी मोठया संख्येने प्रशासकीय सेवेत येऊ शकतील या दृष्टीने शासनाने तातडीने उपाय योजना करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : नागपूर येथील टीम युनिव्हर्सल फूड प्रोसेसिंग कंपनीकडून खाद्यपदार्थामध्ये होत असलेली भेसळ याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे,वि.प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"नागपूर शहराजवळील बिडगाव शिवारातील तथाकथित टोमॅटो सॉस बनविणाऱ्या टीम युनिव्हर्सल फूड प्रोसेसिंग या कंपनीतील नासका लाल भोपळा व इतर टाकाऊ भाजीपाल्यापासून निकृष्ट दर्जाचे आरोग्य विघातक पदार्थ विकण्याचे प्रकरण माहे नोव्हेंबर, 2011 मध्ये उघडकीस आले, अशा प्रकारच्या खाद्यपदार्थातील भेसळीच्या घटना अनेक वेळा होऊनही संबंधितावर आतापर्यन्त कोणतीच कारवाई होत नसल्याने असे प्रकार वारंवार घडत असणे, या करिता शासनाने अन्न व औषध प्रशासनातर्फे दर तिमाहीस केल्या जाणाऱ्या नियमित तपासण्या व केलेल्या कारवायांबाबत जिल्हानिहाय अहवाल जनतेच्या माहितीकरिता वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावा व विभागीय/जिल्हा पातळीवरील ग्राहक संरक्षण मंचाच्या सदस्यांना त्या संबंधी माहिती द्यावी यामध्ये सदर कारखान्यातील माल वापरणारे हातगाडी वाले, हॉटेल्स, रेस्टॉरंट यावरही कारवाई करावी तसेच ज्या ग्राहकांना खाद्यवस्तू वा इतर मालाच्या दर्जाबद्दल शंका आहे अशा ग्राहकांच्या सोईसाठी नाममात्र शुल्क भरुन शासकीय खाजगी प्रयोगशाळा सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात व त्यावर ठराविक मुदतीत कार्यवाही करणारी यंत्रणा कार्यान्वित करणे आवश्यक आहे, अशा प्रकारच्या उपाय योजना शासनाने करण्याची आवश्यकता या बाबत शासनाने तत्काळ निवेदन करावे".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. नीलम गोऱ्हे ...

सभापती महोदय, आपण नागपूरला हिवाळी अधिवेशनानिमित्त जातो त्यावेळी आपल्याला कँटीनच्या माध्यमातून आणि दुकानातील ग्राहक म्हणून काही विषयांचा परिचय

होतो. टीम युनिव्हर्सल फूड यांचे टोमॅटो सॉस अनेक हॉटेलमध्ये वापरण्यात येते. त्यामध्ये नासका भोपळा आणि सडलेल्या भाज्यांचे मिश्रण करण्यात आल्याचे नोव्हेंबर 2011 मध्ये त्या कंपनीवर धाड टाकण्यात आली त्यावेळी उघडकीस आले. या गोष्टीला तीन महिने होऊन गेल्यानंतर या टीम युनिव्हर्सिल प्रोसेसिंग कंपनीच्या लोकांवर शासनाने काय कारवाई केली, त्या कंपनीवर लादलेल्या खटल्याचे पुढे काय झाले याची कुणालाही माहिती नाही. या बाबतीत माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता हा सॉस नागपूरच्या हॉटेलमध्ये मोठया प्रमाणात वापरण्यात येत असून त्यामध्ये गैरप्रकार चालतात असे आढळून आले. या गोष्टीमध्ये सरकारने लक्ष घालावे या साठी विशेष उल्लेखाव्दारे मी लक्ष शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : गोंदिया वन परिक्षेत्रांतर्गत राखीव वन क्षेत्रास लावण्यात येत असलेल्या आगी याबाबत श्री. केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगांव वन परिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या राखीव वन क्षेत्र क्र. 258 निमगांव वन परिक्षेत्रात मोठया प्रमाणात बांबूची लागवड केली जात असणे, येथील गणेशनगर (बरडटोली) जवळ सागवानाचे प्लँटेशन करण्यात आले असून दि. 25 मार्च 2012 रोजी सायंकाळी 6.30 च्या सुमारास सदर प्लँटेशनला अचानक आग लागणे, परंतु घटनास्थळावर लागलेली आग आटोक्यात आणण्याकरिता वन विभागाचा केवळ एकच कर्मचारी प्रयत्न करीत असणे, या आगीमुळे लाखो रुपयांचा बांबू भस्मसात होणे, त्यामुळे जंगलात वावरणाऱ्या वन्य जीवांना धोका निर्माण होणे, आगीत मोठया प्रमाणात औषधी वनस्पती देखील नष्ट होत असणे, वास्तविक पाहता तेंदूपत्ता, मोहफुले व डिंकासाठी ही आग जंगलात लावली जात असणे, अल्पशा कमाईसाठी वन विभागाचे कर्मचारी ठेकेदारांच्या आहारी जाऊन अशी आग लावण्यास प्रवृत्त होत असल्याचे निदर्शनास येणे, जंगलात अशाप्रकारची आग लागणे ही दरवर्षीची ओरड असून यावर कायम स्वरुपी उपाय योजना करण्यासाठी शासनाला अपयश येणे, त्यामुळे यावर शासनाने गांभीर्याने विचार करुन जंगलातील आग रोखणे आणि योग्य चौकशी करुन आग लावण्यास प्रवृत्त करणाऱ्या वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तत्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता लक्षात घेता, शासनाने तातडीने करावयाची उपाय योजना,कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. VIII OF 2012.**

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY CITY CIVIL COURT ACT, 1948.)

श्री.भास्कर जाधव (विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि. स. वि. क्रमांक 8 मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि. स. वि. क्रमांक 8 मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

सभापती महोदय, आपल्या देशामध्ये मुंबई, मद्रास आणि कलकत्ता या तीन बंदरांचे व्यापार, वाणिज्य यादृष्टीने असलेले महत्व लक्षात घेता प्रेसिडेन्सी टाऊन म्हणून त्यावेळेला हाय कोर्टाने 1862 साली दिवाणी स्वरुपाचे दावे चालविण्यासाठी अशा प्रकारच्या न्यायालयाची निर्मिती केली. त्यानंतर 1947-48 मध्ये या न्यायालयामध्ये दावे चालविण्यासाठी त्यांना 10 हजार रुपयांचे आर्थिक अधिकार देण्यात आले. त्यानंतर 1977 मध्ये यात पुन्हा सुधारणा करुन 50 हजार रुपयांचे आर्थिक अधिकार देण्यात आले आणि त्या अधिकारापर्यंत दिवाणी दावे चालविण्याच्या बाबतीत कायद्यामध्ये तरतूद करण्यात आली. 1872 ते 1977 पर्यंत 50 हजार रुपयापर्यंतचे दिवाणी दावे चालविण्याचा अधिकार दिवाणी कोर्टाकडे देण्यात आला. परंतु त्यानंतर 1987 मध्ये पुन्हा शासनाने असा निर्णय घेतला की, या कोर्टामध्ये खूप मोठ्या आर्थिक व्यवहाराचे दावे चालविण्यासाठी आणि विशेष करुन अमर्याद अशा प्रकारचे दावे चालविण्यासाठी अधिकार देण्यात यावेत आणि त्याची अंमलबजावणी 1992 सालापासून करण्यात यावी हा निर्णय 1987 मध्ये करण्यात आला. त्या अधिनियमाला श्री.जमशेद गजधर यांनी उच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले.त्यावेळी उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की,जोपर्यंत दिवाणी न्यायालयांमध्ये तशा प्रकारच्या सोयी उपलब्ध करीत नाही, तोपर्यंत अशा प्रकारचे अमर्याद अधिकार देता येणार नाहीत. म्हणून हा विषय तेथे पेंडींग राहिला.

सभापती महोदय,नंतरच्या काळामध्ये केंद्र शासनाने एक कायदा तयार केला की,अशा दिवाणी न्यायालयांना पाच कोटी रुपयापर्यंत अधिकार द्यावेत.त्यानंतर तुम्ही तेथे इन्फ्रास्ट्रक्चर तयार करावे आणि मगच याबाबतीत निर्णय घ्यावा.याबाबतीत उच्च न्यायालयामध्ये केस सुरु होती. नंतरच्या काळामध्ये म्हणजे 2005 मध्ये निर्णय घेण्यात आला आणि त्या निर्णयानुरुप याबाबत उच्च न्यायालयाला अवगत करण्यात आले की, आम्ही काही सुधारणा टप्प्याटप्प्याने करीत आहोत आणि त्यानुसार आम्ही तशा प्रकारच्या सुधारणा देखील केलेल्या आहेत.परंतु नंतरच्या काळामध्ये शासनाने असा निर्णय घेतला की,आपण या दिवाणी कोर्टाचे अधिकार आता 1 कोटी रुपयाच्या आर्थिक मर्यादेपर्यंत वाढवावेत.मध्यंतरी याच सभागृहाने, विधीमंडळाने मुंबई दिवाणी अधिकारिता ॲक्टमध्ये दुरुस्ती केली आणि दिवाणी न्यायालयातील एक लाख रुपयांचे दावे हे पाच लाखापर्यंत चालविण्याच्या दृष्टीने त्यांचे अधिकार वाढविले.त्याचबरोबर जिल्हा न्यायालयाचे अधिकार हे दोन लाखापासून 10 लाखापर्यंत वाढविले.त्याचा परिणाम चांगल्या प्रकारे झाला की, दोन लाखापर्यंत मर्यादा वाढविल्यामुळे मुंबई हायकोर्टातून किंवा हायकोर्टातून जाणारे 6700 अपिले ही उच्च ......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

न्यायालयाकडून जिल्हा पातळीवर गेली आणि आपण 1 लाखापासून 5 लाखापर्यंत दिवाणी न्यायालयाचे कनिष्ठ स्तरावरील अधिकार वाढविल्यामुळे 46 लाख प्रकरणे ही तालुका पातळीवर म्हणजे दिवाणी न्यायालयामध्ये गेली. अशा प्रकारे एवढ्या मोठ्या प्रमाणात याचे वर्गीकरण झाले. आज सुध्दा आपण जर मुंबई हाय कोर्टामध्ये 1 कोटी रुपयापर्यंतची मर्यादा वाढविली तर जवळजवळ 26 हजार प्रकरणे ही या कोर्टाकडे वर्ग होतील.

सभापती महोदय, मध्यंतरी आपण सर्व पेंडन्सी कमी करण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट सुरु केली. तसेच आपण फॅमिली कोर्ट वाढविली. मॉर्निंग आणि इव्हीनिंग कोर्ट सुरु केली, त्याचप्रमाणे न्यायाधीशांची पदे वाढविली. न्यायालयाच्या इमारती चांगल्या प्रकारच्या सुसज्ज व्हाव्यात तसेच त्यांचे रहाणीमान सुधारावे, त्यांना रहाण्यासाठी वेगवेगळया सोयी असाव्यात इ.सर्व बाबी करुन राज्यात 39 लाख प्रकरणे पेंडींग होती ती संख्या कमी करण्याचा सर्वांनी मिळून प्रयत्न केला आणि त्याचा वर्षभरामध्ये असा परिणाम झाला की, 19 लाख नवीन प्रकरणे दाखल झाली.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

पूर्वीची 39 लाख प्रकरणे होती आणि आणखी 19 लाख प्रकरणे नवीन दाखल झाली परंतु संपूर्ण वर्षामध्ये 26 लाख प्रकरणांचा निपटारा झाला आणि आज ही पेंडन्सी जवळजवळ 32 लाख प्रकरणांपर्यंत आलेली आहे. अशा पध्दतीने आज आपल्या न्यायालयामध्ये न्यायाकरिता वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात लवकर निकाली निघावीत, लोकांना कमी वेळामध्ये आणि कमी खर्चामध्ये लवकर न्याय मिळावा, न्याय व्यवस्थेवरचा लोकांचा विश्वास अधिक दृढ व्हावा हा उद्देश आहे.

मी मघाशी सांगितल्याप्रमाणे तालुक्यातून, जिल्ह्यातून लोकांना मुंबई हायकोर्टापर्यंत यावे लागत होते. त्यांना तिथल्यातिथे न्याय मिळू लागल्यामुळे त्यांचा वेळ वाचला, त्यांचा खर्च कमी झाला आणि त्यांना न्याय सुध्दा झटपट मिळावयास लागला. तशाच प्रकारचा विचार करुन शासनाच्या वतीने हे विधेयक आणण्यात आले आहे. प्रकरणांचा आकडा थोडा मागेपुढे होईल. ते इतके महत्वाचे नाही. प्रलंबित प्रकरणांची संख्या मी 26 हजार सांगितली त्याऐवजी 35 हजार होईल. तेवढी सुधारणा करण्यास काही हरकत नाही. अशा पध्दतीचे हे विधेयक आहे. याहीपेक्षा जर अधिकची माहिती सन्माननीय सदस्यांना पाहिजे असेल तर निश्चितपणे छोटीमोठी माहिती देण्यास मी तयार आहे. या ठिकाणी लोकांच्या हिताच्या दृष्टीने, लोकांना झटपट न्याय मिळावा, कमी खर्चामध्ये, कमी वेळेमध्ये, खालच्या स्तरावर न्याय मिळण्याच्या दृष्टीने हे चांगले विधेयक आणलेले आहे. 1977 पासून 2012 पर्यंत 50 हजार रुपयांच्या आर्थिक अधिकाराची मर्यादा वाढविलेली नसल्यामुळे ती मर्यादा वाढविण्याच्या दृष्टीने हे विधेयक आणलेले आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाला एकमताने पाठिंबा द्यावा अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय हे कायद्याचे अभ्यासक आहेत की नाही हे मला माहीत नाही पण हे विधेयक मांडत असताना त्यांनी कायदेतज्ज्ञासारखे मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. ते सारखे असे म्हणत होते की, खालच्या न्यायालयात सर्वसामान्य जनतेला कमी खर्चात लवकर न्याय मिळावा यासाठी हे विधेयक आणलेले आहे. त्यांनी सुंदर विवेचन केले. खरे म्हणजे हा निर्णय फार लवकर व्हावयास पाहिजे होता. न्याय प्रक्रियेमध्ये जेवढा विलंब होतो तेवढ्या अनेक अडचणी येतात. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, कायदा करुन अंमलबजावणी करा म्हणून आपण हे विधेयक आणलेले आहे.

सभापती महोदय, यामध्ये मर्यादा 10 लाख रुपयांवरुन 1 कोटी रुपयांवर केली जाणार आहे. त्यामध्ये आपण कोणत्या बाबी घेतलेल्या आहेत ? यामध्ये "बौध्दिक मालमत्ताविषयक बाबी" असा उल्लेख केलेला आहे. आपल्या बौध्दिकतेबद्दल मी नंतर बोलणार आहे. अक्कलहुशारी वापरुन जो गुन्हा होतो तो बौध्दिक गुन्हा असा याचा अर्थ आहे. वकील महोदया सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे मागे बसलेल्या असल्यामुळे मला जरा सावधपणे बोलावे लागते. मी आज वकिलांबद्दल काहीच बोलणार नाही. कारण जोपर्यंत बौध्दिकतेने अशा प्रकारचे काही निर्माण करणार नाही तोपर्यंत वकिलाची वकिली कशी चालणार हा प्रश्न आहे. कारण बौध्दिक मालमत्तेच्या बाबतीत गुन्हा घडल्याशिवाय प्रकरण न्यायालयात जाणार नाही आणि न्यायालयात गेल्याशिवाय कामकाज पूर्ण करण्याचा विषय येणार नाही. कारण विधेयकच तसे आलेले आहे. यामध्ये व्यापार चिन्हे म्हणजे ट्रेड मार्क, प्रकाशनाधिकार म्हणजे कॉपीराईट या बाबतीत उल्लेख केलेला आहे. हल्ली वर्तमानपत्रे किंवा मासिके किंवा पुस्तकांच्या बाबतीत माझी कॉपी केली आहे असे कधी तरी ऐकावयास मिळते. जे खरे बुध्दिवादी आहेत ते सरळ अनुवाद असे लिहितात. अनुवाद असे लिहिले की विषय संपतो. त्यामध्ये चोरीचा मामलाच नाही. त्यामुळे जोरात मांडावयास मोकळे. तो बुध्दिवाद आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 15:30

श्री. दिवाकर रावते...

विधेयकाच्या कलम 2 (3अ) मध्ये बौद्धिक मालमत्ताविषयक बाबी "याचा अर्थ, व्यापारचिन्हे, प्रकाशनाधिकार (कॉपीराइट, एकस्व (पेटंट), संकल्पचित्र व भौगोलिक निर्देश, वनस्पतींच्या प्रजाती आणि शेतकरी व वनस्पती लागवडदारांचे हक्क आणि संकलक परिपथ रेखांकन (रचनाकृती) यांच्याशी संबंधित दावे व दिवाणी प्रकरणे, असा आहे," असे नमूद केले आहे. सभापती महोदय, गोमूत्र ही हिंदुस्थानची संस्कृती. शरीर शुद्ध होण्यासाठी आपण गोमूत्र आचमन करतो. पण या गोमूत्राचे पेटण्ट अमेरिका आणि जर्मनीकडे अधिकृतपणे आहे. गोमूत्र या नावाने हे पेटण्ट आहे. म्हणजे आमच्या बौद्धिकतेचे हे असे दिवाळे झालेले आहे. या विधेयकामध्ये "वनस्पती प्रजाती" असा शब्द आलेला आहे. आयुर्वेदाचे मूळ ज्ञान हे हिंदुस्थानातील वेदांपासून आलेले आहे. आमची बौद्धिकता कोठे कमी पडली मला माहीत नाही. पण वनस्पतींच्या अर्काचे पेटण्ट जर्मनीकडे गेलेले आहे. मूळ संशोधन आपले आहे.

यामध्ये "शेतकरी व वनस्पती लागवडदारांचे हक्क" असे शब्द योजण्यात आलेले आहेत. आजच्या दैनिक "सामना"मध्ये "सावकाराच्या जाचामुळे शेतक-याच्या आत्महत्येचा प्रयत्न" या मथळयाखाली आलेली बातमी मी आपल्या माहितीसाठी येथे वाचून दाखवितो. "झरी तालुक्यातील मुकुटबन पोलीस ठाण्याअंतर्गत येत असलेल्या अडकोली येथील शेतक-याने अवैध सावकाराच्या जाचाला कंटाळून 13 एप्रिलला सायंकाळी 5च्या सुमारास विष घेतले. ही बाब कुटुंबीयांच्या लक्षात येताच त्यांनी या शेतक-याला त्वरित चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात हलविले. सध्या तो मृत्यूशी झुंज देत आहे. या तक्रारीनुसार नथ्थू नानाजी बल्की यांनी मागील चार वर्षापासून नापिकी होत असल्याने महादेव काशिनाथ चवले या अवैध सावकाराकडून दरमहा पाच टक्के व्याजदराने 40 हजार रुपये कर्ज घेतले होते. सावकाराने पीडित शेतक-याच्या नावाने असलेली 3 एकर शेत जमीन या रकमेची हमी म्हणून ताब्यात घेतली. पैसे परत केल्यानंतर शेतजमीन परत करण्याचे तोंडी ठरले. हा व्यवहार गावातील चार लोकांच्या समक्ष झाला होता. बल्की यांनी मुद्दल 40 हजार व त्यावरील व्याज 30 हजार असे एकूण 70 हजार रुपये गावातील प्रभाकर बल्की यांच्या समक्ष सावकारास परत देण्याची सावकाराला वारंवार विनंती केली. परंतु सावकाराने नकार दिला." कलम 2 (3अ) खाली शेतकरी हा विषय येतो. सावकारामुळे त्या शेतक-याने आत्महत्या केली.

..2..

श्री. दिवाकर रावते...

या महाराष्ट्रामध्ये शेतक-याच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत होत्या. 3 वर्षे होऊन सुध्दा आत्महत्याग्रस्त शेतक-यांचा प्रश्न सुटत नव्हता. शेतक-यांच्या आत्महत्या या विषयावर हे सरकार पडेल की काय असे वाटत होते. पण 2004च्या निवडणुकीत आघाडी सरकार आले. त्यानंतर अवैध सावकारीमुळे होणा-या आत्महत्येला निर्बंध बसावा म्हणून, या सभागृहाच्या आणि महाराष्ट्रातील जनतेच्या शेतक-यांच्या प्रती असलेल्या संवेदना लक्षात घेऊन आणि विरोधकांची तोंडे बंद करण्याकरिता, मी जबाबदारीने हा शब्द वापरतो, सावकारी विरोधी विधेयक येथे आणले.

मला निश्चित आठवते की आदरणीय मंत्रीमहोदय श्री.हर्षवर्धन पाटील समोर बसले होते. अधिवेशनाचा शेवटचा दिवस होता. ते म्हणाले की, दिवाकर रावते चिंता करु नका, पुढच्या अधिवेशनामध्ये सावकार विरोधी विधेयक सरकार आणणार आहे. मी त्यांना सांगितले की, हा मी किंवा तुम्ही चिंता करण्याचा विषय नाही. हा सर्व शेतक-यांचा विषय आहे. आम्ही विरोधी पक्षामध्ये आहोत आणि तुम्ही सत्ताधारी पक्षामध्ये आहात म्हणून मी हे बोलत नाही. या विधानमंडळाने शेतक-यांना वाचविण्यासाठी विधयेक आणले पाहिजे आणि ते विधेयक 2008मध्ये आणले गेले.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 15:35

श्री.दिवाकर रावते....

महोदय, प्रत्येक विधेयकामधील ज्या काही बाबी असतात, त्या विधी व न्याय विभाग तयार करीत असते. मी माननीय मंत्र्यांना दोष देत नाही. सभागृहासमोर विधेयक का मांडण्यात आले, विधेयकात कोणत्या सुधारणा करावयाच्या आहेत, विधेयकामुळे काय परिणाम होणार आहेत या सर्व गोष्टींची सरकारच्या वतीने माननीय मंत्री महोदय सभागृहात माहिती देत असतात. विधी व न्याय खात्याकडून विधेयकातील कायदेशीर बाबींची पूर्ण तपासणी होते त्यानंतर ते खाते विधेयकाला मंजुरी देते. विधी व न्याय विभागाच्या मान्यतेशिवाय कोणतेही विधेयक सभागृहासमोर येत नाही. ते विधेयक सभागृहासमोर मांडले आणि ते विधेयक आम्ही अतिशय आनंदाने मंजूर केले. काल एका शेतकऱ्याने आत्महत्या केली असल्यामुळे माननीय श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या संदर्भ घेऊन या विधेयकावर आपण बोलावे.

महोदय, सानंदा प्रकरण घडले होते, त्यावर मी काही भाष्य व्यक्त करु इच्छित नाही. त्या प्रकरणाची माहिती सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना आहे. ते विधेयक आणले, आम्ही ते मंजूर केले. त्या विधेयकास पार्श्वभूमी होती. वाद घालण्याचा प्रश्न नव्हता. विरोध करण्याचा देखील प्रश्न नव्हता. त्या विधेयकातील त्रुटी शोधण्यासाठी वेळच दिली गेली नाही. तरी देखील आम्ही हे विधेयक मंजूर केले. हे विधेयक 2005 साली मान्यता घेण्यासाठी माननीय राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले. आज 2012 हे वर्ष सुरु आहे. 2011 मध्ये माननीय राष्ट्रपतीकडून सदर विधेयक त्रुटी पूर्तता करण्यासाठी राज्य शासनाकडे परत आले. आपल्या देशाच्या माननीय राष्ट्रपती हया महाराष्ट्रातील सुकन्या आहेत. त्या मराठी आहेत. दुर्दैव असे आहे की, त्या अमरावती विभागात राहतात. अमरावती विभागातच शेतकऱ्यांच्या सर्वात जास्त आत्महत्या झालेल्या आहेत. देशात सर्वात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या अमरावती विभागात आहेत. देशाच्या सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीने अशा गंभीर प्रश्नाकडे लक्ष घालावे अशी आमच्या सारख्यांची अपेक्षा असते. मराठी मातीतील सुपुत्री देशातील सर्वोच्च स्थान अधिग्रहण करते. अशा वेळी महाराष्ट्रातील जनतेने त्यांच्याकडून अपेक्षा करणे हे काही गैर नाही.

महोदय, महाराष्ट्रातील टंचाईची परिस्थिती या विषयावर झी-24 तास या दूरदर्शन चित्रवाहिनीवर काल चर्चा चालू होती. मी ती चर्चा ऐकत होतो. धुळे शहरातील पाणी टंचाईची परिस्थिती या चित्रवाहिनीवर दाखविण्यात येत होती. त्यांच्या माहेरी, त्यांच्या घरामध्ये त्यांची नात,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्यांच्या मोठया दिराची पत्नी, त्यांची सासू धुळे शहरात पाणी टंचाई किती प्रमाणात आहे याची माहिती सांगत होते. गावातील लोक सांगतात की, आमच्या गावाची लेक देशातील सर्वोच्च पदावर आहे. त्या ठिकाणची तरी पाणी टंचाई दूर व्हावयास पाहिजे होती. ही आनंदाने सांगण्यासारखी बाब नाही. आपल्याला ज्यावेळी राजकारणात स्थान मिळते, त्यावेळी किमान आपण ज्या कुशीतून येतो, तिला मोठे करणे हे आपले कर्तव्य असते. कर्तव्य पार पाडले गेले नाही असे मी म्हणणार नाही. हा काही माननीय राष्ट्रपतीचा प्रश्न नाही. महाराष्ट्रातील प्रथम मराठी महिला राष्ट्रपती होते आहे अशी बातमी ऐकल्या बरोबर सर्व राजकीय विरोध बाजूला ठेवून माननीय शिवसेना प्रमुखांनी पाठिंबा देण्याची घोषणा केली. माननीय राष्ट्रपतींचे गाव आहे, त्या गावांचा राज्यकर्त्यांनी सन्मान करुन तेथील पाणी टंचाईचा प्रश्न सोडविला पाहिजे होता. त्या गावाची पाणी टंचाई दूर करावी हे काही त्यांचे काम नाही. राज्यकर्त्यांनी त्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावयास पाहिजे होते. माझ्या गावात पाणी उपलब्ध करुन द्यावे असे त्या सर्वोच्च स्थानावर बसून सांगू शकत नाही. त्यांच्या गावाची पाणी टंचाई दूर करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची आहे. मुले मोठी होतात, आई-वडीलांचे पांग फेडतात. त्याप्रमाणे पांग फेडण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची होती. परंतु ती जबाबदारी राज्यकर्त्यांनी पार पाडली नाही हे खेद या निमित्ताने मी व्यक्त करतो.

महोदय, काल दूरदर्शनवर धुळे शहरातील पाणी टंचाईची परिस्थिती बघून मला खूप वाईट वाटले. माननीय राष्ट्रपतींच्या गावात पाणी टंचाई दूर करण्याची जबाबदारी सरकारची आहे. परंतु ती जबाबदारी सरकारने पार पाडली नाही असे मी पुन्हा खेदाने नमूद करतो. अमरावती विभागात शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात आत्महत्या केल्या आहेत. 2005 साली विधेयक मंजुरीसाठी माननीय राज्यपालांकडे गेले. माननीय राज्यपालांची मान्यता मिळून ते माननीय राष्ट्रपती यांच्याकडे मंजुरीसाठी गेले. या विधेयकाचा प्रवास कधी व कसा, कसा झाला आहे याची माहिती मला माननीय मंत्री महोदयांकडून जाणून घ्यावयाची आहे. माननीय मंत्री महोदयांनी ती माहिती विभागाकडून प्राप्त करुन घ्यावी व उत्तराच्या भाषणात त्यासंबंधीची माहिती द्यावी. हे विधेयक या सभागृहात मंजूर कधी झाले, ते माननीय राज्यपालांकडे मान्यतेसाठी कधी पाठविण्यात आले, माननीय राज्यपाल कार्यालयाकडून ते माननीय राष्ट्रपती कार्यालयाकडे मान्यतेसाठी कधी गेले,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

माननीय राष्ट्रपती महोदयांच्या कार्यालयातून ते विधेयक त्रुटींची पूर्तता करण्यासाठी राज्य शासनाकडे कधी परत आले, ते विधेयक परत आल्यानंतर त्याचे काय झाले याची माहिती त्यांनी सभागृहाला द्यावी.

यानंतर श्री. भोगले....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

हे विधेयक आम्ही कशाला मंजूर करायचे? यामध्ये शेतकरी हा विषय आहे. त्याचे कज्जे, लढे सुरु आहेत. तुम्ही सावकारीविरुध्दचे विधेयक मंजूर केल्यानंतर बेकायदेशीर सावकारांच्या ताब्यातील सगळ्या जमिनी पुन्हा शेतकऱ्यांकडे येणार आहेत. तेव्हा हे सगळे कज्जे तेथे पुन्हा उभे राहणार आहेत. ते सावकार गप्प बसणार नाहीत. ते न्यायालयात धाव घेणार आहेत. हे विधेयक आपण मंजूर करीत असताना सावकारी विरोधातील विधेयकाच्या अंतर्गत सावकार न्यायालयात जाणार आहेत. अत्यंत विषण्ण मनाने मला हे सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मला त्या विधेयकाचा प्रवास जाणून घ्यायचा आहे. माननीय राष्ट्रपती महोदयांकडून ते विधेयक मंजूर करण्यामध्ये वेळेचा अपव्यय झाला असे मी म्हणणार नाही. तसे झाले असेल तर ते अयोग्य आहे. राष्ट्रपती महोदयांबद्दल बोलताना जपून शब्द वापरावे लागतात. अयोग्य असेल तर त्या संबंधित अधिकाऱ्याने असे का करावे हा प्रश्न निर्माण होतो. प्रशासन मात्र सात- सात वर्षे शेतकऱ्यांच्या जीवनमरणाच्या संदर्भातील विधेयक मंजूर करण्याकरिता एवढा विलंब लावणार असेल तर ते योग्य नाही. माझ्या माहितीप्रमाणे गेली सात-आठ महिने विधी व न्याय विभागामध्ये ते विधेयक पडून आहे. त्या विधेयकामध्ये त्रुटी ठेवणाऱ्या अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई झाली पाहिजे. अधिकारी कायदा ज्याप्रमाणे समजतो त्याप्रमाणे कायद्याचे आकलन करतो. म्हणून दोन वकील आपापसात लढतात. एक वकिलाचे आकलन एक असू शकते तर दुसऱ्या वकिलाचे आकलन वेगळे असू शकते. कदाचित त्यापेक्षा चांगले ज्ञान असेल, ज्ञानात अधिक भर पडली किंवा त्यात सरकारच्या कायदेतज्ज्ञाची भर पडली तर समर्पक भावनेने विधेयक विधिमंडळामध्ये येईल असे वाटत होते. अजूनही अधिवेशन संपायला चार दिवस शिल्लक आहेत. ते विधेयक सभागृहापुढे येऊ शकते. तो चर्चेचा विषय नाही. परंतु दुरुस्ती चुकीची होती म्हणून राष्ट्रपतींकडे ताबडतोब इंग्रजी भाषेतील एस.ओ.एस.म्हणतो त्या पध्दतीने मेसेजसह विधेयक पाठवून मंजूर करुन घ्यावे. तरच या विधेयकातील शेतकरी शब्दाला अर्थ प्राप्त होईल. ते शासन करणार आहे का? हा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मला मंत्री महोदयांकडून चांगल्या अर्थाने हे जाणून घ्यायचे आहे, टीका म्हणून जाणून घ्यायची इच्छा नाही. विलंब झाला त्याबद्दल मी तुम्हाला कोणाला दोष देऊ इच्छित नाही. दोष असला तरी देणार नाही. सावकारीच्या विरोधातील विधेयक या सभागृहात या

..2..

SGB/ पूर्वी श्री.गिते 15:40

श्री.दिवाकर रावते........

अधिवेशनात कधी येणार हे जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत. ते विधेयक ज्या दिवशी मंजूर होईल त्या वेळी हजारो सावकारांच्या ताब्यात असलेल्या जमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यात येणार आहेत. त्या निर्णयाविरुध्द सावकार न्यायालयात गेल्याशिवाय राहणार नाहीत. ते गप्प बसणार नाहीत.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये वनस्पती लागवडीचा संदर्भ दिलेला आहे. हा विषय आदिवासींच्या संदर्भातील आहे. जंगलामध्ये वनस्पती लागवड करण्याचा विषय यात आहे. आदिवासींना जमिनी भाडेपट्टयाने देण्याचा विषय आहे. ब्रिटिशांच्या काळातील अफूच्या लागवडीचा निर्णय त्या त्या राज्यातील उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सर्वोच्च न्यायालयात गेला. ब्रिटिशांनी 100 वर्षापूर्वी फक्त अफू बनविण्याकरिता म्हणून मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि राजस्थान राज्यात काही शेतकऱ्यांना लिजवर जमिनी दिल्या होत्या. भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारतामध्ये अफूची लागवड करता येत नाही. त्यावर बंदी आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट सांगितले की, 100 वर्षे त्यांना परवानगी दिलेली आहे. तुम्हाला ती काढून घेता येणार नाही. म्हणून त्या भागात अजूनही अफूची शेती केली जात आहे. त्याचे अनुकरण आपल्या राज्यात सुरु झाले हा भाग वेगळा आहे. अफूची शेती केल्याबद्दल संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल झाला. ते काम गुन्हेगारी स्वरुपाचे असले तरी अफूची लागवड हा विषय वनस्पती लागवडीच्या संदर्भातील असल्यामुळे या विधेयकामध्ये व्यवस्थित मांडणी केली आहे. त्यामध्ये या परवानगीचा समावेश होतो. हे खटले आता मर्यादा वाढविल्यामुळे वर्ग होतील असे मोठया प्रकर्षाने मंत्री महोदय सांगत होते.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 15:45

श्री. दिवाकर रावते .........

सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी न्यायाधीश, मग हे न्यायाधीश कोण तर ज्यांना सामान्य माणसाची भाषा येते ते न्यायाधीश. सामान्य माणसाची भाषा व मराठीचे ज्ञान असलेले तसेच मराठीमध्ये लोकांना कळेल अशा भाषेत आपले आदेश पारित करणारे, न्यायनिवाडा करणारे न्यायाधीश. यासंदर्भात याच सभागृहात मी दि. 29.3.2007 रोजी "राज्यात सर्व ठिकाणी मराठीची गळचेपी" होत असल्याचा विषय मांडला होता. या निमित्ताने मी याचीही आठवण करुन देऊ इच्छितो की, तामिळनाडूचे मुख्यमंत्री श्री. एम. करुणानिधी असताना त्यांनी भाषेचा स्वाभिमान म्हणून तामिळनाडूची भाषा ही तामिळी असल्यामुळे कोर्टाचे सर्व कामकाज या भाषेतूनच झाले पाहिजे अशा प्रकारचा घटनात्मक निदेश त्यांनी उच्च न्यायालयाला लेखी दिला होता. ज्याप्रमाणे तामिळनाडू राज्यात तामिळी, कर्नाटकमध्ये तेलुगु, बंगालमध्ये बंगाली, हिंदी भाषिक पट्टा म्हणजे हरियाना, उत्तर प्रदेश, बिहार वगैरे राज्यात हिंदी, जम्मू-काश्मीर राज्यात त्यांच्या त्यांच्या भाषांचाच वापर झाला पाहिजे.

तसेच इंटरेस्टेड लॅग्वेज काय असावी यासंदर्भात घटनेत भाषेची विभागणी करण्यात आली आहे. ती अशी की, कलम 348 मधील प्रकरण-3 मध्ये असे म्हटले आहे की, सदरचे न्यायालय, उच्च न्यायालय व त्याची भाषा यांच्या संदर्भात खंड (2), खंड-1 आणि उपखंड यात काहीही अंतर्भूत असले तरी "राज्याच्या राज्यपालांना राष्ट्रपतींच्या पूर्व संमतीने ज्यांचे मुख्य कार्यस्थान ज्या राज्यात असेल अशा उच्च न्यायालयात हिंदी भाषा किंवा त्या राज्यातील कोणत्याही शासकीय प्रयोजनाकरिता वापरली जाणारी अन्य कोणतीही भाषा असेल त्या भाषेचा वापर प्राधिकृत करता येईल." अशा उच्च न्यायालयाने दिलेला किंवा केलेला कुठलाही न्याय निर्णय, हुकूमनामा किंवा आदेश या खंडातील कोणत्याही गोष्टीस लागू असणार नाही. या कायद्यानुसार महाराष्ट्र राज्यात अनिवार्य अशी मराठी भाषा असून त्यासंदर्भात घटनेत निदेश दिलेले आहेत. सुरुवातीला त्यांनी कलम 148 मध्ये सर्वोच्च न्यायालय व प्रत्येक उच्च न्यायालयातील सर्व कार्यवाही इंग्रजी भाषेतून असेल ही गोष्ट लिहिली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांपैकी कोणत्याही सभागृहात अथवा विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहात प्रसिध्द करावयाची सर्व विधेयके किंवा त्या त्या बाबतीत मांडावयाच्या सुधारणा, यातच पुढे म्हटले आहे की, न्यायाधिकरणाची भाषा ही मराठी असली

.....2

श्री. दिवाकर रावते .........

पाहिजे आणि हा विषय मी वारंवार सभागृहात मांडत आहे, आजच मांडतो अशातला भाग नाही. पण काही वेळा त्याला धमकीची भाषा समजली जाते तर कधी टिंगल टवाळी सुध्दा केली जाते किंवा मराठीचा अतिरेकी आग्रह असेही म्हटले जाते परंतु जे सत्य आहे तेच मी मांडतो.

यानंतर श्री. जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सन 2007 साली राज्य शासनाने या बाबात मुख्य न्यायाधीशांना विचारले होते. त्यावर विधी खात्याने कशा प्रकारचा सल्ला दिला याचीही मला माहिती नाही. घटनेमध्ये प्रत्यक्ष तरतूद असतांना, काय करावे याबाबत स्पष्ट निर्देश असतांना मुख्य न्यायाधीशांना राज्य शासनाने विचारले तेव्हा मुख्य न्यायमूर्ती श्री. पळशीकर यांनी लेखी पत्राद्वारे शासनाला कळविलेले आहे. यासंदर्भातील पत्र माझ्याकडे आहे परंतु ते पूर्ण पत्र वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. या लेखी पत्रात थोडक्यात असे म्हटले आहे की, "राज्य घटनेने कोणत्याही प्रकारे मुख्य न्यायमूर्तीवर यासंदर्भातील जबाबदारी सोपविली नसून यासंदर्भात राज्य शासनाचा अधिकार असल्यामुळे राज्य शासनानेच निर्णय घ्यावयाचा आहे." घटनेच्या बाबतीत अपरिपक्वता विधी खाते सांगते तेव्हा विधी खात्याची पोहच काय आहे याचा विचार केला तर बरे होईल. त्यामुळे मंत्री महोदयांनी यासंदर्भात दखल घेण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते

सभापती महोदय, न्यायाधीश कसे असावे यासाठी काही नियम आहेत. सर्वसामान्य लोकांना न्याय देण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे असे वांरवार आदरणीय मंत्री महोदय सांगत असतात. मला अभिप्रेत झाले की, हे सरकार सर्वसामान्य माणसाला लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी हा कायदा करीत आहे. कोर्टामध्ये सर्वसामान्य माणूस गप्प बसलेला असतो व वकील लोक बोलत असतात. वकील हळूच बाहेर येऊन अशिलाला सांगातो की, "तुझ सर्व काम केले आहे." परंतु निकाल उलटा येतो तेव्हा माणसाला यामधील जाणीव होत असते. तरी सुध्दा वकील अशिलाला सांगतो "तुझे काम मी पटवून दिले आहे". यामुळे न्यायालयाची अप्रतिष्ठा होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची काल आपण जयंती साजरी केली आहे त्यामुळे यासंदर्भातील विचार आपण केलाच पाहिजे.

डॉ.बाबासाहेबांनी घटनेमध्ये याचा उल्लेख का केला असेल ? डॉ. बाबासाहेबांनी घटनेमध्ये म्हटले आहे की, "सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालये सोडून इतर न्यायालयामध्ये प्रांतिक भाषा असली पाहिजे". त्यामध्ये हिंदी भाषा असली तरी चालेल. संपर्क भाषा किंवा राज्य भाषा असली पाहिजे याबाबत डॉ. बाबासाहेबांनी घटनेमध्ये तरतूद केलेली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांची भाषा येणारे न्यायाधीश पाहिजे अशी तरतूद केलेली आहे व त्यासाठी सुस्पष्ट नियम



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आहेत ते मी वाचून दाखवितो. "एखादी भाषा लिहिता येते किंवा नाही याची पडताळणीसाठी त्या भाषेत एखादा लेख लिहून घेतल्यावाचून होत नाही. महाराष्ट्रातील कनिष्ठ न्यायालयात न्यायाधीश पदावर नेमणूक होणाऱ्या व्यक्तीला मराठी लिहिता येणे, मराठीचे इंग्रजी व इंग्रजीचे मराठीत अनुवाद करता येणे आवश्यक आहे. ही क्षमता तपासण्यासाठी लेखी परीक्षा आवश्यक आहे." अन्य राज्यातील कनिष्ठ न्यायालयामधील न्यायाधीशांची पदे भरण्यासाठी लेखी परीक्षेत त्या राज्याच्या राज्य भाषेतून परिच्छेद लिहिणे, राज्याच्या भाषेतील मजकुराचा इंग्रजीत अनुवाद करणे, इंगजी परिच्छेदाचा राज्यभाषेत परिच्छेद करणे अशी परीक्षा असते.

सभापती महोदय, कायद्यामध्ये वकील मंडळी पळवाट शोधत असतात. परंतु न्यायाधीशाच्या नेमणुकीसाठी पळवाट शोधणारे आपले राज्य हे एकमेव राज्य आहे. महाराष्ट्र कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांची पदे भरण्याच्या अर्हताबाबत विधी व न्याय विभागाने सन 2008 मध्ये अधिसूचना काढली होती. मला वाटते हे लोक मराठीचे द्वेष्टे आहेत. मला कधी कधी याबद्दल वाईट वाटते. विधी व न्याय विभागात उच्च विद्या विभूषित अधिकारी सुध्दा आहेत परंतु ते असे का वागतात ते काही समजत नाही. ते मराठीचा द्वेश का करतात ते समजत नाही. सन 2008 साली जी अधिसूचना काढली त्यामध्ये न्यायाधीश पदासाठी उमेदवारी अर्जासोबत मराठी भाषा लिहिता, बोलता व वाचता येते याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे पुरेसे आहे असे म्हटलेले आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

परीक्षेमध्ये लिहिता येते की नाही हे बघायची माझी इच्छा नाही. स्पोर्टस्साटी 25 मार्कस् ग्रेस असतात. त्या विद्यार्थ्यांला खेळ येत नसताना देखील तो प्रमाणपत्र आणतो. त्याला टेनिस येत नसते, बॅडमिंटन येत नसते तरी तो प्रमाणपत्र जोडतो. त्यामुळे त्याला 25 गुण ग्रेस मिळतात व परीक्षेत पास होतो. कबड्डी खेळत नसला तरी तो खेळतो असे दाखवून 10 गुण घेतो. तसे आपल्या विधी खात्याने केले आहे. त्यांनी सन 2008 मध्ये एक अधिनियम काढला. त्यात म्हटले आहे की, न्यायाधीश पदासाठी उमेदवाराला मराठी भाषा लिहिता, वाचता आणि बोलताही आली पाहिजे. याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे पुरेसे आहे. उमेदवार वकिली करीत असेल तर जिल्हा व सत्र न्यायालयाकडून आणि तो जर विधी स्नातक असेल तर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून प्रमाणपत्र, लेखी परीक्षेशिवाय घेता येते. म्हणजे परीक्षा न देता प्रमाणपत्र आणायचे. लेखी परीक्षेवाचून प्रशिक्षणार्थीला उत्तीर्ण करण्याचा हा नवा प्रकार संपूर्ण देशामध्ये फक्त महाराष्ट्रामध्ये विधी खात्याने निर्माण केला आहे. 15 वर्षाचा वास्तव्याचा दाखला कसा मिळतो हे आपणा सर्वांना माहिती आहे. आज तुम्ही या आणि वकिलांना भेटा आणि सह्या करा तुम्हाला 15 ते 20 मिनिटांमध्ये फार फार तर अर्धा-एक तासात 15 वर्षाचा वास्तव्याचा दाखला आणून देतात. त्या न्यायालयाने मराठी येते असे प्रशस्तिपत्र द्यायचे आणि त्याने ते स्वीकारायचे. किती मोठा चमत्कार. मराठीची किती अवहेलना, किती गळचेपी होते ते बघा. स्वर्गवासी झालेल्या कुसुमाग्रजांना काय वाटत असेल. तुम्ही आम्ही तर एकदम लहान आहोत. शासन दरबारी मराठी भाषा विवस्त्रावस्थेत आहे असे कुसुमाग्रज बोलले असताना आपण अजूनही मराठी भाषेची वस्त्रे उतरविण्याचे काम करीत आहात. प्रमाणपत्र येवो न येवो तू दाखला दाखव आणि हो न्यायाधीश. एवढी मराठीची अवहेलना.

देशात सगळी घटनात्मक व्यवस्था झाली आहे. संपूर्ण देशामध्ये घटनेप्रमाणे कामकाज चालते. पण महाराष्ट्रामध्येच मराठीचे मारेकरी का निर्माण होतात ? याचे उत्तर मला कोण देणार आहे. हा प्रश्न एकट्या दिवाकर रावतेचा नाही. हा प्रश्न सदनात बसलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचा आहे. आम्ही सर्व सन्माननीय सदस्य मराठीचा अभिमान बाळगणारे आहोत, असा माझा आपल्या प्रती ठाम, सन्मानपूर्वक आदर आहे. मराठीच्या बाबतीत माझी जी भावना आहे ती आपणा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सर्वांची देखील आहे. मी सर्वांच्या वतीने बोलतो. माझ्याकडून जे कमी पडते त्याबाबत इतर जण बोलतात. त्यामुळेच परिपूर्ण मराठी असली पाहिजे असा आग्रह या सदनामध्ये धरला जातो. माझ्यातली अपूर्णता इतर सन्माननीय सदस्य पूर्ण करतात. त्या दृष्टीने मी मराठीकडे पहात असतो. मलाच मराठी येते आणि मीच मांडतो असा माझा अविर्भाव नसतो. शेवटी माझी मराठी माय जगली पाहिजे. ती जगविण्याकरिता सर्वच लेकरांनी तिची सेवा केला पाहिजे. या भावनेतून आपण मराठी करिता बोलत असतो. त्यामुळे त्याकडे बघण्याची भावना ही असते. हे सर्व पाहिल्यानंतर आपल्याला आक्रोश करण्याशिवाय काहीच करता येत नाही.

आज माझ्या राज्यामध्ये न्यायव्यवस्थेमध्ये मराठीची अवहेलना का होत आहे ? हे मला कळत नाही. ह्या गरीब शेतकऱ्याला न्याय कसा मिळणार आहे. आमचे युती शासन आले होते. त्यावेळी काही तरी केले पाहिजे असे आम्हाला देखील वाटले. न्यायालयाचा कारभार मराठीत करणे सोपे काम नाही. दोन दिवसात होणारे ते काम नाही. हा लांबलचक चालणारा कायद्याच्या तरतुदीचा प्रवास आहे. तेव्हा राज्य मराठी विकास संस्थेने न्याय व्यवहार्य मराठी वापर या विषयावर डिसेंबर 1995 मध्ये तीन दिवसांची परिषद घेतली होती. यासाठी एक विधी आयोग नेमण्याची शिफारस केली. ती नाकारून शासनाने न्यायालयात मराठी भाषा असावी म्हणून विधी अनुवाद परिभाषा सल्लागार समितीची पुनर्रचना केली व तिची कार्यकक्षा विस्तृत केली. न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी हे त्या समितीचे अध्यक्ष होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे केंद्रीय व राज्यातील अनेक अधिनियमांचे मराठी अनुवादाचे बरेच काम पूर्ण झाले. स्वतंत्र कार्यालय, कर्मचारी व सक्षमता प्रदान न केल्यामुळे परवा न्या.चपळगावकरांनी राजीनामा दिला. आपण तो बघितला.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

या सभागृहामध्ये महत्वाचे विषय असतात त्यावेळी मराठी भाषेला राजभाषेचा सन्मान मिळण्यासाठी या ठिकाणी उभा राहिल्यानंतर "याचे पुन्हा सुरु झाले बाबा" असे म्हणून मिष्कील हास्य केले जाते. पहिल्यांदा मराठीला मान द्या नंतर बाकीचे करा असे आपल्याला वाटत नाही. आपणा सर्वांचा सन्मान ठेवून मी बोलत आहे, परंतु आपल्याला तसे वाटले नाही. न्यायमूर्ती श्री. चपळगावकर यांनी राजीनामा दिला. मागील अधिवेशन गेले तसे हे देखील अधिवेशन गेले त्यांच्या राजीनाम्यावर अजून भाष्य करण्यात आले नाही. फक्त 15 कोटी दिल्यानंतर टेबल वाजविले जाते व आनंदाने बोलले जाते हे मी ऐकले आहे. त्यानंतर इतकी भयानक बानवा झाली की, दोन्ही एकत्र असलेली मंडळे वेगळी केली गेली, त्यांची कार्यकक्षा वेगळी केली गेली. त्यामुळे त्या कमिटीकडे सोपविण्यात आलेले काम आजतागायत पूर्ण होऊ शकले नाही. अशाप्रकारे न्याय व्यवस्थेमध्ये मराठी आणण्याकरिता आपल्याला काहीही करता आले नाही. अन्य राज्यांमध्ये विधी अभ्यासक्रमामध्ये इंग्रजीसोबत प्रादेशिक भाषा देखील समाविष्ट असते.

मी काल या बाबत सभागृहात विषय उपस्थित केला. काही माननीय सदस्य म्हणाले की, यामुळे इंग्रजी भाषा कशी पुढे जाईल? दहावी मराठीमध्ये झालो, बारावी मराठीमध्ये झालो आणि वकील सुध्दा मराठीमध्ये झाल्यानंतर मराठीतून वकिली केली. माझ्या मातृभाषेमध्ये मी वकील झालो तर जास्त चांगला वकील होईन. समोरच्याला जेव्हा ती भाषा समजेल तेव्हा तो वकिलाला सांगेल की, "साहेब हा मुद्दा हवा होता." आज कोर्टात तो फाड फाड इंग्रजीत काय बोलतो हे त्याला कळत नाही आणि त्याने मांडलेले याला कळत नाही. त्याला वाटते की, माझा वकील कसा भांडला? ते गाऊन घातलेले वकील तंगडे असे फिरवितात, गाऊन फिरवितात की समोरच्याला वाटते काय वकील आहे? त्याच्याकडून 1 लाख रुपये फी घेतली आहे. मी वकिलांच्या विरोधात बोलत नाही. त्या ठिकाणी जे काही चालते त्यामधून जे अज्ञान निर्माण होत आहे त्याबद्दल मी बोलत आहे हे आपण लक्षात घ्यावे. मी वकिलांच्या ज्ञानाबद्दल अजिबात बोलत नाही. परंतु त्यामधून जे काही अज्ञान निर्माण होत आहे, ज्यांच्याकरिता ते लढत आहेत ते अज्ञानी असल्यामुळे मी मराठीची मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्यावेळी बाबूजींनी "हे आम्ही करु" असे सांगितल्यानंतर मी त्यांना धन्यवाद दिले. आम्ही हे लोकांपर्यन्त पोहोचवू, सक्षमपणे पोहोचवू. यापुढे आपल्याला विज्ञानाचे विषय मराठीमध्ये लिहिता येतील यासाठी बाबूजी आपण प्रयत्न करावेत. ज्याप्रमाणे आपण कॉपीचे प्रकार थांबविण्यासाठी कार्यवाही केली. हा विषय गंमतीचा नसल्यामुळे मी सकाळी आपले कौतुक केले. या महाराष्ट्रामध्ये कॉपीचे प्रकार थांबविण्याबाबत एकाही शिक्षण मंत्र्यांना न जमलेले काम आपण केले. या कॉपी प्रकारांवर आपण निर्बंध आणण्याचे काम केले त्याबद्दल तुम्हाला संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सन्मान मिळाला आहे. कॉपीमुक्त पास होणारे विद्यार्थी आपण निर्माण केलेत तर महाराष्ट्राची शैक्षणिक पत नक्कीच वाढलेली असेल, नव्हे ती मोठी झालेली असेल.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी घेतलेल्या दुसऱ्या निर्णयाबाबत मी मघाशी बोललो होतो. खोटे विद्यार्थी दाखवून सरकारला लुटणाऱ्या संस्थांना पायबंद घालणारा सुध्दा आपला क्रांतीकारी निर्णय होता. ज्याप्रमाणे इयत्ता दहावी आणि अकरावीला घेता येतो त्याच प्रकारे बारावीला सुध्दा विज्ञान विषय हा मराठीमध्ये घेता येतो अशाप्रकारचा निर्णय आपण करावा. यामुळे आपल्याला नक्कीच फरक पडलेला दिसेल. मला खात्री आहे की, बाबूजी आपण बोललात म्हणजे नक्कीच करणार. आपण समोर बसला आहात म्हणून मी त्याची आठवण करुन दिली.

सभापती महोदय, अन्य राज्यांमध्ये प्रादेशिक भाषांसोबत इंग्रजी भाषा देखील विधी अभ्यासक्रमामध्ये एक माध्यम म्हणून स्वीकारली आहे. महाराष्ट्रामध्ये विधी अभ्यासक्रमामध्ये इंग्रजी सोबत मराठी भाषा एक माध्यम म्हणून उपलब्ध करुन देणे, भाषिक आधारावरील राज्य घटनेच्या धोरणानुसार आवश्यक आहे. It is mandatory, not optional आपल्याला मराठी समजावे म्हणून मी बोललो. 21 जुलै 1998 पासून मराठी भाषा ही कनिष्ठ न्यायालयाची कामकाजाची भाषा झाली. त्याकरिता युती सरकारने निर्णय घेतला हे मी आपल्याला मुद्दाम सांगतो. याचे कारण "तुमच्या काळात तुम्ही काय केले?" असे आम्हाला विचारु नका. युती शासनाच्या काळात मराठी भाषेला राजमान्यता दिली गेली आहे हे या सभागृहाला माहीत आहे. सर्वच मुख्यमंत्र्यांनी तो प्रस्ताव पुढे ढकलत ढकलत नेला, आमचे माननीय श्री. मनोहर जोशी हे मुख्यमंत्रीपदी आले त्यावेळी अधिकाऱ्यांनी त्यांच्यापुढे ती फाईल नेली व म्हणाले की, आपण एक वर्षाकरिता हा निर्णय पुढे ढकलू या. त्यांनी ती फाईल स्वत:कडे ठेवून घेतली. त्यांनी आयुष्यभर मराठीची प्राध्यापकी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते ....

केल्यामुळे त्या फाईलमध्ये लक्ष घातले आणि त्यांनी जुलैमध्ये निर्णय दिल्यानंतर 15 ऑगस्ट 1995 पासून मराठी या राज्याची अधिकृत राजभाषा झाली. ही या ठिकाणी स्वाभिमानाने सांगण्यासारखी बाब नाही, ही पाळी आमच्यावर यायला नको होती.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

युती शासनावर ही वेळ यावयास नको होती. तो नाकर्तेपणाचा पुरावा होता.

सभापती महोदय, दिनांक 21 जुलै 1998 रोजी मराठी भाषा ही कनिष्ठ न्यायालयाच्या कामकाजाची भाषा झाली. याबाबतीत आदेश देण्यात आले तरीही मराठी भाषेच्या विकासाकडे दुर्लक्ष करण्याच्या शासनाच्या अलिखित धोरणानुसार मराठी भाषेला विधी अभ्यासक्रमामध्ये स्थान मिळालेले नाही. कारण न्यायालयामध्ये टंकलेखक मिळत नाहीत, स्टाफ मिळत नाही अशा प्रकारचे भाष्य केले जाते. परंतु तेथे त्यादृष्टीने सोयी-सुविधा होत नाहीत. अशा प्रकारे जर आपल्याकडे मराठी भाषेची अवहेलना सतत आणि सातत्याने होतच राहिली तर माननीय सभापती महोदय,आपण मला सांगावे की, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी एवढ्या आपुलकीने विधेयक आणले आहे त्याला काय अर्थ आहे? आपण याबाबतीत झगडलात, केंद्र सरकार पर्यंत देखील गेलात आणि एवढे सगळे केल्यानंतर सुध्दा सामान्य माणसाला हे जमत नसेल तर कसे करावयाचे हा प्रश्न निर्माण होतो. या चर्चेच्या निमित्ताने आम्ही या बाबी येथे का मांडत आहोत हे लक्षात घ्यावे.

सभापती महोदय, मी मघाशी माननीय कै.करुणानिधी यांचा उल्लेख केला.आता ते आपल्या मध्ये नाहीत.पण माझ्या राज्यामध्ये उच्च न्यायालयातील भाषा तामिळच असली पाहिजे असा आग्रह त्यांनी धरला. त्यावेळी केंद्रीय विधी विभागाचे मंत्री श्री.हंसराज होते आणि कै.करुणानिधी हे त्या वयामध्ये देखील त्यांच्याकडे जाऊन बसले म्हणजे हा केवढा भाषेचा अभिमान आहे? त्यांना चालता येत नसल्याने ते खूर्चीमध्ये बसूनच जातात. ते मुख्यमंत्री झाल्यानंतर दिल्लीला गेले आणि केंद्रीय विधी विभागाच्या मंत्री महोदयांसमोर जाऊन बसले. घटनेच्या बाहेर जाऊन कोणालाही काम करता येत नाही.तसेच घटनेच्या अंतर्गत असलेले काम करणे हे राज्य शासनाचे कर्तव्य आहे, विधीमंडळाचे ते काम आहे. म्हणून मी याठिकाणी जे सगळे प्रश्न उपस्थित केलेले आहेत ते विधीमंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला कळले पाहिजेत. मग सावकारी कायद्याचे काय झ ाले,न्यायालयामध्ये मराठी भाषेच्या वापरासंबंधातील प्रक्रिया आपण कधी पूर्ण करणार आहोत ते कळले पाहिजे आणि आता माझ्या महाराष्ट्रातील सामान्य जनतेला समजले पाहिजे की, सर्व प्रकरणे खालच्या न्यायालयामध्ये मोठ्या प्रमाणात जाणार आहेत, त्यावेळी माझा वकील मराठीमधून भांडत आहे आणि मला ते सगळे समजत आहे असे जे याबाबतीत सुंदर स्वप्न आहे ते आम्हाला प्रत्यक्षात कधी पहावयास मिळणार आहे असे मी विचारु इच्छितो.

सभापती महोदय,या ठिकाणी शासनाने चांगले विधेयक आणले आहे. त्यामुळे या विधेयका-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

बद्दल काही प्रश्न नाही. ते अमान्य करण्याचा प्रश्नच येत नाही. पण यातून निर्माण होणारे काही प्रश्न आहेत. शेवटी न्यायालयाची भाषा मराठी व्हावी यासाठी सतत आणि सातत्याने या सदनामध्ये मी आणि माझे सहकारी विषय मांडत असतो, शासनाला सांगत असतो, सुचवित असतो, बोलत असतो. याठिकाणी बॉम्बे हाय कोर्टाचे नाव उच्च न्यायालय करावे यासाठी मी सदनामध्ये तीन वेळा ठराव आणले होते.त्यावेळी सरकारने सांगितले की, आम्ही याबाबतीत ठराव करुन केंद्र शासनाकडे पाठवितो.परंतु मला एक गोष्ट कळत नाही की, केंद्र सरकारमध्ये अनेक माननीय मंत्री महोदय आहेत, ते काय करतात? सामना वर्तमान पत्रात बातमी होती. राज्य सभेमध्ये खासदारांनी प्रश्न विचारला होता की, बॉम्बे हाय कोर्टाचे "मुंबई उच्च न्यायालय" असे नाव कधी करण्यात येणार आहे. त्याबाबत सदरहू बदलाची सूची दिल्ली दरबारी पोहोचली असून बदल लवकरच होणार असल्याचे सुतोवाच माहिती व केंद्रीय कायदा मंत्री श्री.सलमान खुर्शीद यांनी सोमवारी राज्यसभे- मध्ये केलेले आहे. त्यांनी असे म्हटलेले आहे की,"बॉम्बे हायकोर्ट, मद्रास हायकोर्ट, चेन्नई हाय कोर्ट व कलकत्ता हायकोर्ट" ही चार नावे बदलावयाची आहेत." पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही नावे बदलण्याकरता त्या-त्या राज्यांनी पावले उचलली आणि त्या-त्या राज्यांमध्ये नावांचा बदल करुन 10 ते 15 वर्षे झ ाली आहेत. केंद्र शासनाला याबाबत निर्णय घेताना घटना दुरुस्ती करावी लागणार आहे हे मान्य आहे. पण त्यासाठी किती आणि का वेळ लागत आहे हे कळत नाही. त्यामुळे ते होणे अत्यंत आवश्यक असून शासनाने याबाबत पाठपुरावा करावा.

सभापती महोदय, ज्यावेळेला आमचे सन्माननीय पंतप्रधान महोदय, राज्याच्या प्रश्नांबाबत विविध राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठका घेतात तेव्हा तेथे कनार्टकमधील प्रश्न, इतर राज्यातील प्रश्न मांडले जातात काय? तशा प्रकारे इतर राज्यातील प्रश्न मांडले जात असतील तर आनंद आहे.कारण मला यातील माहिती नसल्याने मी अधिक भाष्य करु शकत नाही. पण जर इतर राज्यातील प्रश्न मांडले जात असतील तर माननीय मुख्यमंत्र्यांची ती राज्याच्या जाणीवांबद्दलची अपूर्तता आहे असे म्हणावे लागेल, मी त्याला अज्ञान असे म्हणणार नाही. मग अशा प्रकारे जर होत असेल तर त्यांना याबाबतीत माहिती करुन देणे हे त्यांच्या भोवती असलेल्या सर्व अधिकाऱ्यांचे काम आहे. परंतु अधिकारी जर सक्षमतेने काम करीत नसतील तर त्यांना माझ्या या मायबोलीचा, माझ या राज्यभाषेचा, मराठीचा अभिमान नसावा अशी मी शंका व्यक्त करु शकतो काय ? असा मला नेहमीच प्रश्न पडतो. बॉम्बे हाय कोर्टाचे नामकरण करणे हा न्यायालयीन विषय आहे. म्हणून मी

श्री.दिवाकर रावते . . . .

अत्यंत नम्रपणे माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जर आपण हे लवकरात लवकर केले तर फार बरे होईल. तसेच यापुढे संपूर्ण देशामध्ये न्यायाधीशांच्या परीक्षा ज्या पध्दतीने आखून दिलेल्या आहेत, त्यापध्दतीने जर आपल्या राज्यामध्ये परीक्षा झाल्या तर महाराष्ट्रामध्ये आपल्याला मराठीमध्ये उत्कृष्ट न्याय देणारे न्यायाधीश मिळू शकतील.

-----

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुध्दारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या ठिकाणी सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 8- मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्यासाठी जे विधेयक आणलेले आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. या विधेयकाच्या उद्देश व कारणाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, उच्च न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या सुमारे 40,000 दिवाणी दाव्यांपैकी 35,000 पेक्षा अधिक दिवाणी दावे उच्च न्यायालयाकडून शहर दिवाणी न्यायालयाकडे वर्ग करण्यात येतील. हे 40 हजार दावे फक्त बृहन्मुंबईमधील आहेत की महाराष्ट्रातील आहेत ? जर बृहन्मुंबईचे 40 हजार दावे प्रलंबित असतील तर संपूर्ण महाराष्ट्रातील किती दावे प्रलंबित आहेत ? "Justice delayed is justice denied." "Delayed justice is no justice." आपण चांगले विधेयक आणलेले आहे आणि या विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. या 40 हजार दाव्यांपैकी 35 हजार दावे आपण नव्या न्यायालयाकडे वर्ग करणार आहात. या 35 हजार प्रकरणांचा निकाल नव्या न्यायालयामध्ये किती वर्षात लागेल ? पृष्ठ क्रमांक 9 वर असा उल्लेख केला आहे की, राज्य शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेव्दारे, बृहन्मुंबईसाठी मुंबई शहर दिवाणी न्यायालय या नावाचे एक न्यायालय स्थापन करता येईल. आपण एक न्यायालय स्थापन करणार आहात. 40 हजार दाव्यांपैकी 35 हजार दावे त्या न्यायालयाकडे वर्ग करणार आहात. हे 35 हजार दावे किती वर्षात पूर्ण होणार याची माहिती शासनाला नाही किंवा त्या संदर्भात नियोजन केलेले नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष पृष्ठ क्रमांक 8 वरील वित्तीय ज्ञापनाकडे वेधू इच्छितो. आपण नवीन न्यायालय निर्माण करीत आहात परंतु त्याला निधी उपलब्ध करुन देत नाही. वित्तीय ज्ञापनामध्ये असे म्हटले आहे की, हे विधेयक राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, त्यात राज्याच्या एकत्रित निधीतून कोणत्याही आवर्ती खर्चाची किंवा अनावर्ती खर्चाची तरतूद अंतर्भूत असणार नाही. आपण न्यायालय निर्माण करणार पण त्याला कॅपिटल एक्स्पेंडिचर किंवा रेव्हेन्यू एक्स्पेंडिचर यासाठी तरतूद नाही असे वित्तीय ज्ञापनामध्ये म्हटले आहे. मग हे न्यायालय कसे चालणार ? म्हणजे सध्या जे न्यायाधीश आहेत तेच

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

त्या ठिकाणी वर्ग करणार. त्यांचे कर्मचारी त्या ठिकाणी वर्ग करणार. मग याला गती कशी येईल ? जोपर्यंत आपण न्यायाधीशांची संख्या वाढवित नाही तोपर्यंत या कामाला गती येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, आपण वित्तीय ज्ञापनातील शेवटच्या दोन ओळी वाचाव्यात. त्यामध्ये असे म्हटले आहे की, एकत्रित निधीतून यासाठी पैसे काढता येणार नाहीत. आपण फक्त उच्च न्यायालयामधील न्यायाधीश या नवीन न्यायालयात आणणार. शासनाने याचे नियोजन केले पाहिजे की, हे जे 35 हजार प्रलंबित खटले आहेत त्या संदर्भातील निर्णय दोन तीन वर्षात दिला जाईल. या दृष्टीकोनातून राज्य शासनाने त्याचा पाठपुरावा केला पाहिजे.

सभापती महोदय, आपण हा कायदा 1948 मध्ये आणला. ज्यावेळी हा कायदा आला त्यावेळी त्याची द्रव्य विषयक अधिकारिता फक्त 10 हजार रुपये होती. त्यानंतर 1977 मध्ये आपण त्यात सुधारणा करुन ती मर्यादा 50 हजार रुपये केली. आता 50 हजार रुपयांवरुन 1 कोटी रुपये मर्यादा करीत आहोत. माझा त्याला विरोध नाही. आपण ही मर्यादा 1 कोटी रुपयांपर्यंत आणली ही चांगली बाब आहे पण 1986 मध्ये याला उच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले होते. पण उच्च न्यायालयाने आपल्या विधिग्राह्यतेस पुष्टी दिल्यामुळे आता हा नवीन कायदा होत आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, नवीन न्यायालय स्थापन करीत असताना पायाभूत विकास सुविधा असल्याचे शपथपत्र दाखल करावे. आपण इकडे शपथपत्र दाखल करणार की, आमच्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर आहे, आमच्याकडे पायाभूत सुविधा आहे. पायाभूत सुविधा आहेत पण आम्ही खर्च करणार नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ...

मला वाटते शासनाने याचा विचार केला पाहिजे. यासाठी लागणारा निधी, मग तो कॅपिटल एक्स्पेण्डिचर असेल अथवा रेव्हेन्यू एक्सपेण्डिचर असेल, तो कोठून उभा करणार ? तेव्हा त्याबाबतीत लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

खंड 3 (ग)मध्ये असे म्हटलेले आहे की, मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, 1948 याच्या कलम 3 च्या विद्यमान परंतुकाऐवजी नवीन परंतुक दाखल करणा-या या खंडान्वये, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी शहर दिवाणी न्यायालयाची द्रव्यविषयक अधिकारिता वाढविण्याचा आणि उच्च न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेत तद्नुरुप फेरफार करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे. परंतु नियम करण्याचे अधिकार हे उच्च न्यायालयाला आहेत. आपण विधानसभेमध्ये आणि विधानपरिषदेमध्ये कायदे पास करतो. आपल्याकडे उपविधान समिती नियम करते. म्हणजे आपल्याला नियम करण्याचेही अधिकार दिलेले आहेत. उच्च न्यायालयाने नवीन न्यायालय सुरु करण्याचे अधिकार आपणाला देत असताना नियम करण्याचे अधिकार मात्र स्वत:कडे ठेवलेले आहेत. या संदर्भात काही कारणमिमांसा असेल तर त्याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

विधेयकामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "राज्य शासनास, वेळोवेळी, उच्च न्यायालयासी विचारविनिमय करुन तशाच अधिसूचनेद्वारे, मृत्यूपत्रविषयक किंवा अकृतमृत्यूपत्रविषयक अधिकारिता असलेले न्यायालय म्हणून उच्च न्यायालयास किंवा नादार ऋणकोच्या ऋणनिवारणासाठी उच्च न्यायालयास ज्या कोणत्याही दाव्याची किंवा कार्यवाह्यांची दखल घेण्याचा अधिकार असेल, ते दावे व त्या कार्यवाह्या शहर न्यायालयाच्या अधिकारितेच्या कक्षेत आणता येतील." आपण ही व्याप्ती वाढवित आहोत. या न्यायालयाकडे 35 हजार केसेस देत आहोत आणि उच्च न्यायालयाकडे फक्त 5 हजार केसेस देणार आहोत. उच्च न्यायालयाकडे 5 हजार केसेस असतील आणि त्यांच्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर देखील तेवढेच आहे. 35 हजार केसेससाठी कशा त-हेचे इन्फ्रास्ट्रक्चर राहाणार आहे यासंबंधीची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी.

कलम 3 (क) मध्ये फेरफार केलेला आहे. "एक कोटी रुपयांहून अधिक नसतील अशा मूल्याचे" असा मजकूर समाविष्ट करण्यात आलेला आहे.यामध्ये बदल करा असे मी म्हणत नाही.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ...

कलम 3(क) मध्ये "पारसी विवाह व घटस्फोट अधिनियम, 1936 अन्वये उच्च न्यायालयास, किंवा" असे म्हटलेले आहे. आता पारसी समाजाची लोकसंख्या किती आहे आणि त्यांचे दावे चालविण्यासाठी किती पारसी शिल्लक आहेत हाही प्रश्न आहे. तेव्हा ही तरतूद का करावी लागली ? पारसी समाजाचाच येथे उल्लेख का करण्यात आला, इतर समाजाचा उल्लेख का करण्यात आला  नाही ? या न्यायालयाला विवाह विषयक अधिकार दिले जाणार असतील तर ते एकाच समाजाच्या बाबतीत का दिले जात आहेत, या बाबतीत कायदा करीत असताना काय विचार होता यासंबंधी सभागृहाला खुलासा होणे आवश्यक आहे.

कलम 7 (1) मध्ये असे म्हटलेले आहे की, "या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक वाटतील अशा, परंतु या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे करता येतील."आपण करीत असलेला कायदा हा परिपूर्ण असावा यासंबंधीची ही तरतूद आहे. पुढे असे म्हटलेले आहे की, "परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही." कायदा केल्यानंतर किमान तीन-चार वर्षे त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता भासणार नाही असा कायदा असला पाहिजे. आता आपण दोन वर्षाची मुदत दिलेली आहे. ही मुदत समाप्त झाल्यानंतर पुन्हा अशा प्रकारची 4 वर्षाची सुधारणा येईल काय अशी शंका घ्यायला वाव आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 16:20

श्री.अरुण गुजराथी...

अशी शंका या तरतुदीमुळे निर्माण झालेली आहे. हा अतिशय चांगला कायदा आहे.

महोदय, माझी शासनास अशी विनंती आहे की, महाराष्ट्रात किती दावे पेंडींग आहेत याची माहिती माननीय मंत्री महोदयांना सांगता आली तर ती सांगावी. आपण अभ्यासू मंत्री आहात, आपण अधिकारवाणीने बोलता, सभागृहात विचारलेल्या प्रश्नांना चांगल्या पध्दतीने उत्तरे देता. 40 हजार प्रकरणे मुंबईत प्रलंबित असतील तर उर्वरित महाराष्ट्रात किती प्रकरणे प्रलंबित आहेत ? येत्या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये एकही केस पेंडींग राहणार नाही, एकही खटला चालविला गेला नाही असे होणार नाही, या पध्दतीचे नियोजन करण्याची आज आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील कोर्टातच केसेस पेंडींग आहेत अशातला भाग नाही. संपूर्ण देशातील वेगवेगळया राज्यात अशीच परिस्थिती आहे. पण यात आदर्श निर्माण करण्याची आपल्याला निश्चितपणे संधी मिळणार आहे. कलकत्ता कोर्टाने द्रव्याची सीमा 10 लाखापर्यंत दिली.

महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, बॉम्बेचे मुंबई नामांतर पूर्णपणे झालेले नाही. मद्रासचे देखील चेन्नई असे नामांतर झालेले नाही. अजूनही तेथे मद्रास असाच उल्लेख केला जात आहे. तेथे 25 लाखाची मर्यादा आहे. आपण त्यापुढे जाऊन 1 कोटीची मर्यादा दिली आहे. शासनाने हा अतिशय चांगल्या पध्दतीने निर्णय घेतलेला आहे. हा कायदा आणत असताना अजून काही बाबी समाविष्ठ करता येतील काय याचा विचार केला पाहिजे. ज्याला आपण पीकमील अमेंडमेंट म्हणतो, पीकमील अमेंडमेंट करण्यापेक्षा इंटिग्रेटेड अमेंडमेंट केली पाहिजे. याच्यात आता कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही असा एक चांगल्या पध्दतीचा व संपूर्ण बाबींचा स्पष्टपणे उल्लेख असलेला कायदा तयार करावा अशी सुधारणा मी सुचवित आहे. आपण या कायद्यात जी सुधारणा आणलेली आहे, ती सुधारणा अजून जास्त व्यापक करण्याची आवश्यकता आहे. बृहन्मुंबईसाठी वेगळे न्यायालय करीत असताना उर्वरित महाराष्ट्रासाठी नवीन दिवाणी न्यायालय निर्माण करण्याचा विचार करावा. घटस्फोटासाठी एक वेगळेच कोर्ट निर्माण करावे म्हणजे अशा प्रकरणांसाठी इतर कोर्टाचा वेळ जाणार नाही.

महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते या ठिकाणी बसलेले आहेत. लोकसत्ता वृत्तपत्रात गेल्या तीन वर्षाच्या कालावधीत घटस्फोटांची संख्या किती वाढली याची माहिती छापण्यात आली होती.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी...

घटस्फोटाच्या प्रकरणासाठी जिल्हावार कोर्ट निर्माण केले तर इतर कोर्टांना अडचण येणार नाही. देशात सर्वात जास्त घटस्फोट पंजाब येथे होतात. महाराष्ट्रात जितके घटस्फोट होतात, त्यातील 50 टक्के घटस्फोट हे मुंबई, पुणे आणि नाशिक या शहरांमध्ये होतात असे लेखामध्ये नमूद केले होते. घटस्फोट आणि लग्नाच्या संदर्भात वेगळी न्यायालये निर्माण करण्याचा प्रयत्न करता आला तर त्या दृष्टीकोनातून शासनाने विचार करावा. सध्या फॅमिली कोर्ट आहे, त्यात काही सुधारणा करता आल्या तर त्या सुधारणा शासनाने कराव्यात. या विधेयकाला पाठिंबा देऊन मी माझे मनोगत पूर्ण करतो.

------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: केंद्र शासनाच्या महासंचालक रोजगार व प्रशिक्षण बेरोजगारासाठी सुरु केलेली ए.ई.सी.आदर्श रोजगार योजना बंद पडण्याच्या मार्गावर असल्याबाबत प्रा.सुरेश नवले, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

प्रा.सुरेश नवले ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

केंद्र शासनाच्या महासंचालक रोजगार व प्रशिक्षण यांच्या ए.ई.सी.आदर्श रोजगार योजना ही दोन वर्षापूर्वी सुरु करण्यात येऊन त्या अंतर्गत प्रत्येक राज्याच्या मार्फत शासकीय व खाजगी संस्थेमार्फत बेरोजगारांना व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यासाठी नोंदणी करण्यात येते, या योजनांतर्गत बेकारांना व्यवसाय प्रशिक्षण मोफत देण्यात येणार असून यासाठी प्रवेशावेळी बेकारांकडून परीक्षा व प्रवेश शुल्क घेऊन अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्यानंतर ते संबंधिताना परत करण्यात येणार होते. मागील दीड वर्षात लाखो विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्क देण्यात न आल्याने प्रशिक्षणार्थ्यांच्या परीक्षा शुल्काचा परतावा देण्यात न येणे, त्यामुळे अनेक संस्था बंद पडण्याच्या मार्गावर असणे, अधिकाऱ्याच्या दिरंगाईमुळे प्रशिक्षण शुल्काचा परतावा न मिळाल्याने शासनाची समाजोपयोगी योजना बंद पडण्याच्या मार्गावर असल्याने या योजनेतील त्रुटी दूर करुन संस्थांची प्रशिक्षण शुल्क मिळण्यासाठी करावयाची तातडीची कार्यवाही. धन्यवाद.

-----------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.गिते... 16:25

**पृ.शी.**: मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयक

**मु.शी.**:

L.A. BILL NO. VIII OF 2012

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY CITY CIVIL COURT ACT, 1948.)

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, वि.स.वि.क्र.8, मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, एका बाजूला न्याय लवकर मिळावा यासाठी उच्च न्यायालयातील खटले कमी व्हावेत आणि दिवाणी न्यायालयात ते वर्ग केले जावेत अशी रचना करीत आहोत तर दुसऱ्या बाजूला न्याय मिळत असताना तो सोपा व्हावा, न्यायालयातील कामकाज मराठी भाषेतून चालावे आणि ते अधिक गतीमान व्हावे या दृष्टीने सुध्दा विचार करण्याची गरज आहे. न्यायालयीन प्रक्रियेच्या संदर्भात मला काही मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत. तीन वर्षापूर्वी कोल्हापूर शहरात रस्ता रुंदीकरणाच्या प्रकल्पासाठी तपोवन नावाच्या झोपडपट्टीच्या निष्कासनाचा विषय पुढे आला त्यावेळी त्या भागातील लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन रस्ता रुंदीकरणाची आवश्यकता आहे म्हणून त्या झोपडपट्टीतील लोकांना आवाहन केले आणि महापालिका तुम्हाला पर्यायी जागा देईल असे सांगितले. त्यामुळे तीन वर्षे सातत्याने कोणी ना कोणी त्यांना दिलेल्या पर्यायी जागेच्या संदर्भात उच्च न्यायालयात दाद मागण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांना दिलेल्या पर्यायी जागेच्या संदर्भात न्यायालयाकडून स्थगिती दिली जाते. गेली तीन वर्षे रस्ता रुंदीकरणाच्या आवश्यकतेपोटी आवाहन केल्यामुळे ज्यांनी आपले राहती घरे रिक्त केली त्यांना पर्यायी घर मिळालेले नाही. उच्च न्यायालयात प्रकरण गेल्यानंतर सुनावणीसाठी आतापर्यंत 20 वेळा तारखा देण्यात आल्या. प्रत्येक सुनावणीच्या दिवशी हे प्रकरण यादीमध्ये सगळ्यात शेवटी दर्शविलेले असते. दिवसभरात 30 ते 32 प्रकरणांची सुनावणी झाल्यानंतर कोर्टाचे दिवसाभराचे कामकाज संपते व पुढील सुनावणीची तारीख देण्यात येते. पहिल्या सुनावणीच्या तारखेला यादीमध्ये 117 वा क्रमांक असताना 30

..2..

SGB/ पूर्वी श्री.गिते... 16:25

श्री.चंद्रकांत पाटील.......

प्रकरणाची सुनावणी झाल्यानंतर पुढील सुनावणीच्या दिवशी या केसचा क्रमांक 187 वा कसा येतो? असाच प्रकार सुरु राहिला तर 20 नव्हे तर 200 तारखा पडल्यातरी ही केस निर्णयाअभावी प्रलंबित राहणार आहे. न्यायालयात ज्यावेळी एखादी केस चालते त्यावेळी ती लवकर निकाली निघावी यासाठी यंत्रणा उभी केली आहे.

उच्च न्यायालयाचे अधिकार दिवाणी न्यायालयाकडे शिफ्ट केल्यामुळे काही प्रमाणात खटले कमी होतील. परंतु न्याय देण्याची प्रक्रिया बदलली नाही किंवा न्याय देण्यासाठी केस दाखल केल्यानंतर पुढील तपास करणे, चार्जशीट सादर करणे यासाठी जो वेळ लागतो त्याची मर्यादा निश्चित केली पाहिजे. चार्जशीट सादर करायला सात ते आठ महिन्यांचा वेळ लागतो. एका प्रकरणात पाच वर्षापूर्वी विजेच्या भारनियमनाच्या विरोधात भारतीय जनता पक्षाने कोल्हापूरमध्ये मोर्चा काढला होता. त्या मोर्चाच्या संदर्भात ज्या केसेस दाखल झाल्या त्याबाबतचे चार्जशीट पाच वर्षानंतर सादर झाले. त्यात शोध घेण्याचा विषय नव्हता. परंतु चार्जशीट सादर न झाल्यामुळे न्यायालयात तारखा पडत राहिल्या. एका बाजूला उच्च न्यायालयाचा भार कमी करावा, आपापल्या गावामध्ये लोकांना न्याय मिळावा यासाठी आपण कायद्यात बदल करीत आहात. दिवाणी न्यायालयाला अधिक अधिकार देत आहात. परंतु आज वेळेवर न्याय मिळत नाही याचा देखील विचार झाला पाहिजे. किती दिवसात चार्जशीट सादर झाले पाहिजे, एकदा केस सुनावणीसाठी आल्यानंतर तिचा क्रमांक पुढच्या सुनावणीच्या वेळी कंटिन्यू झाला पाहिजे. आज 11 व्या क्रमांकावर सुनावणी असेल तर पुढील दिवशी 10 व्या क्रमांकावर असावयास पाहिजे, तो क्रमांक 127 वा असता कामा नये.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केल्याप्रमाणे मराठी भाषेतून न्यायालयाचे कामकाज चालले पाहिजे. न्याय सोपा व लवकर मिळेल या दृष्टीने विचार झाला पाहिजे. दिवाणी न्यायालयांची क्षमता वाढवित असताना 1 कोटी रुपयांपर्यंतच्या खटल्याचे अधिकार दिले जात आहेत. त्याच धर्तीवर कोल्हापूर, सातारा, सांगली भागातील लोकांना उच्च न्यायालयात दाद मागायची असेल तर मुंबईला यावे लागते. गेली 20-22 वर्षे आंदोलनाच्या माध्यमातून हा विषय चर्चेला येत आहे. उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे झाले पाहिजे अशी मागणी केली जात आहे. शेजारच्या अनेक राज्यात त्यांच्या त्यांच्या उच्च न्यायालयांनी खंडपीठ लगेच निर्माण केली. महाराष्ट्राची इच्छाशक्ती कमी पडत आहे.

नंतर श्री.जुन्नरे...

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ....

सुप्रीम कोर्टात पाठपुरावा करण्यासाठी आपण कमी पडतो आहोत. 20 वर्षापासून कोल्हापूरचे लोक खंडपीठाची मागणी करीत आहेत. उच्च न्यायालयामध्ये दाद मागावयाची असेल तर सांगली, सातारा, कोल्हापूर येथील नागरीकांना मुंबईला यावे लागते. पुण्यातील मंडळी पुणे येथे उच्च न्यायालयाची मागणी करीत आहेत म्हणून कोल्हापूरची मागणी बाजूला ठेवणे हे काही बरोबर नाही. 200 कि.मी.च्या आत उच्च न्यायालय असेल तर खंडपीठ मिळू शकत नाही त्यामुळे पुण्याचा विषयच येत नाही. महाराष्ट्राच्या एका मोठया नेत्याची पुण्यामध्ये खंडपीठ व्हावे अशी इच्छा आहे परंतु लॉजिकली पुण्यात खंडपीठ होणार असेल तर पुण्यातही खंडपीठ करा आणि कोल्हापूरमध्येही खंडपीठ करा.

सभापती महोदय, सहज न्याय मिळावा व उच्च न्यायालयाचा भार कमी व्हावा यासाठी शासन दिवाणी न्यायालयाची क्षमता वाढवित आहे, त्यामुळे कोल्हापूरच्या खंडपीठाचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळी संभाजीनगरला खंडपीठ झाले तेव्हापासून रिटपिटीशन किंवा उच्च न्यायालयात दाद मागणाऱ्यांच्या संख्येत वाढ झालेली आहे. अन्याय झाला असला तरी मराठवाडयातील लोकांना दाद मागण्यासाठी मुंबईत येणे शक्य नव्हते. त्यामुळे मुंबईत यावयाचे, प्रवास करावयाचा, राहण्याचा खर्च, जेवणाचा खर्च तसेच वकिलाची फी त्यामुळे लोक म्हणायचे ठीक आहे. अन्याय झाला तर झाला अजून कशाला पैसे खर्चून दाद मागायची ? संभाजीनगरला सहजपणे उच्च न्यायालय मिळाले तसे उच्च न्यायालयात जाणाऱ्या दाव्यांची संख्या कितीतरी पटीने वाढलेली आहे. उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूरला व्हावे अशी मागणी गेल्या 20 वर्षापासून कोल्हापूरवासीय करीत आहेत परंतु त्यांच्या मागणीला शासनाने वाटाण्याच्या अक्षता लावलेल्या आहेत. कोल्हापूर येथे खंडपीठ झाले तर शेती संबंधिंचे पश्चिम महाराष्ट्रातील दावे तेथल्या तेथे सुटू शकतील. सांगली, सातारा, कोल्हापूर,सोलापूर या ठिकाणी समृध्दी आहे त्या समृध्दीमुळे छोटया मोठया गोष्टीसाठी लोकांना कोर्टात जाण्याची सवय पडलेली आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे सुरु केले तर मुंबई उच्च न्यायालयाचे प्रेशर किती तरी प्रमाणात कमी होऊ शकेल. न्यायालयात जाणे म्हणजे मूर्खपणा आहे असा लोकांचा जो समज आहे तो समज शासनाने दूर केला पाहिजे. त्यामुळे शासनाने न्याय मिळण्याच्या प्रक्रियेमध्ये सुधारणा करावी अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----

..2..

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) सभापती महोदय, सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 8. मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता हे विधेयक आलेले आहे. या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी खूप उहापोह केलेला आहे. या विधेयकाच्या संदर्भात मी केवळ 2-3 मुद्दे मांडणार आहे.

या विधेयकातील उद्देश व कारणांमध्ये "तथापि पुरेशा पायाभूत सुविधा असल्याची खात्री पटवून देण्यासाठी आवश्यक ती माहिती सादर करुन उक्त नियमात अमलात आणणाऱ्या अधिसूचनेच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाला विनंती करण्याची राज्य शासनाला मोकळीक देऊन" असा जो उल्लेख केलेला त्यातून आपल्याला नेमके काय सांगावयाचे आहे ते समजत नाही. सर्वोच्च न्यायालयात पायाभूत सुविधा पूर्वी नव्हत्या का ? यातून आपल्याला नेमके काय सांगावयाचे आहे हे सभागृहाला कळले पाहिजे. ज्युरीसडिक्शन वाढविल्यामुळे 46 लाख प्रकरणे, 700 अपील जिल्हा पातळीवर निकाली काढण्यात यशस्वी होणार आहोत असा उल्लेख करण्यात आलेला आहे. कालच्या वर्तमानपत्रात "ज्येष्ठांची आयुष्याची संध्याकाळ कोर्टाच्या पायरीवर" अशी बातमी छापून आलेली आहे. त्यात म्हटले आहे की, ज्येष्ठांचे साधारणत: 1,16,621 दावे प्रलंबित आहेत. ज्येष्ठ नागरिकांची या राज्यात अशी अवस्था असेल तर खरोखरच त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांचे दावे प्रलंबितच राहतील अशी भीती वाटते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, साडेतीन वर्षापूर्वीच माननीय हायकोर्टाने सूचना दिल्या होत्या की, ज्येष्ठांचे दावे लवकर निकालात काढा. आजही आपण ज्येष्ठांचे दावे निकालात काढू शकलेलो नाही. 60 वर्षे किंवा त्याहून अधिक वय असलेले किती जण आहेत ? अशांचे किती दावे प्रलंबित आहेत. कोल्हापूर मध्ये 9668, सांगलीमध्ये 7734, साताऱ्यामध्ये 7211, उस्मानाबाद येथे 7208, पुण्यामध्ये 6706 इतके ज्येष्ठांचे दावे प्रलंबित आहेत. यामध्ये मुंबई देखील पाठीमागे नाही. मुंबईत स्मॉल कॉज कोर्टात 6905, सेशन कोर्टामध्ये 1151, फॅमिली कोर्टामध्ये 126 असे दावे प्रलंबित आहेत. मग या ज्येष्ठांना न्याय कधी मिळणार आहे. हे चित्र सगळ्या जिल्ह्यांमध्ये आहे. पाहिजे असेल तर मी आकडेवारी देखील द्यायला तयार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 1602 आणि रत्नागिरी जिल्ह्यात 1407 इतके ज्येष्ठांचे दावे प्रलंबित आहेत. आज ज्येष्ठांची अशी अवस्था असेल तर मग बाकीच्यांची काय असेल ? आज 39 लाख दावे प्रलंबित आहेत अशी माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी दिली आहे. या व्यवस्थेमुळे जवळ जवळ 26 लाख प्रकरणांचा निपटारा होणार आहे. आज आपण मॉर्निंग,इव्हीनिंग कोर्ट चालवितो. फॅमिली कोर्ट चालवितो, फास्ट ट्रॅक कोर्ट चालवितो, रेग्युलर कोर्ट चालवितो. तरी देखील या दाव्यांचा निपटारा होताना दिसत नाही. फास्ट ट्रॅक पेक्षा आपण अजून काही करू शकणार नाही. तेव्हा या दाव्यांचा निपटारा कसा होणार आहे ? आज तारीख पे तारीख ही गोष्ट चालू असते. या दाव्यांचा निपटारा का होत नाही ? आज न्यायायाधीशांची पदे भरलेली नाहीत. सरकारी वकिलांची पदे भरलेली नाहीत. स्टाफची पदे भरलेली नाहीत. मुंबई, पुणे, नागपूर, संभाजी नगर या सारखा सगळ्या शहरांमध्ये थोड्या फार फरकाने हीच परिस्थिती आहे. तसेच वैद्यकीय क्षेत्रात नुकसान भरपाईचे दावे होतात. तसे किती दावे प्रलंबित आहेत ? ही संख्या देखील फार मोठी आहे. वास्तविक या लोकांना ताबडतोब नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. कोणाचा मुलगा जातो, कोणाचा हात जातो, कोणाचा अवयव निकामी होतो,कोण आयुष्यातून उठतो. तर अशांना नुकसान भरपाई कधी मिळणार आहे ? यासाठी आपण वेगळी व्यवस्था अंगीकारणार आहात काय ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

पारसी विवाह आणि घटस्फोट अधिनियम 1936 संबंधातील मुद्दा माननीय श्री.अरूण गुजराथी यांनी उपस्थित केला आहे. पान 2 वर खंड 3. (क) (क-1) मध्ये "बौद्धिक मालमत्ताविषयक बाबीं संदर्भात उच्च न्यायालयास" असे नमूद करण्यात आले आहे. तेव्हा बौद्धिक मालमत्ता विषयक बाबी या शब्दांचे नेमके अर्थ काय आहेत ? कीस पाडायचा म्हणून पाडत नाही. आम्हाला बौद्धिक मालमत्ता विषयक बाबी कोणत्या हे कळले पाहिजे. शब्दश: अर्थ घेतला तर त्याचा काही अर्थ लागत नाही म्हणून इंग्रजीतील विधेयक मागवून त्याचा काही अर्थ लागतो काय हे पाहिले. पण तिकडे देखील अर्थ लागत नाही. तेव्हा याचा नेमका अर्थ काय आहे हे सांगावे.

"पारसी विवाह व घटस्फोट अधिनियम, 1936 अन्वये उच्च न्यायालयास" असा उल्लेख विधेयकामध्ये आहे. तेव्हा याचा देखील नेमका अर्थ काय, हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. आपण मला येथे बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.

.....

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधी व न्याय राज्यमंत्र्यांनी या ठिक्राणी एक अतिशय चांगले विधेयक मांडले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी, या विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी व त्यावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी "Justice delayed is Justice denied" असा उल्लेख केला. जर तुम्ही उशिरा न्याय दिला तर तो न्याय होऊ शकत नाही अशा स्वरुपाचे ते वक्तव्य आहे. या विधेयकाव्दारे आपण 1 कोटीपर्यन्त मर्यादा वाढविल्यानंतर 40 हजारांपैकी 35 हजार दावे न्यायालयांकडे वर्ग केले जाणार आहेत. माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेबांनी म्हटल्याप्रमाणे या विधेयकामध्ये कोणतेही आर्थिक पाठबळ दाखविले नाही, फायनान्शिअल स्टेटमेंटमध्ये सुध्दा दाखविले नाही. तरीसुध्दा आपण हे दावे ट्रान्स्फर करुन त्यांचा लवकर निपटारा करु असे सांगण्यामध्ये शासनाची जी इच्छा शक्ती आहे ती कशाप्रकारे पूर्ण करणार आहात याबद्दल माझ्या मनात शंका आहे. सभापती महोदय, या ठिक्राणी ट्रान्स्फर होणारे 35 हजार दावे कशा स्वरुपाचे आहेत हे देखील समजून घेणे आवश्यक आहे. हायकोर्टापुढे आज अनेक दावे प्रलंबित आहेत, ज्यांचे दहा ते पंधरा वेळा हिअरींग झाले आहेत, किंवा ज्या दाव्यांचे शेवटचे ऑर्ग्युमेंट होईपर्यन्त ते पोहोचले असतील असे दहा ते पंधरा किंवा पाच हजार पर्यन्त असलेले दावे पुन्हा या कोर्टापुढे आणले तर त्यांची प्रक्रिया पुन्हा शून्यामधून सुरु करावी लागणार आहे. याचा अर्थ या दाव्यांना तेव्हापासूनच विलंब सुरु होणार आहे. ज्या दाव्यांची हियरींग पूर्ण झ ाली आहे, किंवा ज्या दाव्यांचे शेवटचे हिअरींग शिल्लक आहे आणि फक्त आता जजमेंट बाकी आहे अशाप्रकारचे दावे आपण ट्रान्स्फर केले तर त्यामध्ये पुन्हा विलंब लागणार आहे. याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आपण पीट डिस्पोजल ऑफ केसेसच्या गोष्टी करतो. माझे अनेक वकील मित्र सांगतात की, एकदा आपण सिटी सिव्हील कोर्टात दावा दाखल केल्यानंतर तो 25 वर्षे चालत रहातो. असे कां घडते हे देखील आपण समजून घेणे गरजेचे आहे. याबाबत आपण काही कालमर्यादा घालणार आहोत की नाही? आपण किती वेळा या केसेस ॲडजर्नमेंट करणार आहोत, त्यांना आपण किती वेळा स्थगन देणार आहोत? एखादा दावा दाखल केल्यानंतर 25-25 वेळा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे....

ॲडजर्नमेंट करीत राहिलो तर ते हिअरींग पाच ते दहा वर्षांनी येते. सभापती महोदय, केवळ उशीर करण्यासाठी अशाप्रकारचे अनेक दावे आज दाखल केले जातात. मुंबई महानगरपालिकेमध्ये अनधिकृत बांधकामांचे दावे दाखल केलेले असतात. अलीकडे त्या दाव्यांचे डिस्पोजल लवकर होत चालले आहे हे आपण पहात आहोत. त्या ठिकाणी सांगण्यात आले आहे की, मुंबई महानगरपालिकेच्या पातळीवर त्या दाव्यांचे हिअरींग करण्यात यावे, त्यांच्याकडून जर झाले नाही तर तुम्ही आमच्याकडे या. अशाप्रकारच्या केसेस झाल्यामुळे अधिक वेगाने डिस्पोज झाले आहेत.

आपण यापूर्वी पाहिले आहे की, अनधिकृत बांधकामांचे दावे कोर्टामध्ये दाखल केले जात असत आणि 20 ते 25 वर्षे त्याबाबत स्टे ऑर्डर आणली जात असे. त्यानंतर आमच्यासारखी काही मंडळी सहानुभूतीच्या भावनेने ते बांधकाम रेगुलराईज करण्यासाठी प्रयत्न करतात व ते बांधकाम नंतर रेगुलराईज होते. या करिता या दाव्यांना काही तरी वेळेचे बंधन घालणे अत्यावश्यक आहे. एखाद्या दाव्याच्या बाबतीत आपण दोन, तीन, चार, पाच किती ॲडजर्नमेंट देणार आहात, याकरिता आपण आपल्या नियमामध्ये बंधन घातले नाही तर हे दावे लवकर निघाली काढण्याबाबत शासनाचे असलेले उद्दिष्ट कधीच साध्य होणार नाही. एखादा दावा दाखल झाल्यानंतर त्याचा निकाल किती वर्षामध्ये लागला पाहिजे या बाबत या कोर्टांवर वेळेचे बंधन घातले तर दावे वेळेवर निकाली काढण्याचे आपले उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे .....

सभापती महोदय, जर आपण त्यासाठी वेळेचे बंधन टाकले नाही आणि जर वेळेचे बंधन टाकल्यानंतरही डिले झाला तर त्यांना हा उशीर कशामुळे झाला आहे ही बाब रेकॉर्डवर आणावी लागेल. ट्रान्स्फर ऑफ सिस्टीम यामध्ये येईल. मग या दाव्यांचा निकाल का लागलेला नाही हे कळू शकेल.त्यामध्ये अमुक-अमुक अडचणी आहेत किंवा त्याबाबतीत काही कागदपत्रे मिळत नाहीत किंवा इतर काही अडचणी आहेत. त्यामुळे वेळ लागत आहे वगैरे सर्व गोष्टी रेकॉर्डवर येतील. त्यामुळे ट्रान्स्फरन्सी येण्यामध्ये निश्चितपणे मदत होईल. याठिकाणी मुंबई शहराचा उल्लेख केला असून याठिकाणी 35 हजार दावे ट्रान्स्फर होणार आहेत. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जवळजवळ प्रलंबित दाव्यांची संख्या 1 कोटी होईल तेव्हा एकंदर किती दावे असतील ते सांगता येत नाही. त्यामुळे स्टाफ वाढविणे किंवा नवीन न्यायालये स्थापन करणे किंवा नवीन जज्ज नेमणे आवश्यक आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी ज्याचा उल्लेख केला की, ज्यांचे दावे आहेत ते त्यांच्या भाषेमध्ये चालले तर मग आपल्या दाव्याच्या बाबतीत काय होत आहे ते त्यांना कळू शकेल. म्हणून त्यांची जी मागणी आहे किंबहुना त्यांनी घटनेतील उल्लेखही त्यासाठीच येथे वाचून दाखविला आहे की, यासाठी मराठी भाषा ही अनिवार्य करावयास पाहिजे आणि मी सन्माननीय सदस्यांच्या या मताशी निश्चितपणे सहमत आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांना या विधेयकाच्या माध्यमातून एका गोष्टीचा आनंद वाटेल.

सभापती महोदय, मघाशी मी या विधेयकाची मराठी आवृत्ती व इंग्रजी आवृत्ती असे दोन्ही वाचत होतो. कारण जर मराठी वाचून कळले नाही तर इंग्रजी वाचावयाचे. पण माझ्या असे लक्षात आले की, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन, खंड(1) मध्ये मराठीमध्ये असे म्हटलेले आहे की,"या खंडामध्ये राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे नियत करील अशा दिनांकास अधिनियम अंमलात आणण्याचा आणि अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे." येथे इंग्रजीमध्ये असे म्हटलेले आहे की, "Under this clause, power is taken to the State Government...." मला कळत नाही की, इंग्रजी काय आहे. कदाचित कायद्याच्या भाषेतील इंग्रजी बरोबर आहे काय ? याचीही मला कल्पना नाही. I think the wording should be "...power should be taken by the State Government..."अशा प्रकारे या विधेयकामध्ये मराठीचे इंग्रजीमध्ये भाषांतर केल्याचे दिसत आहे.कारण मराठीमध्ये असे म्हटलेले आहे की,"राज्य शासनाकडे घेण्यात

श्री.प्रकाश बिनसाळे .....

आला आहे. It is .....taken by the Government. It cannot be taken to the Government.

सभापती महोदय, त्याच्या पुढील जो खंड 3 (ग) आहे. त्यामध्ये देखील अशाच प्रकारची वाक्य रचना करण्यात आली आहे. तसेच खंड 5 मध्ये "Power is taken to the High Court" इंग्रजी भाषांतर करीत असताना अशा प्रकारे वाक्य रचना करण्यात आली आहे. हे बरोबर आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. कदाचित कुठे तरी माझे निश्चितपणे चुकत असणार. कारण कायद्याच्या संदर्भातील जे तज्ज्ञ आहेत, त्यांनी हे विधेयक बनविलेले असल्याने हे बिल बरोबरच असले पाहिजे. याबाबतीत माझी स्वत:ची अशी धारणा झाली आहे की, प्रथम हे विधेयक मराठीमध्ये ड्राफ्ट करण्यात आले आहे आणि त्यानंतर त्याचे इंग्रजीमध्ये भाषांतर करण्यात आले आहे म्हणजे कॉपी टू कॉपी आणि मख्खी टू मख्खी असे आमच्या लहानपणी असावयाचे किंवा माशी एका पुस्तकाला चिकटली होती, तशी ती चिकटवावयाची आणि वर म्हटल्याप्रमाणे कॉपी टू कॉपी मख्खी टू मख्खी असे करावयाचे अशा स्वरुपाचे करण्यात आल्याचे दिसत आहे. त्यामुळे माझ्या दृष्टीकोनातून इंग्रजी बिलामध्ये ही रिपिटेड चूक आहे.कदाचित शासनाच्या दृष्टीकोनातून किंवा कायदा बनविणाऱ्यांच्या दृष्टीकोनातून ही चूक नसेलही.पण कायदा बनवित असताना अत्यंत पध्दतशीरपणे, अत्यंत विचारपूर्वक काम केले पाहिजे. कारण जर यातील एक जरी शब्द बदलला तरी संपूर्ण कायद्याचा अर्थ बदलत असतो. त्याच पध्दतीने यामध्ये जर चुकीचे शब्द आले आणि ते जर कायदे मंडळाने पास केले तर कायदे मंडळाला काहीच कळत नाही अशा प्रकारची धारणा समाजामध्ये आहे, ती आणखी वाढीस लागेल, त्यासाठी मदत होईल. त्यामुळे हे कुठेतरी थांबले पाहिजे. हा कायदा अत्यंत चांगला आहे, या कायद्याच्या मागील उद्देश अत्यंत चांगला आहे. पण तो साध्य करण्यासाठी मला असे वाटते की, शासनाने यासाठी लागणाऱ्या ज्या पूरक गोष्टी आहेत, त्या करणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे ....

नवीन न्यायालये स्थापन करणे, न्यायाधीशांची नेमणूक करणे, त्यासाठी लागणारा स्टाफ देणे, त्यांच्यावर वेळेचे बंधन घालणे, ऑर्डर्नमेंटचे बंधन घालणे, अशी वेगवेगळी बंधने घालून त्यामध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता कशी निर्माण होईल आणि जनतेमध्ये कसा विश्वास निर्माण होईल हे पाहिले पाहिजे. कायदा हा श्रेष्ठ आहे आणि आपल्याला या ठिकाणी न्याय मिळेल असा विश्वास जनतेमध्ये निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. तरच शासनाचे लवकर आणि योग्य न्याय देण्याचे जे उद्दिष्ट आहे ते साध्य होईल. मी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या तेवढ्यासाठीच केलेल्या आहेत. मी पुन्हा एकदा या विधेयकाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या बिलावर खूप चर्चा झालेली आहे. मी थोडक्यात दोन मुद्दे मांडणार आहे. या विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 2 वरील खंड 2 मध्ये (3अ) हा मजकूर समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये "...संबंधित दावे व दिवाणी प्रकरणे, असा उल्लेख आहे." यामध्ये "बौध्दिक मालमत्ताविषयक बाबी" याचा अर्थ, व्यापारचिन्हे, प्रकाशनाधिकार (कॉपीराईट, एकस्व (पेटंट), संकल्पचित्र व भौगोलिक निर्देश, वनस्पतींच्या प्रजाती आणि शेतकरी व वनस्पती लागवडदारांचे हक्क आणि संकलक परिपथ रेखांकन (रचनाकृती) यांच्याशी संबंधित दावे व दिवाणी प्रकरणे, असा आहे." असा उल्लेख केलेला आहे. या विधानाचा चुकीचा अन्वयार्थ लावण्यास खूप मोठा वाव आहे. म्हणून याबाबत चित्र स्पष्ट होणे आवश्यक आहे. यामध्ये ज्या दाव्यांचा उल्लेख केलेला आहे त्यामध्ये व्यापारचिन्हे, प्रकाशनाधिकार, एकस्व, संकल्पचित्रे याच्याशी संबंधित दावे व दिवाणी प्रकरणे असे म्हटले आहे. याच संदर्भातील दिवाणी प्रकरणे की अन्य आणखी दिवाणी प्रकरणे याचा अर्थ त्यामधून स्पष्ट होत नाही. म्हणून या मजकुरामध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे का हे तपासले पाहिजे. नाही तर हाही एक मोठा वादाचा मुद्दा होईल. यामध्ये न्यायाला विलंब लावणे म्हणजे न्याय नाकारणे असे चित्र निर्माण करण्याला वाव मिळतो असे माझे मत बनले आहे. त्यामुळे त्यामध्ये सुधारणा करता येते काय ते बघावे.

सभापती महोदय, त्याबरोबर खंड 3 मधील (ग) मध्ये विद्यमान परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल असे म्हटले आहे. या परंतुकामध्ये असे म्हटले आहे की, "परंतु राज्य शासनास, वेळोवेळी, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करुन, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, शहर न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेत वाढ करता येईल आणि उच्च न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेत तदनुरुप फेरफार करता येईल." आज कोणत्या ना कोणत्या पक्षाचे सरकार सत्तेवर आहे आणि भविष्यात आणखी कोणत्या पक्षाचे सरकार येऊ शकेल. यामध्ये राज्य शासनास न्यायालयाच्या अधिकार कक्षेत हस्तक्षेप करण्यास संधी मिळते का आणि न्यायालयाच्या स्वायत्ततेला व न्यायिक स्वातंत्र्यांला काही धोका पोहोचतो का याचाही विचार होणे आवश्यक आहे. या दोन बाबी मांडून मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, या सभागृहासमोर विधानसभा विधेयक क्रमांक 8 मांडण्यात आलेले आहे. या विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे. या बिलाच्या खंड 3 मध्ये सन 1984 चा मुंबई अधिनियम क्रमांक 40 याच्या कलम 3 च्या सुधारणेमध्ये असे म्हटले आहे की, (ग) मध्ये विद्यमान परंतुकाऐवजी पुढील परंतुक दाखल करण्यात येईल. "परंतु राज्य शासनास, वेळोवेळी, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करुन, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, शहर न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेत वाढ करता येईल आणि उच्च न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेत तदनुरुप फेरफार करता येईल." यामध्ये ही जी फ्लेग्जिबिलिटी दाखविली आहे ती अत्यंत चांगली आहे. कारण जसजसा समाज बदलत राहील त्याप्रमाणे गरजा बदलत राहतील. त्यामुळे त्याप्रमाणे कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याच्या वाटा आपण शिल्लक ठेवल्या पाहिजेत. त्यामुळे या ठिकाणी जे परंतुक टाकलेले आहे ते अत्यंत चांगले आहे. त्याच पध्दतीने पृष्ठ क्रमांक 3 वर खंड 7 (1) मध्ये असे म्हटले आहे की, "या अधिनियमाव्दारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, ती दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक वाटतील अशा, परंतु या अधिनियमाव्दारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदीशी विसंगत नसतील अशा तरतुदी राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे करता येतील."

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 16:55

ॲड. उषा दराडे...

ज्या वेळी गरज लागते त्यावेळी आपण घटनेमध्ये सुद्धा दुरुस्त्या करतो. आपण 73वी आणि 74वी घटना दुरुस्ती केली. या घटना दुरुस्तीचे देशभर कौतुक आणि स्वागतही झाले. कायद्यामध्ये देखील अशा पध्दतीने सुधारणा करुन कलम काढण्याची किंवा समाविष्ट करण्याची ही प्रक्रिया अत्यंत स्वागतार्ह आहे. मी या विधेयकाचे समर्थन करते. 1 कोटी पर्यन्त मूल्य असलेले दावे व प्रकरणे शहर दिवाणी न्यायालयाकडे वर्ग करण्याची विनंती सर्वोच्च न्यायालयाने केली होती. त्यानुसार या तरतुदी आपण केलेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा आपण सन्मान केलेला आहे. हे सर्व आपण का करतो ? या ठिकाणी न्यायालयात प्रलंबित असलेल्या दाव्याबाबत माझ्या सहका-यांनी येथे बरीच चर्चा केली. संपूर्ण देशामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये सिव्हील विषयक, क्रिमिनल विषयक, किंवा रेव्हेन्यू विषयक हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत. या प्रकरणांचा निपटारा लवकर व्हावा, आणि शेतक-यांना त्याचा लवकरात लवकर फायदा व्हावा किंवा क्लायण्टस्‌ना मग तो पिटिशनर असेल किंवा रिस्पॉण्डण्ट असेल, प्लेण्टिफ असेल किंवा डिफेण्डण्ट असेल या प्रत्येकाला लवकर रिलिफ मिळाला पाहिजे या उद्देशाने कायद्यामध्ये दुरुस्ती करुन पक्षकाराची सोय करण्याचा प्रयत्न आपण करीत असतो. मला 1994ची दुरुस्ती आठवते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी हिंदू कोडबिल 4 भागात विभागून पास केले. त्यामध्ये वारसा हक्क कायद्याप्रमाणे इतर हक्कामध्ये महिलांना टाकण्यात आले होते. परंतु 1994ला महाराष्ट्र शासनाने दुरुस्ती करुन वाडवडिलांच्या मालमत्तेत महिलांना भावाप्रमाणे समान अधिकार दिले आणि कोपार्सनर केले.

सभापती महोदय, पायाभूत सुविधांच्या दृष्टीने विचार केला तर कोर्टाच्या ज्या इमारती आहेत त्यांची अवस्था काय आहे ? ग्रामीण भागाचे चित्र फार वेगळे आहे. बोटावर मोजण्या इतक्या ठिकाणी चांगल्या इमारती आहेत. आमच्या जिल्ह्याचा विचार केला तर पूर्वी जेथे जेएमएफसी न्यायालय भरत असे किंवा दिवाणी अथवा फौजदारी तालुका न्यायालय भरत असे त्याच न्यायालयामध्ये आता नव्याने आलेले डिस्ट्रिक्ट कोर्ट देखील भरत आहे. परळीमध्ये नवीन तालुका कोर्ट सुरु झाले. ते इरिगेशनच्या रेस्ट हाऊसमध्ये भरते. अंबेजोगाईमध्ये नवीन डिस्ट्रिक कोर्ट आले. त्यासाठी इमारत आहे. परंतु न्यायाधीशांना रहाण्यासाठी क्वार्टर्स नाहीत. आमच्या बीडमध्ये

..2.

16-04-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3U-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

निजाम काळापासूनची एक इमारत आहे.अशी सर्व परिस्थिती आहे. शिरुर येथील न्यायालयासाठी भाड्याने जागा घेतलेली आहे. म्हणून पायाभूत सुविधांकडे आपण अधिक गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने फॅमिली कोर्टाची तरतूद केली. परंतु प्रत्येक जिल्ह्यामध्ये फॅमिली कोर्ट सुरु झालेली नाहीत. बोटावर मोजण्याइतक्या ठिकाणी ही फॅमिली कोर्ट आहेत. जे मॅट्रिमोनियल लिटिगेशन्स आहेत मग ते डायव्होर्स पिटिशन असेल, रेस्टिटयुशन ऑफ कॉंज्युगल राईट पिटिशन असेल, ज्युडिशियल सेपरेशन असेल, मेण्टेनन्स असेल, या सगळया प्रकरणांना डिस्पोझल देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला फॅमिली कोर्ट करणे ही आमच्या महिला संघटनांची अनेक वर्षापासूनची जुनी मागणी आहे. याचा शासनाने विचार करण्याची गरज आहे. हुंडा प्रतिबंधक कायदा आहे. पीसीपीएनडीटी कायदा आहे, द्विभार्या प्रतिबंधक कायदा आहे. परंतु या कायद्यांची अंमलबजावणी करण्याची मानसिकता नाही. पूर्वी सती विरोधी कायद्याची कडकपणे अंमलबजावणी झाली म्हणून सतीप्रथा बंद झाली. आता कुणी सती गेलेले दिसत नाही. आता "नको ती कोर्टाची पायरी" असा समाजाचा न्यायालयाकडे बघण्याचा दृष्टीकोन झालेला आहे. हे सर्व कुटुंबाशी संबंधित असलेले कायदे आहेत. साधारण पीसीपीएनडीटी कायद्याचा विचार केला तर जर मी गर्भपात केला नाही तर माझा नवरा मला सांभाळणार नाही कारण माझी आर्थिक परिस्थिती त्यावर विसंबून आहे. ही सर्व परिस्थिती या न्यायसंस्थेवर परिणाम करते. म्हणून या सर्व गोष्टींकडे बारकाईने पाहिले पाहिजे.

मोटार व्हेईकल ॲक्टमध्ये काही काळ महिलांना सीएफ एक्झम्प्ट करुन दिले.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

त्यानंतर कोर्ट फीच्या संदर्भात पुन्हा असे झाले की, सुरुवातीला कोर्ट फी लावू नका. ज्यावेळेला मोटार ॲक्सीडेंट क्लेम डिसाईड होईल त्यावेळेला कोर्ट फी दिली तरी चालेल असे सांगण्यात आले. याबाबतीत माझे म्हणणे असे आहे की, महाराष्ट्र शासनाने या विषयाचा गांभीर्याने विचार करावा आणि मोटार ॲक्सीडेंट क्लेम्स्मध्ये महिला आणि मायनर जे असतील त्या डिपेंडेंटस्ना किंवा वृध्द असतील अशा डिपेंडेंटस्ना कोणत्याही परिस्थितीमध्ये मोटार व्हईकल ॲक्टमध्ये पिटीशनरला कोर्ट फी लावण्याचे बंधन करु नये. जी इन्शुरन्स कंपनी किंवा प्रायव्हेट पार्टी असेल त्या इन्शुरन्स कंपनीला किंवा प्रायव्हेट पार्टीला पिटीशन डिसाईड झाल्यानंतर कंपल्सरी कोर्ट फी कोर्टामध्ये जमा करण्याबाबतचे आदेश दिले जावेत अशी माझी या निमित्ताने सूचना आहे.

सभापती महोदय, लॅन्ड ॲक्वीझिशन ॲक्टच्या अनुषंगाने शासनाने काही परिपत्रके काढलेली आहेत. शासनाने काही परिपत्रके अशी काढलेली आहेत की, ज्याच्यामध्ये लॅन्ड रेफरन्स दाखल करीत असताना कोर्ट फी लागत नसे. 1994 च्या दरम्यान माननीय श्री.शरदराव पवार हे मुख्यमंत्री असताना कोर्ट फी माफीचा कायदा करण्यात आला होता. मॅट्रीमोनियल केसेसमध्ये महिलांना कोर्ट फी माफ करण्यात आली होती. मोटार ॲक्सीडेंट क्लेम ॲक्ट आणि लॅन्ड ॲक्वीझिशन ॲक्टमध्ये सुध्दा अशी प्रोव्हीजन करण्यात यावी अशी माझी शासनास विनंती आहे. शासनाच्या जी.आर.चे विश्लेषण महसूल अधिकाऱ्यांकडून बरोबर झाले की गल्लत झाली याबाबातची मला माहिती नाही. परंतु नंतर ते मॅटर कोर्टात आले, साक्ष नोंदविण्याच्या स्टेजला आले त्यावेळी कोर्ट फी घेतली गेली. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने कुठल्याही परिस्थितीमध्ये खूप कणखर अशी भूमिका घेणे गरजेचे आहे. डिसीजनमध्ये किंवा जजमेंटमध्ये ॲक्वीटलचे प्रमाण खूप मोठे आहे.

महोदय, माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी ही गोष्ट मान्य केली की, आमच्याकडे पी.सी.पी.एन.डी.टी.चा ॲक्ट असेल, कलम 376 ची केस असेल, 354 ची केस असेल, 302 ची केस असेल, कन्व्हीक्शनचे प्रमाण कमी आहे आणि ॲक्वीटलचे प्रमाण जास्त आहे. यात सगळयात महत्वाचे कारण कोणते असेल तर ते म्हणजे अवेअरनेस ऑफ लॉ, नॉलेज ऑफ लॉ कॉमन पर्सनला नाही. पोलीस स्टेशनला फिर्याद देत असताना ती कुठल्या भाषेत दिली पाहिजे, कुठल्या पध्दतीने दिली पाहिजे, कुठल्या पध्दतीने नॅरेट केले पाहिजे याचे ज्ञान ना पिटीशनरला

2...

ॲड.उषा दराडे...

आहे, ना पोलीस ॲथॉरिटीज्‌ला आहे. पोलीस ॲथॉरिटी ज्यावेळी चार्जशीट तयार करतात. त्यावेळी फिर्याद ही पोलीस ॲथॉरिटीच्या भाषेत लिहून घेतली जाते. साधारणपणे सी.आर.पी.सी च्या कलम 154 प्रमाणे फर्स्ट इन्फर्मेशन रिपोर्ट पोलीस स्टेशनला दाखल केला जातो. फस्ट इन्फरमेशन रिपोर्ट म्हणजे कोणी पोलिसांना दूरध्वनीव्दारे तक्रार केली तरी त्याबाबत पोलिसांना एफ.आय.आर.नोंद करण्याची आवश्यकता असते. परंतु परिस्थिती अशी आहे की, पोलिसांना देखील त्यासंबंधी ज्ञान नसते, फिर्यादीला देखील त्याचे ज्ञान नसते. पोलिसांना सी.आर.पी.सी.च्या कलम 154,161,162 चे शंभर टक्के नॉलेज असणे गरजेचे आहे. समाजाला देखील त्याची माहिती होणे गरजेचे आहे. काही गोष्टी चांगल्या देखील केल्या गेल्या आहेत.

महोदय, एफ.आय.आर.रेकॉर्ड झाला तर त्याची प्रत फिर्यादीला देण्यात येते. परंतु फिर्यादीस नुसती प्रत देऊन चालणार नाही. त्या नोंदीचा अर्थ फिर्यादीला सांगणे गरजेचे आहे. पंचनामा म्हणजे काय, पंच म्हणजे काय, या गोष्टी फिर्यादीला समजावून सांगितल्या पाहिजेत. आपल्याकडे पंचाना सुरक्षा नसल्यामुळे केसेसना योग्य न्याय मिळण्यास फार मोठा धोका निर्माण होऊ शकतो. आपण परवा अफूच्या संदर्भात बऱ्याच केसेस दाखल केल्या. अशा केसेसमध्ये एक पंच जरी होस्टाईल झाला तर सर्व प्रकरण संपून जाते. म्हणून या गोष्टीकडे शासनाने लक्ष घालणे गरजेचे आहे. सुप्रीम कोर्टाचे जे निर्णय असतात, ते निर्णय जिल्हा कोर्ट, तालुका कोर्ट यांच्यावर बंधनकारक असतात.

महोदय, एक प्रकरण माझ्या वाचनात आले आहे. ल्यूशिया वर्सेस सर हेन्री या प्रकरणामध्ये न्यायाधीशांनी असे मत व्यक्त केले होते की, लग्नाच्या संदर्भामध्ये महिलांच्या लिटिगेशनची पेंडन्सी आहे. त्या अनुषंगाने मला एका प्रकरणाचा उल्लेख करावयाचा आहे. या प्रकरणात न्यायाधीशांनी असे मत व्यक्त केले की, "The question of validity of a marriage cannot be tried like any other issue of fact, independent and presumption, that the Court held that the law will presume in favour of marriage and first presumption could only be rebutted by the strong and satisfactory evidence." या ठिकाणी प्रश्न असा निर्माण झाला होता की, लाँग टाईम ती महिला पर पुरुषाबरोबर पत्नी सारखी राहिली. त्या माणसाचे पहिले लग्न झालेले आहे.

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ॲड.उषा दराडे......

आणि मग त्या महिलेचा विवाह झाला आहे की नाही, तिला पोटगी द्यायची की नाही हे इश्यू चर्चेला आले त्यावेळी लॉर्डशिपना त्यांचा निर्णय मॅरेजच्या बाजूने द्यावा लागला. विधिवत व्याख्या दिलेली नसली तरी अनेक पध्दतीने असे निर्णय आले. मग मॅरेजची व्याख्या बदलावी लागली. मेंटेनन्सची व्याख्या बदलावी लागली.

मेंटेनन्सच्या बाबतीत सीआरपीसीमधील कलम 488 होते. Section 488 of Cr.P.C. reads as under, "If any person having sufficient means neglects or refuses to maintain his wife or his legitimate or illegitimate child unable to maintain itself, the District Magistrate, Presidency Magistrate, Sub-Divisional Magistrate or a Judicial Magistrate of First Class, may upon proof of such neglect or refusal, order such person to make a monthly allowance for the maintenance of his wife or his child at such monthly rate not exceeding five hundred rupees." म्हणजे सुरुवातीला फक्त 500 रुपयांची मेन्टेनन्सची मर्यादा होती. परंतु दोन दिवसांपूर्वी मी उस्मानाबादच्या संदर्भातील एक निकाल पाहिला. 20 हजार रुपये प्रती महिना मेन्टेनन्स संबंधीचा निर्णय दिला गेला. कायदा नेहमी फ्लेक्झीबल असला पाहिजे. तो लोकांच्या हिताचा असला पाहिजे.

पुढे हेच सीआरपीसीचे 488 कलमाची सुधारित आवृत्ती म्हणून कलम 125 समोर आले. त्या संदर्भात कॅ.रमेश चंदर विरुध्द विना कौशल, AIR 1978 SC 1007. कलम 488 ची सुधारित आवृत्ती म्हणून कलम 125 मध्ये ॲडिशन केले. "Except for the fact that the parents have also brought in the category of person entitled for maintenance...". या ठिकाणी असे प्रकार झालेले आहेत. माझे एवढेच म्हणणे आहे की, यामध्ये लॉर्डशिपनी रिकमेंड केली आहे. "The word 'wife' in Section 125 of the Cr.P.C. should be amended to include a woman who was living with the man like his wife for a reasonably long period." अशा पध्दतीची ते रिकमेंडेशन आहे. या बाबतीत फक्त एवढेच सांगून भागणार नाही. कलम 494 मध्ये कॉग्निझेबल ऑफेन्स नाही. "Marrying again .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे......

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

during the lifetime of spouse", यामध्ये मॅट्रिमोनियल गुन्हे खूप मोठया प्रमाणावर पेंडिंग असतात. मला या ठिकाणी एवढेच म्हणावयाचे आहे की, या संदर्भातील बरेच सेक्शन्स आहेत त्या सेक्शनमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. आपण न्यायालयांचा नेहमीच सन्मान केलेला आहे. न्यायालयांनी देखील लोकांना चांगल्या पध्दतीने न्याय दिलेला आहे. ही सुधारणा लोकांना निश्चित न्याय देईल. त्या प्रमाणे हे बिल काम करेल अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करुन या विधेयकाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपविते.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक-8 मुंबई शहर दिवाणी न्यायालय सुधारणा विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, 50 हजार रुपयांची मर्यादा 1 कोटी रुपयांवर नेत असतना यापूर्वी ही मर्यादा अमर्याद करण्याचा शासनाने प्रयत्न केला होता. परंतु त्या निर्णयाविरुध्द कोणीतरी कोर्टात धाव घेतली आणि मग शासनाने ही सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. या ठिकाणी या विधेयकावर आपले विचार मांडताना अनेक माननीय सदस्यांनी पायाभूत सुविधांबद्दल भाष्य केले आहे. मुंबई, ठाणे या भागातील वेगवेगळ्या न्यायालयांमध्ये आम्ही जातो त्यावेळी त्या ठिकाणी पायाभूत सुविधा किती अपुऱ्या आहेत याची जाणीव होत असते. पायाभूत सुविधा म्हणजे केवळ इमारत नव्हे तर न्यायालयाला आवश्यक असलेला कर्मचारीवर्ग व इतर अनेक गोष्टींचा त्यामध्ये समावेश होतो. त्या दृष्टीने राज्य सक्षम आहे का? न्यायालयांना वेगवेगळ्या सुविधा देण्यासाठी आराखडा तयार करण्याची गरज आहे. 700 ते 750 पदे नव्याने निर्माण करण्यासाठी शासनाने परवानगी दिलेली आहे. ती पदे प्रत्यक्षात कधी भरली जातील याबाबत शंका आहे. 2012-13 च्या अर्थसंकल्पामध्ये 125 कोटी रुपये मिळाले आहेत. त्यातून या सगळ्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

न्यायालयाला आपण जी काही सोयी सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे ती खरोखर पुरेशी आहे काय ? सर्व पायाभूत सोयी सुविधा न्यायालयाला मिळणार आहेत काय याबाबत विचार करण्याची गरज असून यासंदर्भात काही तरी प्लॅन केला तरच खऱ्या अर्थाने न्यायालयाला पायाभूत सोयी सुविधा मिळू शकतील मला असे वाटते. पायाभूत सोयी सुविधेच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने आदेश दिलेले असून शासनाने सुध्दा यासंदर्भात प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्यामध्ये पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील असे शासनाने सांगितले असून शासनाच्या प्रतिज्ञापत्राच्या संदर्भात हायकोर्टाने सुध्दा समाधान व्यक्त केलेले आहे. त्यामुळे सोयीसुविधेच्या संदर्भात मंत्री महोदयांनी माहिती दिली तर अधिक चांगले होईल.

सभापती महोदय, विधेयकाच्या खंड 6 मध्ये म्हटले आहे की, नवीन नोटीसा बजावण्याची गरज नसेल व असे दावे उच्च न्यायालयाकडून शहर दिवाणी न्यायालयाकडे आपोआप वर्ग केले जातील. परंतु हे दावे ट्रान्स्फर करतांना ज्यांचे दावे आहेत त्यांना ते ट्रान्स्फर केलेले आहेत हे कळविण्याची व्यवस्था आपल्याला करावी लागेल. आपल्याकडून दावे गेल्यानंतर खाली कम्यूनीकेट किती होतील याबाबत माझ्या मनात शंका आहे त्यामुळे याबाबत स्पष्टीकरण देता आले तर चांगले होईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी कोर्टाच्या मराठी भाषेच्या संदर्भातील विचार चांगल्या प्रकारे मांडले आहेत. सभागृहात विधेयक येतांना "बॉम्बे ॲक्ट" असा नेहमी उल्लेख केला जातो. खरे म्हणजे यासंदर्भात विधानसभा विधेयक क्रमांक एल-14 तयार आहे. जी विधेयके तयार आहेत ती प्रायोरिटीने पारित करण्यात आली तर सरकारची प्रामाणिकता दिसून येईल. नाही तर कोणी मागते, कोणी तरी आग्रह धरते असे होता कामा नये. कामकाज सल्लागार समितीच्या दोन तीन बैठकांमध्ये हे विधेयक चर्चेसाठी आले नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये हे विधेयक आले असते तर हे विधेयक लवकर पारित करण्याचा आम्ही निश्चित प्रयत्न केला असता. "बॉम्बे ॲक्ट" च्या ऐवजी "मुंबई कायदा"असे जे विधेयक आहे ते सभागृहात लवकर येण्याची आवश्यकता आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

सभापती महोदय, परवा विजेचे विधेयक आले होते. विधेयकाच्या ड्राफ्टींगमध्ये काही चुका झाल्या होत्या. वर्णमाला व व्यंजनाच्या संदर्भात विधी व न्याय विभागाला स्पष्टीकरण देण्याची गरज आहे. वर्णमालामध्ये ए,बी,सी,डी,इ,एफ,जी असे आहे तर व्यंजनामध्ये "क,ख,ग,घ,च,छ,ज," असे आहे. वर्णमालामध्ये "जी" आले की, व्यंजनामध्ये "ग" लावतात. हे विधेयक जसेच्या तसे गोंधळात पारित करण्याचा आग्रह राहिला तर त्या चुका दुरुस्त होत नाहीत व त्या तशाच्या तशा पुढे राहतात. त्यामुळे या विषयातील क्लॅरिटी लवकर आणली पाहिजे तसेच प्रचलित व्यंजनाच्या ऐवजी "अ,ब,क,ड," आणले तर ते समजण्यास सोपे होईल. असे सर्व बदल पूर्वलक्षी प्रभावाने करता येणार नाहीत. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी सांगितले आहे की, विधेयक तयार करणाऱ्यांनाही सोपे जाईल व वाचतांना सोपे जाईल असे बदल विधेयकाच्या संदर्भात विधी व न्याय विभागाने केले तर चांगले होईल.

धन्यवाद.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, या विधेयकात म्हटले आहे की, उच्च न्यायालयाचा भार कमी करण्यासाठी हे विधेयक येथे आणण्यात आलेले असून त्यासंदर्भातील अधिकार दिवाणी न्यायालयाला मिळणार आहेत. आपण विधेयकात म्हटले आहे की, पक्षकारांवर नवीन नोटीस न बजाविता अशा प्रकरणाची सूची सूचना फलकावर लावली जाईल. त्यामुळे यासंदर्भात माझी सूचना अशी आहे की, उच्च न्यायालयाची वेब साईट अतिशय चांगली असून उच्च न्यायालयाचे झालेले निकाल व ऑर्डर उच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर लागली जाते. त्यामुळे पक्षकारांना तसेच वकिलांनाही त्याचा फायदा होत असतो. पक्षकारांना माहिती न देता सरळ सरळ पक्षकारांचे दावे दुसऱ्या न्यायालयात वर्ग करणे व त्यासंदर्भात माहिती न देणे म्हणजे पक्षकारांच्या मूलभूत अधिकारावर गदा येते. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर कोण-कोणते दावे दिवाणी न्यायालयात हस्तांतरीत केलेले आहेत त्याची माहिती आली पाहिजे अशी माझी पहिली सूचना आहे.

सभापती महोदय, आपण पायाभूत सुविधा म्हणतो परंतु यामधून उच्च न्यायालयाच्या अधिकाराचा भंग होतो की, नाही हे मला माहिती नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

आज सर्व न्यायालयामध्ये हीच परिस्थिती आहे. आज नगरच्या न्यायालयांना एफएसआय वाढवून पाहिजे आहे. जेणे करून इमारतीवर काही मजले वाढवून तेथे कोर्ट रूमची सोय होईल. तसेच वाहनतळाची सुविधा होणे, स्वच्छता गृहे चांगली असणे आवश्यक आहे. तेथील ड्रेनेज लाईन अतिशय खराब अवस्थेमध्ये आहे. त्यामुळे माझे असे मत आहे की, पायाभूत सुविधा देत असताना सर्व न्यायालयांच्या संदर्भात एफएसआय वाढवून घेणे, इमारतींचे आधुनिकीकरण करणे या बद्दल देखील निर्णय घेणे अतिशय आवश्यक आहे. आता आपण नवीन न्यायालयात दावे वर्ग करणार आहात. हे दावे भौगोलिकदृष्ट्या कुठे असणार आहेत ? कारण आम्ही हे चित्र बघतो की, आपण वेगवेगळी न्यायालये निर्माण करत आहात. पक्षकार इकडून तिकडे जातील असे गृहीत धरत आहात. त्यावेळी न्यायाधीशांची व्यवस्था करतो. पण वकिलांचे काय ? ज्या वकिलांनी उच्च न्यायालयामध्ये वर्षानुवर्षे प्रॅक्टीस केली आहे त्यांचे काही दावे आपण दिवाणी न्यायालयात वर्ग करणार आहात असे म्हटले आहे. त्यामुळे भौगोलिक दृष्ट्या ते कुठे असणार आहेत ? पक्षकार आणि वकील यांना न्यायालयात जाणे लांब होणार आहे. उदा.न्यायालय वांद्रे येथे हलविले तर प्रचंड गोंधळ तारखांमध्ये निर्माण होईल. तेव्हा हे न्यायालय उच्च न्यायालयाच्याच इमारतीत असणार आहे काय, याबद्दल देखील स्पष्टता असली पाहिजे.

दुसरे असे की, न्यायालयाकडे कामकाज करण्यासाठी पूर्ण वेळ आहे अशी स्थिती नाही. दावा लवकर निकाली निघाला अशी परिस्थिती नाही. उच्च न्यायालयाचा निकाल शिरसावंद्य असला तरी दिवाणी न्यायालयामध्ये आधी असलेल्या भारामध्ये नवीन भर पडणार आहे. त्यामुळे मुंबई, औरंगाबाद, नागपूर येथे प्रलंबित असलेल्या दाव्यांसंबंधी आपण कोणती पावले उचलणार आहात ? कारण आज तेथील दावे देखील प्रलंबित आहेत. आपण एक एक नवीन न्यायालाने सुरू करीत आहोत. 1998 मध्ये महिलांच्या अत्याचारावरील 6 न्यायालये सुरू केली. ती 2003 पर्यंत चालली. त्यातील बीड आणि नगर मधील न्यायालये बंद पडली आहेत. ती न्यायालये परत सुरू केली आहेत असे दोन वर्षापूर्वी सांगितले. त्यावेळी सांगितले होते की, स्त्रियांवरी अत्याचाराचे सगळे दावे तेथे वर्ग करू. ते दावे वर्ग झाल्यानंतर व न्यायालय बंद पडल्यानंतरत्रेधातिरपीट होत असते.

मी आपल्याला कौटुंबीक न्यायालयाचे उदाहरण देते. गेल्या वर्षी 22 ठिकाणी कौटुंबीक न्यायालये स्थापन करू असे

डॉ.नीलम गोऱ्हे...

सांगितले. त्यासाठी आपण अजून निधीची तरतूदच केलेली नाही. त्यामुळे येथे असलेले न्यायाधीश, आवर्ती खर्च, इमारत यासाठी कोणती तरतूद करणार आहात ? यासंबंधी देखील स्पष्टता व्हावी. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी अनेक कायद्यांचा उल्लेख केला आहे. त्याबद्दल मी एका वाक्यात सांगेन की, केंद्र सरकारने मलिमत समिती नेमली होती. ही समिती अनेक लिगल रिफॉर्ससंबंधी होती. लॉ कमिशनच्या अनेक सूचना केंद्र व राज्य शासनाकडे प्रलंबित आहेत. विधी आयोगाच्या सूचना नुसार आपण कोणकोणत्या कायद्यामध्ये बदल करू इच्छित आहोत अशा प्रकारचा आराखडा निश्चित केला तर त्या मधून काही तरी तथ्य निघेल. अन्यथा प्रत्येक वेळेला हाताला पट्टी, पायाला पट्टी, डोक्याला पट्टी, डोळ्याला पट्टी, जेथे गरज पडली आहे तेथे पट्ट्या मारत चाललो आहोत, अशी अवस्था होईल. त्यामुळे आपल्या कायद्याला अतिशय विद्रूप स्वरूप देतो की काय, अशी मला शंका वाटते. त्यामुळे या सर्व मुद्यांचाच विचार करावा असे मला वाटते. धन्यवाद.

.....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधान सभेने निवडलेले) : सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 8 वर बोलण्यासाठी मी उभा आहे. ग्रामीण भागामध्ये किती अडचण येते ते मी आपल्याला सांगणार आहे. पायाभूत सुविधेमध्ये संगणक, झेरॉक्स मशीन नसेल तर गुन्हेगाराला अडचणीचे होते. याचे कारण गुन्हेगाराने वरच्या कोर्टामध्ये, सेशन कोर्टामध्ये अपील करावयाचे असेल तर त्याला कागदपत्रे मिळण्यास अडचणीचे होते. कारण तेथील न्यायालयीन कार्यालयातर्फे किंवा क्लार्क हे बाहेरून झेरॉक्स काढत नाही. मग गोंदिया सेशन कोर्टामध्ये येऊन कागदांची झेरॉक्स काढावी लागते. यासाठी फार मोठा विलंब लागतो. त्यामुळे न्यायालय सुविधेमध्ये पायाभूत सुविधा अधिक मजबूत पाहिजे.

आपण म्हणता जलद गतीने न्यायालयाचा निर्णय झाला पाहिजे. आमगाव मध्ये एक केस झालेली आहे की, दीड महिना झाला त्या आरोपीला अद्यापर्यंत जामीन मिळत नाही. त्या पेक्षा गंभीर प्रकार गोंदिया जिल्ह्यामध्ये घडला होता. 700 पोते धान्य पकडले गेले होते. विभिन्न कारण दाखवून त्याला 15 दिवसात जामीन मिळाला होता. गुन्हेगार नसताना देखील त्याला गुन्हेगार ठरविण्यात आले असून अशा प्रकारे अडवणुकीचे धोरण ठरविणे योग्य नाही.

सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

शासनाच्या विधी व न्याय विभागाने या बाबतीत खऱ्या अर्थाने न्याय दिला पाहिजे. या प्रक्रियेमध्ये कागदपत्रांची फेर तपासणी करुन त्यामध्ये वारंवार विलंब लावला जात आहे. आरोपींनी एमसीआर घेऊन सुध्दा दीड महिन्याचा कालावधी लोटल्यानंतर त्यांना न्यायालयाकडून कोणत्याही प्रकारचा न्याय मिळत नाही. या विधेयकाच्या निमित्ताने पायाभूत सुविधा देत असतांना या सर्व गोष्टींमध्ये शासनाने लक्ष घातले पाहिजे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विधी व न्याय राज्यमंत्र्यांनी याठिकाणी मांडलेले हे विधेयक नवीन स्वरुपाचे नसून पूर्वीच्या असलेल्या विधेयकामध्ये सुधारणा करण्यासाठी मांडले आहे.

सभापती महोदय, मराठीत अशी एक म्हण आहे की, "शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये" परंतु कोर्टाशिवाय आता पर्याय शिल्लक राहिलेला नाही अशावेळी आपण कोर्टामध्ये जात असतो. ज्या कारणांसाठी हे विधेयक मांडण्यात आले आहे त्यामध्ये दाव्यांची प्रलंबित असलेली संख्या देण्यात आली आहे. या दाव्यांची वर्गवारी करीत असतांना त्यांचे मूल्य किती आहे याचा आधार म्हणून आपण वापर केला आहे. पूर्वी जी द्रव्य विषयक अधिकारिता 50 हजार होती ती आपण आता 1 कोटी रुपये केली आहे. याचा अर्थ त्यामध्ये असलेल्या आर्थिक भागापुरतीच आपण वर्गवारी केली आहे असे या विधेयकाच्या उद्देशावरुन थोडेसे मला सुचित होत आहे.

सभापती महोदय, दुसरे असे की, द्रव्य विषयक अधिकारिता 50 हजार वरुन 1 कोटींपर्यंत नेण्याचा हा प्रवास थोडा बाजूला ठेवला तर विधेयकाच्या पृष्ठ क्र. 2 वरील (3-अ) मध्ये म्हटले आहे की, "बौध्दिक मालमत्ताविषयक बाबी" याचा अर्थ, व्यापारचिन्हे,प्रकाशनाधिकार (कॉपीराइट), एकस्व (पेटंट), संकल्पचित्र व भौगोलिक निर्देश, वनस्पतींच्या प्रजाती आणि शेतकरी व वनस्पती लागवडदारांचे हक्क आणि संकलक परिपथ रेखांकन (रचनाकृती) यांच्याशी संबंधित दावे व दिवाणी प्रकरणे, असा आहे".मला वाटते की, गेल्या तीस चाळीस वर्षामध्ये अशाप्रकारचे नवीन विषय त्यांच्यावरील न्याय निवाडा होण्यासाठी आपल्यापुढे येत आहेत. यामध्ये एकस्व म्हणजेच पेटंटच्या कायद्यामधील रुपयांचे मूल्य लक्षात घेऊन जर आपण करणार असू तर ते न्यायाच्या दृष्टीने योग्य राहील की नाही अशी माझ्या मनामध्ये शंका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यानंतर 3 (ख) (क-1) मध्ये "पारसी विवाह व घटस्फोट अधिनियम, 1936 अन्वये उच्च न्यायालयास" या कलमामध्ये पारसी विवाहाबाबत स्पेसिफिक असा उल्लेख झालेला नसावा, त्यासाठी आपण हा उल्लेख केला असेल तर या देशामध्ये असलेला पारसी समूह किती संख्येमध्ये आहे, कमी संख्येत असलेल्या या समाजासाठी मुंबईच्या कायद्यामध्ये आपण सुधारणा करीत आहोत, ती करीत असतांना या अतिशय छोटया असलेल्या समूहामध्ये संपत्तीचे दावे असतात त्यादृष्टीने आपण या ठिकाणी मुद्दाम उल्लेख केला आहे असे मला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

सभापती महोदय, बऱ्याच माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतांना सांगितले की, यामध्ये दाव्यांची वर्गवारी करुन हायकोर्टावरील दाव्यांचा भार हलका करण्यासाठी खालच्या कोर्टामध्ये नेण्याचा आपण हा प्रयोग करीत आहात. हा प्रयोग करीत असतांना त्यांच्यासाठी सोयी-सुविधा आहेत की नाहीत हे पाहिले पाहिजे. आपण धरण बांधण्याचा जरी निर्णय घेतला तरी अगोदर पुनर्वसन त्यानंतर धरण अशाप्रकारचे धोरण आपण स्वीकारलेले असते. अशाप्रकारचे मोठया प्रमाणावरील खटले आपण खालच्या न्यायालयाकडे पाठविणार आहोत त्यावेळी आवश्यक असलेली पायाभूत सुविधांची पूर्तता किती प्रमाणात केली आहे, त्या पायाभूत सुविधांव्दारे हा दाव्यांचा भार पेलण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे की नाही याची तपासणी करुन नंतर हा भार त्यांच्याकडे सोपविणे अधिक इष्ट राहील अशाप्रकारचा एक विचार मला यामधून आपल्याला सूचित करावासा वाटतो.

या विधेयकातील तरतुदींमध्ये कॉपीराइटचा अधिकार आहे. प्रकाशनांच्या बाबतीत सांगू इच्छितो की, गेल्या काही वर्षातील मान्यवर साहित्यिकांना प्राप्त झालेले अधिकार किंवा त्यांच्याकडे असलेले स्वामित्व काही ठराविक वर्षाच्या कालावधीपुरतेच त्यांना बाळगता येते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . .. 17:25

श्री.हेमंत टकले . . . .

त्यानंतर ते सर्वांसाठी खुले होते.अशा पध्दतीच्या स्वामित्वाच्या प्रकाशनाच्या हक्कांचे खटले कै. वि.स.खांडेकरांपासून, कै.पु.ल.देशपांडे यांच्यापर्यंत झाले आहेत.गेल्याच महिन्यामध्ये त्यांच्यावरील "गोळाबेरीज" नावाचा जो सिनेमा प्रदर्शित झाला आहे, त्यातील कथेच्या हक्कावरुन भांडणे होत आहेत.

सभापती महोदय, यामध्ये दुसरा भाग असा आहे की, मुंबई ही चित्रपट नगरीचे माहेर घर समजली जाते. याठिकाणी अतिशय मोठ्या प्रमाणात सिनेमांच्या कथांचे हक्क, संगीताचे हक्क, गीतांचे हक्क यासंदर्भातील जे खटले आहेत, त्यामुळे आपण केवळ मूल्यावर आधारित अशी वर्गवारी न करता, संबंधितांच्या मूल्यांपेक्षा, इतर काही बाबी आहेत त्याचा विचार करुन हे खटले खालच्या कोर्टाकडे देत असताना त्याबाबत आपण एक साधक-बाधक विचार केला तर ते योग्य होईल असे वाटते. याठिकाणी विधेयकातील अनेक तरतुदींबाबत बोलता येईल. परंतु अशा प्रकारचे बिल आणून त्यामध्ये सुधारणा करणे हे आपल्याला आवश्यक होते आणि त्यादृष्टीने याठिकाणी हे विधेयक आणलेले आहे.परंतु त्यामध्ये पुढील काळामध्ये मूलभूत सुविधांच्या अभावी येऊ शकणाऱ्या काही संभाव्य अडचणी आहेत आणि त्या कायदेशीर अडचणी आहेत. त्यांचा सांगोपांग विचार करुन या विधेयकामध्ये अधिक काही आणता आले तर हे विधेयक अधिक समर्पक होईल असे मला वाटते. याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी जे सुधारणा विधेयक आणलेले आहे, त्याला मी समर्थन देतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

. . . .2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक -8 बाबत ज्या सुधारणा आणल्या आहेत, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचे खरोखर आभार मानतो. कारण त्यांनी येथे एक चांगले विधेयक मांडलेले आहे. "Intellectual Property Matters", म्हणजे आपण मराठीमध्ये त्याला बौध्दिक मालमत्ता विषयक बाबी म्हणतो. आजकाल आपण जो विचार करतो म्हणजे जर डोक्यामध्ये एखादा विचार आला तर त्यालाही आपल्याला कॉपीराईट करता येते किंवा रजिस्टर करता येते किंवा ट्रेडमार्क करता येते आणि ती इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी माझी स्वत:ची हक्काची प्रॉपर्टी होते. उदाहरण द्यावयाचे तर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब उभे राहून काही बोलले तर त्यावर त्यांचाच हक्क राहील आणि रहाणार आहे. जर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी तो विषय रजिस्टर्ड केला तर आम्हालाही सन्माननीय सदस्यांची परवानगी घेऊनच बोलावे लागणार आहे. This is an Intellectual Property. सध्या आपण यामध्ये थोडीशीच सुधारणा करीत आाहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी यामध्ये शेतकऱ्यांबद्दल, वनस्पतीबद्दल भरपूर सांगितले असून मी त्याच्या जास्त खोलामध्ये जात नाही. सन्माननीय सदस्य गो-मूत्रा बद्दल बोलले. गो-मूत्रा बद्दल जर्मनी आणि अमेरिका यांच्याकडे पेटंट आहेत. याबद्दल आपण ऐकलेले आहे, वाचलेले आहे. पण मी विधानसभेमध्ये स्वत: पाहिलेले आहे की, The Laws relating to Cyber Crimes and Intellectual Property are in-depth Laws. आपण याचा खोलात जाऊन विचार केला पाहिजे कारण हा आजच्या युगाचा कायदा आहे. हे दोन्ही कायदे आजच्या युगाचे कायदे आहेत. यामध्ये संधोधन करणे, विचार करणे किंवा याबाबत बोलणे किंवा यामध्ये आणखी सुधारणा करणे ही काळाची गरज आहे.

सभापती महोदय, याबाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले असून माझ्या काही सूचना आहेत. त्या मी थोडक्यात मांडणार आहे. माननीय मंत्री महोदय, श्री.भास्कर जाधव यांना सांगावयाचे आहे की, आपण नवीन कोर्ट एस्टॅब्लीश करीत आहोत. या अधिवेशनामध्ये जे बजेट सादर करण्यात आले त्यामध्ये काही कोर्ट सुरु करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. तसेच कोर्टाच्या इमारतींसाठी तरतूद करण्यात आलेली आहे त्याबाबतीत मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.पण आपल्याला केवळ कोर्टाची इमारत बांधून चालणार नाही तर ज्याप्रमाणे आपण कायद्यामध्ये संशोधन करतो त्याप्रमाणे आपल्याला काही मॉडर्नायझेशन करावे लागेल.तसेच मघाशी





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन . . ..

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की,आपल्याला सर्व महिती वेबसाईटवर दिसली पाहिजे. भारतामध्ये 122 कोटी लोकसंख्या आहे, महाराष्ट्रामध्ये 11 कोटी लोकसंख्या आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन ...

आपले सरासरी वय 25 वर्षे आहे. हे नवीन संगणक युग आहे. या लोकांना संगणक, मोबाईल, ई-मेल याचे चांगले ज्ञान आहे. त्या दृष्टीने मी सायबर क्राईम आणि इंटलेक्चुअल प्रॉपर्टीच्या संदर्भात शोध घेत होतो. त्यांच्या हिशेबाने जर आधुनिकीकरण केले तर ते योग्य होईल.

सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांकडून आणखी एक माहिती हवी आहे की ज्या हिशेबाने आपली लोकसंख्या वाढत आहे त्या हिशेबाने आपण किती न्यायालये वाढवित आहोत किंवा न्यायाधीशांची संख्या किती वाढवित आहोत ? मला सहसा कोर्टात जाण्याचे काम पडत नाही पण एकदा आमच्या जवळच्या लोकांच्या केसच्या संदर्भात एक महिन्यापूर्वी मी कोर्टात गेलो होतो. मी त्या ठिकाणी पाहिले की, कोर्टाच्या साईझ वेगवगळ्या असतात. डिस्ट्रीक्ट कोर्ट असेल, सेशन कोर्ट असेल किंवा खालचे न्यायाधीश असतील त्यांच्या कोर्टाच्या साईझ वेगवेगळ्या असतात. त्या ठिकाणी कोर्टाची खोली पंधरा बाय वीस फुटाची होती. बाकीच्या खोल्या त्यापेक्षा फार मोठ्या असतात. माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये लक्ष घालणे गरजेचे आहे. लोकसंख्येच्या हिशेबाप्रमाणे आपण कोर्ट आणि न्यायाधीशांच्या बाबतीत काय करणार आहात ? आज अनेक तरुण कायद्याचा अभ्यास करीत आहेत आणि वकील होत आहेत. त्या ठिकाणी वकिलांच्या बसण्याची व्यवस्था तसेच न्यायाधीशांची संख्या किती वाढविणार याकडे आपण लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, आपण कालबध्द कार्यक्रम करावयास पाहिजे. आपल्या कायद्यामध्ये तरतूद आहे की आपण केसेस कालबध्द पध्दतीने निकाली काढल्या पाहिजेत. प्रत्यक्षात किती केसेस कालबध्द पध्दतीने निकाली निघतात ? आपण आणखी एक कायदा करावयास पाहिजे किंवा कायद्यामध्ये आणखी एक सुधारणा करावयास पाहिजे. जसे लोकअदालतमध्ये हजारो लोक येतात. लोकअदालतमध्ये एखादा वकील गेला आणि त्यांनी जर एखादी केस लावून घेतली तर त्याला एखादा रिवार्ड किंवा मानसन्मान दिला तर ते योग्य होईल. ज्याप्रमाणे आपण शिक्षकांना जिल्हा परिषदेमार्फत सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देतो. महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार असतो. राष्ट्रपतींचा पुरस्कार असतो. त्याप्रमाणे जर आपण त्यांना पुरस्कार दिला तर जास्तीत जास्त लोक लोकअदालतमध्ये जाऊन आपली प्रकरणे निकाली लावून घेतील. अशा पध्दतीने आपण त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांना प्रोत्साहन देण्याच्या बाबतीत जर काही नवीन तरतूद आणली तर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. मनिष जैन ....

लवकरात लवकर प्रकरणे निकाली निघतील, असे मला वाटते.

सभापती महोदय, मघाशी या सभागृहात रस्त्यांच्या संदर्भात चर्चा झाली. अनेक सन्माननीय सदस्यांनी टोलच्या संदर्भात आपले विचार मांडले. आपला मोटार वाहन कायदा आहे. आपल्याकडे कंझ्युमर कोर्ट आहे त्याप्रमाणे जर आपण एमएसईटी या कायद्यामध्ये विशिष्ट कोर्ट निर्माण केले तर ते योग्य होईल. त्यामध्ये सेवानिवृत्त न्यायाधीश असू शकतात, सिनियर ॲडव्होकेट असू शकतात, सिनियर सिटिझन्स असू शकतात. असे अनुभवी लोक त्यामध्ये असू शकतात. आपल्याकडे मोटार वाहन कायदा तसेच भूसंपादनाच्या संदर्भात काम असते, एमसीआरचे काम असते, कलम 138 च्या केसेस असतात. आता व्यापारीवर्ग मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. महाराष्ट्र शासन तसेच केंद्र शासन सांगते की, कायदेशीर कामे करा. चेक बाऊंस होण्याच्या केसेस किंवा व्यापाऱ्यांच्या कलम 138 च्या केसेसची संख्या खूप वाढत आहे. त्यांचे निकाल प्रलंबित राहण्याची संख्या खूप वाढत आहे. याकडें आपण लक्ष दिले पाहिजे. आज आपल्याकडे मेट्रोपोलिटन शहरामध्ये कलम 138 च्या संदर्भात वेगवेगळे बेंचेस आहेत, वेगवेगळे न्यायाधीश आहेत. त्या ठिकाणी न्यायाधीश न्याय देतात पण जिल्हा पातळीवर ही तरतूद नाही. तालुक्याच्या ठिकाणी ही व्यवस्था करावी अशी अपेक्षा मी करीत नाही परंतु मेट्रोपोलिटन शहराच्या बरोबर जिल्हा पातळीवर जर आपण कलम 138 च्या बाबींमध्ये लक्ष घातले तर योग्य होईल. कारण हा खूप मोठा विषय आहे.

सभापती महोदय, एमसीआरचा फार मोठा विषय असतो. त्या ठिकाणी ज्याला आपण मॅजिस्ट्रियल कस्टडी म्हणतो किंवा एमसीआरच्या विषयामध्ये जे आरोपी असतात ते जामीन घेतात, जामिनासाठी पुढची तारीख घेतात. तारीख घेण्यासाठी त्यांना कोर्टात हजर राहावे लागते. त्या ठिकाणी सकाळपासून संध्याकाळपर्यंत थांबावे लागते. ते न्यायाधीश महोदयांकडे जात नाहीत. त्या ठिकाणी न्यायाधीशासमोर न जातात कारकूनच त्यांना पुढची तारीख देतो. त्या कारकून महाशयांचा स्वत:चा काही हिशेब असतो, काही देवाणघेवाण असते. 100 रुपये, 500 रुपये कमविण्यासाठी तो त्यांना सकाळपासून संध्याकाळपर्यंत बसूवन ठेवतो. त्या बाबतीत जर सकाळी 11.00 ते 12.00 किंवा 12.00 ते 2.00 अशी वेळेची मर्यादा ठरवून दिली तर ते योग्य होईल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन....

प्रत्येक जिल्हा न्यायालयामध्ये लोकांसाठी वेळेचे नियोजन करणे आवश्यक आहे. लोकांना न्यायालयामध्ये वारंवार जावे लागते ते टाळता येईल.

सभापती महोदय, मोटार वाहन ॲक्टसंबंधी मी बोलणार आहे. काही श्रीमंत लोक रात्रीच्या वेळी मोठ्या शहरांमध्ये नशेत गाडी चालवितात. या लोकांकडून रात्रीच्या वेळी बेदरकारपणे गाडी चालविल्यामुळे अपघात होतो. त्या अपघातात झोपडपट्टीत राहणाऱ्या किंवा रस्त्यावर झोपणाऱ्या लोकांचे प्राण जातात, काही लोक गंभीर जखमी होतात. असे प्रकार शहरांमध्ये वारंवार होत असल्याचे वाचनामध्ये येते. सध्याच्या कायद्यानुसार संबंधितास शासनाकडून 50 हजार रुपयांची तातडीने मदत केली जाते. परंतु प्रकरण कोर्टामध्ये 4-5 वर्षे चालू राहिल्यामुळे या लोकांना उर्वरित 3-4 लाख रुपयांची मदत मिळण्यामध्ये विलंब होतो. रस्त्यावर झोपलेल्या माणसाला अपघात झाल्यास त्याला तातडीची मदत म्हणून शासनाकडून 50 हजार रुपये दिले जातात. ही रक्कम त्याचे वकील लगेच घेऊन टाकतात. त्यामुळे त्याच्या हातामध्ये काहीच रक्कम शिल्लक रहात नाही. त्यामुळे अशा प्रकरणातील लोकांना अधिकाधिक मदत देण्याची कायद्यात तरतूद केली पाहिजे, त्याचप्रमाणे त्यांना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. या लोकांना 4 वर्षानंतर मदत मिळते. परंतु दरम्यानच्या काळात शासनाने त्यांना योग्य ती मदत केली पाहिजे. रस्त्यावर राहणाऱ्या लोकांना 4 वर्षांनी नुकसान भरपाई मिळत असल्यामुळे त्यांची स्थिती अत्यंत दयनीय होते. या मुद्याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे.

सभापती महोदय, या विधेयकाला अनुसरुन अनेक मुद्दे आहेत. परंतु मी व अनेक सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत मंत्री महोदयांचे उत्तर ऐकावयाचे असल्यामुळे मी माझे भाषण येथेच थांबवितो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण येथेच थांबवितो.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 8, मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) या विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी व या विधेयकावर केवळ मुद्दे मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, हायकोर्टामध्ये केसेस चालतात त्याची माहिती इंटरनेटच्या व एनआयसीच्या माध्यमातून संबंधितांना समजते. त्याच धर्तीवर जिल्हा व तालुका पातळीवरील कोर्टातील प्रकरणांची माहिती एनआयसीच्या माध्यमातून उपलब्ध झाली तर पक्षकारांना त्याचा फायदा होऊ शकतो. न्यायालयांची संख्या वाढविणे, कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणे हे मुद्दे आहेत. परंतु काही न्यायाधीशांना स्वतःच्या हाताने निकाल लिहावा लागतो. त्यांच्याकडे लघुलेखक नाहीत. आता ग्रामपंचायत स्तरावर संगणकीय व्यवस्था सुरु होत आहे. त्यामुळे तालुका व जिल्हा पातळीवरील कोर्टातील माहिती एनआयसीच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिली नाही तर पक्षकारांवर तो अन्याय होईल. ही व्यवस्था शासनाने जरुर करावी. आपण न्यायालयातील प्रोसिजर बदलू शकत नाही, पण सिस्टिममध्ये बदल करण्याचा आपल्याला अधिकार आहे, त्याचा वापर शासनाने करावा अशी विनंती करतो आणि येथेच थांबतो.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले वि.स.वि.क्रमांक 8 मंजूर करण्यासाठी या सभागृहासमोर ठेवण्यात आलेले आहे. विधानमंडळाला कायदेमंडळ असेही संबोधले जाते. ज्याप्रमाणे या विधिमंडळात अन्य विषयांवर जास्तीत जास्त चर्चा व्हावी असे अपेक्षित असते त्याप्रमाणे एखाद्या कायद्याबाबत सुधारणा करीत असताना किंवा नवीन कायदा मंजूर करीत असताना त्यावर दोन्ही बाजूने सखोल व साधकबाधक चर्चा झाली पाहिजे. सर्वसमावेशक, सुदृढ व समाजाला न्याय देणारा तो कायदा असावा अशा प्रकारची अपेक्षा असते.

आज या विधेयकावरील चर्चेला या सदनाचे ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सुरुवात केली. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, भगवान साळुंखे, ॲड.उषाताई दराडे, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, डॉ.नीलमताई गोऱ्हे, सर्वश्री हेमंत टकले, मनिष जैन, रमेश शेंडगे यांनी देखील चर्चेत भाग घेतला आहे. आणखी काही सन्माननीय सदस्यांना या चर्चेत भाग घ्यावयाचा होता. परंतु ज्यांना बोलण्याची संधी मिळाली आहे, त्यांच्या भाषणातून अनेक मुद्दे आले असल्यामुळे अनेक सन्माननीय सदस्यांनी सहकार्याची भूमिका घेतली आहे. ते सन्माननीय सदस्य उत्तर ऐकण्यासाठी उपस्थित आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जे मुद्दे उपस्थित केले त्याबाबतीत सर्वप्रथम खुलासा करणे आवश्यक आहे. मला पहिल्यांदा हे सांगितले पाहिजे की, हा कायदा संपूर्ण महाराष्ट्राकरिता नाही. हा कायदा फक्त मुंबई शहरापुरता आहे. मी माझ्या प्रास्ताविकामध्ये सांगितले होते की, ही जी बंदरावरची शहरे आहेत, मग त्यामध्ये मद्रास असेल, मुंबई असेल, कोलकत्ता असेल या शहरातील त्यावेळच्या व्यापार, उद्योग इत्यादी गोष्टींचा विचार करुन 1862 साली वसलेल्या या शहरांच्या आर्थिक बाबींच्या संदर्भातील प्रकरणांचा न्यायनिवाडा करण्यासाठी 1947-48च्या दरम्यान कायदा करण्यात आला. त्यावेळी 10 हजार रुपयाच्या आर्थिक मर्यादेचे अधिकार देण्यात आले होते. या मर्यादेत 1977 आणि 1987मध्ये बदल करण्यात आले. त्यावेळी जमशेद नावाच्या गृहस्थाने त्यास विरोध केला आणि 1992 पासून अंमलात येणारा कायदा उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या चक्रव्यूहात अडकून पडला. मागच्या वेळी आपण जो कायदा केला होता त्या कायद्यांतर्गत मुंबईच्या बाहेर जी दिवाणी न्यायालये आहेत, जिल्हा न्यायालये आहेत त्यांचे अधिकार 1 लाखावरुन 5 लाखापर्यनत आणि 2 लाखावरुन 10 लाखापर्यन्त केल्यामुळे लोकांना चांगल्या प्रकारे न्याय मिळाला. जवळ जवळ 35 हजार दावे खालच्या कोर्टात वर्ग झाले. मुंबईमध्ये चकरा मारण्यामध्ये जो वेळ आणि खर्च वाया जात होता तो वाचला. लोकांना आर्थिक भूर्दंड पडला नाही. लोकांना त्यामुळे फायदाच झाला. त्यावेळी एकूण 40 लाख प्रकरणे खालच्या कोर्टात आली. या प्रकारे मुंबई उच्च न्यायालयातील 1 कोटी पर्यन्तचे दावे मुंबई दिवाणी न्यायालयाला चालविण्यास दिले तर उच्च न्यायालयाकडून दिवाणी न्यायालयाकडे 35 हजार प्रकरणे येतील.

सभापती महोदय, हे करीत असताना न्यायधीश किती आहेत, पायाभूत सुविधा किती आहे असे प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारले. उच्च न्यायालय वगळता संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जिल्हा आणि दिवाणी न्यायालयामध्ये न्यायाधीशांची 2053 पदे आहेत. त्यापैकी 100च्या आसपास पदे रिक्त आहेत. बाकीची सर्व पदे भरलेली आहेत. दिवाणी कोर्टामध्ये न्यायाधीशांची मंजूर पदे 87 असून त्यापैकी 64 पदे भरलेली आहेत. म्हणजे मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त आहेत अशातला भाग नाही.

..2..



श्री. भास्कर जाधव...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काही सन्माननीय सदस्यांनी मूलभूत सुविधांचा प्रश्न उपस्थित केला. मला हे सांगितले पाहिजे की, आपण मूलभूत सुविधांसाठी गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणावर पैसे खर्च केलेले आहेत. तसेच या वर्षासाठी केन्द्र आणि राज्य सरकारने जवळ जवळ रु. 233 कोटीची तरतूद इमारती दुरुस्तीसाठी, न्यायाधीशांच्या निवासांच्या दुरुस्तीसाठी आणि अन्य गोष्टीसाठी केलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 17:45

श्री. भास्कर जाधव...

यामध्ये राज्य सरकारने 167 कोटी रुपये आणि केंद्र सरकारने 132 कोटी रुपये अशा प्रकारे जवळ जवळ 262 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये एकूण 204 कामांचा समावेश करण्यात आलेला आहे. चांगल्या प्रकारची व्यवस्था करण्याचे काम आज राज्य सरकारच्या मार्फत केले जात आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी या ठिकाणी सांगितले की, मराठीतून न्यायनिवाडा झाला पाहिजे. परीक्षा मराठीतून दिल्या जात नाहीत. फक्त सर्टिफिकेट जोडले की, तुम्हाला मराठी भाषा येते यासंबंधी त्यांनी काही उदाहरणे दिली, त्याचप्रमाणे क्रीडा विभागाकडून आणि शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांना ग्रेस मार्कस् दिले जातात त्याबाबतच्या देखील काही उदाहरणांचा उल्लेख केला. या संदर्भात मी माहिती प्राप्त करुन घेतली आहे. ती माहिती चुकीची असेल तर ती दुरुस्त करुन घ्यावी लागेल. त्यांना कोणत्याही परिस्थितीमध्ये मराठी लिहिता आले पाहिजे, मराठी बोलता आले पाहिजे, मराठी या विषयाची काही गुणांची परीक्षा देणे हे त्यांना निश्चितपणे बंधनकारक आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी 35 हजार दावे दिवाणी कोर्टाकडे वर्ग करणार असाल तर हायकोर्टाकडे काही काम शिल्लक राहील किंवा नाही अशी शंका उपस्थित केली. हायकोर्टात फक्त पाच हजारच प्रकरणे राहतील काय अशीही शंका त्यांनी व्यक्त केली. परंतु ते तसे नाही. 1 कोटीपर्यंतच्या अधिकाराचे दावे दिवाणी कोर्टाकडे वर्ग केले जाणार आहेत. दिवाणी न्यायालयाकडे असे दावे वर्ग केले तरी हायकोर्टाकडे आजच्या तारखेला 2 लाख 2 हजार 408 दावे हे पेंडींग राहतील. सिटी सिव्हील कोर्टाकडे या प्रकरणांची जी पेंडन्सी आहे, ती प्रकरणे एकंदरीत 23 हजार 825 एवढी आहेत. तसेच या राज्यात किती जुन्या केसेस पेंडींग आहेत या अनुषंगाने देखील सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले. 10 वर्षापूर्वीची 2010 पर्यंत 4 लाख 43 हजार प्रकरणे पेंडींग होती. त्याच्यापैकी 2 लाख 41 हजार एवढी प्रकरणे निकाली काढण्यात आली आणि 31.12.2012 पर्यंत 2 लाख 1 हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. पाच वर्षापर्यंतचे जे दावे होते, ते 2010 पर्यंत 8 लाख 73 हजार प्रकरणे पेंडींग होती. परंतु 31.12.2011 पर्यंत 4 लाख 66 हजार प्रकरणे निकाली काढण्यात आली आणि सद्य:स्थितीत 4 लाख 8 हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. राज्यातील एकूण प्रकरणे बघितली तर 30.6.2010 पर्यंत

2...

श्री.भास्कर जाधव.....

41 लाख 34 हजार प्रकरणे न्यायालयांकडे प्रलंबित होती. परंतु त्यामध्ये आणखी त्याचवर्षी 31.12.2011 पर्यंत 31 लाख 7 हजार नवीन प्रकरणे न्यायालयांकडे दाखल झाली आहेत. त्यावर्षी 30.7.2010 ते 31.12.2012 पर्यंत 39 लाख 66 हजार प्रकरणे निकाली काढण्यात आली. तरी सुध्दा 31.12.2011 पर्यंत 32 लाख 76 हजार प्रकरणे न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. प्रत्येक वर्षाच्या प्रकरणांचे आकडे देखील माझ्याकडे उपलब्ध आहेत. परंतु ती आकडेवारी देऊन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सावकारी कायद्याबद्दल काही प्रश्न या ठिकाणी उपस्थित केले. त्यांनी जे म्हणणे मांडले ते खरे आहे. सरकारने सावकारीच्या संबंधीचे विधेयक सभागृहात 2010 या वर्षी मांडले. ते विधेयक या सभागृहात मंजूर झाल्यापासून ते केंद्र सरकारकडे पेंडींग आहे. हे विधेयक केंद्रीय गृह मंत्रालय, केंद्रीय वित्त विभाग दिल्ली यांच्याकडे दिनांक 28.10.2011 रोजी मंजुरीसाठी पाठविले. या विभागांनी सदर विधेयकाच्या बाबतीत काही अभिप्राय मागविले होते. राज्य शासनाने दिनांक 2.12.2011 रोजी या विधेयकातील त्रुटींची पूर्तता करुन सदर अभिप्राय त्या विभागाकडे पाठविले आहेत.

यानंतर श्री. भोगले....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...........

त्यानंतर हे प्रकरण वित्त मंत्रालयाच्या अभिप्रायासाठी दिनांक 7.12.2011 रोजी राज्य शासनाकडे पाठविण्यात आले होते. राज्य शासनाच्या अभिप्रायासंदर्भात प्रलंबित असल्यामुळे दिनांक 19.1.2012 रोजी पुन्हा त्या संदर्भात संबंधितांकडे स्मरणपत्र पाठविण्यात आले होते. आता हे प्रकरण केंद्राकडे प्रलंबित आहे. त्यांनी काही कंप्लायन्स करुन मागविले होते, ते दिलेले आहेत. ते विधेयक सहकार विभागाने पारित करावयाचे आहे. विधी व न्याय विभागामार्फत निश्चितपणे पाठपुरावा करु.

सभापती महोदय, प्रकरणे निकाली कशी निघतील असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. आहे हीच व्यवस्था आणि या व्यवस्थेचे आर्थिक अधिकार वाढविण्यामुळे फार काही अडचणी येतील असे मला वाटत नाही? शासन कायदा करणार आणि रुल्स हायकोर्ट करणार का? असा प्रश्न माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी उपस्थित केला आहे. तसेच नवीन दिवाणी न्यायालय मुंबईबाहेर स्थापन करण्याची सूचना देखील त्यांनी केलेली आहे. आता जिल्हा पातळीवर व तालुका पातळीवर देखील दिवाणी न्यायालये अस्तित्वात आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी चार्जशीट किती दिवसात दाखल करावी याचे नियम असले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली. माझ्या माहितीप्रमाणे नियम निश्चितपणे असतात. ठराविक वेळेत चार्जशीट दाखल केली नाही तर लॅप्स होते म्हणून पाच वर्षे चार्जशीट दाखल केली नाही असे जे वक्तव्य केले ते कितपत योग्य आहे हे समजून घेण्याची गरज आहे. दुसरा एक मुद्दा त्यांनी मांडला आहे तो म्हणजे आदल्या दिवशी बोर्डावर पाचव्या नंबरवर प्रकरण असताना चार प्रकरणांची सुनावणी झाली असल्यास दुसऱ्या दिवशी पाचव्या क्रमांकाचे प्रकरण पहिल्या नंबरवर आले पाहिजे. ही पध्दत समजून घेऊन त्यावर भाष्य केले पाहिजे. माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर असले तरी त्यावर भाष्य करणे तितकेसे बरोबर वाटत नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी हायकोर्टाचे खंडपीठ कोल्हापूर येथे स्थापन करावे अशीही मागणी केली आहे. या संदर्भात अनेक वर्षे पाठपुरावा सुरु आहे असेही त्यांनी सांगितले. ते खंडपीठ पुणे येथे स्थापन करायचे आहे हा विषय नाही. खंडपीठ स्थापन करणे आजच्या स्थितीत अवघड आहे. ते शक्य आहे असे वाटत नाही. हा विषय यापूर्वीच नाकारला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...........

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी सांगितले की, ज्या प्रकरणांची सुनावणी झालेली आहे ती प्रकरणे हस्तांतरित करु नयेत. हा अतिशय चांगला मुद्दा आहे. इश्यू फ्रेम केलेले नसतील अशीच प्रकरणे हस्तांतर करावीत अशीही त्यांनी सूचना केली आहे. निश्चितपणे तशी प्रकरणे हस्तांतरित केली जातील. ज्या प्रकरणांची सुनावणी झाली आणि जी प्रकरणे न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत अशी प्रकरणे हस्तांतरित केली तर पुन्हा नवी विटी, नवा दांडू असा प्रकार होईल. म्हणून कलम 18 नुसार त्या प्रकरणांचा निपटारा त्याच ठिकाणी केला जाईल. प्रस्तुत सुधारणांची अंमलबजावणी करताना अडचण आली तर कलम 7 मध्ये तरतूद ठेवली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी बीड जिल्हयातील न्यायालयाला रक्कम मंजूर करावी अशी सूचना केली आहे. माझ्याकडे आकडेवारी उपलब्ध आहे. 3.27 कोटी रुपये एका प्रकरणात आणि 37 लाख रुपये दुसऱ्या एका प्रकरणात मंजूर केलेले आहेत. आकडेवारी चुकीची असेल तर दुरुस्त करता येईल. परंतु निश्चितपणे अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी न्यायालयाच्या कामात राजकारणी हस्तक्षेप करतात असे म्हटले. कुठे हस्तक्षेप होतो? तसे काही होत नाही. राजकारण्यांचा हस्तक्षेप आहे म्हणून बिल आणले असे झालेले नाही.

नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी शिक्षकांचा विषय सोडून विचार मांडल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारले आहे की, सुप्रीम कोर्टाच्या ऑर्डर प्रमाणे सोयी सुविधा निर्माण करण्याकरिता किती खर्च करण्यात आलेला आहे ? हायकोर्टाला ज्या सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या त्याबाबत शासनाने प्रतिज्ञापत्र दिल्यामुळेच हायकोर्टाने हा कायदा करण्याची मान्यता दिलेली आहे. कोणती प्रकरणे ट्रान्स्फर होतील त्याचे स्पष्टीकरण विधेयकामध्ये देण्यात आलेले आहे. वर्णमाला व व्यंजनाच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उल्लेख केलेला आहे. वर्णमाला आपण एबीसीडी या प्रमाणे करतो परंतु व्यंजनामध्ये त्याचा क्रम चुकतो याचा पहिला अनुभव मला नागपूरच्या अधिवेशनामध्ये आलेला आहे. ही चूक नेमकी कशामुळे झाली यासंदर्भात आम्ही निम्मी रात्र विचार करीत बसलो होतो. जी चूक झाली होती त्यासंदर्भात चांगल्या चांगल्या अधिकाऱ्यांना सुध्दा सांगता येत नव्हते. मराठी आणि इंग्रजीमध्ये अल्फाबेटीकल चूक होऊ शकते. मराठी आणि इंग्रजी विधेयकामध्ये दोन ठिकाणी व्याकरण दृष्टया चूक झाली असून यामध्ये निश्चितपणे सुधारणा केल्या जातील. मराठी आणि इंग्रजी शब्दामध्ये जो अल्फाबेटीकली फरक येतो त्याचा सुवर्णमध्य काढण्याची आवश्यकता असून तो सुवर्णमध्ये निश्चितपणे काढला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी स्वामित्वाचे खटले वेळेवर निकाली निघाले पाहिजे असे सांगितले असून खटले वेळेवर निधण्यासाठीच या ठिकाणी हे विधेयक आणले गेलेले आहे एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, माझे मित्र श्री. मनिष जैन यांनी प्रत्येक केसचा निकाल टाईम बाऊंड लागला पाहिजे अशी सूचना केलेली आहे. लोकशाहीमध्ये जे 4 स्तंभ आहेत ते 4 स्तंभ राज्यकर्त्यांना नेहमी उपदेश करीत असतात, मार्गदर्शन करीत असतात, कोण कोण आदेश देतात, कोण कोण आमचे निर्णय रद्दबातल ठरवितात. राज्यकर्त्यांना केवळ सूचनाच ऐकण्याचे काम करावे लागते व त्या मान्य कराव्या लागतात. परंतु आम्हाला मात्र तशा प्रकारच्या सूचना देता येत नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

आम्ही कोणाच्या तरी अधिकारावर अधिक्षेप केला अशा प्रकारचा आरोप राज्यकर्ते म्हणून आमच्यावर केला जातो परंतु लोकशाहीमध्ये आमची चार स्तंभाकडून अपेक्षा आहे की, परस्पर प्रत्येकाने प्रत्येकाचा सन्मान राखला पाहिजे, प्रत्येकाने प्रत्येकाच्या अधिकार कक्षेमध्ये हस्तक्षेप करु नये ही जी अपेक्षा आहे ती चारही स्तंभाने पाळली तर निश्चितपणे लोकशाही सुदृढ होऊ शकेल व आपण म्हणता त्या प्रमाणे परस्पर व्यवस्था होईल असे माझे मत आहे.

सभापती महोदय, पारशी विवाह व घटस्फोटीताबद्दल सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. पारशी विवाह व त्यांच्या घटस्फोटाच्या संदर्भात 1936 च्या विधेयकात तरतुदी करण्यात आल्या होत्या. पारशी लोकांचा विवाह व घटस्फोटाच्या संदर्भात नियम आणि कायदे वेगळे आहेत त्यामुळे विधेयकात तसा अंतर्भाव आलेला आहे. मुंबईतील दिवाणी कोर्टात पारशी लोकांच्या संदर्भात काम कराल परंतु बाहेरच्या कोर्टात काय कराल ?असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेबांनी विचारला आहे. यासंदर्भात मुंबई सोडून बाहेर सुध्दा दिवाणी कोर्ट सुरु झालेले आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. हे विधेयक चांगल्या विचाराने आणले असून न्याय व्यवस्थेमध्ये शासन नवीन नवीन चांगले बदल घडवित आहे, सोयी सुविधा देत आहे.

सभापती महोदय, हातामध्ये कागद घेऊन मला चांगले विचार मांडण्यामध्ये अडचण निर्माण होत असते. माझ्या माहिती प्रमाणे डिस्ट्रीक्ट लेव्हल पासून ते दिवाणी न्यायालयामध्ये 2053 न्यायाधीश आहेत परंतु त्यामध्ये 100 न्यायाधीश कमी आहेत. उच्च न्यायालयामध्ये एकंदरीत 87 न्यायाधीश आहेत परंतु प्रत्यक्षात 64 न्यायाधीशांचीच नेमणूक करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ जुन्नरे.. 18:00

श्री.भास्कर जाधव..

त्यामुळे बाकीच्या जागा भरण्याकरिता एमपीएससीकडून परवानगी मिळाली आहे. हे विधेयक सर्वसमावेशक आहे. जिल्हा पातळीवरची माहिती एनआयसीद्वारे संकेतस्थळांवर द्यावी अशी सूचना सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी केली आहे. निर्णयासंबंधीची माहिती संकेतस्थळावर टाकण्यासंबंधाची सूचना चांगली आहे. आपण दिवसेंदिवस संगणकीकरण करत आहोत. आपण इ-गव्हर्निंग सिस्टीम स्वीकारली आहे. त्यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने आमचा विभाग प्रयत्नशील आहे.

येथे सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांनी रिवॉर्डसंबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. मला आठवते की, राज्यामध्ये एकाच दिवशी एकाच वेळी लोक न्यायालय अदालतचा कार्यक्रम घेतला होता. त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. मला वाटते की, त्या दिवशी 2 लाख प्रकरणे एकाच दिवशी निकालात निघाली. त्यामुळे रिवॉर्ड वगैरे काही नको. आपण मॉर्निंग कोर्ट, इव्हीनिंग कोर्ट, फास्ट ट्रॅक कोर्ट सुरू केलेले आहे. एवढेच नव्हे तर नवनवीन न्यायालये स्थापन करीत आहोत. दहा लाख नागरिकांसाठी 50 न्यायाधीश असावेत असा एक नियम आहे. पण त्यात सुधारणा झाली आहे. पूर्वी आपण 45 दिवस आधी प्रश्न देत होतो. आता तो कालावधी 30 दिवसांपर्यंत आणला आहे. कारण नवनवीन तंत्रज्ञान अवगत केले आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करून झटपट न्याय देण्याच्या दृष्टीने आपण ज्या अनेक उपाययोजना करीत आहोत त्यापैकी ही एक आहे. जेणेकरून हे दावे लवकरात लवकर निकालात निघतील, अशा प्रकारचे हे विधेयक आहे. या विधेयकाच्या चर्चेमध्ये सर्वांनी अत्यंत चांगल्या प्रकारे सहभाग घेतला आहे. मार्गदर्शन केले. यामध्ये दोन-तीन गोष्टी साध्य होतात. आमच्या सारख्याने वाचलेल्याच्या पलीकडे इतर माहिती मिळते. ती माहिती आत्मसात केली जाते.

न्यायालयाचे कामकाज मराठीतून करण्यासंबंधीच्या मुद्याची मी माहिती घेतली. हायकोर्ट वगळता त्याच्या खालील जी कोर्ट आहेत त्यामध्ये साधारणपणे 42 टक्के मराठीकरण झाले आहे. याची गती अधिक वाढवली पाहिजे, ही गोष्ट खरी आहे. जिल्हा पातळीवर न्यायनिवडा मराठीतूनच व्हावा याकरिता अधिकच प्रयत्न करू या. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा यासंबंधी सातत्याने पाठपुरावा आहे तो खरोखर गौरवास्पद आहे. मी कौतुकास्पद म्हणणार नाही. या

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव..

सरकारी कामामध्ये आपला निश्चितच वाटा आहे. आपण अशा पद्धतीने पाठपुरावा केला, अधिक योगदान व मार्गदर्शन केले आणि आपला रेटा शासनाच्या पाठीमागे लागला तर यातील गती अधिक वाढेल अशा प्रकारचा विश्वास देऊन आपण सर्वांनी हे विधेयक एकमताने मंजूर करावे अशी आग्रहाची विनंती करून मी येथेच थांबतो.

**उप सभापती** : झटपट न्याय मिळण्याच्या दृष्टीने आता आपण हे विधेयक झटपट मंजूर करू या.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 7 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 8 एकमताने संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 8 एकमताने संमत झाले आहे.

.....

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**उप सभापती** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ सायंकाळी 6.45 वाजेपर्यन्त वाढविण्यात येत आहे.

-----

**पृ. शी.** : 22 फेब्रुवारी 2012 रोजी पुणे शहरातील जुना बाजार झोपडपट्टीला लागलेली आग

**मु. शी.** : 22 फेब्रुवारी 2012 रोजी पुणे शहरातील जुना बाजार झोपडपट्टीला लागलेली आग यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प.स. यां□ उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□□□म 92 अ□ये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रते:-

" दिनांक 22 फेब्रुवारी 2012 रोजी पुणे शहरातील जुना बाजार झोपडपट्टीला मध्यरात्रीच्या सुमारास लागलेली आग, यात काही दुकाने, गोदामे व झोपडया खाक होणे, यातील जळीतग्रस्तांची पर्यायी व्यवस्था केली नसल्याने नातेवाईकांना शेजाऱ्यांकडे राहण्याची आलेली वेळ, त्यातच मुलांच्या परीक्षा आल्याने या झोपडपट्टीवासीयांचे होत असलेले हाल, पुणे शहरात अशाप्रकारे झोपडपट्टींना एसआरएसाठी जमिनी बळकाविण्यासाठी आगी लावण्याचे प्रकार अनेक ठिकाणी घडत असणे, अशा सर्व झोपडपट्टीच्या आगीची सीआयडीमार्फत चौकशी करण्याबाबत,तसेच या जळीतग्रस्तांना वस्तू स्वरुपात मदत करण्याचे आश्वासन देऊनही अद्यापपर्यन्त कोणत्याच प्रकारची मदत करण्यात न येणे, परिणामी त्यांच्यात पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या करिता शासनाने जळीतग्रस्तांच्या निवाऱ्याचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाय योजना"

सभापती महोदय, या अर्धा तास चर्चेच्या विषयासंबंधीची एक लक्षवेधी सूचना या सभागृहामध्ये चर्चेकरिता उपस्थित करण्यात आली होती. पुणे शहरातील जुना बाजार झोपडपट्टीला मध्यरात्री आग लागली या विषयावरील अर्धा तास चर्चा ठेवण्यामागील व्यापक हेतू असा की,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

लक्षवेधी सूचनेवरील चर्चेमध्ये धोरणात्मक विषयाबाबत सरकार काही तोडगा सुचवू शकते असे नाही. वेगवेगळया प्रकारे लागणाऱ्या आगींबाबत आपण विचार करावयास लागल्यानंतर असे स्पष्ट दिसते की, निवासी भागामध्ये लागणाऱ्या आगी त्याचबरोबर औद्योगिक वसाहतींच्या ठिकाणी लागणाऱ्या आगी या दोन्ही महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये येतात. काही वेळेला रस्त्यांवर वाहने उभी असतांना ती अचानक जळून खाक होणे, किंवा गॅसचे, पेट्रोल-डिझेलचे टँकर भस्मसात होणे अशाप्रकारच्या घटना घडतांना दिसतात. अशा सात प्रकारच्या आगी लागतात. त्यात शॉर्ट सर्किटमुळे लागलेली आग, गॅस लिकेजमुळे लागलेली आग, औद्योगिक वसाहतींमध्ये रासायनिक द्रव्यांनी पेट घेतल्यामुळे लागलेली आग, कारखान्यांमध्ये रासायनिक स्फोट झाल्यामुळे लागलेली आग असे प्रकार आहेत. या रासायनिक आगी विझविण्याकरिता वेगळया प्रकारची यंत्रसामग्री लागते ती ठराविक महानगरपालिकांकडे आणि औद्योगिक वसाहतींमध्ये उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे रस्त्यांवर किंवा महानगरपालिका क्षेत्रामध्ये लागत असलेल्या आगी विझविण्याकरिता महानगरपालिकांकडे आवश्यक असलेली उपाय योजना नसते. यामध्ये पेट्रोल, डिझेल, गॅसचे मोठे टँकर या वाहनांना आग लागल्यानंतर ती विझविण्यासाठी करावयाच्या कृती बाबत आवश्यक असलेल्या प्रशिक्षणाची कमतरता त्या ठिकाणी जाणवते. त्यामुळे महानगरपालिकेतील आग प्रतिबंधक उपाय योजना अधिक कार्यक्षम करण्याकडे आपला अधिक भर दिसून येतो.

या बाबत नगर विकास विभागाकडून अशी अपेक्षा आहे की, ज्यावेळी कुठेही आपत्ती निर्माण होते त्यावेळी रेस्क्यू ऑपरेशन मध्ये लोकांची तातडीने सोडवणूक करणे, त्यानंतर रिलिफ म्हणजे त्यांना दिलासा देणे, त्याचप्रमाणे त्यांचे पुनर्वसन करणे आणि त्यानंतर अशाप्रकारच्या दुर्घटना पुन्हा घडू नयेत याकरिता प्रतिबंधक योजना तयार करणे याकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, रेस्क्यू ऑपरेशनमध्ये आपण पहातो की, मुंबईमध्ये आग लागल्यानंतर मोठया इमारतीमधील लोकांची सोडवणूक करीत असतांना ते लोक घाबरुन वरुन उडया मारतात, त्यामध्ये काही मृत पावतात तर काही वाचतात. जेव्हा तिसऱ्या किंवा चौथ्या मजल्यावर आग लागते त्यावेळी तेथील लोकांनी आपली सोडवणूक कशाप्रकारे करुन घेतली पाहिजे या बाबत लोकांमध्ये जागृती आणण्याकरिता मोठया प्रमाणात काम करण्याची गरज आहे असे आपल्याला सातत्याने जाणवते. या

DGS/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

करिता शासनाकडून धोरणात्मक निर्णय होण्यासाठी मी काही महत्वाचे मुद्दे मांडू इच्छिते.

विविध महानगरपालिकांकडे आग प्रतिबंधक यंत्रणा आहे. आज महाराष्ट्रात जवळ जवळ 23 महानगरपालिका आहेत आणि नवीन 5 महानगरपालिका आहेत. तेथील प्रतिबंधात्मक असलेल्या यंत्रणांची तुलना करावयास लागलो तर अहमदनगर महानगरपालिकेकडे असलेले अग्निशमन दल व परभणी महानगरपालिकेकडे असलेले अग्निशमन दल....

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

( भाषण अपूर्ण - यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

व दुसऱ्या एखाद्या महानगर पालिकेतील अग्निशमन दल यामध्ये आपल्याला कमालीची तफावत आढळते. मुंबई सारख्या ठिकाणी अग्निशमन दलाचा जो परफॉर्मन्स् असेल तसाच पुणे येथे सुध्दा दिसतो असा अजिबात भाग नाही. किंबहुना बुरुड आळीमध्ये आग लागली त्याच्या अगोदर जेथे आग लागली होती तेथे काही त्रुटी दिसून आल्या आणि त्यावेळी सहा माणसे मृत झाली.

सभापती महोदय, त्यावेळी एक गोष्ट अशी दिसून आली की, अग्निशमन दलातील पदे रिक्त होती. विशेषत: अग्निशमन दलातील प्रमुख अधिकाऱ्याचे पद जवळजवळ एक वर्ष रिक्त होते. जर आपण नवीन पाच महानगरपालिका होतील असे गृहीत धरले तर साधारणपणे 28 महानगरपालिका, अनेक नगरपालिका आणि मग हळूहळू नगरपालिकांच्याही महानगरपालिका होतील. अशा प्रकारे शहरे वाढत चालली आहेत. तसेच जर एखाद्या ठिकाणी अग्निशमन दल अस्तित्वात नसेल तर आपण आग प्रतिबंधक आणि शमन यासाठी एक राज्य स्तरावरील ॲथॉरिटी निर्माण करावी आणि ही ॲथॉरिटी तयार करुन त्यामार्फत या सर्व महानगरपालिकांमधील सेवांचा दर्जा कसा चांगला करता येईल, त्याचबरोबर जर डिझॉस्टर मॅनेजमेंटच्या अंतर्गत निधी लागला, तसा तो लागणारच आहे तर त्यासाठी विशेषत: ड्रील करणे किंवा सामान्य नागरिकांचे प्रशिक्षण घेणे इ. कामे सातत्याने करणे हे गरजेचे आहे.तसेच सरकारी अधिकाऱ्यांच्या बरोबर त्या-त्या महानगर-पालिकांमधील अग्निशमन दलातील लोकांची गुणवत्ता कशी वाढविता येईल यासाठी संबंधित ॲथॉरिटीने मार्गदर्शन करणे किंवा अनुभवांची देवाण-घेवाण करण्याचे काम करावे असे मला सुचवावयाचे आहे. अशा पध्दतीची ॲथॉरिटी तयार करावी आणि त्यांच्यावर एकंदर तीन जबाबदाऱ्या असू शकतात. एक म्हणजे प्रशिक्षण करणे, दुसरे म्हणजे एकमेकांच्या मदतीसाठी प्रत्यक्षात कोण कुठे मदतीसाठी धावत जाऊ शकते हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय,विशेषत: रासायनिक आगीच्या संदर्भात सांगावयाचे तर मुंबईच्या जवळपास काही ठराविक ठिकाणी रासायनिक आगी विझविण्यासाठी सोयी आहेत. आज महाराष्ट्रातील सहा रिजनमध्ये महानगरपालिका आहेत. काही ठिकाणी फटाक्यांच्या कारखान्यांना आग लागते. उदाहरण द्यावयाचे तर जळगावला फटाक्यांच्या कारखान्याला लागलेल्या आगीमध्ये लहान मुले भस्मसात झाली. अशा पध्दतीने प्रत्येक महसूल विभागाकडे सुध्दा रासायनिक आगी आटोक्यात येण्यासाठी आपण काय करु शकतो यासाठी सुध्दा तेथे प्रशिक्षण केंद्रांचा उपयोग करता येईल असे मला वाटते. त्यामुळे पहिले प्रशिक्षण, दुसरे म्हणजे तेथील स्टाफचे ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट किंवा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

मनुष्यबळ संसाधन करणे आणि तिसरे म्हणजे जी अग्निशमन दल आहेत त्यांच्या साधनांचा दर्जा चांगला करणे. उदाहरणार्थ पुणे महानगरपालिकेची जी रेस्क्यु व्हॅन आहे त्याचा पत्रा तुटलेला आहे किंवा फायर एक्स्टींग्युशर्स म्हणजे आग विझविण्यासाठी जे फवारे असतात ते बऱ्याच वेळेला उघडतच नाहीत. ते कालबाह्य झालेले असतात. अशा वेळी या यंत्रणेची अचानक जाऊन तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्परिक्षण म्हणजे प्रशिक्षण, मनुष्यबळाची गुणवत्ता वाढविणे आणि साधनांचे परीक्षण करणे या तीन गोष्टी ही ॲथॉरिटी याबाबतीत करु शकते याकडे मला लक्ष वेधावयाचे आहे. त्याच बरोबर महानगरपालिकांमधील अग्निशमन दलातील पदे तीन महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त असतील तर आमच्याकडील पदे का रिक्त आहेत याबाबत त्यांना नगरविकास विभागाला त्याची कारणे द्यावी लागतील आणि ती कधीपर्यंत भरण्यात येणार आहेत हेही सांगावे लागेल. अन्यथा आपण स्वत:हून त्यांना विचारणा केली पाहिजे की, याठिकाणी काही पदे रिक्त आहेत काय आणि त्या अनुषंगाने आपण कोणती उपाययोजना करु शकता.

सभापती महोदय, माझे शेवटचे दोन मुद्दे असे आहेत की, बऱ्याच वेळेला वीज पडते. आपण त्याचा आगीमध्ये उल्लेख करीत नाही आणि वीज पडण्यावर काही बंधन नाही की ती अमुक एका महानगरपालिका क्षेत्रामध्ये पडेल किंवा पडणार नाही. उलट ज्या भागामध्ये ॲन्टीना ऊंच आणि मोठ्या आहेत तेथे सुध्दा वीज कोसळण्याचा प्रकार घडतो. म्हणून मला असे सुचवावयाचे आहे की, वीज पडू नये म्हणून विजेला रोखून धरेल असे रिॲक्टर्स् नवीन तंत्रज्ञानाने उभे करण्याचा विचार केला पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे लातूर येथील श्री.अतुल देऊळगावकर हे पर्यावरण तज्ज्ञ आहेत. त्यांनी याबाबतीत दैनिक लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये अनेक लेखमाला लिहिल्या आहेत की, साधारणपणे 15 हजार रुपयांमध्ये एका मोठ्या लोकसंख्येचे संरक्षण करेल असे रिॲक्टर्स्सुध्दा उभे करता येतात. तसेच छोट्या गावांमध्ये किंवा शहरांमध्ये झोपड्या जळतात. तेथे अचानक आग लागते. अशा वेळी सोलापूर येथील सामाजिक कार्यकर्ते श्री.अरुण देशपांडे आहेत. त्यांनी एक छोटेसे रसायन शोधलेले आहे.

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे (खाली बसून) : ते माझ्या मतदार संघामध्ये रहातात.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, त्या रसायनाची 25 ते 30 रुपये इतकी किंमत आहे. गरीब माणसाचीझोपडी बांधत असताना जो रंग देतात किंवा पाचटावर ते रसायन लावले तर आग प्रतिबंधक झोपडी तयार होऊ शकते. खरे म्हणजे मुळात झोपड्या बांधण्यात येऊ नयेत अशी जरी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

सरकारची भूमिका असली तरी शहरामध्ये सुध्दा झोपडपट्टी आहे. तेथे आग प्रतिबंधक अशा तंत्र इ ाानाचा उपयोग अतिशय कमी पैशामध्ये लोकांना स्वयंस्फूर्तीने कसा करता येईल आणि ग्रामीण भागामध्ये सुध्दा कशा पध्दतीने काम करता येईल.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

अशा प्रकारे आपण विचार करावा आणि या दृष्टीकोनातून एक आग प्रतिबंधक ॲथॉरिटी तयार करुन या सर्व मुद्यांसाठी दीर्घकालीन उपाययोजना केली तर ते योग्य होईल. ज्यावेळी अशा प्रकारच्या घटना घडतात आणि विशेषत: शहरांमध्ये प्लॉट्स रिकामे करुन घेण्यासाठी संशयास्पद पध्दतीने आगी लावल्या जातात हे आपणा सर्वांना माहीत आहे. ज्या ठिकाणी अनधिकृत झोपड्या आहेत त्या ठिकाणी मी समर्थन करणार नाही परंतु ज्या ठिकाणी लोक वर्षानुवर्षे राहात आहेत आणि थोडा जरी त्या ठिकाणी संशय वाटतो असा जर भाग असेल तर महानगरपालिकेने केलेल्या चौकशीच्या पलीकडे जाऊन राज्य सरकारने स्वत: सुध्दा त्याचा अहवाल मागविण्याची यंत्रणा कायम स्वरुपी उभी करावी याकडे मी या अर्धा-तास चर्चेव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, ही घटना पुणे येथील मंगळवार पेठेतील जुना बाजार येथे घडली आहे आणि त्या संदर्भातील लक्षवेधी सूचना सुध्दा सभागृहामध्ये आली होती. तरी देखील सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी या अर्धा-तास चर्चेला जी सुरुवात केली त्यामध्ये त्यांनी सांगितले की, यामध्ये शासनाला काही तरी धोरणात्मक निर्णय घेता येतील यादृष्टीने ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे आणि खरोखरच त्या विषयावरच त्यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे विवेचन आणि मतप्रदर्शन केले. त्यांनी केवळ हे केले नाही, ते केले नाही असे म्हणण्यापेक्षा उपाय देखील सुचविले. त्यांनी आगींचे वेगवेगळे प्रकार किंवा कोणकोणत्या कारणास्तव आग लागते, आग लागल्यानंतर ती विझवितांना कशा प्रकारच्या अडचणी निर्माण होतात, त्या अडचणी येत असताना कोठे कोठे कशा प्रकारची साधनसामुग्री अपुरी पडते आणि ती निर्माण कशी केली पाहिजे या संदर्भात एकंदरीत या अर्धा-तास चर्चेचा रोख आहे.

सभापती महोदय, यामध्ये दोन-तीन गोष्टी आहेत. एक म्हणजे वाढते शहरीकरण लक्षात घेऊन आज महानगरपालिकेकडे अग्निशमन दल आणि आग प्रतिबंधक उपायांकरिता लागणारी इक्विपमेंट्स बऱ्यापैकी आहेत. परंतु ज्या छोट्या छोट्या नगरपालिका आहेत त्यांना तशा प्रकारची सोय करणे आर्थिकदृष्टया न परवडणारे आहे. हे लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने गेल्या वर्षी 81 नगरपालिका अशा निवडल्या की ज्यांच्याकडे अशा प्रकारची सोय नाही त्यांना 90 लाख रुपयांचे एक युनिट अशा पध्दतीने 81 युनिट मंजूर केले. ते मंजूर करीत असताना त्या ठिकाणी आणखी एक अडचण निर्माण होते की, त्याकरिता कमीत कमी 6 लोकांचा स्टाफ पाहिजे. या विषयाशी संबंधित तो विषय नाही परंतु ते खाते सुध्दा माझ्याकडेच असल्यामुळे मी आपल्या माहितीकरिता सांगतो. त्यासाठी 6 लोकांचा स्टाफ निर्माण करावा लागतो. त्याची बाकीची व्यवस्था करण्याकरिता, वाहन घेण्याकरिता शासन पैसे देते परंतु त्यासाठी 6 लोकांचा स्टाफ निर्माण करावा लागतो, त्यांना प्रशिक्षण द्यावे लागते त्यामुळे काही नगरपालिकांना हे विषय परवडत नाहीत. त्यामुळे याला पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही.

दुसरी गोष्ट अशी की, ज्या भागामध्ये, ज्या तालुक्यामध्ये इंडस्ट्री आहे, कारखानदारी आहे त्या कारखानदारीमध्ये तशा प्रकारचा स्वत:चा एखादा फायर फायटर, त्या फायर फायटर बरोबर

...3...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

RDB/

डॉ. नीलम गोऱ्हे ......

तशा प्रकारचे प्रशिक्षित कर्मचारी किंवा पाण्याची व्यवस्था वगैरे असते. परंतु अशी किती तरी शहरे आणि गावे इतकी मागासलेली आहेत की, त्या ठिकाणी कोणतीही इंडस्ट्री नसते आणि फायर फायटींगची सोय सुध्दा नसते. असाही प्रकार लक्षात आलेला आहे. त्यामुळे शहरातून फायर फायटर जाईपर्यंत सगळे बेचिराख झालेले असते असे अनुभव येतात, ही गोष्ट खरी आहे. त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे.

काही तरुणांना, काही जवानांना त्याचे प्रशिक्षण देण्याच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, आपल्याकडे मुंबईच्या अग्निशमन दलाचे जे संचालक आहेत त्यांच्या अखत्यारीत दर सहा महिन्याने एक-एक बॅच प्रशिक्षण देऊन बाहेर काढतो. ते प्रशिक्षित झालेले तरुण राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी जातात. त्यांच्या नेमणुका सुध्दा होतात. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी हा जो प्रश्न उपस्थित केला त्या सगळ्या भागाचा विचार करता यातील काही यंत्रणा नगरपालिका हद्दीमध्ये, काही यंत्रणा महानगरपालिका हद्दीमध्ये आणि काही यंत्रणा ही नागरी एरियाच्या बाहेर ग्रामीण भागामध्ये सुध्दा उभी करावी लागणार आहे. ही यंत्रणा उभी करीत असताना नागरी भागाच्या संदर्भात नगरविकास विभागाचा निर्णय घेऊ शकतो परंतु बाकीच्या संपूर्ण राज्याकरिता अशा प्रकारचा एक स्क्वॉड तयार करावा,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

अशा प्रकारची एक ॲथोरिटी तयार करावी, अशी सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. त्यांची मागणी अत्यंत चांगली आहे. परंतु ती व्यवहारिकदृष्ट्या तपासून पहावी लागेल. ही ॲथोरिटी तयार करावयाची झाल्यास त्यासाठी लागणारी स्टेशन्स किती असावीत, त्यासाठी स्टाफ किती लागेल, तेथे इक्विपमेंट किती ठेवावी लागतील, या सर्व गोष्टींचा विचार करावा लागेल. काही नगरपालिकांना अनुदान देण्याचा विचार पुढे येऊ शकतो. त्यांना अनुदान द्यावे काय यावर विचार करावा लागेल. महानगरपालिकेमध्ये सध्या असलेल्या व्यवस्थेत अधिक वाढ करावी काय, ज्या ठिकाणी औद्योगिक क्षेत्र आहे त्यांच्याकडे असलेली व्यवस्था परिपूर्ण आहे काय हे पहावे लागेल. ज्या ठिकाणी अजिबात व्यवस्था नाही तेथे ही व्यवस्था निर्माण करता येईल काय, या सर्व गोष्टी बघणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी एका चांगल्या विषयाला वाचा फोडलेली आहे. हा विषय शासनाच्या चर्चेमध्ये निश्चितपणे राहील आणि या विषयाला न्याय देण्याबाबत व प्रत्यक्षात कृतीत उतरविण्याचा जरुर प्रयत्न केला जाईल.

श्री एस. क्यू. ज़मा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने अच्छा उत्तर दिया है.शहरीकरण ज्यादा होने की वजह से फायर की घटनाएं बढ़ती जा रही हैं. इसलिए सरकार के लिए भी यह बहुत चिंता का विषय है. मेरा कहना है कि नागपुर में नेशनल लेवल का मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर डिपार्टमेंट का एक नेशनल फायर सर्विस कॉलेज है. यह कालेज बहुत पुराना है. करीब दो-ढाई सौ करोड़ रुपए खर्च करके उसका नूतनीकरण भी किया जा रहा है. नागपुर में स्पोर्टस कॉम्पलेक्स के पास बहुत बड़ी योजना तैयार हो रही है. मेरा कहना है कि उस काम में जो अड़चनें आ रही हैं, उस बारे में सरकार को ध्यान देना चाहिए. वहां पर जो एनक्रोचमेंट हुआ है, उस बारे में वहां की नगरपालिका की ओर से उनको सपोर्ट नहीं मिल रहा है.

फायर सर्विस के लिए आपको ट्रेंड मॅन पावर चाहिए. इसलिए मेरा कहना है कि वहां पर अल्पावधि के कोर्स आप शुरु कर सकते हैं. इस तरह के कोर्स आप मुंबई में शुरु भी कर रहे हैं. अगर आपने शॉर्ट डयुरेशन के कोर्स शुरु किए तो उससे वहां के स्थानीय नौजवान जो कि होम गार्ड या सिविल डिफेंस सर्विस के लिए ट्रेंड हैं या जो अच्छे पढ़े-लिखे लड़के हैं, उनको

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री ज़मा ......

आप फायर सर्विस का शॉर्ट डयुरेशन का कोर्स करने की सुविधा उपलब्ध करा सकते हैं. ऐसा करने से ग्रामीण एरिया में फायर सर्विस के लिए ट्रेंड मॅन पावर आपको मिल सकती है. तीसरा मेरा प्रश्न यह है कि शहरों के अंदर जो बिल्डिंगें आ रही हैं, उनको अग्निशमन विभाग से वॅलिडिटी सर्टिफिकेट लेना पड़ता है. लेकिन वह सर्टिफिकेट बहुत ही बोगस ढंग से दिया जाता है. फायर की दृष्टि से जो सावधानियां वहां पर बरती जानी चाहिए, वे सावधानियां वहां पर बरती नहीं जाती हैं. उस बारे में थोड़ी सख्ती बरती जानी चाहिए और यदि आवश्यक हो तो उससे संबंधित कानून भी बनाया जा सकता है. हमारी माननीय सदस्या ने भी यहां पर कहा कि एक स्पेशल अथॉरिटी बनायी जानी चाहिए. उसकी देखरेख में यह काम होना चाहिए. मेरा यही कहना है कि नयी बिल्डिंगें फायर प्रुफ बनायी जानी चाहिए तथा आग बुझाने के सभी आधुनिक यंत्र वहां पर उपलब्ध होने चाहिए.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मुंबईत अनेक ठिकाणी आगी लागतात. मुंबईत मोठ्या प्रमाणात विकासाची कामे चालू आहेत. काही ठिकाणी 60 ते 115 मजल्यांचे टॉवर्स उभे राहत आहेत, मोठमोठे मॉल्स उभे राहत आहेत. बांधकामाबाबत शासनाचे व मुंबई महानगरपालिकचे नियम अस्तित्वात असतानाही ते नियम पाळले जात नाहीत. मुंबईत फायर ब्रिगेडची व्यवस्था परळ, भायखळा व गोरेगाव येथे आहे. मुंबईतील वाढती लोकसंख्या विचारात घेता ज्या प्रमाणात फायर ब्रिगेडची व्यवस्था असावयास पाहिजे तेवढी व्यवस्था उपलब्ध नाही असे आतापर्यंत लागलेल्या आगींच्या घटनांवरुन दिसून येते. विकासाच्या कामांवर करोडो रुपये खर्च केले जात आहेत. त्यामुळे फायर ब्रिगेडच्या व्यवस्थेवर शासनाने किंवा मुंबई महानगरपालिकेने खर्च करण्यापेक्षा मोठे टॉवर्स, मॉल्स असतील त्यांनी फायर ब्रिगेडची व्यवस्था केल्यानंतरच त्यांना बांधकामाची परवानगी दिली पाहिजे. झोपडपट्टयांमध्ये मोठ्या प्रमाणात आगी लावल्या जातात असा संशय आहे. काही वेळा त्या आगींना नियंत्रणात आणणे शक्य होत नाही. या मुद्यांबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी सुचविल्याप्रमाणे एक ॲथोरिटी निर्माण करण्याबाबत मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. अग्निशमन दलांमध्ये अनेक पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे पुढील 2-3 महिन्यांमध्ये भरण्याची मोहीम हाती घेतली जाईल काय, परदेशामध्ये प्रत्येक 13 मजल्यानंतर ड्राय एरिया सोडणे बंधनकारक असते. विकासकाला त्या जागेवरील फ्लॅट विकता येत नाहीत. त्याचे कारण असे की, जर दुर्घटनेमुळे त्या लोकांना फ्लॅट रिकामे करण्याची वेळ आली तर तेथे येऊन त्या मजल्यावरुन त्यांना हलविले जाते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:25

डॉ. नीलम गो-हे.....

मुंबई, पुणे आणि नागपूर या शहरामध्ये उंच-उंच इमारती उभ्या रहात आहेत. त्या इमारतीमधील 13व्या मजल्याचा सुरक्षिततेसाठी वापर करण्याचे बंधन घालण्यात येणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा यांनी तीन प्रश्न विचारले. इंडियन फायर सर्व्हिसेसकडून मदत घेण्याचा प्रयत्न केला जाईल का असा त्यांचा पहिला प्रश्न होता. त्या बाबतीत निश्चितपणे प्रयत्न केले जातील. शॉर्ट डयुरेशन कोर्सेस संबंधीचा त्यांचा दुसरा प्रश्न होता. मघाशी मी सांगितल्या प्रमाणे आपल्या अग्निशमन दलामार्फत 6-6 महिन्याचे ट्रेनिंग देण्याच्या संदर्भात माहिती घेऊन त्या पध्दतीचे कोर्सेस सुरु करण्याचे प्रयत्न केले जातील.

सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी मुंबईमध्ये उंच इमारती आणि मॉल्स यामध्ये दुर्घटना घडू नयेत म्हणून कोणती काळजी घेणार आशी विचारणा केली. ही गोष्ट खरी आहे की, आता 5, 60, 70 मजल्यांच्या इमारती आणि मॉल्स तयार व्हायला लागले आहेत. महानगरपालिकेची यंत्रणा ठराविक उंची पर्यन्त जाऊन आग विझविण्याचा प्रयत्न करते. नवीन नियमावली प्रमाणे अशा उंच इमारतींना त्यांची स्वत:ची आग प्रतिबंधक यंत्रणा स्वतंत्रपणे तयार करावी लागते. ती यंत्रणा तयार केल्यानंतरच त्यांना परवानगी दिली जाते. तसेच दर 6 महिन्याने नगरविकास विभागामार्फत, अग्निशमन दलामार्फत याची तपासणी केली जातो. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी विचारणा केली की, मोठ्या इमारतींना परवानगी देत असताना जसे परदेशामध्ये 13वा मजला सुरक्षेसाठी रिकामा ठेवून दुर्घटना घडली तर नागरिकांना सुरक्षेच्या दृष्टीने प्रथम तेथे हलविले जाते आणि नंतर त्यांना खाली उतरविले जातो, तशा प्रकारची व्यवस्था करण्याबाबत बंधन घालण्यात येईल का ? तशा प्रकारची व्यवस्था करण्यासंबंधी डीसी रुल्समध्ये तरतूद करण्याबाबत नगरविकास विभाग पुढाकार घेईल.

**तालिका सभापती** : अधा-तास चर्चा संपली आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:25

तालिका सभापती....

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे.उद्या मंगळवार, दिनांक 17 एप्रिल 2012 रोजी सकाळी 10 ते 11.30 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीत अल्पकालीन चर्चा होतील. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 28 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 17.04.2012 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

----

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही